

# निरगाठ सुरगाठ

डॉ. तारा भवाळकर

# निरगाठ–सुरगाठ

डॉ. तारा भवाळकर

आकांक्षा प्रकाशन, नागपूर

निरगाठ–सुरगाठ
Nirgath-surgath
तारा भवाळकर
Dr. Tara Bhawalkar
३, स्नेहदीप,
आंबेडकर मार्ग, सांगली.
(०२३३) २३७३३२६
प्रकाशन क्र. ८०

प्रथमावृत्ती : १५ ऑक्टो. २०१०

प्रकाशक : अरुणा सबाने
आकांक्षा प्रकाशन
ए–५०६, गणेश गौरी
अपार्ट.,कोतवालनगर, नागपूर–१५
(०७१२) २२४७८८४,
९९७००९५५६२
email :
aruna-sabane@rediffmail.com
आयबीएन–८१–९०३७१६–८–३

मुद्रक :
अंकुर एन्टरप्रायजेस, नागपूर

अक्षरजुळवणी :
संजय नेमाडे

मुखपृष्ठ :
माधव लोखंडे
प्रा. पुरुषोत्तम माळोदे

किंमत : एकशे साठ रुपये

२१ व्या शतकात आपल्या अंतरोर्मींनी
भरारी घेऊ पाहणाऱ्या,

चि. सुमेधा, चि. शुभांगी
चि. मंजिरी, चि. मीनल
चि. नेहा, चि. विष्णुप्रिया
आणि
चि. आनंद – या माझ्या लाडक्या भाचरांना

उदंड शुभेच्छांसह –

मावशी/आत्या

# अनुक्रमणिका


प्रास्ताविक
१. सरस्वतीचा कोप? ०७
२. कहाणी भुकेल्या सुनेची १०
३. हिमालय चढा, पण... १५
४. गाना आये ना आये... २०
५. सुंदर मुली २५
६. औषध न लगे मजला २९
७. सती, सवत आणि चेअरमन ३३
८. कुटुंब व्यवस्था : थोडे मुळाकडे ३५
९. जननी आणि माता ४०
१०. पुरुषी दहशतवाद ४४
११. महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रीची वाटचाल ५०
१२. नवसहस्त्रक : परंपरा आणि परिवर्तन ५६
१३. चिंताजनक परिवर्तन ६१
१४. मध्यमवर्गीय स्त्री : एक सिंहावलोकन ६५
१५. बदलते कुटुंब ७५
१६. एका व्यक्तीचे कुटुंब ८२
१७. अपघात : कधी असे कधी तसे ८७
१८. स्त्री शिक्षण आणि समाज सुधारणा ९१
१९. कुंपणावरून ९५
२०. अक्षर दिवाळी ९८
२१. मातृत्व : पुनर्विचार १०३
२२. पायवाटेची रंगरूपे १०७
२३. एक अवघड वळण १११
२४. कडू करंजाचं झाड ११४
२५. कळतं पण वळत नाही ११९
२६. तारुण्य : तेव्हा आणि आता १२४
२७. घरची अर्थमंत्री १३२
२८. असेही अनुभव १३६

# थोडी पार्श्वभूमी

गेल्या पंधरा-वीस वर्षांतील निवडक लेखांचा हा संग्रह आहे. म्हणजे विसाव्या-एकविसाव्या शतकांच्या सीमारेषेवरचे हे लेखन आहे. काळाचा आवर्जून उल्लेख करायचं कारण असं की, या सर्व लेखनाला सामाजिक संदर्भ आहे आणि सामाजिक अनुभव अपरिहार्यपणे स्थळ-काळाशी, परिसराशी बांधलेले असतात. हे लेखन प्रामुख्याने स्त्री-केंद्री आहे. म्हणून स्थल-कालसंदर्भांचा उल्लेख केला. कारण काळ जसजसा पुढे सरकतो तसे सामाजिक संदर्भ बदलतात. आजचे 'ताजे' उद्या 'शिळे' - कालबाह्य झाले असे वाटते. 'काळ बदलला आहे. आता कुठे जुन्या समस्या राहिल्या आहेत? स्त्रिया बदलत आहेत. स्त्रीवरील बंधने तर आता इतिहासजमा झाल्यासारखी आहेत,' असे म्हटले जाते. यात अगदीच तथ्य नाही असे नाही. पण सर्व 'बंधने' ही केवळ वरवरची, शब्दांतून व्यक्त होण्याजोगी असतातच असे नाही. समाजाच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या जडणघडणीत ती तयार होत गेलेली असतात. काही अज्ञात असतात, वर वर पाहता सगळीच पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतून आलेली नसतात हे खरे असले तरी बहुतेकवेळा कळत-नकळत ती तशी असतात. बाह्यत: बदल झालेले दिसले तरी एकूणच समाजाच्या... स्त्री-पुरुष दोघांच्याही अंत:स्तरात अभावितपणे ती निरगाठीसारखी घट्ट रुतलेली असतात. निरगाठीची सुरगाठ आणि सुरगाठीची उकलगाठ होण्याची प्रक्रिया ही समाजमनाबाबत खूप मंदगतीने होत असते. म्हणूनच शतकांचे आकडे बदलले तरी काही समाजमानसबंध आदिमतेपर्यंत रुतून बसलेले असतात. हे सर्वच काही जाणीवपूर्वक होते असे नाही, जाणीव-नेणिवेच्या सीमेवर समाजमन आणि म्हणूनच व्यक्तिमनही रेंगाळत असते.

म्हणूनच अनेक घटिते (facts) जुनी असूनही नवी असतात. कालही असतात, आजही असतात. त्यातील जाचक भाग उद्या तरी नसावा असे वाटते. अशा उलट-सुलट संमिश्र मानसिकतेतून प्रसंगपरत्वे हे लेखन होत गेले. सर्वसामान्य स्त्रिया अनेकदा काही बाबी स्व-गत बोलायलाही घाबरतात, संकोचतात, त्यातील

काही शब्दातून प्रकट करण्याचा हा थोडासा प्रयत्न आहे.

हे सर्व लेखन नियतकालिकांच्या सदर लेखनाच्या गरजेतून प्रामुख्याने झाले आहे. काही अन्य निमित्ताने झाले आहे. त्यामुळे काही मर्यादा आल्या आहेत. तरी त्या त्या विषयापुरता तो लेख/टिपण स्वयंपूर्ण आहे.

'सकाळ' सप्तरंग पुरवणी, तरुण भारत (बेळगाव) अक्षरयात्रा पुरवणी, 'जनस्वास्थ्य' (सांगली) या नियतकालिकांनी आवर्जून सदर लेखनासाठी निमंत्रित करून ते प्रथम प्रकाशित केले याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

स्त्रीविषयक लेखन म्हणजे केवळ स्त्रियांनीच लिहिण्या-वाचण्यासाठी असते, या (अप) समजातून बाहेर येऊन सुजाण असलेल्या आणि सुजाण होऊ पाहणाऱ्या सर्वच स्त्रीपुरुषांनी ते वाचावे; कारण जन्मापासून आपण सर्व स्त्री-पुरुष विविध नात्यांनी बांधलेले असतो. म्हणून समाजातला कोणताही प्रश्न केवळ स्त्रियांचा वा पुरुषांचा सुटा नसतो. ते एकमेकांशी बांधलेले असतात. म्हणून सर्वांचीच समज जशी विकसित होत जाते तसे जगणेही सहज स्वास्थ्यमय होऊ शकते. सुटा विचार हा एकूणच विचार-आचाराचा पैस विस्तारण्याच्या सोयीचा एक भाग असतो. तो सवता-सुभा नसतो. निदान आता एकविसाव्या शतकात आपण सर्वांनी असा विचार करायला हरकत नसावी. अर्थात हे केवळ या पुस्तकापुरते नाही.

याच पुस्तकापुरते बोलायचे तर किमान ते वाचावे. आवडणे-न आवडणे, पटणे-न पटणे हा पुढचा भाग. ते प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित आहेच, असो.

'आकांक्षा' शीर्षकाला साजेशा प्रवृत्तीने प्रकाशन संस्थेचे शिवधनुष्य पेलणारी माझी मैत्रीण अरुणा सबाने हिने आणि 'आकांक्षा' परिवाराने तत्परतेने पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी घेतली, त्याबद्दल मन:पूर्वक आभार!

डॉ. तारा भवाळकर
३, स्नेहदीप/आंबेडकर रोड,
सांगली-४१६४१६

# सरस्वतीचा कोप?

"तुम्ही मला उगीच भलते सलते काही करायला सांगू नका. मी करणार नाही."

"अग, पण यात भलते सलते काय आहे? तुझ्यासाठी मुद्दाम पुण्याहून पुस्तके आणि प ाटी आणली आहे. या सुट्टीत तुला लिहायला, वाचायला शिकवायचे ठरवूनच मी आलो आहे."

"मला असले काही करून माझे नुकसान करून घ्यायचे नाही."

"यात कसले नुकसान आहे? पुण्या-मुंबईच्या बायका नाही का शिकत?"

"त्यांचे मला सांगू नका. त्यांना विधवा व्हायचे असेल..."

ह्या आशयाचा संवाद विसाव्या शतकाच्या आरंभी पुढे काँग्रेसचे मोठे नेते झालेले बेळगावचे गंगाधरराव देशपांडे आणि त्यांच्या पत्नीमध्ये झालेला आहे. गंगाधररावांनी खोदून खोदून विचारल्यावर बाईंनी सांगितले होते की, बायका जर लिहाय-वाचायला शिकल्या तर सरस्वतीचा कोप होतो आणि त्यांना वैधव्य येते. ही त्या काळातील समस्त स्त्रीवर्गाच्या मनात असलेली धारणा बाईंच्या मनात पक्की होती.

सरस्वतीदेवी स्वत:च स्त्री असून तिच्या हातात पुस्तक आहे. ती लिहिते-वाचते म्हणून ती विद्येची देवता आहे. मग लिहिणाऱ्या-वाचणाऱ्या स्त्रीला ती असा वाईट शाप कसा देईल? अशा तार्किक युक्तिवादांना बाईंनी अजिबात दाद दिली नाही. त्यांच्या मनाच्या तळात असलेली भीती गंगाधररावांना दूर करता येणे कठीण झाले.

तरीही अशा प्रकारच्या पारंपरिक, मानसिकतेशी सुधारक धडका देतच राहिले. पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी हे बऱ्याच आधी घडले. उर्वरित महाराष्ट्रात आणि यंत्रयुगीन नवयुगाच्या सुधारणांच्या प्रारंभपर्वात कर्नाटकसारख्या दूरच्या प्रदेशात, स्त्री शिक्षणासारख्या सुधारणा पोचायला वेळ झाला. समाजाची आणि

खुद्द स्त्रियांची मानसिकता बदलणे कठीण गेले. तरी काळाच्या रेट्यात तेही झालेच. स्त्रिया लिहू-वाचू लागल्या.

शहरी नोकरपेशा कुटुंबात मुलीचे शालान्त परीक्षेपर्यंतचे शिक्षण ही विसाव्या शतकाच्या प्रथमपर्वात सहज बाब होऊ लागली होती. पदवी शिक्षण ही अजून अपूर्वाईची बाब होती.

शहरी नोकरीपेशा शिक्षित तरुणांना आपली पत्नी शिक्षित असावी, असे वाटू लागले. म्हणून खरे तर मुलींच्या शिक्षणाचा रेटा थोडा वाढला. तरी पदवीधर तरुणाला पदवीधर पत्नी काही परवडत नव्हती. तरुण मुलांचे शिक्षणाचे प्रमाण जसजसे वाढले तशी पदवीधर तरुणींची लग्नाच्या बाजारात मागणी वाढली. म्हणजे स्त्री शिक्षणाची गरज ही स्त्रीच्या केवळ लग्नाच्या गरजेतून सिद्ध होत राहिली. पुरुष शिकला म्हणून त्याला शिक्षित स्त्री हवीशी वाटू लागली. स्वाभाविकच ज्या समाजस्तरातले पुरुष ज्या प्रमाणात आणि ज्या दर्जाचे शिक्षण घेऊ लागले, त्या प्रमाणात त्या समाजातील स्त्रियांची संख्या आणि दर्जा वाढला. आजही हेच चित्र सर्वत्र दिसते.

विसाव्या शतकाच्या मध्यावरचे आणखी एक उदाहरण! उच्च शिक्षित तरुणाने मोठ्या उत्साहाने पदवीधर तरुणीशी विवाह केला. विवाहापूर्वी मोठ्या हौसेने तो तिच्याशी राजकीय, सामाजिक, साहित्यिक विषयांवर चर्चा करी. दोघेही खूप आनंदाने विवाहबद्ध झाले आणि वर्षभरातच चित्र बदलले. आता पत्नी एखाद्या विषयावर बोलू लागली की, तो हटकून तिला गृहकृत्याची आठवण करून देई. तिचा मुद्दा उपेक्षेने दुर्लक्षित करी. विवाहापूर्वी मोठ्या कौतुकाने आपल्या मित्रांसह तिच्याशी गप्पागोष्टी करणारा आणि अभिमान मिरवणारा नवरा आता तेव्हाच्या एखाद्या मित्राशी ती बोलू लागली की, तिचा हटकून अपमान करू लागला, ती गोंधळून गेली. तिला काही कळेनासे झाले. आपल्या नवऱ्याचे नक्की खरे रूप कोणते? लग्नापूर्वीचे की लग्नानंतरचे?

आणि तिच्या अचानक लक्षात आले की, त्याला शिकलेली बायको हवी होती हे खरे! पण तिच्या बुद्धिमत्तेचे सार्थक व्हावे म्हणून नव्हे तर आपल्या प्रतिष्ठेच्या अनेक बाबींपैकी एक बाब म्हणून! चांगले घर, फर्निचर तशी दिसायला चांगली, शिवाय पदवीधर म्हणून मिरवायला, मित्रांमध्ये प्रतिष्ठेची एक बाब म्हणून स्वत:चे मोठेपण सिद्ध करायला! हे तिच्या ज्या क्षणी लक्षात आले त्या क्षणी ती मनातून मोडूनच गेली. ती 'ही' म्हणजे मालतीबाई बेडेकर यांच्या कादंबरीची नायिका 'शबरी!' नावही तिचे लक्षणीय. कलियुगातील उपेक्षिता 'शबरी'!

तरीही स्त्री शिकतच राहिली, शिकता शिकता स्वत:ला घडवीत राहिली आणि एकविसावे शतक उजाडले आणि परवाच एक हकीकत वाचली. एका वकिलाने आपल्याबरोबरच्या एका बुद्धिमान वकील मुलीशी विवाह केला. उदारमतवादाचा सगळा व्यवहार अनुभवून ती हुरळून गेली. बरोबर प्रॅक्टिस सुरू झाली. चर्चा, कोर्टात केस लढवणे, नवऱ्याचे केस हरणे, हिचे केस लागोपाठ जिंकणे त्याचेही कौतुक झाले. आणि हे जेव्हा पुन:पुन्हा होऊ लागले तेव्हा त्याने तिला घरात बंदिस्त करून टाकले, बाहेरच्या जगाशी, माहेरशीही फोनसंपर्क सुद्धा तोडून टाकला. केवळ नजरकैद! कोणतेही स्पष्टीकरण न देता.

पुढचे सगळे रामायण सांगत नाही, तिची सुटका अशीच कोणाच्या तरी दयेने झाली; पण नवऱ्याच्या या विक्षिप्त वागण्याचे कारण कळले ते मात्र उद्वेगजनक आहे.

'स्वत:ला शहाणी समजणारी, शिकलेली बाईही शेवटी मी गुलामासारखीच वागवू शकतो, हे सिद्ध करण्याची पैज म्हणे त्याने मित्रांबरोबर लावली होती.

एकूण स्त्री शिक्षणही अखेरपर्यंत या 'व्यवस्थेची सोय' म्हणूनच राहणार? मुद्दाम गेल्या शंभर वर्षातली ही तीन उदाहरणे दिली आहेत. काय समजायचे यातून?

तरीही भविष्यात पुरुष-मानसिकता बदलेल असा आशावाद बाळगूया.

# कहाणी : भुकेल्या सुनेची

**आ**मच्या लहानपणी आमची आजी एक गोष्ट सांगायची. एका मुलीचं लग्न होऊन ती सासरी गेली. रीतीप्रमाणे मुलीला सासरी कसं वागायचं याची शिकवण तिच्या आईनं दिली होती. "सर्वांची जेवणं झाल्याशिवाय सासुरवाशिणीनं जेवू नये. उरलं-सुरलं असेल तेवढंच खाऊन भूक भागवावी. घरातली सगळी कामं बिनबोभाट करावीत." सगळ्याच मुलींच्या आया पिढ्यान्‌पिढ्या मुलींना हीच शिकवण देत आल्या आहेत. मुलीच्या सासूलाही बरं वाटलं की निदान हिच्या आईची शिकवण चांगली आहे.

काही दिवस सासू-सुनेचा नवा संसार लागी लावून देण्यासाठी तिच्या घरी राहिली. सून कामाला वाघीण होती. सगळं काम नीटनेटकं वेळेवर करायची. नवऱ्याला सासूला आधी जेवण वाढायची. तिच्या रुचकर स्वंपाकावर दोघे ताव मारायचे. पण तिला काही उरलं आहे की, नाही याची मुळीच फिकीर करायचे नाहीत. सून आपली जे उरलं असेल ते खाऊन रहायची; पण तिची भूक काही भागायची नाही. वाढतं वय, कामाचा ताण यात तिची उपासमार व्हायला लागली. पण सासूची मर्जी तिच्यावर बसली. तिने घराचा कारभार सुनेवर सोपवला आणि ती काही दिवसांसाठी दुसऱ्या सुनेकडे गेली. ही सून बिचारी अशक्त होऊन गेली. ही उपाशी रहात असेल असं नवऱ्यालाही वाटेना. तोही रोज ती करेल तेवढ्या पदार्थांचा चट्टामट्टा करू लागला. ती उरेल तेवढंच खात राहिली.

पाणवठा ही सगळ्या सासुरवाशिणींची मोकळेपणाने मन मोकळं करायची जागा. एकदा भुकेने अगदी कासावीस झालेली ही सून मैत्रिणींजवळ ढसढसा रडली. तशा सगळ्या वाढत्या पोरवयाच्याच या मुली. प्रत्येकीची अवस्था थोड्याफार फरकानं हीच होती. सुनेला जणु अर्धपोटीच ठेवायचं असतं, असा तमाम सासवांचा समज होता आणि ही घरगुती बायका-बायकांमधली बाब आहे.

आपण पुरुष माणसांनी त्यात लक्ष घालायचं नसतं. तसं केलं तर आपल्या पुरुषीपणाला उणेपणा येईल, असा काहीसा नवरे लोकांचा समज असावा किंवा बायकांना पोटभर खायला लागू शकतं याचं भानच त्यांना नसे की काय कोण जाणे! पण सगळ्याजणींचं दु:ख एकच होतं. दिसायला किरकोळ पण असायला मोठं.

मग एकेकजणी त्यातूनही मार्ग काढून आपली भूक भागवण्याचा प्रयत्न करायच्या. त्यांच्या युक्त्याही एकाचढ एक असायच्या. पण प्रत्येकजण घरातल्या भाकरी-चटणीची या ना त्या प्रकारे चोरी करायच्या. कोणी इतरांना वाढताना लुगड्याच्या ओच्यात एखादी अर्धी भाकरी टाकायच्या. कोणी गडीमाणसांना दिलेल्या भाकरीतली भाकरी चोरायच्या तर कोणी कुत्र्याला घालायला किंवा भिकाऱ्याला वाढायला दिलेल्या भाकरीतून कमिशन काढायच्या. करणार काय? शेवटी 'पापी पेटका सवाल' होता ना!

आजी गोष्ट सांगताना एकेका सुनेच्या भाकरी चोरण्याच्या तऱ्हा अगदी रंगवून सांगायची.

एक सून मात्र मोठीच युक्तिबाज होती. थोरामोठ्या घरची असूनही का कोण जाणे पण तिलाही पोटभर जेवण मिळत नसे. मग ती काय करायची? भाकरी-पोळीसाठी पीठ मळलं की कुणाचं लक्ष नाही असं पाहून एक भला मोठा ऊंडा (गोळा) चुलीतल्या जाळाखाली राखेत खुपसून ठेवायची. सगळा स्वयंपाक करायचं काम तिचंच होतं. त्यामुळे अधून मधून तो ऊंडा खालीवर करून खरपूस भाजून काढायची. सगळ्यांची जेवणं होऊन दुपारी सगळे वामकुक्षीला आराम करायला गेले की तो ऊंडा ती परातीत घेऊन मोकळा करायची. त्यात बचकभर गूळ तूप घालून मळायची आणि धुणं धुवायला म्हणून पाणवठ्यावर जाताना लपवून बरोबर घेऊन जायची. सगळ्या सासुरवाशिणी सुना मग लपवून- छपवून चोरून आणलेलं खाणं झाडाखाली बसून खायच्या आणि घरी जायच्या. त्यामुळं पहाटेपासून कामाचा धबडगा असूनही सुनांना भर उन्हात नदीवर धुणं धुवायला जायचा उत्साह का असतो, ते कधीच कुणाला कळायचं नाही आणि सगळ्याच समदु:खी असल्यानं चहाडी तरी कोण कुणाची करणार?

सुनांची परवड सांगताना आमची आजी अगदी तद्रूप होऊन जायची. जणु काही ती आपलीच कथा सांगते आहे, असं वाटायचं.

अशाच सुनांच्या गोष्टींच्या मालिकेत आणखी एक कथा होती. तिची सासू फार म्हणजे फारच खाष्ट होती आणि ती दिवसभर घरकामात तिचा पिट्टा पाडत असे. दुपारी सगळ्या गावच्या सुनांबरोबर पाणवठ्यावर धुणं धुताना एकमेकींशी

बोलून जो विरंगुळा त्यांना मिळत असे, तोही तिला बिचारीला मिळत नसे.

अगदी करकरीत तिन्हीसांजा पार उलटून गेल्या की अंधारात तिची सासू तिला नदीवर पाठवायची, तिला एकटीला भीती वाटायची, भुकेने आतडी कुरतडत असायची; पण नाईलाज म्हणून ती जायची.

एकदा तर ती भुकेने खूपच व्याकुळ झाली. थकून ती वेशीवरच्या मारुतीच्या देवळात जरा टेकली. तर मारुतीपुढे कुणीतरी कणकेचे दिवे लावून शेजारी कणकेचे मुटके ठेवले होते. दिव्यातलं तेल संपत आलं होतं. भुकेची आगच इतकी भयंकर होती की तिनं ते कणकेचे दिवे, मुटकुळी उचलली आणि नदीकाठच्या स्मशानात एक प्रेत जळत होतं, सरळ तिथं गेली. प्रेताच्या कडेच्या निखाऱ्यातच तिने मुटके भाजले आणि खाल्ले. नदीचे पोटभर पाणी प्याली तेव्हा कुठं तिला बरं वाटलं. मग तिचा हा रोजचाच क्रम झाला. तिला तेवढं का होईना, नियमित खायला मिळू लागल्यानं तिच्या चेहऱ्यावर जरा तुकतुकी दिसू लागली. सासूला तिचा संशय आला. तिने तिचा पाठलाग केला आणि मारुतीच्या देवळातले दिवे-मुटके चक्क प्रेताच्या निखाऱ्यावर भाजून खाणारी सून पाहून ती भयचकित झाली. ही सून माणूस नसून प्रेते खाणारी लाव-भूत आहे म्हणून तिचा बोभाटा केला आणि कोणत्याही जुन्या गोष्टीचा शेवट अघोरी कृत्य करणाऱ्या बाईला दिलेल्या शिक्षेने होतो, तसाच झाला. लोकांनी त्या बिचाऱ्या सुनेचे नाक-कान कापून तिला गावाबाहेर हाकलून दिलं. मला मात्र त्या सुनेबद्दल अपार कळवळा वाटत राही.

आजीची गोष्ट इथे संपत असे. पण आता या आणि अशा सगळ्या जुन्या गोष्टी कथा, दंतकथा ऐकताना वेगळेच विचार मनात येतात.

समाजात जे सार्वत्रिक घडत असतं, त्याचंच प्रतिबिंब लोककथांमध्ये उमटत असतं. याचा अर्थ असा की उपासमार होणाऱ्या सुना ही बाब काही फक्त करमणुकीखातर घडलेल्या गोष्टीत नव्हती, तर ते जीवनातलं वास्तव होतं.

एकीकडे ''अन्न हे पूर्णब्रह्म ।'' म्हणून अन्नाला सर्वश्रेष्ठ स्थान आमच्या संस्कृतीत आम्ही देतो, याचा अभिमान बाळगला जातो. अन्नदान हे महादान मानलं जातं. मग कुटुंबातल्या स्त्रियांना मात्र अन्नग्रहणाबाबतीत उपेक्षित का बरं ठेवलं जात असावं? आधी साधं पोटभर अन्न नाही मग ते जीवनसत्वयुक्त किंवा चौरस आहार वगैरे असणं तर दूरच.

कोणी म्हणेल, या सगळ्या जुन्या गोष्टी झाल्या, आता काही असे होत नाही. पण हेही खरे नाही. जगाच्या पाठीवरच्या सगळ्या तिसऱ्या-विकसनशील म्हणवल्या जाणाऱ्या देशातल्या कुपोषणग्रस्त व्यक्तींमध्ये स्त्रियांचे आणि (म्हणूनच)

बालकांचे प्रमाण सर्वाधिक असते.

अगदी मध्यमवर्गीय स्तरामध्येही स्वत:च्या आहाराविषयी दक्ष असणं म्हणजे काहीतरी अपराध आहे, अशीच भावना बायकांमध्ये असते. त्यामुळे काही कारणामुळे घरात पुरुष व मुले नसतील तर ''बायकांना कशाला भाजी?, दूध?, दही?'' आपलं पोटभरीपुरतं काहीतरी खायचं! अशीच रीत दिसते. कोणी जर तसं वागत नसेल तर आपल्या आहाराबाबत दक्ष असलेली स्त्री ही 'स्वार्थी' म्हणून टिंगल-टवाळीचा विषय ठरते.

स्त्रियांच्या आहाराबाबत हा नकारात्मक आणि उपेक्षेचा दृष्टिकोन आजही भारतात तरी सार्वत्रिक दिसतो. त्यातल्या त्यात गरोदरपणात आणि बाळंतपणात तिला थोडं-फार पौष्टिक अन्न मिळतं. तेही तिच्या पोटी येणारा/आलेला 'तथाकथित', 'वंशाचा दिवा' सुदृढ बनावा म्हणूनच. इतकं करूनही तिने मुलीला जन्म दिला तर दोघींचीही उपेक्षा सुरू होते. मुलगाच व्हावा म्हणून पुन्हा पुन्हा बाईला बाळंतपणाला सामोरे जावे लागते आणि पुन्हा जर मुलगी झाली तर अनेकदा तिला साधे जेवणही घरातून पोचवले जात नाही. दवाखान्यातल्या इतर बायका, परिचारिका आणि कधीकधी खुद्द डॉक्टर आपल्या घरून खाद्यपदार्थ आणवून त्या बाईला देत असल्याच्या घटना मी माझ्या अनेक डॉक्टर मैत्रिणींकडून ऐकल्या आहेत. जणु काही बाईला स्वतंत्रपणे जीव नसतोच. ती घरकामाला किंवा मुले जन्माला घालायला उपयुक्त असेल, तरच तिची काळजी घ्यायची. ही वृत्ती अनक्षर समाजातच नव्हे तर शिक्षितातही अनेकदा आढळते. असे का व्हावे?

स्त्रीचे एकूणच जीवनातले दुय्यम स्थान हे एक महत्त्वाचे कारण आहेच. हे दुय्यमत्व स्त्रियांच्या मनातही खोलवर रुजलेले आहे. त्यातून शिक्षित स्त्रीही पूर्णपणे बाहेर येऊ शकत नाही.

स्त्रियांच्या क्षेत्रात काम करणारी एक मैत्रीण परवाच भेटली. एका पाहणीत त्यांनी एक मजेशीर निष्कर्ष काढला आहे. दुसरीकडे तो तेवढाच गंभीरही आहे. ''स्त्रियांच्या हाती खऱ्या अर्थाने अर्थसत्ता किती आहे?'' या प्रश्नाचा शोध या गटाने अनेक अंगांनी घेतला आहे. समाजाच्या सर्व स्तरात विविध प्रश्न त्यांनी स्त्रियांना विचारले, तेव्हा 'स्त्री सत्ता आणि घरातील दूध यांचा फार जवळचा संबंध भारतीय कुटुंब व्यवस्थेत आढळला. म्हणजे असे की घरात गुरे असतील तर त्यांची देखभाल करणे, दूध काढणे येथपासून दुधाचे ताक, लोणी, तूप बनवणे, त्यांची विक्री करणे हे सर्व व्यवहार प्रामुख्याने स्त्रिया करतात. गुरे नसतील तरीही गवळ्याकडून दूध घेण्यापासूनचे पुढचे सगळे सोपस्कार ही फक्त

बाईचीच जबाबदारी असते. मात्र यातल्या अगदी थोड्या बायका जवळ जवळ नगण्य बायका नित्यनियमाने आपल्या आहारात दुधाचा किंवा दुधाच्या पदार्थांचा समावेश करताना आढळल्या. नित्यनियमाने घरातल्या मुलांना (मुलींना नव्हे) आणि पुरुषांना आवर्जून दूध दिले जाते. मात्र घरात भरपूर दूध असले तरी ''तुम्ही रोज पेलाभर दूध घेता का?'' या प्रश्नावर ''हा कसला विपरित प्रश्न?'' (बायका कुठं रोज दूध पितात कां?) अशीच उलट प्रतिक्रिया बहुतेक ठिकाणी मिळाली असे शोधकर्त्यांनी आवर्जून नोंदवले आहे. वृद्ध पतीपत्नी असतील तर पत्नी पतीला आवर्जून दूध देते, पण स्वत: घेत नाही. बहुतेक ठिकाणी तो वृद्ध पतीही 'तू दूध घे' असे पत्नीला म्हणत नाही. अनेक बायकांना हा प्रश्नच 'विचित्र' वाटला.

वरवर दिसायला गोष्ट अगदी साधी आहे. स्त्रियांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असते. परिणामी रक्तक्षयाचे (ॲनिमिया) प्रमाण ही जास्त असते, हे निष्कर्ष आता सर्वज्ञात आहेत. दारिद्र्य हे कुपोषणाचे खूप मोठे कारण आहे, हेही खरे आहे. मात्र अनेक सुस्थितीतल्या, मध्यमवर्गीय, तथाकथित शिक्षित कुटुंबातही असे का व्हावे?

स्त्रीकडे पाहण्याचा उपेक्षेचा संस्कार इतका खोलवर रुजला आहे की स्त्रियाच त्या वृत्तीच्या 'बळी आणि वाहक' (व्हिक्टीम ॲण्ड एजंट) झालेल्या आहेत. आपले दागदागिने, कपडेलत्ते या बाह्य शृंगाराकडे वाजवीपेक्षाही जास्त लक्ष देण्यात स्त्रियांना आणि पुरुषांनाही यात काही विपरित वाटत नाही. उलट अभिमान वाटतो. पण स्त्रीच्या आहाराबाबत दक्ष असणे हे 'स्वार्थी'पणाचे वाह्यातपणाचे वाटते. हा दृष्टिकोनच चुकीचा नव्हे का?

अघोरी उपास-तापास व्रते करणे, हीही जणू स्त्रियांचीच जबाबदारी! वर्षानुवर्षे अशा अनियमित आहाराचा, उपवासाचा परिणाम स्त्रियांच्या आरोग्यावर पिढ्यान्‌पिढ्या होत आला आहे.

स्त्रियांच्या आहाराबाबत स्त्रियांनाच सजग करणं, प्रबोधित करणं ही एक महत्त्वाची गरज आहे. काय, केव्हा आणि किती आहार घ्यायचा याचे पुस्तकी पाठ स्त्रियांना शाळा-कॉलेजात बरीच वर्षे मिळत आहेत. त्याचबरोबर त्यांची अंमलबजावणी इथून पुढे विनासंकोच, अपराधीपणाची भावना न बाळगता केली तरच आजीने सांगितलेल्या भुकेल्या सुनांची कहाणी खऱ्या अर्थाने सुफळ संपूर्ण होईल आणि कुटुंबात सर्व अर्थाने आरोग्य आणि आनंद नांदेल.

# हिमालय चढा पण...

"तुम्ही येणार हे आम्हाला आज सकाळी समजलं. नुसतं आपलं, "तुमचा - 'तुमचा' हं.. म्हणजे बायकांचा मेळावा आहे." एवढंच आम्हाला सांगितलं होतं. मेळावा कशासाठी? कोण येणार आहे? आम्हाला काही माहीतच नव्हते."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्तच्या एका मेळाव्यातला हा प्रसंग. काही कार्यकर्ती मुलं आली होती बोलवायला. तेव्हाही मी त्यांना म्हटलं होतं की, "तुमच्या मंडळात कोणी स्त्रिया-मुली नाहीत का?" तुमच्या आसपास बऱ्याच शिक्षित मुली माझ्या विद्यार्थिनीही आहेत. त्यांना का नाही मंडळात घेत?" यावर कार्यकर्त्या मुलांनी, "फार गडबड झाली कार्यक्रम ठरवताना..." वगैरे सारवासारव केली. एकजण म्हणून गेला, "बायकांचं स्वतंत्र महिला मंडळ आहे ना! आमच्या मंडळात मग पुन्हा...?" "कशाला बायका?" - असं त्याला म्हणायचं होतं. पण मित्रानं इशारा केल्याने तो गप्प बसला.

प्रत्यक्ष कार्यक्रमात सगळाच गोंधळ. मुलींची तक्रार ही की "आम्हाला हे काही विचारीतच नाहीत - आम्ही उलट चांगला कार्यक्रम केला असता. नेहमीचेच आहे हे!"

- आणि असे अनुभव अगदी सांगलीसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणीही वारंवार येतात. ग्रामीण-अर्ध-ग्रामीण भागात तर नेहमीच येतात.

- कोणत्याही व्याख्यानमालेत एखादा स्त्री वक्ता हवा असा अलीकडे बऱ्याच वेळा आग्रह असतो. तिने 'स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी' बोलावे असा हेतू - आग्रह असतो. आणि वर "आमच्या गावात बायकांची खूप गर्दी असते बरं का?" असे स्त्री वक्त्याला मधाचं बोट दाखवलेलं असतं.

- अलीकडे आणखी एक म्हणजे स्त्री वक्ता असला तर अध्यक्ष एखादी स्त्री नियुक्त केली जाते. मग वक्त्याच्या तुलनेने तिचा अधिकार काहीही असो. आभार मानायला, पुष्पगुच्छ देण्यासाठीही बाईचीच नेमणूक असते.' हेही एकपरीने

बरेच आहे.

पण या उलट दृश्य मात्र अजून तरी आढळेलं नाही. म्हणजे एखाद्या गावात एखादी चांगली स्त्री प्राध्यापक, अभ्यासू, चांगलं बोलणारी असली तरी तिची नियुक्ती पुरुष वक्ता असताना अध्यक्षपदी होत नाही किंवा त्याचा परिचय, आभार ही कामे स्त्रीकडे दिली जात नाहीत. (एखादा अपवाद असेल पण तो अपवादच!)

एखाद्या व्याख्यानमालेत स्त्रीविषयक विषय सोडून इतर विषयांवर बोलणाऱ्या स्त्री वक्त्यांची संख्येनं जास्त प्रमाणात नियुक्ती तर अजून एकाही व्याख्यानमालेत आढळत नाही. याचा अर्थ गावात किंवा आसपास अशा स्त्री वक्त्या नसतात असे नाही. किंवा जे पुरुष वक्ते असतात किमान त्यांच्या पात्रतेच्या अनेक वक्त्या, विविध विषयाच्या अभ्यासू प्राध्यापक हल्ली अगदी तालुक्याच्या गावीही असतात. मात्र त्यांचा आवर्जून शोध घेऊन त्यांना बोलतं करायचा प्रयत्न होताना दिसत नाही, परंपरागत रुढीमुळं स्त्रिया संकोचत असतात. पण तो संकोच लहान-सहान कार्यक्रमातून दूर करण्याचा प्रयत्न ('महिला मंडळी' कार्यक्रम वगळता) स्त्री-पुरुषांच्या संयुक्त कार्यक्रमात सहभागी करून घेऊन केला जाताना दिसत नाही.

अनेक ठिकाणी प्रारंभी सांगितल्याप्रमाणे महिला मेळाव्याचेही पूर्ण नियोजन त्या त्या क्षेत्रातील पुरुष कार्यकर्त्यांनी केलेले असते, ऐनवेळी ''शोभेपुरत्या'' अध्यक्ष, पुष्पगुच्छ देणाऱ्या स्त्रियांची नियुक्ती होते. पण कार्यक्रमाच्या नियोजनाच्या निर्णय प्रक्रियेत स्थानिक स्त्रियांचा सहभाग नगण्य असतो.

मेळावे व्याख्याने सोडा. हल्ली अनेक प्रकारच्या मंडळांच्या स्थापना, संस्था, त्यांच्या विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन सगळीकडे प्रचंड प्रमाणात होत असते.

विविध धार्मिक उत्सव, प्रसिद्ध व्यक्तींच्या जयंत्या-मयंत्या, त्यानिमित्ताने मंडळात कार्यक्रम होत असतात. त्यांच्या निमंत्रण पत्रिकेवरच्या पदाधिकाऱ्यांची आणि आयोजक सदस्यांची नुसती नावे पाहिली तरी त्या पंधरा-वीस नावांत कुठंतरी औषधापुरतं एखाद-दुसऱ्या बाईचं नाव असलं तर असतं. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या आयोजनात ती पडद्याआडच असते. फार तर कार्यकर्त्यांच्या चहा-फराळाच्या कामाची जबाबदारी तिच्यावर असते.

ग्रामीण भागात हे होत असेल तर परंपरागत रूढीतून अजून मन बाहेर येत नाही, असे फार तर म्हणता येईल पण जेव्हा डॉक्टर आणि प्राध्यापक यांच्या संघटनांच्या कार्यक्रमातूनही निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग नगण्य आणि

केवळ खाण्या-जेवणाच्या कार्यक्रमांचीच जबाबदारी डॉक्टर किंवा प्राध्यापक असलेल्या स्त्रियांवरच सोपवली जाते, त्यावेळेला या 'उच्च' शिक्षित मंडळींच्या (स्त्री-पुरुष दोघांच्याही) डोक्यांतून परंपरागत कामाच्या वाटणीचे भूतच पक्के बसलेले दिसते. येथे तुम्ही केवळ डॉक्टर वा प्राध्यापक (किंवा जो पेशा असेल तो) असता, त्याच्याशी संबंधित वैचारिक कार्यक्रम (चर्चा, परिसंवाद) हे मुख्य असतात. जर जेवण-खाण कार्यक्रम असतीलच तर ती जबाबदारीही संयुक्तपणे घेतली जावी असा आग्रह क्वचितच धरला जातो.

कलात्मक-साहित्यिक कार्य करणाऱ्या संस्थाही हल्ली सर्वत्र आहेत. त्यातूनही फार वेगळी परिस्थिती दिसत नाही. हल्ली ग्रामीण भागांतूनही साहित्यिक मेळावे, उपक्रम वारंवार होतात. त्यांची उदंड निमंत्रणे येत असतात. त्यांच्या निमंत्रण पत्रिका बारकाईने पाहणे हा उद्योग गेली काही वर्षे मी करीत आहे. गंमत म्हणून आणि सामाजिक मानसिकतेचे प्रतिबिंब म्हणूनही!

अशा तथाकथित साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमातही स्त्रियांचा सहभाग नगण्य असतो. चर्चा, परिसंवाद, कथाकथन अशा कार्यक्रमातून स्त्रिया जवळजवळ हद्दपार असतात. चुकून एखाद दुसरे नाव असते. मात्र एखाद्या 'स्त्रीविषयक' (उदा. स्त्रियांच्या कथा, साहित्यातील स्त्रीचित्रण इ.) कार्यक्रमासाठी मात्र सगळ्या स्त्रियाच गोळा केल्या जातात जणु अशा विषयावर पुरुष वक्त्याने बोलणे महत्वाचे मानले जात नसावे. संयोजनात तर स्त्रिया नसतातच.

फार काय स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या नव्या-जुन्या सर्व शिक्षण संस्थांच्या संचालक कार्यकारी मंडळात तर सर्व पुरुष सदस्यच असतात. तेथेही एखादी स्त्री शोभेपुरती असते आणि तीही बहुधा 'स्वीकृत सदस्य' म्हणूनच असते. त्या संस्थांच्या दैनंदिन कारभाराचा गाडा (अध्यापन, मुख्याध्यापक पद इ.) मात्र बव्हंशी स्त्रियाच ओढत असतात.

कार्यकारी मंडळाचे निर्णय त्यांनी केवळ 'राबवायचे' असतात.

वस्तुतः म. ज्योतिबा फुले आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुढाकार घेऊन जेव्हा महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाचा पाया घातला तेव्हा पुढील काळात निदान स्त्रियांच्या शिक्षण संस्थांमधून तरी स्त्रियांचीच संचालक मंडळे असावीत, अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती; पण या महात्म्यांच्या नावे सुरू केलेल्या संस्थामधूनही अजून सर्वत्र स्त्रियांची संचालक मंडळे दिसत नाहीत आणि त्याची खंतही कोणाला वाटत नाही.

हे असे का व्हावे? असा प्रश्नही उपस्थित केला जात नाही.

आपल्या समाजातल्या तथाकथित धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यिक

संस्थांमधून, कार्यक्रमांमधून काम करणाऱ्या लायकीच्या स्त्रियाच नाहीत, हे खरे नाही. गेली दीडशे वर्षे महाराष्ट्रात तरी स्त्रीशिक्षणाची परंपरा आहे. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अगदी आत्मविश्वासाने स्वतंत्रपणे काम करणाऱ्या स्त्रिया आता तालुक्याच्या गावात सुद्धा आढळत आहेत. कला, साहित्य या क्षेत्रात काम करणाऱ्या तर खूपच आहेत. मग संस्थात्मक कामात त्यांची नावे सहभाग का नाही? त्यांना संधी दिली जात नाही की त्या स्वीकारीत नाहीत? की कोणाला आवर्जून असे काही करण्याची गरजच वाटत नाही?

केवळ राजकारणात एकदम स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवून हा प्रश्न खऱ्या अर्थाने सुटेल कां? तसा तो पूर्णपणे सुटत नाही, असा अनुभव आहे. मग ग्रामपंचायतीपासून ते लोकसभा, विधानसभेपर्यंत 'योग्य स्त्री उमेदवार मिळत नाहीत. मग राखीव जागा भरायच्या कशा?' असा युक्तिवाद प्रत्येक पक्षाकडून केला जातो.

स्त्रिया एकदम राजकारणात येणार कशा? समाजाच्या सर्व स्तरातल्या विविध संस्थात्मक कामांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी स्त्रियांनी आणि पुरुषांनी दोघांनीही जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत असं मनापासून वाटल्याशिवाय केवळ राजकारणातल्या स्त्रियांच्या (दिखाऊ) राखीव जागांचा हेतूही खऱ्या अर्थाने साध्य होणे कठीण आहे.

पारंपरिक शब्दात सांगायचे तर 'उंबरठ्याबाहेर' कामासाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रीच्या डोक्यावर काल्पनिक भयाची प्रचंड ओझी असतात. त्यापोटी तिचा संकोच असतो, आणि दुसरीकडे स्त्रिया आपल्याबरोबरीने काम करू लागल्या तर आपले महत्त्व कमी होईल की काय? या भीतीचा हिमालय पुरुषांनाही 'मुक्त' होऊ देत नाही. हे आपण कधी सुजाणपणे समजून घेणार आहोत का?

वस्तुत: जीवनाच्या विविध क्षेत्रात स्त्रिया आणि पुरुष कामासाठी एकत्र येतील तेव्हाच स्त्रियांचा न्यूनगंड आणि पुरुषांचा अहंगंड (किंवा स्त्रियांबरोबर काम करणे म्हणजे कमीपणा हा न्यूनगंडच) यांचे निरासन होऊ शकेल. प्रत्यक्ष अनुभवाला सामोरे जाण्यालाच आपण घाबरतो आणि काल्पनिक धारणा व भय यात गुरफटून आपल्या समाज-मानसाचा विकास आपण खुंटवतो. त्याला खीळ घालतो.

सार्वजनिक कार्यक्षेत्रात कामाची पात्रता हाच निकष असावा आणि समाजातल्या सर्वच स्तरांची, सर्वच घटकांची पात्रता वाढविण्यासाठी प्रयत्न हवेत. सर्व सामाजिक संस्थात्मक कामात स्त्रियांचा संख्यात्मक सहभाग काही काळ प्रयत्नपूर्वक वाढवीत नेणे आवश्यक आहे. अशा संस्थात्मक कामांच्या

बऱ्या वाईट अनुभवातून स्त्रियाही घडत जातील आणि मग ''राजकीय सत्तास्पर्धेच्या निवडणुकात योग्य स्त्री उमेदवार मिळत नाही'' ही सबब राहणार नाही. मात्र त्या दिशेने वाटचाल करण्याची इच्छा हवी. म्हणून हा लेखनप्रपंच!

हे काहीही न करता एकदम राजकारणातल्याच उमेदवारीसाठी स्त्रियांना राखीव जागा देणे म्हणजे ''हिमालय चढायला परवानगी आहे पण गावच्या हमरस्त्यावरून चालायला मात्र बंदी!'' अशासारखं व्हायचं तुम्हाला नाही वाटत असं?

# गाना आये या ना आये...

**का**ही दिवसांपूर्वी दूरदर्शनवर एका आदिवासी जमातीवरचा माहितीपट पाहिल्याचं आठवतं आहे.

घनदाट जंगल, अत्यंत विरळ अशी माणसांची वस्ती; पण पोटापाण्याची सोय त्यांनाही करावी लागतेच. अशात एखाद्या दांडग्या रानडुकराची शिकार करायचा घाट घातला जातो. जनावर माजलेलं, त्याला मारण्यासाठी आदिवासींजवळ फक्त धनुष्यबाण आणि भाले! शिकारीची वेळ... रात्री पाणवठ्यावर मंडळी दबा धरून बसली आहेत. ताण वाढतो आहे. दाट जंगलातल्या चढत्या रात्रीने त्यात भर पडते आहे आणि डोळ्यांचं पातं लवतं ना लवतं एवढ्यात जनावर पाण्याला तोंड लावत असताना गचकन् त्याच्या राठ पाठीत भाला घुसतो. जनावर चवताळून उलटतं आणि रोखल्या श्वासांनी, जिवाच्या करारानं बाण आणि भाले डुकरावर आदळत, खुपसत त्याला संपवतात. जनावर शांत झालं तरी वातावरणातला ताण कमी होत नाही. एका दांडग्या बांबूला यथास्थितपणे ते बांधून मागे-पुढे चार-चार जणांच्या खांद्याचे टेकू लावून ते धूड उचललं जातं. जाळीतून दबल्या पावलांनी वाट काढत मंडळी ओळखीच्या पाऊलवाटेला लागतात आणि आता त्यांच्या कंठातून आवाज उमटतात. एका लयीत आणि पावलांच्या तालावर विशिष्ट सूर घुमू लागतात. दूरवर सूर्याची किरणं दिसू लागतात आणि चेहऱ्यावरचे ताण पूर्णपणे दूर होतात. एकांत जंगलात आपल्याच सुरांची सोबत साथ देत राहते.

आणि अचानक मला गाण्याच्या उगमाची गंगोत्री सापडते. सुरांनी माणसाची स्वत:चीच प्रथम सोबत केली. डोक्यावरच्या चिंता-ताण सैल करण्यासाठी मदत केली. ताणमुक्तीचा आनंद दिला.

मग सगळीच आदिवासी गीतं आणि नृत्यं आठवली. सुगीच्या दिवसातली लोकगीतं आणि नृत्यं आठवली. ग्रीष्माच्या रखरखाटाने आलेले शारीरिक आणि

मानसिक ताण पावसाच्या शिडकाव्याने सैल झाले, शेतं हिरवी झाली, कणसं भरली, धान्याच्या राशी खळ्यात आल्या की ताणमुक्तीच्या आनंदाने बेहोश होऊन लोकगीतं, नृत्य रंगू लागतात. निसर्गाने साथ दिली की वर्षभराची चिंता दूर होते आणि त्याचा आविष्कार गीत, नृत्य, यात्रा, जत्रा, क्रीडा, स्पर्धा, नटणं-थटणं अशा अनेक अंगांनी होत राहतो. अशावेळी कविवर्य केशवसुतांची एका कवितेची ओळ हटकून आठवते -

*''गाण्याने श्रम वाटतात हलके । हेही नसे थोडके ॥''*

श्रम शरीराचेही असतात, मनाचेही असतात, नुसतेच शारीरिक श्रम करीत राहिले तर शीण, थकवा वाढतो. म्हणून आपल्या पारंपरिक जीवनशैलीत कामाबरोबर गाणं येतं. आता शेतीकामातही खूप यंत्रे आली आहेत; पण जेव्हा बैलांचे नांगर, मोटा होत्या, कापणी मळणी माणसांनाच मेहनत घेऊन करायला लागायची तेव्हा मोटेची गाणी, भलरीची गाणी गात गात शेतकरी श्रम हलके करीत असे. ''गाता गळा आणि शिंपता मळा'' ही माणसाच्या सुखाची परमावधी असते.

बायकांची तर पारंपरिक सगळीच कामं शारीरिक कष्टाची! दळण-कांडण, धुणी-भांडी, बाळाला जोजवणं-झोपवणं, सडा-सारवण, शिवाय शेतातली कामं आणि वर घरात सासुरवास असला तर तो ताण! अशावेळी प्रत्येक काम करताना गाणं गात, ओव्या गात आपले शारीरिक मानसिक ताण हलके करण्याचा प्रयत्न बाई करीत आली आहे.

*''गाण्याच्या नादात तुला ओढिते दगड ।''*

म्हणत दळताना जात्याच्या दगडाशीच ती बोलत राही, तर कधी

*''जात्या तू ईसवरा (ईश्वरा) नको मला जड जाऊ ॥''*

म्हणून जात्याचीच विनवणी करीत असे.

हादग्या-भोंडल्याच्या गाण्यातून सासरच्या माणसांवर ''झिप्र कुत्रं सोडा ग बाई।'' असं हसत हसत सांगत प्रत्यक्षातल्या सासुरवासाच्या कडक आधणात गाण्याचं विसण घालीत राही. प्रत्यक्षात सासरच्या माणसांपुढे मान वर करून पहायची हिंमत नसे. अशावेळी खेळातल्या गाण्यांतून, म्हणी-उखाण्यांतून आपलं मन मोकळं करण्याच्या बाईच्या दृष्टीने मनात साठलेल्या ताणांचं हे एकप्रकारे विरेचन (ॲरिस्टॉटलच्या भाषेत 'कॅथॉर्सिस') असे.

नृत्य, नाट्य, गीत या सर्वच कला माणसांचे शरीर, मानसिक ताण हलके करण्यासाठी असल्याची उद्दिष्टे 'नाट्यवेद' निर्माण करणाऱ्या 'भरतमुनी'नेच सांगून ठेवली आहे. नाटकाच्या निर्मितीचा हेतू सांगताना भरतमुनी म्हणतात-

*''दु:खार्तानां, श्रमार्तानां, शोकार्तानां, तपस्विनाम् -*
*विश्राम जननं लोके, नाट्यमेतद् मया कृतम् ।।''*

दु:खी, श्रमिक, शोकग्रस्त आणि तपस्वी या सर्वांच्या मनाला विसावा मिळावा (आणि पुन्हा प्रपंचातले टक्के टोणपे खाण्यासाठी ताजेतवाने होता यावे) म्हणून मी नाटक निर्माण केले, असा निर्वाळा नाट्यशास्त्रकर्त्यानेच दिला आहे. नाटक म्हणजे अनेक कलांचे संगमतीर्थ!

दैनंदिन गरजा भागविण्यासाठी शारीरिक आणि मानसिक श्रम घ्यावेच लागतात. कधी कधी त्यांचा अतिरेक होतो. मग ताण वाढत जातात. अशावेळी कला आणि क्रीडा यांच्यामध्ये प्रत्यक्ष कृतिशील सहभाग हा फार निरामय उतारा आहे.

प्रत्येक व्यक्तीजवळ कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची कल्पकता, नवसर्जनशीलता असते, आपल्या ऐहिक गरजांसाठी ती वापरली जातेच. पण जेव्हा व्यावहारिक लाभ हानीची गणितं ओलांडून तिचा उपयोग होतो तेव्हा जे निर्माण होतं तीच कला! त्यातून मिळणारा आनंद हा कलात्मक आनंद! ज्या आनंदाला व्यावहारिकतेची कुंपणं नसतात; नसावीत. असा एक कोपरा सुबुद्ध माणसाने प्रयत्नपूर्वक जतन करायला हवा. प्रपंचाच्या ऐन धकाधकीतही त्याच्यासाठी शक्ती आणि वेळ ठेवावा. मग 'ताणमुक्तीच्या' नावाखाली 'बिझिनेस पार्टी'च्या नावाखाली इतर मादक द्रव्यांच्या सेवनाची गरज रहात नाही. आपण काहीतरी आनंददायी निर्माण करू शकतो ही धुंदी पुरेशी ठरते; पण त्यासाठी त्या कलानिर्मितीत प्रत्यक्ष सहभाग हवा. केवळ दुसऱ्यांची गाणी ऐकून, टेपरेकार्डस् ऐकून, नाटके-सिनेमे पाहून किंवा तत्सम अप्रत्यक्ष कलास्वाद हा एक प्रकारे माणसाला निष्क्रीय करतो. हे सर्व करताना स्वत:ही गाण्याची लकेर आपल्यापुरती आपल्यासाठीच निर्हेतुक छेडीत रहावी. आपण आपल्यासाठीच नृत्याच्या ताल-लयीत कधीतरी झोकून द्यावं, आपण आपल्यासाठीच रंगांचे चार फटकारे कागदावर ओढावेत आणि आपल्याला अभिव्यक्त करीत रहावं. थोडक्यात म्हणजे

*''गाना आये ना आये गाना चाहिये ।''*

तो आनंदाच्या मुळीचा झरा आहे. जीवनातले ढळते तोल सावरण्यासाठी आपल्याच रक्तातला आदिताल सर्वात प्रभावी उतारा आहे. त्यालाच कला म्हणायचं, दुसरं काय?

आपण सगळे तानसेन होऊ शकत नाही पण 'कानसेन' तर होऊ शकतो आणि 'बाथरूम सिंगर' तर असतोच असतो. तो गाता गळा एरव्हीही वाहता

ठेवून पहावा. अनोख्या आनंदाचा ठेवा सापडेल.

आपल्या पारंपरिक जीवनशैलीत देवाधर्माच्या नावावर का होईना आरत्या, पदे, स्तोत्रे, अभंग, भजने हे सर्वांच्या गात्या गळ्याला प्रवाही ठेवत होते. एक परीने ते गाण्यामधले ॲक्टिव्ह पार्टिसिपेशन (सक्रीय सहभाग) होते. आता नुसते दूरस्थ बसून ऐकणे-पाहणे हे फार 'पॅसिव्ह' होत आहे. शरीर आणि मन दोन्हीची गुंतवणूक कलेत हवी, तरच पुरता आनंद भोगता येतो. अन्यथा चिंता, ताण, अस्वस्थता माणसाला ग्रासून टाकते.

कला आणि क्रीडा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जोपर्यंत ते पोटापाण्याचा आणि रुपये आण्याच्या विनिमयाचे साधन होत नाही, तोवर त्यातून निखळ आनंद मिळतो. त्यामुळे चिंता ताण यातून तोल सावरतो. जी निर्मिती केवळ स्वान्त:सुखाय असते, ती माणसाला स्वर्गीय समाधान देते.

जी. ए. कुलकर्णी यांची एक सुंदर कथा आहे. एक फीडल् वादक असतो. जगाच्या पाठीवरचा सर्वश्रेष्ठ फीडलवादक व्हायचे, ही त्याची महत्त्वाकांक्षा असते तो खूप मेहनत घेतो; अनेक स्पर्धा गाजवतो, महफिली गाजवतो. यशाच्या धुंदीत जगू पाहतो. पण मन शांत होत नाही. अशांतच राहते. हातात अखंड वाद्य असते. आता सर्वकाळ तो आणि वाद्य हेच एकमेकांचे असतात. त्याला खाण्यापिण्याचेही भान रहात नाही. चालता चालता एका पर्वतश्रेणीतून एका अरुंद वाटेवरून वाद्य वाजवीतच चालत राहतो, पाहणारांना भीती वाटते की, हा वाद्याच्या नादात कुठेतरी तोल जाऊन पडेल; पण घडते भलतेच. एका क्षणी नादावल्या अवस्थेत तो फिडल् फेकून देतो. पाहणारा म्हणतो, ''आता त्याला दुसऱ्या कशाची गरज नाही. तोच एक फीडल् झाला आहे. आता तो तोल जाऊन पडणार नाही.'' कलावंताची कलेची समाधी म्हणतात ती हीच! त्याला आता बाहेरच्या कोणत्याच साधनाची गरज नाही. पूर्णपणे आत्मरंगात तो दंग झाला. सुख-दु:खाच्या, ईर्ष्या-स्पर्धेच्या अतीत-पल्याड जाऊन तो पोचला.

जी.एं.ची ही कथा जगण्याचं, आनंदानं सफल जगण्याचं एक फार मोठं सूत्र सांगते. एक परीने ''आत्मरंगी मन रंगले।'' म्हणणाऱ्या संतांसारखी ही कलेची आत्मलीन समाधीच समाधानाची परमावधी ठरते. सुख सुख म्हणतात, ते वस्तूत आणि इर्ष्येत थोडंच सापडलं?

*'सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवढे ।।'*

हा जीवनाचा नित्य अनुभव असतो.

*'वेड्या मना कर विचार । सुख थोडे दु:ख फार ।।'*

असं आधुनिक कवीही सांगतात; पण या दु:खावर मात करण्याचा उताराही

माणसाजवळच असतो. एखाद्या कलेची थोडी जरी 'कळ' अवगत असली तरी दु:खाच्या 'कळा' विसरता येऊ शकतात. ''तुझे आहे तुजपाशी, परि तू जागा चुकलासी।''

म्हणून तर क्रौंच पक्ष्याच्या आनंदमग्न जोडीतल्या नराला पारध्याचा बाण लागला आणि क्षणार्धात तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून हळव्या हृदयाचे महर्षी वाल्मिकी शोकाकुल झाले; पण दुसऱ्याच क्षणी तो शोक प्रसंगच त्यांच्या अंत:करणातल्या प्रतिभावंत कवीला प्रेरणा देणारा ठरला आणि करुणरसपूर्ण, शोकसंतप्त भावना व्यक्त करणारा सुमधुर अनुष्टुभ् छंदातला श्लोक त्यांच्या मुखातून उमटला. तो जगाच्या पाठीवरच्या एका महान् महाकाव्याचा - 'रामायणा'चा प्रारंभबिंदू होता. महाकवीच्या प्रतिभास्पर्शाने 'शोक' श्लोकरूप झाला. त्या रामायण महाकाव्याने अक्षरश: पिढ्यान्‌पिढ्यांच्या जनमानसाला मात्र समाधान दिले आहे. आनंद दिला आहे. महाकवींमुळे, कलावंतांमुळे वेदनेचा वेद होतो. आसूचे रूपांतर हसूमध्ये होते. हे सामर्थ्य आहे कलेचे! कलात्मक रसिक वृत्तीचे!

आपण सगळे काही महाकवी वाल्मीकीची (किंवा व्यास मुनींची) प्रतिभा घेऊन जन्माला आलो नाहीत हे खरे! ते प्रतिभेचा महासागर होते हेही खरे! पण आपल्याजवळ त्या महासागरातला एखादा बिंदू निश्चित असतो. तो आपल्यामधल्या कलावंताची सर्जनशीलता, नवनिर्माणक्षमता चेतवतो आणि आपल्याही दु:खावर उतारा देणारे क्षणाचे हसू का होईना फुलवू शकतो. आपल्यासारख्या सामान्य माणसांना सरस्वतीकन्या बहिणाबाई चौधरींनी दिलेला संदेश या संदर्भात फार महत्त्वाचा वाटतो. आनंदाच्या चंद्रज्योती फुलवणारा वाटतो. बहिणाबाई म्हणतात-

*''रडू नको माझ्या जीवा । तुला रडायाची रं सवंऽऽ (सवय)।*
*रडू हंसव रे जरा । त्यात संसाराची चव।।'' हेच खरे!*

# सुंदर मुली

मध्यंतरी लागोपाठ सुंदर मुलींचे समूहच्या समूह एकत्रित पहायला मिळाले आणि सौंदर्यदर्शनाने नेहमीच जसा आनंद होतो त्यापेक्षा कितीतरी अधिक आणि वेगळ्या प्रकारचा आनंद अनुभवता आला.

एखाद्या जागतिक पातळीवरच्या सौंदर्यस्पर्धेला किंवा मेळाव्याला मी गेले होते की काय अशी शंका कदाचित येईल, जागतिक सोडा... गेला बाजार जिल्हा स्तरावरच्या किंवा शहरस्तरावरच्या सौंदर्यवतींच्या मेळाव्याला हजर राहण्याचा योग आला असावा, असेही वाटले असेल; पण अशा कोणत्याही मेळाव्याला, स्पर्धेला जाण्याचा प्रसंग आला नव्हता, हे आधीच सांगितलेले बरे!

व्याख्यानानिमित्ताने मराठवाड्यातल्या ग्रामीण म्हणता येईल अशा एका गावी जाण्याचा योग आला होता. स्टॅण्डवर उतरताच एक सुंदर मुलगी तत्परतेने सामोरी आली आणि माझं नाव विचारून ''तीच मी'', अशी खात्री करून घेत माझ्या हातातल्या सामानाचा ताबा घेतला. तिच्या झपझप चालीशी जमवून घेणं मला जरा कठीणच गेलं आणि पुढे दोन दिवस ती आणि तिच्या परिवारातल्या संस्थेतल्या मुलींनी माझ्या मनाचा ताबा घेतला. त्यातली ती स्वत: प्रतिभा आणि तिची एक मैत्रीण अंजली एकदमच लक्षात राहून गेल्या.

प्रतिभा ठेंगणी, ठुसकी, चुटचुटीत, एकाच वेळी अनेक कामाचं व्यवधान लीलया सांभाळणारी नळाला लावलेली पाण्याची बादली वाहून जाऊ नये म्हणून धावत असतानाच दुसरीकडे परगावी असलेल्या वकिलांशी मोबाईल फोनवरून बोलत कायद्याच्या कलमांचे सहज संदर्भ देत बोलणारी आणि त्याच वेळी फाटकातून आत येत असलेल्या पोलीस ऑफिसरचे हसतमुखाने स्वागत करीत क्षणात रसोईखान्यात आजचा स्वयंपाक व्यवस्थित चालला आहे ना? इकडे नजर टाकून येणारी - अष्टभुजेसारखी सगळीकडे लवलवणारी!

त्यामानाने अंजलीची चाल धीमी; पण तिचा उंचपुरा उफाड्याचा बांधा

आणि काहीशा आक्रमक चालीचा डौल साधीत सर्वत्र संचार करणारी. स्वत:च्या कामाबद्दल विलक्षण आत्मविश्वास प्रत्येक हालचालीतून व्यक्त होत असला तरी कुठेही उद्दामपणाचा स्पर्श नसलेली "एकदा वस्तू पाहिली की, अगदी तश्शी करून हातात देते बघा." असे म्हणत असलेली अंजली तसे करूनही दाखवते याचा अनुभव तिने तयार केलेल्या... विशेषत: शिवण कामातल्या निरनिराळ्या सुबक वस्तू पाहताना आला. लहान बाळाच्या कपड्यांपासून ते वडिलांच्या शर्ट-पायजम्यापर्यंतचे सर्व स्त्री-पुरुषांचे कपडे आणि छोट्याशा पैशाच्या पाकिटापासून मोठमोठ्या प्रवासी पर्स-बॅगापर्यंतच्या नेटक्या वस्तू पाहिल्या तेव्हा तिच्या बोलण्यात आत्मप्रौढी नसून विलक्षण आत्मविश्वास असल्याचे आणि त्याचे तिला सार्थ भान असल्याचे जाणवले. अशा कितीतरी बायकामुली आपल्या अवतीभोवती वावरत असतात.

या दोन मुलींचा तपशील दिला तो एक नमुना म्हणून पण त्यांच्या संस्थेतल्या अनेक मुलींची आत्मविश्वासाने भरलेली व्यक्तिमत्त्वे आणि डोळ्यांतली चमक पाहून या सुंदर मुलींमध्ये मन गुंतून राहिले.

आणखी एक संधी मिळाली ती खेळाच्या मैदानावर कोल्हापूर जिल्ह्यातले नूल हे कर्नाटक सीमेवरच अगदी छोटेसे खेडेगाव. गेले होते दुसऱ्याच एका कार्यक्रमासाठी. पण परतीच्या वाटेवर क्रीडांगणावरील कार्यक्रमाच्या संयोजकांचा मैदानावर येण्याचा आग्रह झाला. या छोट्याशा गावात खऱ्या अर्थाने (नाममात्र नव्हे) "अखिल भारतीय स्तरावरच्या महिला हॉकीस्पर्धा" चालू होत्या आणि १४/१५ वर्षांपासून वीस-बावीस वर्षे वयोगटातल्या भारतभरच्या मुलींचे संघ आले होते.

त्या सर्व दिवसभर उन्हात खेळणाऱ्यांचे, पहाटे, रात्री थंडीत सराव करणाऱ्यांचे चेहरे अगदी रापले होते; पण त्यांच्या हालचाली इतक्या डौलदार होत्या, डोळे इतके बोलके होते आणि उभे राहणे, हस्तांदोलन करणे या क्रियांमध्ये इतका आत्मविश्वासपूर्ण जिव्हाळा होता की क्षणभर त्या मुलींचा सात्विक हेवा वाटला.

क्रीडांगणावर खेळणाऱ्या मुली ही आता तशी अपूर्वाई राहिलेली नाही. तरीही सगळ्याच मुलींच्या खेळात आणि हालचालीत डौल असतो असे नाही. मात्र इतर कोणत्याही मुलींपेक्षा काही काळ का होईना क्रीडांगणावर घालवलेल्या मुलींची व्यक्तिमत्त्वे अधिक आकर्षक होतात. आत्मविश्वासपूर्ण होतात.

अगदी अठरा एकोणीसच्या वयात शारीरिक शिक्षणाचा एक अभ्यासक्रम मला पूर्ण करावा लागला होता. सुभाषचंद्र बोस यांच्या सैन्यातले एक वृद्ध अधिकारी मुद्दाम मुलींना मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. राणी लक्ष्मी प्लॅटूनच्या

कितीतरी आठवणी त्यांनी सांगितल्या. त्याचवेळी आमच्यापैकी एकजण किंचित पोक काढून चालत येत होती. हे वृद्ध सहाफुटापेक्षा अधिक उंच तगडे! पंजाबी चैंचलसिंग दोन ढांगात त्या मुलीच्या पाठीशी गेले आणि तिच्या वाकलेल्या पाठीवर धपाटा घालून आधी ती सरळ केली. मुलगी कळवळली; पण ते सहज पुन्हा आपल्या जागी गेले आणि हसत हसत म्हणाले, ''देखो लडकियों, आजाद भारत की लडकी ऐसी चले कि देखनेवाले दंग रह जायें और किसी की मजाल ना हो कि कोई आँख उठाकर देखें!'' (ती मुलगी मीच, खोटे कशाला बोला)

-एखाद्या मंत्रासारखे त्यांचे हे वाक्य मनावर कोरले गेले आहे. ''मुलींनो अशा डौलात चाला की लोकांनी पहात रहावं, मात्र वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची हिंमत होऊ नये.'' - मुलींची आणि बायकांचीच नव्हे तर खऱ्या अर्थाने स्वतंत्र देशातल्या नागरिकाची चाल कशी असावी याचे जणु रहस्यच त्यांनी सांगितले होते, असे वाटते.

स्त्रीचे विनम्र असणे म्हणजे अकारण जमिनीकडे पहात, आत्मविश्वास हरवून राहणे नव्हे. आत्मसन्मान आणि आत्मविश्वास माणसाच्या नजरेतून आणि चालण्यातून व्यक्त होतो. मुलींना याचे मर्म समजते ते क्रीडांगणावर. म्हणून प्रत्येक मुलीने काही काळ तरी मुक्तपणे क्रीडांगणावर घालवावा असे आवर्जून सांगावेसे वाटते.

मुलींच्या आणि स्त्रियांच्या सौंदर्याविषयी फार विपरीत समज सगळ्यांच्याच मनात रुजलेले आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेतील तथाकथित सौंदर्यवर्धनाच्या सामानांचे ठेकेदार त्यात दरक्षणी भर घालीत आहेत. आणि दूरदर्शनवर भूमितीश्रेणीने प्रसार करीत आहेत. डोक्यापासून पायापर्यंत प्रत्येक अवयवाचे नीतळ खरे तर गुळगुळीतपण म्हणजे सौंदर्य! असा संदेश सर्व जाहिराती पोचवतात. जणु शरीराचा प्रत्येक अवयव गुळगुळीत नसेल तर स्त्रीची फार मोठी सौंदर्यहानी आहे, असा समज पौगंडावस्थेपासून मुलींच्या मनात या जाहिरातींमुळे घर करून बसतो.

परंतु आपली बुद्धिमत्ता, आत्मविश्वास या 'आतून' विकसित होणाऱ्या बाबी आहेत, हे त्यांना कुणी सांगतच नाही की काय असे वाटण्याजोगी परिस्थिती आहे. जाहिरातींचा प्रभाव मुलींच्या आयांवरही जबरदस्त होत असतो. केवळ अमुक साबणाने धुतलेले शुभ्र कपडे घालून किंवा तमुक प्रसाधने वापरून आत्मविश्वास येत नसतो. ''एक नूर आदमी, दस नूर कपडा'' ही म्हण एका मर्यादेपर्यंतच खरी असते. आधी माणसामध्ये- मग ती स्त्री असो वा पुरुष प्रत्येकामध्ये ''नूर'' (तेज) तर असायला हवे ना? तेजाचा उगम 'आतून' होतो. बाहेरच्या साधनांनी

फार तर तो खुलवता येतो. म्हणूनच मुला-मुलींना बाह्य वस्तूंचा वापर म्हणजेच आपल्या व्यक्तिमत्त्वाचे गमक असा संदेश देणारी मानसिकता घातक ठरते.

स्त्रीच्या बाबतीत तर गोरा रंग म्हणजे सौंदर्याची आद्य अट! हा समजही दिवसेंदिवस फारच घट्ट होतो आहे. खरे तर आपण उष्ण कटिबंधातली भारतीय मंडळी काळ्या-सावळ्या वर्णाचा प्राचीन काळापासून वारसा घेऊन आलेलो; आपण गोऱ्या रंगाचा हव्यास बाळगणे हे तसे आपल्या 'प्रकृती'च्या विरोधातच आहे. कदाचित जे नाही त्याचे आकर्षण असेल पण वास्तवाचे भान सोडून कसे चालेल?

मराठी माणसांचे प्राचीन प्राकृत ग्रंथातले वर्णनही ''दढमढह, सामलंगे'' म्हणजे ''धडधाकड आणि सावळ्या अंगाचा'' असेच आहे. अभिजन वर्गाने जरी पुरुष सावळा असला तरी त्याला गोरीच बायको हवी. (''सावळा वर बरा गौर वधूला।'') असे म्हटले असले तरी आमच्या राष्ट्रीय नायिका सावळ्याच आहेत. द्रौपदीचे तेजस्वी नीलश्यामलत्व सुप्रसिद्धच आहे. गोरी राधाही मूलतः 'सावळी प्रकृती' आहे लोकपरंपरेत तर गोऱ्या स्त्रीचा काहीसा अधिक्षेपच आहे. ''एक गोरी आणि हजार खोड्या चोरी'', अशा म्हणींतून तो व्यक्त होतो-

*''राम लक्षुमण इंद्रनील मणी।*
*सीताई सावळी शोभे रत्नायाची खाणी।।''*

म्हणून सीताबाईचे सावळेपण येथील सर्वसामान्य बाईशी सहज सख्य जोडणारे ठरते.

अखेर बाह्य रंग-रूप आंतरिक तेजाखेरीज उजळत नाही. अन्यथा ते प्रभावहीन होते, याचा प्रत्ययही येत असतो.म्हणूनच मराठवाड्यातल्या आंबाजोगाईच्या ''मनस्विनी'' काय की हॉकी मैदानावरच्या आत्मविश्वासाचे तेज अवघ्या व्यक्तिमत्त्वात असलेल्या आणि आपल्या कर्तृत्वाने आसमंत उजळून टाकणाऱ्या सगळ्याच मुली मला सुंदर वाटतात. ''ऐश्वर्यवती'' वाटतात. त्यांच्यात विकाऊ सौंदर्य नाही हे खरे पण त्यांना आणि त्यांच्या परिवाराला पुरून उरणारे टिकाऊ सौंदर्य निश्चित आहे, असे वाटते.

# औषध नलगे मजला

**फा**र फार वर्षांपूर्वीची गोष्ट! एका चक्रवर्ती राजाची लाडकी, परमसुंदर कन्या एकाएकी मलूल झाली. तिची कांती फिकट झाली, चेहरा म्लान झाला, कशातच उत्साह वाटेना. तिची तहानभूक हरपली. तिची आधीच नाजुक असलेली काया सुकत चालली. राजपरिवारात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मुदपाकखान्यातल्या सुगरण आचाऱ्यांनी परोपरीचे रुचकर पदार्थ केले तरी राजकन्येच्या घशात घास अडकून बसे. राजपरिवारातल्या बायकांनी दृष्ट काढली. 'बाहेर'चे काही असेल म्हणून अंगारे-धुपारे, तोडगे-ताडगे केले. राजकन्या दिवसेंदिवस सुकतच चालली. राजवैद्य आले. तऱ्हेतऱ्हेची चूर्णे, गुटिका, चाटणे देऊ लागले. तरी राजकन्येवर काही परिणाम होईना. सगळ्या उपायांना राजकन्याही विटली. औषधांना नकार देऊ लागली. तिच्या सख्यापार्वत्या तिला रमवण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागल्या. राजकन्येने अगतिकपणे आपल्या अंतरंग सखीकडे पहात हातातला औषधाचा पेला बाजूला ठेवत म्हटले,

''औषध नल-गे मजला ।'' - सगळ्याजणी हिरमुसल्या. एक अनुभवी अंतरंग सखी मात्र सगळे उमगल्यासारखी मंद हसली.... चतुर वाचकांच्या लक्षात आलेच असेल की, ही कथा आहे नल-दमयंतीची! ही राजकन्या दमयंती आपल्या सखीला तिने चतुरपणाने आपल्या आजारावरचे औषध सांगितले, ''हे सखी गं, औषध ''नल'' गे मजला । नलराजा हेच माझे औषध ।'' एकूण हा सगळा प्रणयविकाराचा मामला । औषध देणारे भलतीच औषधं देत होते.

ही एक रोमँटिक प्रणयकथा । औषधे देणाऱ्या वैद्यराजांची इथे थोडी खिल्लीच उडवली आहे.

अगदी रोकड्या व्यावहारिक जगात मात्र खरेच अनेकदा असे होते. अनुभवी बायकांच्या म्हणीच्या भाषेत सांगायचे तर ''डोळ्यात केर आणि कानात फुंकर!'' आजार एक आणि औषध भलत्याच आजारावरचे देतात वैद्यराज! कारण त्यांना

निदानच झालेले नसते ना रोगाचे नेमकेपणाने!

आजच्या भाषेत म्हणजे आजाराचे नेमके 'डायग्नोसिस' (निदान) बरेचदा होत नाही. अनेकदा 'सेकंड', 'थर्ड' 'ओपीनियन' घेऊनही नेमका आजार कळत नाही. अंदाजाने औषधे दिली जातात. त्यांचे आणखी काही दुष्परिणाम होत राहतात.

दातांच्या डॉक्टरांबाबत किंवा हाडवैद्यांबाबत (आर्थोपेडिक) अनेकदा अशा प्रकारचे विनोद सांगितले जातात. दात दुखत असतो उजवीकडचा, दंतवैद्य उपटतात डावीकडचा! कहर म्हणजे दात नादुरूस्त असतो एकाचा उपटला जातो दुसऱ्याचाच! तीच गोष्ट हाडवैद्याबाबत उजव्या पायाऐवजी डाव्या पायाच्या हाडाचेच ऑपरेशन डॉक्टर करतात. हा सगळा विनोदाचा भाग असला तरी निष्काळजीपणाने खरोखरच अशी एखादी घटना घडल्याचे कानावर येते. ''डोळ्यात केर आणि कानात फुंकर'' या म्हणीचा प्रत्यय अधून मधून येतच असतो.

वर्तमानाचे दोष काढायचे आणि त्या तुलनेत भूतकालीन चांगुलपणाचे गोडवे गायचे, ही आपणा भारतीयांच्या वृत्तीची एक खासीयत आहे. त्यानुसार जुन्या भारतीय परंपरेतील वैद्यांचे निदान किती अचूक असे आणि उपाययोजना कशी नेमकी असे याच्या कथाही अधून मधून ऐकण्यात, वाचनात येत असतात. अशीच ही एक कथा!

जुन्या जमान्यातली गोष्ट! एका श्रीमंत घरातल्या मुलाचे लग्नाचे वऱ्हाड पालखी-मेण्यांतून चालले होते. नवरा मुलगा त्यावेळच्या रीतीप्रमाणे दहा बारा वर्षांचा! कपाळी चंदनाचा कपाळभर मळवट भरून मुलगा मेण्यात बसला होता. भोई मेणा वाहून नेत होते. मुलगा बालसुलभ कुतूहलाने मेण्याच्या बाहेर डोकावून पहात होता. एवढ्यात त्या भागातले नामांकित वैद्यराज पालखीतून येत होते. नवऱ्यामुलाच्या मेण्याजवळ त्यांची पालखी आली. त्यांनी एक कटाक्ष मुलाकडे टाकला वऱ्हाड कोणाकडे चालले आहे याची चौकशी केली आणि घाईगर्दीने आपल्या घराकडे गेले. नवरी मुलगी त्यांच्याच गावातली होती. तिच्या वडिलांना बोलावून सांगितले की, ''या मुलीशी लग्न होणे अशक्य आहे.'' एवढे सांगून होईतो निरोप आला की, वऱ्हाडातल्या नवऱ्यामुलाने वाटेतच ''राम'' म्हटला.

ही कथा आहे ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या बंगाली कादंबरीकार आशापूर्णादेवी यांच्या ''प्रथम प्रतिश्रुती'' या कादंबरीतील!

तात्पर्य - जुन्या वैद्यराजांनी केवळ ओझरता कटाक्ष टाकून केलेले निदान किती अचूक ठरत असे, हे सांगणे!

आजारी माणसाचा आजार कितीही गंभीर असला तरी अखेरपर्यंत त्याच्यावर

उपचार करणे हे वैद्यकशास्त्राचे नीतितत्त्व मानले जाते आणि तसे उपचार करणे हे वैद्यकक्षेत्रातील तज्ज्ञांचे कर्तव्य मानले जाते. पण त्यासाठी प्राथमिक, आद्य आणि महत्त्वाची अट म्हणजे रोगाचे नेमके निदान होणे!

आधुनिक वैद्यक (मेडिसिन) शास्त्रानुसार 'निदान' नेमके होण्यासाठी अनेक प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. आजार काही का असेना पण आधी रक्त, थुंकी, लघवी अशा तपासण्या ही जवळ जवळ सर्वसामान्य बाब झाली आहे. जोडीला स्कॅनिंग, एक्स-रे, सोनोग्राफी इत्यादी असतात. या सगळ्या तपासण्यांची दरवेळी गरज असतेच का? असा सर्वसामान्य माणसाला प्रश्न पडतो. अर्थात त्याखेरीज नेमके निदान करणे कठीण जाते एखादे वेळी साध्या आजारातही गंभीर आजाराची मुळे असू शकतात असे युक्तिवाद वैद्य मंडळी (डॉक्टर) करतातच. तरी असे प्रमाण किती? त्याचा अंदाज येईल एवढे प्राथमिक निदान तरी सर्व तपासण्या करण्यापूर्वी तज्ज्ञांना का करता येऊ नये? मग त्यांना तज्ज्ञ का म्हणायचे? अशा शंका सामान्य माणसांना येतातच.

तर अशाच तपासणी चक्रात अडकलेल्या एका गुंड्याभाऊंची ही कथा! 'जिवाची मुंबई' करायला म्हणून गुंड्यभाऊ मुंबईला गेले. तेथे त्यांना एके सकाळी दोन-चार शिंका आल्या. ज्यांच्या घरी ते गेले होते ते म्हणाले, ''मुंबईची हवा फार वाईट. तुम्ही आधी डॉक्टरकडे जाऊन औषध घेऊन या. त्या काळात सहकारी तत्त्वावर सर्व तपासण्या एकाच ठिकाणी करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांचे संघ नव्हते. त्यामुळे गुंड्याभाऊंना फार आटापिटा करावा लागला. रक्त, लघवी, थुंकी, दात इ. तज्ज्ञ मंडळींकडे हेलपाटे मारून आणि रिपोर्ट गोळा करून गुंड्याभाऊ जिकिरीला आले. मुंबई बघण्यासाठी आणलेले पैसे डॉक्टरी तपासण्यात संपले. सगळे रिपोर्ट घेऊन ते मूळ डॉक्टरांकडे गेले. तेथे मेडिकल कॉलेजच्या शिकाऊ मुलांची झुंड आली होती. सगळे रिपोर्ट पाहून डॉक्टर मुलांना (भावी डॉक्टरांना) म्हणाले, ''हे पहा निरोगीपणाचे मॉडेल! त्यांच्या नखातही दोष नाही. इतके ताजे निरोगी रक्त सँपल म्हणूनसुद्धा पहायला मिळणार नाही.'' असे म्हणताच 'सँपल' म्हणून रक्त काढण्यासाठी भावी डॉक्टरांची झुंड सुया सरसावीत पुढे आली. हा किस्सा आहे आद्य विनोदी लेखक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या ''गुंड्याभाऊचे दुखणे'' या लेखातला. सुमारे सत्तर वर्षांपूर्वीचे हे वर्णन! आधुनिक वैद्यकशास्त्रावर मल्लिनाथी करणारे!

आमची आजी लहानपणी एक गोष्ट सांगायची. एका दरिद्री शेतकऱ्याची एक रूपवती कन्या होती. रानात शिकारीला आलेल्या राजाच्या नजरेत ती भरली. त्याने तिच्याशी लग्न केले. आता राणी वैभवात लोळत होती; पण ते सुख तिच्या

अंगी लागेना. ती कृश होत चालली. विविध वैद्यांनी खूप औषधे दिली तरी गुण येईना. एकदा राणीच्या माहेरची एक गरीब म्हातारी राजाकडे आली आणि म्हणाली, ''मी हिला औषध देते. पण सकाळ-संध्याकाळ मी तिला औषध देताना तिथे दुसरे कोणीही असता उपयोगी नाही.'' आश्चर्याची गोष्ट म्हणजे महिनाभरात राणी आरोग्यसंपन्न झाली, असे काय औषध दिले होते म्हातारीने? काही नाही. रोज सकाळ-संध्याकाळ ताजी भाकरी, घट्ट दही, तिखट, कांदा असे लहानपणापासूनचे तिच्या सवयीचे जेवण होते ते!

त्यावरूनच एक कथा सांगितली जाई ''धट्टी कट्टी गरिबी आणि लुळी पांगळी श्रीमंती''ची! गरिबांचे अन्न आणि त्यांची शारीरिक हालचाल, कष्ट यांचे संतुलन झाले की, औषधाची गरज लागत नाही हे तात्पर्य असे. हे खरे तर सर्वांच्याच बाबतीत खरे आहे. ताजे, स्वच्छ, सीमित आणि नियमित अन्न आणि शारीरिक हालचाली, श्रम यांचे संतुलन महत्त्वाचे!

लहानपणापासून ज्या अन्नाची सवय झालेली असते. ते सहज पचते. आमच्या एका ध्येयवादी स्नेह्यांनी अनाथ आश्रमातल्या मुलीशी लग्न केले. गर्भवती असताना डॉक्टर मंडळी तिला दूध घ्यायला सांगत; पण तिला त्याची कधीच सवय नसल्याने तिला दूधच मानवत नसे. उलटून पडे. आदिवासींच्या आहाराबाबत अनेकदा शहरी तज्ज्ञ मंडळी निदान करतात; पण आदिवासींना तसे अन्न मानवत नाही. त्यांच्या सवयीच्या अन्नातच थोडेफार फेरफार केले तर त्याचा उपयोग चांगला होतो असा कार्यकर्त्यांचा अनुभव आहे. म्हणजे पुन्हा त्याचेही नेमके निदान (डायग्नोसिस) महत्त्वाचे!

एरव्ही अनेक तपासण्या करून आणि अंदाजाने दिलेल्या औषधांचे ''साईड डिफेक्ट्स'' अनुभवून एखादा रुग्ण म्हणेल, ''औषध न - लगे मजला!'' नको ते औषध! अर्थात् आरोग्य संपन्नतेमुळे औषधाची गरजच न लागणे हे सर्वात उत्तमच!

# सती, सवत आणि चेअरमन!

"अग तेच ते! त्यांची मधली मुलगी माझ्या मावसभावाला दिलीय्!"

"'मुलगी दिलीय्' काय म्हणता? आपल्यासारख्यांनी तरी शब्द जरा विचारपूर्वक वापरायला हवेत. 'मुलगी दिली' म्हणताना आपणच स्त्रीच्या वस्तुपणावर शिक्कामोर्तब करतो आहोत असं नाही वाटत?" हे सगळं भाषण काहीशा तीव्र स्वरात सात्विक संतापाच्या आवेशाची धार असणारं होतं, म्हणून स्वाभाविकच त्याकडे लक्ष गेलं. तिच्या म्हणण्यात चांगलंच तथ्य होतं. कै. धोंडो केशव कर्वे यांच्या विचारानुसार 'कन्यादान' न करता प्रौढ वधू-वरांनी 'परस्पर दानाचा' विधी करणे कालोचित होईल का? - ते असो पण-व्यवहारातली भाषा, वाक्प्रचार हे सगळे समाजाच्या स्थूल व्यवहाराचे आणि मानसिक धारणांचेच वाहक असतात हे खरे! ते इतके तोंडवळणी आणि कानवळणी पडलेले असतात की, त्यात काही गैर आहे, हेही कुणाच्या सहजासहजी लक्षात येऊ नये.

एकदा एका जाहीर व्याख्यानात भाषांच्या भेसळीचा विचार मांडताना एक वक्ता सहजच बोलून गेला की, "कोणतीही भाषा सलग शुद्ध बोलली जात नाही. मराठी, हिंदी, इंग्रजीची भेळ करून एक धेडगुजरी भाषा..." वाक्य पूर्ण होण्याच्या आतच श्रोतृवर्गातून निषेधाचे सूर उमटले आणि "धेडगुजरी" हा शब्द अनवधानाने तोंडून गेला, कोणत्याही जातीचा अपमान करण्याचा हेतू नव्हता." असे सांगून वक्त्याला माफी मागावी लागली.

स्त्रियांबाबत सवयीने वापरल्या जाणाऱ्या भाषेतून अधोरेखित होणारी स्त्रीची अवस्था मात्र सहजासहजी लक्षात येत नाही; कारण भाषा समजातून घडत जाते. समाजाच्या स्थितीगतीचे प्रतिबिंब दैनंदिन भाषेतून ठसठशीतपणे प्रतिबिंबित होते. 'सती', 'सवत' असे काही शब्द मराठीत स्त्रीलिंगीच आहेत. याचे कारण अगदी स्पष्ट आहे कारण त्या शब्दात अभिप्रेत असलेली प्रत्यक्ष अवस्था समाज फक्त स्त्रीच्या बाबतीतच अपेक्षित धरतो. 'सती' स्त्रीनेच जायचे आणि 'सतित्त्वात अपेक्षित' गुणधर्म स्त्रीतच असले पाहिजेत. पुरुषाच्या बाबत त्यांची अपेक्षाच

नसल्यामुळे त्यांचे वाचक पुल्लिंगी शब्दच मराठी भाषेत नाहीत.

तसेच पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषालाच बहुपत्नीत्वाची मुभा असल्याने 'सवत' हे नातेही केवळ स्त्रीच्या बाबतीतच अस्तित्वात असते. व्याकरणाच्या सोयीसाठीसुद्धा 'सवता'सारखा पुल्लिंगी शब्द अस्तित्वात येऊ शकला नाही.

संस्कृतमधील 'सूतिका' किंवा मराठीतील 'बाळंतीण' अशासारखे शब्द फक्त स्त्रीच्या प्राकृतिक भूमिकेतून येणे समजू शकते पण त्याच अवस्थेतून 'सुईण' आणि 'दाई' ही येते; कारण स्त्रीजीवनसंबद्ध ही कामेही स्त्रीचीच झाली आहेत. म्हणून त्यांचे वाचक पुल्लिंगी शब्दही नाहीत.

व्याकरणातील अनियमितता म्हणून काही शब्द केवळ पुल्लिंगात (उदा. मासा, ससा) किंवा काही शब्द केवळ स्त्रीलिंगात (उदा. माशी, पाल) असणे हा वेगळा भाग आहे. पण स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्थानावरील अपेक्षेतून भाषेत येणारे शब्द हे त्या त्या समाजातील स्त्री-पुरुष विषयक मानसिक धारणांचे प्रतिबिंब असते. सौ. कु. श्रीमती सारख्या उपाधींची सवय स्त्रीचे पुरुषसापेक्ष अस्तित्व अधोरेखित करते, याची अनेकवार चर्चाही होते.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत स्त्रीच्या स्थितीगतीचा विविध विषयांच्या अनुषंगाने धांडोळा घेणाऱ्या अभ्यासकांनी स्त्रीवादी भूमिकेतून असे भाषिक अभ्यासही केले आहेत. मराठीत आणि एकूणच भारतीय भाषांतून मात्र फार खोलवर जाऊन अजून असा भाषिक अभ्यास झालेला दिसत नाही.

विशेषत: म्हणी, उखाणे, वाक्प्रचार या भाषेच्या सहज प्रवाही आविष्कारातून स्त्रीच्या स्थितीगतीबद्दल समाजाच्या मानसिक धारणातील संगती-विसंगती खूप प्रकर्षाने जाणवते.

पुरुषप्रधान व्यवस्था ही प्रामुख्याने पितृसत्ताक अर्थव्यवस्था आहे. त्यातून आलेले एक भाषिक उदाहरण गंमत म्हणून पाहू. वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटपावरून आणि वारसा हक्कातून येणारा शब्द 'भाऊबंदकी' फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. 'बहीण बंदकी' अजून तरी नाही. कदाचित नवीन कायद्यानुसार स्त्रिया पैतृक संपत्तीबाबत भांडू लागल्या तर 'बहीणबंदकी'चीही भर भाषिक शब्दसंपत्तीत पडू शकेल.

इंग्रजीमधील एक उदाहरण नेहमी दिले जाते. अध्यक्षपदासाठी असलेला 'चेअरमन' हा शब्द फक्त 'man'-पुरुषवाचकच आहे. आता स्त्रियाही अध्यक्ष बनू लागल्या. तेव्हा त्या म्हणाल्या, 'आता आम्ही शब्द बदलू.' तेव्हापासून शब्द प्रचारात आला आहे 'चेअरपर्सन!' क्षणभर बरे वाटले. पण क्षणात लक्षात आले की, अरेच्चा! यातही 'सन' आहे. 'डॉटर' कुठे आहे?

# कुटुंबव्यवस्था : थोडे मुळाकडे

"घरकाम, स्वयंपाक करणे हे कमी दर्जाचे काम आहे, असे मी मानीत नाही. तिनेही ते मानू नये असे मला वाटते. घर सांभाळणे हे सर्वार्थाने कठीण काम आहे, असे मला वाटते."

विशेष श्रेणीत इंजिनिअरिंगची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या, आपल्या आईवडिलांच्या एकुलत्या एक मुलाने दहा पंधरा वर्षांपूर्वी आपल्या भावी वधूबद्दलच्या अपेक्षा पत्रातून व्यक्त केल्या होत्या. या मुलांचे वय होते तेव्हा पंचवीस वर्षाचे! म्हणजे ऐन "गद्धेपंचवीशीतले!"स्वप्नरंजनाचे! अवास्तव अपेक्षा करण्याचे! विशेष म्हणजे मुलीच्या सौंदर्याविषयीही त्याच्या गैरवाजवी अपेक्षा नव्हत्या. स्वत:ला साजेसे आणि कुटुंबातील अन्य व्यक्तींमध्ये (दिसायला) सामावून जावी, असे व्यक्तिमत्त्व असावे असेही त्याने लिहिले होते.

लग्नासाठी उभी असलेली प्रत्येक मुलगी ही प्रपंचाची- म्हणजेच घरकामाची आवड असलेली. हसतमुखाने स्वत:चे व्यक्तिमत्त्व कुटुंबात विरघळवून टाकणारी असतेच असे गृहित धरलेले नव्हते. याचा अर्थ वरील मुलाने पत्नीने फक्त घरातच रहावे असे म्हटले नव्हते - "घरकाम कमी दर्जाचे मी मानीत नाही" हे त्याचे म्हणणे दुहेरी अर्थाने महत्त्वाचे आहे. एक म्हणजे पत्नीने ते केले तर तिला मी कमी दर्जाची मानणार नाही आणि मला स्वत:ला घरकाम करताना कमीपणा वाटत नाही." यातला उत्तरार्ध अधिक महत्त्वाचा आहे, असे मला वाटते.कारण पिढ्यान् पिढ्या आपल्या समाज व्यवस्थेत रूजलेल्या कुटुंब व्यवस्थेत घरकाम हे 'फक्त' स्त्रीचेच 'कर्तव्य' आहे आणि ते करवून घेणे हा अन्य विशेषत: कुटुंबातील पुरुष सदस्यांचा 'हक्क' आहे, हे गृहीत असते.

एक व्यक्ती म्हणून स्त्रीला कुटुंबात स्वतंत्र स्थान आहे. याचे भान उरलेले नाही. त्यामुळे प्रचलित कुटुंबव्यवस्था ही प्रामुख्याने गृहिणीच्या आत्मविलोपनावर उभी असलेली आणि टिकून राहिलेली व्यवस्था आहे. व्यक्तित्वशून्य गृहिणी ही परंपरेत आदर्श मानली जाते. ही परंपरा तरी कोणती? ही केवळ भारतीय किंवा

केवळ पौर्वात्य परंपरा नव्हे, ही पुरुषप्रधान परंपरा आहे. जगभरची. मध्ययुगात क्रमाक्रमाने दृढ होत गेलेली. तिचा प्रारंभ झाला माणसाचे भटके वन्य जीवन संपून स्थिर जीवन प्रारंभ करण्याच्या टप्प्यातच!

स्त्री-पुरुषांच्या - खरे तर नर-मादीच्या एकत्रीकरणाखेरीज जीवनचक्र चालणे अशक्य आहे. हे एकत्रीकरण जोपर्यंत नैसर्गिक ओढीपुरतेच असते, तोवर स्वामित्व, एकमेकांवर कुरघोडी हे प्रश्न उद्‌भवत नाहीत. स्वाभाविकच गुलामगिरीचाही प्रश्न उद्‌भवत नाही.

पण माणूस हा निसर्गाने दिलेल्या प्रेरणांवरच समाधान मानणारा प्राणी नाही - तो निसर्गदत्त प्रेरणा आणि स्व-सामर्थ्य यांच्याच आधारे नैसर्गिक बाबींवर स्वामित्व प्राप्त करू पाहतो. हा त्याचा प्रवास कोट्यवधी वर्षांचा आहे. त्यालाच तो मानवी संस्कृती म्हणत आला आहे.

प्राकृतिक जीवनाचे माणसाला एकीकडे आकर्षण असले तरी तेथे दर क्षणी अस्तित्वासाठीचा संघर्ष अटळ असतो. माणसाची बुद्धी अन् प्रयत्न यातून माणूस स्वत:ची सुरक्षितता शोधीत आला आहे. ही सुरक्षितता शारीरिक अन् मानसिक अशी दोन्ही स्तरांवरची - खरे तर परस्परावलंबी आहे.

प्राथमिक अवस्थेत अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच वंशसातत्यासाठी नर-मादींचे एकत्र येणे याच माणसाच्या मूलभूत शारीरिक गरजा आहेत. त्या मिळतील की नाही? कशा मिळतील? मिळाल्या तर टिकतील की नाही? टिकल्या तर अधिक काळ आणि अधिक चांगल्या रीतीने कशा टिकवता येतील? या प्रश्नांची उत्तरे माणूस शोधीत राहिला तो दुहेरी स्तरांवर.

एकीकडे प्रत्यक्ष भौतिक परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न करीत दुसरीकडे अमूर्त मानसिक पातळीवर एखाद्या अद्वितीय श्रेष्ठ शक्तीचा आधार शोधीत! ती शक्ती कधी भूत असेल तर कधी दानव असेल. तीच शक्ती अनुकूल झाली की देवरूपात भासेल. त्या अमूर्त शक्तींच्या अनुकूलतेसाठी मग मध्यस्थ भगत (शॅमन) विधिविधाने, तोडगे, मंत्रतंत्र असा पसारा वाढत गेला.

प्रथम वन्यपशूंसम जंगली अवस्था, नंतर प्राथमिक पाषाण युगात शिकारीसाठी नैसर्गिक अणकुचीदार दगडांचा वापर, उत्तर पाषाणयुगात स्वत: दगडाची शस्त्रे घडविण्याचे कौशल्य आत्मसात करीत विकसित करीत नेणे, उत्तर टप्प्यात काहीशी भटकी वन्य पशुपालन अवस्था आणि सामूहिक रीतीने योजनाबद्ध शिकार करणे या अवस्थांतून समाजाची बांधणी होत गेली. समूह जीवनात अधिक सुरक्षितता आणि जीवनाची अधिक शाश्वती मिळते. ही जाणीव हा शोधही नैसर्गिक प्रेरणा अधिक मानवी प्रयत्न यांचे संयुक्त अपत्य आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये. तरी अजून शिकार हेच उपजीविकेचे प्राथमिक आणि

महत्त्वाचे साधन असते.

शेतीचा शोध हा खऱ्या अर्थाने आजच्या मानवी संस्कृतीचा प्रारंभबिंदू आहे.

भटक्या शिकारी अवस्थेत अपत्यधारणा, प्रसूती, संगोपन ही जबाबदारी प्रामुख्याने स्त्रीवरच आली. एकीकडे शिकारीतही तिचा सहभाग होता. पण त्याचे प्रमाण कमी होणे स्वाभाविक होते. पण स्त्री स्वस्थ नव्हतीच- तिचे भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण चालूच होते. त्यातून फल-मूल-धान्यादि जीवनोपयोगी उत्पन्ने जशी निसर्ग आपोआप देतो, तशीच ती आपण थोड्याशा प्रयत्नातून स्वत: निर्माण करू शकतो, हेही तिने केलेल्या निरीक्षण प्रयोगातून तिला उमगले. आपोआप उगवलेल्या धान्य-फलमूलांची बीजे आपल्या निवासस्थानाभोवती लावली! तर निवासाजवळच पोटासाठी उत्पन्न मिळते, हे स्त्रीला उमगले. मग तिचे प्रयोग सुरू झाले. हा शेतीच्या शोधाचा प्रारंभ! त्याचे श्रेय स्त्रीचेच! आपल्या झोपडीच्या अवती-भोवतीची जमीन कठीण लाकडाच्या दांड्याने (खननयष्टी) खणून तिची मशागत करून पीक काढणे अधिक सुलभ होते, हे ही स्त्रीला समजले. स्त्रीप्रधान शेती ही शेतीची आद्यावस्था. शेतीची निर्मिती मूलत: स्त्रीची।

म्हणजे शरीर सुरक्षिततेसाठी अन्न, वस्त्र, निवारा अन् वंशसातत्यासाठी अपत्य निर्मिती, संगोपन या जीवनचक्रातल्या सर्वात आद्य, मूलभूत बाबींचा विकास स्त्रीने केला आहे. प्राथमिक शेतीची ती स्वामिनी होती.

ही प्राथमिक शेती अ-हल्य (नांगरविरहित) शेती होती. हल म्हणजे नांगर. पुरुष अजून 'हलधर' झाला नव्हता. त्याने नांगर धरला अन् शेतीची मशागत करून काढलेल्या उत्पन्नाचा स्वामी होत गेला. तो 'सीतापती' (नांगरलेल्या भूमीचा स्वामी) झाला.

पण मूलत: भूमीची स्वामिनी ही स्त्रीच! स्थिर आणि सुरक्षित मानवी जीवन निर्माण करण्यात तिचा सहभाग मोठा - म्हणून कुटुंब हा शब्दच भूमिवाचक उपजीविकेसाठी सम्बद्ध अशा आशयाचा बनला.

कुंकुणा हे भूमिवाचक नाम. त्यातून कुटि, कुट शब्द आले. त्यातला मूळ शब्द 'कुल' म्हणजे भूमीशी सम्बद्ध मनुष्य समूह! स्त्री-पुरुष मुले यांचा गट. जमिनीची मशागत करणारा.

मुळात हा शब्द आस्ट्रोएशियाटिक भाषा कुळातला. त्याचे किमान दोन वेळा संस्कृतीकरण झाले असावे असे भाषाशास्त्रज्ञ म्हणतात. (संदर्भ - 'मराठी व्युत्पत्तिकोश' संपा - कृ. पां. कुलकर्णी) बाळबोध मराठीत केवळ पत्नी या अर्थाने 'कुटुंब' शब्द आजही क्वचित वापरला जातो. त्यामुळे मानववंशशास्त्राच्या दृष्टिकोनातून झालेली कुटुंबसंस्थेची निर्मिती आणि त्यामुळे आलेली भाषावैज्ञानिक

भूमिकेतून कुटुंब शब्दाची व्युत्पत्ती या दोन्हीचे परस्पर पूरकत्व पाहता स्त्री आणि मुले-बाळे हाच कुटुंबाचा आद्य घटक आहे, केवळ स्त्री आणि मुलेबाळे असली की आजही कुटुंब उभे राहते - पुरुष सदस्यावाचून फारसे अडत नाही. कारण एकूण अपत्यसंभव प्रक्रियेतही त्याचा सहभाग निमित्तमात्रच असतो. परंतु स्त्री सदस्याखेरीज कुटुंब संभवतच नाही. हे कळत असले तरी वळवून घेतले जात नाही.

कुटुंबसंस्थेच्या स्थापनेत आणि धारणेत स्त्रीचा सिंहाचा (खरे तर सिंहिणीचा) वाटा होता आणि आहे, हे वेगळे सिद्ध करण्याची गरज नाही. मग कुटुंबात आज तिचे स्थान अन् प्रतिष्ठा अशी नगण्य का आणि कशी झाली? हा खरे तर विस्तृत विवेचनाचा विषय आहे. प्रस्तुत तेवढा अवकाश नसल्याने केवळ सूत्र मांडीत आहे.

प्राथमिक अवस्थेत स्त्रिया आणि मुले ही उपजीविकेची साधने मिळवण्यात सहभागी होतीच. आधुनिक जीवनापासून जसजसे भूतकाळाकडे जावे, तसतसा उपजीविकेची साधने मिळविण्यात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसतो. प्रसूती इत्यादी काळात आज मध्यमवर्गीय स्त्री जशी दुबळी, परावलंबी दिसते तशी ती श्रमजीवीमध्ये नसते. नव्हती, त्यामुळे स्त्रीचे नैसर्गिक दुबळेपण वगैरे कल्पित Myth Making आहे. एक 'प्राणी' म्हणून अन्य माद्या जितक्या सहज हा निसर्गक्रम पेलतात, तसाच ती मानवी स्त्रीही पेलते-पेलू शकते. जीवनात जसजशी उत्पादनसाधनांची स्थिरता आणि शाश्वती येत जाते, तसतशी एकूणच माणसाची जात (स्त्री पुरुष दोन्ही) शारीरिक दृष्ट्या कमकुवत बनत जातात. नैसर्गिक परिस्थितीशी सामना करण्याची, जुळवून घेण्याची क्षमता उणावत जाते. आज त्या दृष्टीने एकुणातच माणूस दुबळा झाला आहे.

पण दुसरीकडे माणसाने निसर्ग अनुकूल करून घेण्यासाठी आपली बुद्धी अन् शक्ती खर्ची घालून प्रचंड भौतिक साधनसामुग्री गोळा केली आहे.

या सगळ्या प्रक्रियेत कुटुंबव्यवस्थेत जर आपल्याला स्थान अन् सुरक्षितता हवी असेल तर केवळ अपत्यजन्मासाठी निमित्त असून चालणार नाही. संबंधित अपत्य व स्त्री या दोघांसाठी बाह्य साधनांची उपलब्धता करून देण्यात सहभाग वाढला तरच ते शक्य आहे. हे पुरुषाच्या ध्यानी आले. त्यातूनच क्रमाने उत्पन्नाचे स्थिर साधन असलेल्या शेतीवर पुरुषाचा सहभाग वाढत अखेर ताबा प्रस्थापित झाला. शेती स्त्रीच्या ताब्यातून पुरुषांच्या ताब्यात गेली. भू-स्वामिनी असलेली, भू-स्वरूपा असलेली स्त्री नाममात्र 'लक्ष्मी' राहिली आणि भूपती'चे राज्य आले. 'लक्ष्मी'चे स्वयंप्रेरकत्व संपले. ती 'पांगळी' झाली. स्थिर शेतीपरंपरेत हे पांगळेपण दृढ होत गेले. भूमी आणि स्त्री दोन्हींचा उपयोग तर जीवनधारणेसाठी

व्हावा, मात्र त्यांचे स्वातंत्र्य बंदिस्त व्हावे यासाठी मग ''एक एव पतिर्नार्या'' स्त्रीला एकच पती, तिच्या गर्भावर (क्षेत्र) फक्त त्याचेच स्वामित्व । त्यासाठी सतीत्व, पातिव्रत्य, सौभाग्य माहात्म्य, विधवांची अवहेलना, प्रत्येक स्त्रीला विवाहाची सक्ती, गृहिणीची गृहकर्तव्ये, नावाची 'लक्ष्मी'पण अशा खऱ्याखोट्या, बऱ्यावाईट, शारीरिक-मानसिक बंदिवासात स्त्री जखडली गेली. तिचा सर्वार्थाने फायदा तर करून घेता यावा पण तिचे स्वामित्व कुठेच नसावे - ती सदैव असुरक्षित असली तरच तिच्यावर ताबा ठेवणे सोपे जाईल. म्हणून बाप आणि पती दोघांच्या संपत्तीत तिला वाटा नाही. फक्त अन्नवस्त्राची सोय! तीही तिचा कष्टासाठी, सर्व सेवांसाठी साधन म्हणून निरपेक्षपणे वापर करून घेता यावा म्हणून! या पद्धतीने जी वागेल तिचा पतिव्रता, सुगृहिणी, सुमाता इ. म्हणून गौरव. एरव्ही अवहेलना - हे दृश्य परिचित आहे.

एकूण आजच्या कुटुंब व्यवस्थेचे हे दृश्य आहे. तिला घरात बंदिस्त करून बाहेरच्या जगातही तिला स्थान ठेवले नाही. घराबाहेर तथाकथित पराक्रमाचे जग पुरुषांचे, प्रतिष्ठेचे! स्त्रीचे जग स्वयंपाकपाणी, पोरेबाळे सांभाळणे, घरातल्या सेवा हे सर्व गौण झाले. घरकाम बिनडोकपणाचे, ते पुरुषाने करणे म्हणजे पुरुषार्थाचा अध:पात! असे समजण्यापर्यंत आपण आलो आहोत.

पण विज्ञानयुगात उत्पादनसाधने ही वेगाने बदलत आहेत. केवळ एका जमिनीच्या तुकड्याला धरून राहण्याची गरजच संपल्यामुळे कुटुंबाचे स्वरूप बदलणे अपरिहार्य आहे, हे समजून घेणे भाग आहे. विज्ञान साधनांमुळे उपजीविकेचे अन्य मार्ग वेगाने उपलब्ध होत आहेत. स्त्री कष्ट करीतच होती. आता तिला कुटुंबाला बांधून घेऊनच 'साधन' बनून राहण्याची गरज नाही. जेथे स्त्री 'घर' करून राहते तेथे कुटुंब होतेच. अपत्यधारणेवरही ती स्वामित्व मिळवू शकते. याचे भानही तिला येत आहे. त्यासाठी तिच्याभोवती उभ्या केलेल्या भावनात्मक, खोट्या सती व पतिव्रत्याच्या Myth च्या भिंतीनाही तडा जातो आहे. या सर्वांचे भान या पुरुषप्रधान व्यवस्थेला मात्र जितक्या गंभीरपणे यायला हवे. तसे येत नाही. हे दुर्दैव आहे.

पुरुषप्रधान व्यवस्थेला आणि पुरुषांनाही आपले 'कृत्रिम' स्वामित्व झुगारून आता अधिक वास्तवाची जाण येणे आवश्यक आहे. म्हणूनच या लेखाच्या प्रारंभी सांगितलेल्या तरुणाची समंजस भूमिका महत्त्वाची आहे. ही जसजशी वाढेल तसतसा समतोल आला तरच कुटुंब टिकेल अन्यथा मोड-तोड अटळ आहे.

# जननी आणि माता...

**ल**हानपणी ऐकलेल्या दोन गोष्टी मला आज आठवतात; त्या आधी सांगते.

एका न्यायाधीशापुढे एका अट्टल दरोडेखोराचा खटला चालला होता. सगळ्या पुराव्यांच्या आधारे न्यायाधीशाने त्या दरोडेखोराला खूप मोठी सक्त मजुरीची शिक्षा दिली. त्यावेळी त्या दरोडेखोराची आई तिथे हजर होती. तिला फार दु:ख झालं. हंबरडा फोडीतच तिने मुलाला मिठी मारली. त्याक्षणी मुलाने आईच्या कानांचा कडाडून चावा घेतला आणि म्हणाला, ''ही तुला शिक्षा! माझी शिक्षा मला आता भोगावीच लागणार आहे. पण लहानपणी मी पहिली चोरी केली तेव्हा तू मला शिक्षा करून समज का दिली नाहीस? उलट तू माझ्या चुकीवर पांघरूण का घातलेस? त्यामुळे माझी चोरीची सवय वाढत गेली आणि आज ही वेळ आली.'' आई म्हणाली, ''अरे पण माझी आईची वेडी माया तुला कशी कळणार? तुला शिक्षा करणे माझ्या जीवावर आले,'' ''तेच तुझे चुकले. ही कसली भिकार माया? मुलाला त्याच्या चुकीची योग्य वेळी शिक्षा करणे, समज देणे, ते खऱ्या प्रेमळ आईचे कर्तव्य असते. ते तू केले नाहीस, म्हणून आज माझे आयुष्य वाया गेले. याला तूच जबाबदार आहेस. नुसता मुलांना जन्म दिला म्हणजे चांगली आई होता येत नाही.'' आईला आता चूक कळली तरी काही उपयोग नव्हता.

दुसरी गोष्ट थोडी वेगळी आहे. एकदा एका न्यायालयात एक चमत्कारिक खटला आला. एका चार-पाच वर्षांच्या मुलावर दोन बायका आईपणाचा अधिकार सांगू लागल्या. एक चांगली श्रीमंत देखणी होती. तर दुसरी गरीब शेतमजूर होती. न्यायाधीश काय करतात इकडे लोकांचे लक्ष होते.

न्यायाधीशांनी जमिनीवर एक खडूचे वर्तुळ काढले. मध्ये मुलाला उभे कले आणि दोघी बायकांना सांगितले की मुलाचा एकेक हात धरून खेचा जी बाई त्या मुलाला वर्तुळाबाहेर खेचून घेईल, तिला मुलाची मालकी मिळेल, दोघींनी

थोडेफार खेचताच ते मूल वेदनेने रडू लागले. लगेच गरीब बाईने त्याचा हात सोडून दिला, तिच्या डोळ्यात मुलाच्या वेदना पाहून पाणी आले. ती म्हणाली, ''खरे तर हे मूल माझे आहे. त्याचा हात खेचला तर दुखतो, तो रडतो, ते मला पाहवत नाही. म्हणून मी खेचणार नाही. त्या श्रीमंत बाईला हवे असेल तर त्याला देऊन टाका, कुठे का असेना, माझे बाळ सुखात असू दे.''

ती पुन्हा रडू लागली. तेव्हा न्यायाधीशाने निकाल दिला की, ही गरीब स्त्रीच मुलाची खरी आई आहे. श्रीमंत बाईने जरी मुलाला जन्म दिला असला तरी त्याच्यावर खरी माया, ममता या गरीब बाईचीच आहे. म्हणून तीच त्याची माता आहे.

मुलाला केवळ जन्म देऊन जननी होणे एकवेळ सोपे आहे. पण मुलावर खरी ममता करून माता होणे कठीण आहे. डोळसपणे प्रेम, ममता करते तीच खरी माता. म्हणून तर देवकी कृष्णाची जननी असली तरी यशोदा त्याची माता म्हणून श्रेष्ठ ठरली. माँ, अम्मा, अम्बा, आऊ, आई, माता, जननी या सर्वांचा व्यवहारात एकच अर्थ केला जातो, तो म्हणजे आई आणि आई म्हणजे जी मुलाला जन्म देते ती!

पण हे पूर्णपणे खरे नाही. भाषाशास्त्रज्ञांच्या मते भाषेत खऱ्या अर्थाने समानार्थी शब्द नसतातच. वरवर अनेक शब्दांचा एकच अर्थ असला तरी व्युत्पत्तीच्या दृष्टीने दोन शब्दात अर्थच्छटांचा सूक्ष्म फरक असतो.

अम्ब म्हणजे जल, पाणी! निर्मितीचे आदिकारण सर्व निर्मिती जलातून होते. त्या अम्ब शब्दाचा अर्थ ध्वनी माँ, अम्मामध्ये आहे. निर्मिती आणि पोषण यांचे मूळ आई!

पाणी आणि माती ही सृष्टीतल्या सर्व प्राणीमात्रांच्या निर्मितीची मुळे आणि पोषणाचीही मुळे! म्हणून रक्षणाचीही! सर्जन म्हणजे निर्मिती, पोषण आणि रक्षण ही जीव सृष्टीच्या अस्तित्वाची शाश्वत कार्ये आहेत आणि पाणी आणि माती यांवर ती अवलंबून आहेत.

नर-मादीच्या मीलनातून अपत्याचे जनन (जन्म) होणे हा निसर्गाचा क्रम आहे. त्यातून मादी जननी होते ती 'जन्म-दा' म्हणजे जन्म देणारी होते. तिने ममता करणारी, मातीसारखा आधार देणारी, शरीर-मनाचे पोषण करणारी माताही असावे ही माणसाच्या जगाची अपेक्षा असते. जन्मल्या जीवाचे पोषण करण्याची काही अंशी तरतूद निसर्गत: माणसासह सर्व सस्तन प्राण्यांमध्ये केली आहे. ती जीवनदायी दुग्धपान करणारी, जीवनजलदायी म्हणून अम्बा, माँ होते.

पण हे अगदी नेहमी होतेच असे नाही. निसर्गक्रमानुसारही एखादी स्त्री

मुलाला जन्म देऊन जननी होऊ शकत नाही. पण प्रत्येक जननी 'माता' ही नाही होऊ शकत. ती बाळाला क्वचित स्तनपानही नाही करू शकत. केले तरी एक जीवशास्त्रीय गरज म्हणून करते, पण ती खऱ्या अर्थाने ममता करू शकेलच याची खात्री नसते. डोळसपणे मुलाच्या शरीराचे आणि मनबुद्धीचे पोषण करणे म्हणजे ममता करणे. मुलामध्ये या जगात टक्के-टोणपे खात, बरे-वाईट ओळखण्याची क्षमता निर्माण करणे म्हणजे खरे पोषण करणे. हे करण्याचा सुजाणपणा बाळगते तीच खऱ्या अर्थाने माता होऊ शकते. मग ती जननी-जन्म-दा नसली तरी ती चांगली माता, सु-माता होऊ शकते.

कारण जनन आणि काही अंशी पोषण हा प्रकृतीचा क्रम असला तरी ममता, प्रेम, सुजाणपणा ही संस्कृतीची निर्मिती आहे आणि सर्व प्राणीसृष्टीत फक्त माणसाचीच जात संस्कृती निर्माण करणारी प्राणीजात आहे.

प्रकृतीची सर्व शक्तिसामर्थ्ये समजून घेत घेत प्रकृतीला अधिक सुंदर, उन्नत, मानवोपयोगी करण्याचे काम संस्कृती करते मानवाच्या संवेदनशीलतेमधून संस्कृतीचा विकास होत असतो. केवळ प्रकृती हे करू शकत नाही. केवळ प्रकृती कधी कधी फार उग्र-भीषणही असते. काही प्राण्यांच्या जन्मदात्या जन्मत:च आपली बाळे भक्षण करतात आणि आपली भूक शांत करतात. प्रकृतीचे हे उग्र बालघातक जननीरूप आहे. त्या उग्र संहारक प्राकृतिक जननीरूपाचे उदार, उन्नत, प्रतिपालक, ममतामय रूपांतर करण्याचे काम मानवी संस्कृती करते.

थोडक्यात म्हणजे केवळ जननी होणे ही प्रकृती असेल तर माता होणे ही संस्कृती आहे, आणि बालघातिनी होणे ही विकृती आहे.

जननी होणे किंवा न होणे अनेकदा प्रकृतीच्या अधीन असले तरी माता होणे हे संस्कृतीच्या स्वाधीन आहे; मग त्यासाठी मादी असण्याचीही गरज नाही. याचे खूप मोठे उदाहरण म्हणजे साने गुरुजी! साने गुरुजी तर स्त्रीसुद्धा नव्हते. तरी अमळनेरच्या शाळेतील वसतिगृहांतील लहान लहान मुलांच्या सर्व खस्ता त्यांनी काढल्या. मुलांच्या आजारपणात त्यांची घाण काढण्यापासून त्यांना स्वयंपाक करून जेवू-खाऊ घालण्यापर्यंत सर्व शरीरकष्टाची कामे तर त्यांनी केलीच. त्याचबरोबर झाडे-फुले वाढवून जोपासना करण्याचे, सर्वांच्या ठिकाणी आदर राखण्याचे, राष्ट्रप्रेमाचे, ज्ञाननिष्ठेचे, सत्याचे, शरीर कष्टाला प्रतिष्ठा देण्याचे अनेक जीवनोपयोगी संस्कार त्यांनी अत्यंत मायेने केले. मुलांना चांगले वळण लावण्यासाठी क्वचित कठोरपणाचा बुरखाही घ्यावा लागला; पण त्यांच्या प्रेममय व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच इतका मोठा होता की त्यांचे विद्यार्थी आपोआपच सुसंस्कारित होत गेले.

आई होण्यासाठी आईचे मन हवे. केवळ मादीचा देह असून प्रत्येकीला सु-

माता होता येत नाही. म्हणून तर मुलाला ज्ञान, जन्म देणारे आणि त्याच्या मन बुद्धीचा प्रतिपाल करणारे पुरुष गुरुही 'गुरुमाऊली' होतात. सर्व विश्वाच्या सद्‌भावनांचे प्रेमाने पोषण करणारे ज्ञानदेव 'ज्ञानेश्वर माऊली' म्हणूनच जनमनात रूजतात.

फार काय पंढरीचा विठोबा हा पुरुषदेवही भक्ताच्या मनात वत्सल, प्रतिपालक मातृरूपात विठाई माऊली म्हणून घर करून राहतो, तेव्हा तो सर्वात जवळचा वाटतो.

म्हणून देहाने एखाद्या अपत्याला जन्म देऊन जननी होणे, न होणे बरेचसे प्रकृतीच्या अधीन असले तरी एखाद्या बालकाचा ममतेने देह, मन, बुद्धी यांचा प्रतिपाल करून माता होणे प्रत्येक सुसंस्कृत व्यक्तीला नर-नारीला शक्य आहे. आज सुसंस्कृत असण्याचा आणि शिक्षित खरे तर साक्षर असण्याचाही काही संबंध आहे, असं वाटत नाही. मनाची उदात्तता, विशालता, अपार प्रेम करण्याचे सामर्थ्य आणि क्षुद्र स्वार्थातून बाहेर येणे ही सुसंस्कृत असण्याची लक्षणे आहेत. शिक्षित माणूस सुसंस्कृत असावा अशी अपेक्षा असते. आहे की नाही, हे ज्याने त्याने आपल्या मनात डोकावून पहावे.

जन्म-दा होणे ही केवळ देहनिष्ठ आणि मर्यादित बाब आहे तर माता होणे ही मन-बुद्धिनिष्ठ व्यापक अमर्याद जीवांसाठी पुरून उरणारी बाब आहे, हे मदर तेरेसांसारख्या जगन्माता सिद्ध करीत असतातच.

आपण केवळ जननी वा जन्म-दा होण्यात धन्यता मानायची की यल्लम्मा (विश्वमाता) होण्याची आस बाळगायची हे आपली संस्कृतपणाची पातळी ठरवणार असते. सुरुवातीच्या दोन कथा हेच सांगतात.

आज जगाच्या पाठीवर सर्वत्र क्रूरपणा, स्वार्थ, हिंसा, बलात्कारी वृत्ती बोकाळलेली असताना या चुकत चाललेल्या जगाला सावरण्यासाठी नर-मादीमधला, प्रत्येक व्यक्तीमधला मातृत्वभाव जागायला हवा, फुलायला हवा. या अराजकाला आळा घातला तर तो फक्त मानवी मनातला मातृत्वभावच आळा घालू शकेल. या अर्थाने विश्वमातृत्वच जगाचे तारण करू शकेल. एकविसाव्या शतकाच्या उदयाबरोबर या विश्वव्यापी मातृत्वाचाही उदय व्हावा ही सदिच्छा!

# पुरुषी दहशतवाद

मुलगी लग्नाला आली की तिचं लग्न होणं हाच एकमेव विषय कुटुंबात महत्त्वाचा ठरतो. लग्न होऊन जेमतेम वर्ष होत आहे तोच घरात पाळणा हलावा म्हणून सासर-माहेरचे लोक उतावीळ होतात. सासर घराला 'वंशाचा दिवा' पाहण्याची घाई झालेली असते, मुलीच्या नवऱ्याला आपलं पौरुष प्रदर्शित करण्याची घाई झालेली असते तर 'हे' लवकर घडलं नाही तर मुलीला कायमची माहेरी पाठविली जाईल की काय अशी काहीशा धास्तीनेच माहेरची मंडळीही उतावीळ असतात. या सगळ्यात बिचाऱ्या त्या मुलीची काही स्वतंत्र इच्छा असेल असं इतरांच्या मनात येत नाहीच, पण मुलीच्याही मनात येऊ नये इतकी परंपरेने तिच्या मनाची, इच्छांची बंदिस्ती केलेली असते. लग्न झाल्याबरोबर मूल जन्माला घालण्याची इच्छा झालीच पाहिजे. तसं नसेल तर मुलीतच काही दोष आहे अशी मानसिकता सर्व समाजाचीच असते.

मुलगी गर्भवती झाली की, दुसरी धास्ती सुरू होते, मुलगाच होणार ना! जणु मुलगा न होणे हा बाईचाच दोष! पहिली मुलगी कशीतरी खपवून घेतली जाते. पण पाठोपाठ मुलगीच झाली तर बाईच्याच मनात एक अपराधगंड आणि धास्ती असते. कधी ती इतकी टोकाची असते की, बाई त्या अर्भकालाच संपविते किंवा नवजात मुलीसह स्वत:ला संपविते.

पुरुषप्रधान दहशतवाद असा खोलवर रुजला आहे की, यात काही गैर आहे असं कोणालाच वाटू नये. अशी समाजमनाची घडण झाली आहे.

विज्ञानयुगाने माणसाला शहाणपण यावं. सुसंस्कृतपणा वाढावा अशी वैज्ञानिकांची अपेक्षा असते. पण गर्भजलपरीक्षेचा शोध लागल्यापासून गर्भावस्थेतच स्त्री-गर्भाची भ्रूणहत्या करण्याचे प्रमाण भारताच्या सर्व भागात आणि समाजाच्या सर्व स्तरात भयावहपणे वाढले आहे.

त्याआधी अनेक समाजात जन्मल्याबरोबर मुलीचा गळा घोटला जाई आणि

अनेक पिढ्या एखाद्या गावात मुलगी वाढूच शकली नाही याचा अभिमान बाळगला जाई, हा पुरुषी दहशतवादाचा विकृत आविष्कार आहे.

सामान्यत: निसर्गात नर-मादी यांचे जन्मप्रमाण समसमान असते. स्वत:ला बुद्धिमान समजणाऱ्या माणसाने त्यात इतका असमतोल निर्माण केला आहे की, काही समाजात तरुण मुलांना योग्य वधू मिळून लग्न होणे आजच कठीण होत आहे.

समाजशास्त्रज्ञांच्या मते ही विषमता अशीच वाढत राहिली तर नजीकच्या भविष्यकाळात तरुणींचे अपहरण, स्त्रियांवरील बलात्कार वाढत जातील.

समाजाच्या सर्वच स्तरात बाईच्या-मुलीच्या मनावर एक अखंड दडपण असते. दहशत असते, दहशत असते बलात्काराची! अगदी तथाकथित कुटुंबातही बाई सुरक्षित नसते. बायका नटून-थटून घराबाहेर जातात म्हणून पुरुषी वासना चाळवल्या जाऊन बलात्कार, छेडछाड असे प्रकार होतात, असा एक साळसूद युक्तिवाद नेहमी केला जातो; पण ज्या ज्या वेळी स्त्रियांच्या संघटनांनी समाजाच्या विविध स्तरातल्या आणि विविध वयातल्या स्त्रियांची पाहणी केली तेव्हा अत्यंत धक्कादायक निष्कर्ष हाती आले आहेत. आपल्या संस्कृतीच्या उच्चतेचे आणि उदात्तेचे गोडवे गाणाऱ्यांनी एकदा स्त्रियांच्या अंत:स्तरातील ही वास्तविकता सहानुभूतीने समजून घ्यावी. प्राचीन साहित्यातूनही या दडपणाची अनेक उदाहरणे सापडतात.

साठ टक्क्यांहून अधिक स्त्रियांना आपल्या बालपणात आणि वाढत्या वयात कुटुंबातील अगदी जवळच्या नातेवाईक पुरुषांकडून लैंगिक सतावणुकीचे अत्यंत विपरित आणि लज्जास्पद अनुभव आलेले असतात. या नातेसंबंधातील पुरुषांत आजोबा, चुलता, मामा, आते मामे, मावसभाऊ आणि क्वचित जन्मदाता बापही असतो. पुरुषाविषयीची ही दहशतीची टांगती तलवार बाईच्या डोक्यावर जन्मभर असते.

नुकतीच घडलेली कोठेवाडीतील सामूहिक बलात्काराची घटना सगळ्या सुसंस्कृतेतला काळिमा फासणारी आहे. नातवाच्या वयाच्या पुरुषाने - नराने आपल्या आजीच्या वयाच्या स्त्रीवर बलात्कार करणे तेही बंदिस्त वाड्यात असताना जबरदस्तीने आत घुसून करणे ही घटना आम्ही पशूहून नीच असल्याची निदर्शक नाही का? अशा पुरुषी वृत्तीचा निषेध सामूहिक-सार्वत्रिक स्तरावर सुसंस्कृत पुरुषांनी केल्याची एकही घटना नाही. हे तरी कोणत्या सामाजिक मानसिकतेचे लक्षण आहे?

जाती जातीतील वैमनस्यावरून पुरुष मंडळी परस्परांच्या स्त्रियांना छळतात,

बलात्कार करतात, त्यांची नग्न धिंड काढून विटंबना करतात आणि आपल्या पुरुष असण्याची अत्यंत विकृत बीभत्स दहशत निर्माण करीत असतात. अशा बातम्या सतत वर्तमानपत्रात वाचून अंगवळणी पडतात, इतकी आमची संवेदनशीलता बोथट झाली आहे.

पुरुषांच्या आपआपसातल्या वैमनस्याचा बळी घेण्यासाठी पुरुषी अहंकार त्यांच्या स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे काढण्याची परंपरा किमान रामायण, महाभारताइतकी जुनी आहे. मग ती शूर्पणखा असो, सीता असो, अंबा-अंबालिका असोत की द्रौपदी असो! या स्त्रियांचे केवळ पुरुषी अहंकारामुळे धिंडवडे निघाले आणि ती परंपरा आजतागायत चालू आहे.

युद्धकाळात, युद्धजन्य परिस्थितीत तर आक्रमणकर्ते आणि ज्यांच्यावर आक्रमण होते ते दोन्ही पक्षांचे पुरुष परस्परांच्या स्त्रियांची विटंबना करण्यात आघाडीवर असतात. अत्यंत भीषणप्रकारे स्त्रियांची वाताहत होते. त्यांचे अनेक अभ्यास झाले आहेत. ''स्त्री-पुरुष'' या पुस्तकात छाया दातार यांनी प्राचीन काळापासूनच्या जगभराच्या युद्धातील स्त्रियांच्या विटंबना, वाताहत, बलात्कार, विकृत छळ यांच्या अभ्यासाचा पूर्ण तपशील दिला आहे, तो माणसाच्या माणूसपणाला लाज आणणारा आहे.

बाईला स्वत:ची इच्छा असता उपयोगी नाही. ही 'मनुप्रणित' धारणा पुरुषी मनात इतकी घट्ट रुजली आहे की, अगदी सांगून जाऊन मध्यस्थीने लग्न ठरवतानाही नकाराचा अधिकार फक्त वरपक्षाचाच असतो, ही धारणा अजूनही नाहिशी होत नाही. वधूपक्षाला नकाराचा अधिकार असू शकतो हे मनोमन स्वीकारणारा समाजस्तर अत्यंत अल्प आहे.

तीच धारणा तरुणवर्गात दिसते आणि त्यांची अत्यंत विकृत आणि क्रूर रूपे गेल्या काही वर्षात उग्रपणे समोर आली आहेत. स्त्रीने दिलेला नकार पुरुष पचवू शकत नाही त्यासाठी तो आत्मपरीक्षण करून आपले दोष समजून घेऊ शकत नाही. जणु पुरुष म्हणून जन्माला येणं हाच मोठा पराक्रम असल्याची धारणा असल्याने आवडलेल्या मुलीने दिलेला नकार पुरुष पचवू शकले नाहीत. त्या अहंकारातून मग तरुणींचे खून, त्यांना जाळणे, अंगावर ॲसिड फेकून विद्रूप करणे, सामूहिक बलात्कार अशा विकृतींचे हिडीस आविष्कार झालेले दिसतात. पुरुषी दहशतवादाचे हे विकृत रूप दिवसेंदिवस वाढत आहे. आणि बायका मुलींनाच 'जपून' राहण्याचा उपदेश केला जात आहे.

हुंडाबळी हेही पुरुषी दहशतवादाचेच एक रूप आहे. पुरुष म्हणून जन्माला येऊन एखाद्या स्त्रीशी लग्न करून जणु आपण तिच्यावर आणि तिच्या कुटुंबावर

मेहरबानी करीत आहोत. त्या बदल्यात वरपक्षाच्या सर्व मागण्या वधूपक्षाने पूर्ण केल्याच पाहिजेत अशी धारणा 'हुंडाबळी' प्रकरणातून स्पष्ट दिसते.

स्त्री जन्म ही पापाची खाण, स्त्री जन्म हा दुय्यम, कष्ट आणि अवहेलना मुकाट्याने सहन करण्यासाठी आणि मुख्य म्हणजे पुरुषाच्या लैंगिक व अन्य सुखांसाठीच असतो ही धारणा कळत-नकळत समाजाच्या (स्त्री-पुरुष दोघांच्याही) हाडीमाशी खिळलेली असते. त्यामागे या समाजात स्त्रीविषयीचा पिढ्यान्-पिढ्यांचा दृष्टिकोन कारणीभूत आहे. त्यामुळे स्त्रीने केवळ पुरुषाचीच नव्हे तर पुरुष कुळाचीही (सासरची) सेवाचाकरी विनातक्रार करण्यातच स्त्रीत्वाचा गौरव आहे, हेही घट्ट रुजले आहे.

त्यातूनच पातिव्रत्य आणि सतीत्व यांच्या अगदी अतिरेकी टोकाच्या संकल्पना पिढ्यान्‌पिढ्या समाजमनात रूजल्या आहेत. (म्हणूनच देवराला सतीचे उदात्तीकरण होते.) त्यांचा गौरव करताना अनेक कथा-कहाण्या व्रते, रूढी यांचा जन्म झाला आहे. त्यांचे उदात्तीकरण होता होता बायकाच उत्साहाने त्याचे पालन करतात. दहशत ही दहशत न वाटता गौरव वाटावा अशी मतलबी मानसिकता दृढ झाली आहे. एक परीने बळी (व्हिक्टिम) जाणाऱ्या बाईलाच 'बळी' प्रथेची 'वाहक'(एजंट) बनवले गेले आहे. त्यामुळे आपलं बाई असणं म्हणजे गौण असणं, हीच आपली नियती आहे, अशी बाईच्या मनाची घडण या संस्कृतीने केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून कुटुंबात स्त्रियांवर विविध प्रकारच्या दडपणांचा, अत्याचारांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष मारा होत असतो.

वधूपक्षाने हुंडा दिलाच पाहिजे, वरपक्षाचे मानपान केलेच पाहिजेत, त्यात काही कमी झाले तर होणारा छळ सोसलाच पाहिजे अशी मानसिकता या समाजातल्या बायकांचीही असल्याने त्या फारसा प्रतिरोधच करू शकत नाहीत.

सासरघरच्या सर्वांची सेवाचाकरीही तिने केलीच पाहिजे हीही धारणा घट्ट आहे. त्यात काहीही कमी झाले तरी आपलीच चूक म्हणून छळ सहन केला पाहिजे. (उदा. आजच्या सर्व हिंदी मालिका)

मुख्य म्हणजे तिला स्वत:चा मान असताच उपयोगी नाही. अपमान झाल्याची तिला जाणीव झाली तरच ती उलटून प्रतिवाद करेल ना! तिने निमूटपणे ऐकून घ्यावे. प्रतिवाद केला तर परिणामी होणाऱ्या छळाला सामोरे गेलेच पाहिजे.तो स्त्रीजातीचा मर्यादाभंग ठरतो.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे पुरुषाच्या सर्व लैंगिक इच्छा निमूटपणे पूर्ण केल्या पाहिजेत. त्यात कमतरता झाली तर तो देईल ती शिक्षा भोगलीच पाहिजे.

या सर्व धारणांतून स्त्रियांना सासरघरी आणि पतीकडून होणारी मारहाण ही

अगदी सामान्य बाब म्हणून आजही बहुसंख्य बायकांनीही स्वीकारलेली आहे. याखेरीज तिचा अपमान करणे, सिगरेटचे चटके देणे, अन्न-वस्त्र पुरेसे न देणे, अपार कष्ट करणे हेही सहन केलेच पाहिजे.

स्त्रीचे दुय्यमत्त्व अनेक अंगांनी पदोपदी व्यक्त होते आणि पुरुषी अहंकारापोटीचा दहशतवादही क्षणोक्षणी आविष्कृत होतो.

सर्वसामान्य शहरी, शिक्षित, मध्यमवर्गात पुरुषी अहंकारापोटीचा दहशतवाद इतक्या उग्रपणे व्यक्त होत नसला (त्यात 'सन्माननीय' अपवाद आहेतच) तरीही स्त्रीने सर्व पातळ्यांवर समानत्वावर असणे अजून सर्वस्वाने पुरुष पचवू शकत नाही. जर काही स्त्रिया पूर्ण आत्मविश्वासाने बरोबरीने वागू लागल्या तर कुटुंबात कामाच्या ठिकाणी (अगदी प्राध्यापक, डॉक्टरही) स्त्रियांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पाणउतारा करणे, लागट बोलणे, वागणे, काहीच जमले नाही तर अशा स्त्रियांविषयी त्यांच्या मागे काही अफवा पिकविणे, टिंगल टवाळी करणे अशा अनेक अंगांनी आपल्या पुरुषी 'अहं'चे विकृत प्रदर्शन करून आत्मतृप्ती करून घेतात आणि आपल्या बाबतीत असे होणे आपल्या आत्मसन्मानाला घातक असल्याने ते होऊ न देण्याची जबाबदारी असल्याचे एक अनाम-अदृश्य ओझे जवळजवळ प्रत्येक बाई जन्मभर डोक्यावर वागवत असते. तिचे बाई असणे कोणी तिला विसरून द्यायला तयार नसते आणि तिचे माणूस असणे सहन करायला तयार नसते. कलाक्षेत्रातील स्त्रियांबाबत आणि आता राजकारणातील स्त्रियांबाबत (काही अपवाद वगळता) गलिच्छ कंडया पिकवत रहाणे ही मानसिकता पुरुषी दहशतवादाचेच एक रूप आहे.

प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे स्त्रीला 'ताडन' करणे हा जणु आपला जन्मसिद्ध अधिकार आहे, या धारणेतून या देशातला पुरुष बाहेर पडणे फार कठीण आहे. (अशक्य नाही.) सध्या तरी येथील पुरुषी मानसिकता ही तुळशीदासांच्याच जातकुळीची आहे.

*"पशु गँवार ढोर अरू नारी । सब ताडन के अधिकारी ।।"*

सार्वत्रिक स्तरावर ही मानसिकता प्रत्यक्ष कृतीत बदलेल, तो सुदिन!

एरव्ही शब्दांतून, सुभाषितांतून स्त्रियांचा गौरव करायचा, स्त्रीदेवतांची पूजाअर्चा धुमधडाक्याने करायची आणि अगदी आई, बहीण, पत्नी, कन्या, सखी सर्वच नात्यांनी ती आपल्या अंकित असावी अशी कृती करायची हा पुरुषी मानसिकतेचा अंतर्द्वंद्वात्मक व्यवहार चालूच आहे.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरचा दहशतवाद जर लांछनास्पद असेल, माणुसकीला काळिमा फासणारा असेल तर त्याचा प्रारंभ कुटुंबांतर्गत पुरुषी दहशतवादी

मनोवृत्तीत तर नाही ना? याचा अंतर्मुख होऊन विचार व्हायला हवा असं नाही वाटतं? कारण त्याचेच बाह्य रूप म्हणजे स्त्रियांच्या सर्वच व्यवहारावर फतवे काढून बंधने घालणे असते मग कोणी बुरख्यांची सक्ती करेल तर कोणी कुंकू-बांगड्यांची! स्त्रियांच्या शरीरावरची मालकी दृढ करण्याचे हे बाह्य आविष्कार क्रमाने स्त्रियांवर आणि मग विरोधी वागणाऱ्या पुरुषांवरही आक्रमक बंधने घालतात. याचे कारण हे दहशतवादी स्वत:च भयभीत असतात. स्वत:च्या कर्तृत्वाने, सत्कार्याने मानमान्यता मिळवता येत नसली की बाह्य बंधने, धाक आणि दडपशाही सुरू होते. बंधने घालणाऱ्याचेच मन आधी भयभीत, बंदिस्त आणि आत्मविश्वासशून्य असते. पुरुषी अहंकारापोटी होणाऱ्या दहशतवादी लहानमोठ्या कृतींमागेही स्त्री जातीविषयीची एक सुप्त भयभावना तर नाही? एरव्ही सर्वांगांनी स्त्रियांवरच्या बंधनांची गरज का वाटावी? खऱ्या अर्थाने निरामय समाज निर्माण करायचा असेल तर सर्वच पातळ्यावर भय आणि दहशत यांपासून मुक्तता हवी ती मानवी स्वातंत्र्याची, निरामय समाजरचनेची आद्य अट हवी. त्याचा प्रारंभ कुटुंबापासून व्हावा तरच खरी लोकशाही संस्कृती प्रस्थापित होऊ शकेल.

# महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रीची वाटचाल!

शुक्राची चांदणी उगवल्याबरोबर भल्या पहाटे उठून जात्यावर दळण दळणारी उंच आवाजात सासर-माहेरच्या कौतुकाच्या ओव्या गाणारी, उंबऱ्याच्या आत राहून तोंडावर आडवा पदर घेऊन खालच्या आवाजात पुरुष माणसांशी बोलणारी खानदानी आब राखणारी, सुगीच्या दिवसात खळी सारवून कणसं मोडायला बसणारी, घरधन्यानं मोट धरली की आपण पाणी भरणारी श्रमकरी शेतकरीण ही ग्रामीण स्त्रीची प्रतिमा एके काळच्या ग्रामीण जीवनातले वास्तव होते. ते मागे पडूनही आता तीन-चार दशके उलटत आहेत. गेल्या पाच पंचवीस वर्षांत तर ग्रामीण जीवन पार बदलून गेले आहे. मग त्या जीवनातली स्त्री बदलली नसली तरच नवल.

तसे तर इंग्रज या देशात आले तेव्हाच इथल्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या संथ-शांत जीवनाला पहिला तडा गेला. जमीन मोजणी करून सरकारच्या माणसांच्या सारावसुलीचा बडगा शेतकऱ्याला अगतीक करू लागला. यंत्रयुगाने आणलेल्या सुबक वस्तूंनी ग्रामीण जीवनातले सुतार, लोहार, कोष्टी, साळी बेकार होऊ लागले. मुंबईच्या गिरण्यांनी त्यांना रोजगाराची नवी दिशा दिली आणि खेड्यातील जमिनीशी बांधलेले शेतकरी आणि कारू-नारू जमिनीपासून तुटून शहराकडे धावू लागले.

''उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट नोकरी'' या म्हणीचा आशय नेमका उलटा झाला. ''उत्तम नोकरी आणि कनिष्ट शेती''चा जमाना झपाट्याने आला. एकेकाळचा ''शेतकरी राजा'' इतका कंगाल झाला की अनेकांना जीव देण्याशिवाय गत्यंतर उरले नाही.

शहरी जीवनातल्या झगमगाटाने, पोषाखीपणाने, यांत्रिक रंजन साधनांनी आणि पाठोपाठ येणाऱ्या व्यसनाधीनतेने तरुणांचा अलगद ताबा घेतला. शिक्षणाचा प्रसार खेड्यापर्यंत पोचला. गेल्या पंचवीस तीस वर्षांत साखर कारखानदारी

क्षेत्रात तर महाविद्यालयेही झपाट्याने वाढली. लहानमोठे यांत्रिक उद्योगही खेड्यापाड्यांपर्यंत पोचले. खेड्यांचे झपाट्याने शहरीकरण झाले.

''खेड्याकडे चला'' या महात्मा गांधींच्या संदेशाचे अगदी विपरित रूप खेड्यांना प्राप्त झाले. या सगळ्या उलथापालथीत एकूण जीवनाचा अर्धा भाग असलेले स्त्री जीवन बदलले नसते तर आश्चर्य!

वाफेवर चालणाऱ्या पिठाच्या गिरण्या पन्नास वर्षांपूर्वीच ग्रामीण भागात पोचल्या आणि जात्यावरची ओवी मुकी झाली. यात एक गोष्ट चांगली झाली की, उरी फुटेपर्यंत दगडी जाती ओढण्याचे बायकांचे कष्ट संपले. राना-शेतातही विहिरीवरचे पाण्याचे पंप आले त्यामुळे बाईला चिखलात जायची गरज कमी झाली. मोटेच्या जागी पुरुष माणसं यंत्र चालवू लागली. नांगर गेला ट्रॅक्टर आला, पेरणी, कापणी, मळणी सगळी कामं यंत्राची झाली. बैलांची, मजुराच्या गडी-माणसांचीही गरज कमी होत गेली. त्यामुळं ''घरधन्यासाठी भाकरी नेणारी कारभारीण'' ही जुन्या ग्रामीण कथा-कवितेतच शिल्लक राहिली; कारण साखर कारखान्याला ऊस घालणारा बागाईतदार शेतकरीही आता मोटारसायकलवरून जाऊ लागला. मोठ्या शेतकऱ्याच्या मालकाच्या हातालाच आता माती लागेनाशी झाली. तर घरच्या बायकांना त्याची गरज उरली नाही.

दुसरीकडे लहान कोरडवाहू शेतकरी मात्र कंगाल होत चालला. मजुरीसाठी आता तो बायकां-मुलांसह सरकारी रोजगार हमीचा कामगार झाला. ग्रामीण जीवनातले अर्थकारणही रोख पैशाभोवतीच फिरू लागले. जमिनीविषयीची आस्था ओसरत जाणारा एक तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात वाढला. मोठ्या शेतकऱ्यांतून पुढे येणाऱ्या राजकीय पुढारीपणाच्या आकर्षणात तो अडकला कष्टापेक्षा पोषाखीपणात गुरफटला. थोड्याफार शिक्षणाने धड नोकरीची हमी राहत नाही. शहरी चटपटीत विद्यार्थ्यांपुढे आपण कमी पडतो हा न्यूनगंडही आला. काम नाही, जमिनीचा संबंध तुटत चाललेला, तरुणपणाची रग, ग्रामीण नेतृत्वाचे आकर्षण, म्हणून त्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या फळीत काम करताना वाढत जाणारी निराशा आणि परिणामत: सहज उपलब्ध असलेल्या व्यसनी वस्तूंची उपलब्धता त्यातून वाढणारी व्यसनाधीनता हेही चित्र दिसते.

अशा स्तरातल्या ग्रामीण स्त्रीची ससेहोलपट वाढली. त्यातच ग्रामीण भागात पाण्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट झाली. झाडीतोड इतकी झाली की, गावे उजाड आणि भकास होऊ लागली. पण पाणी आणि चुलीसाठी जळण हे बाईच्या दरदिवशीच्या निकडीचे प्रश्न अधिकाअधिक बिकट झाले. जळणासाठी आणि पाण्यासाठी मैलोन्‌मैलाची पायपीट करताना श्रमकरी बाई जिकिरीला

आली. अपरिमित झाडीतोड झालेल्या उजाड गावातून बायकांना देहधर्मासाठी आडोसे नाहीसे झाले; पण त्याप्रमाणात नवी बंदिस्त स्वच्छतागृहे न झाल्याने कुचंबणा वाढली. यंत्रामुळे शेतमजुरीतली तिची गरज उणावत गेली. पुरुषवर्गाची वाढती बेफिकीरी आणि व्यसनाधीनता यांचे सर्वात जास्त चटके या स्तरातल्या बाईलाच सहन करावे लागत आहेत.

त्यात गेल्या काही वर्षांत आणखी एका संकटाने तिला ग्रासले आहे. तो म्हणजे एड्स हा रोग. ग्रामीण स्त्रीची काहीही चूक नसताना, अपराध नसताना कुटुंबातल्या पुरुषांच्या बाहेरख्यालीपणामुळे झालेली लागण स्त्रियांपर्यंत पोचते आहे. तिच्या मुलांना जन्मापासून या असाध्य आजाराचे बळी व्हावे लागते आहे. पुरुषाला लागण झाली तर बाई त्याला कशी का होईना सांभाळते; पण बाईला लागण झाली की कुटुंबही तिला झिडकारते आणि तिच्या नशिबी जिवंत नरकवास येतो. ग्रामीण भागातही एड्सचे लोण वाढत आहे.

ग्रामीण जीवनातला एक सुस्थितीतला स्तर साखर कारखानदारी, सहकारी सोसायट्या, त्यातून आलेली राजकारणातली प्रतिष्ठा आणि सधनता यांचा लाभकरी आहे. या स्तरातल्या स्त्रियांना मात्र काही अपवाद वगळता फारसे स्वतंत्र स्थान मिळाले नाही. अनेकदा पुरुषांच्या आर्थिक सुबत्तेमुळे प्रथम विवाहाच्या स्त्रियांच्या कपाळी परित्यक्तेचे (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष) जिणे येते. सांगली जिल्ह्यातच काही कार्यकर्त्यांनी केलेल्या पहाणीत ग्रामीण भागातल्या स्त्रियांच्या परित्यक्ततेचे प्रमाण भयावह रीतीने वाढत आहे, असे आढळले आहे.

गेल्या काही वर्षांत एकूणच अर्थकेंद्री जीवनाकडे समाज इतक्या वेगाने ओढला जातो आहे की, ग्रामीण जीवनातही पैशासाठी कोणताही विधिनिषेध न बाळगणाऱ्यांचा वर्ग वाढतो आहे. स्त्रियांच्या हुंडाबळींची, जळितांची, आत्महत्येला भाग पडणारींची संख्या इतकी वाढत आहे की, ती जणु समाजाच्या अंगवळणी पडणारी बाब झाली आहे. वर्तमानपत्रातल्या अशा बातम्यांचे कोणाला काही वाटेनासे झाले आहे. लग्न करून घरात आणलेली तरुण स्त्री हे पैसे मिळवण्याचे सोपे साधन वाटते आहे. तिचा छळ करण्यात सासरघरची सर्व स्त्रीपुरुष मंडळी सहभागी असतात. ग्रामीण माणसे म्हणजे साधीभोळी सरळ पापभिरू माणसे हा एकेकाळचा समज अत्यंत भीषणपणे मागे पडला आहे.

स्त्रीला मुलगा किंवा मुलगी होण्यात तिचा काही दोष नसतो हे वैज्ञानिक सत्य माहीत असूनही मुलगा होत नाही म्हणून स्त्रीचाच छळ होण्याच्या पारंपरिक मनोधारणेत काहीही बदल झालेला नाही. वैज्ञानिक संशोधनाचा उपयोग पारंपरिक मन नेमक्या विपरितपणे करून घेताना दिसते. ग्रामीण भागात स्त्री-पुरुष शिक्षणाचे

प्रमाण निश्चित वाढले आहे. प्रसार माध्यमांनीही वैज्ञानिक सत्य लोकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही गर्भजल परीक्षेसारख्या नव्या शोधांचा उपयोग केवळ स्त्रीगर्भाची हत्या करण्यासाठीच केला जात आहे. वस्तुत: हा कायद्याने गुन्हा असूनही समाजातले सर्व घटक त्यात सहभागी आहेत. परिणामत: स्त्री-पुरुषांची समाजातली संख्या झपाट्याने विषम होत आहे. एक हजार मुले जन्माला आले तर मुलींचे प्रमाण फक्त ९३३ असल्याची ताजी आकडेवारी आहे. म्हणजे दिवसेंदिवस स्त्रियांची संख्या कमी होत जाणार शिवाय हुंडाबळी, बालमृत्यू, मुलींची अधिक हेळसांड झाल्याने होणारे मृत्यू, बाळंतपणात तरुण स्त्रियांचे होणारे मृत्यू यामुळे स्त्रियांची संख्या आणखीनच उणावते आहे.

म. फुले, आगरकर, धोंडो केशव कर्वे, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी अशा स्त्रियांविषयी पुरोगामी विचार-आचार असलेल्या लोकोत्तर महामानवांच्या महाराष्ट्रात स्त्रियांविषयी इतकी तुच्छता असावी हा या सुधारकांच्या भूमीचा करंटेपणा म्हणायचा!

स्त्रियांच्या बाबतीत विषमतेची वागणूक ही या देशाला नवी नाही; पण कालमानानुसार हे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढते आहे ही चिंतेची बाब आहे.

पण तरीही आशेला जागा आहे.

'बाईची जात हरळीसारखी चिवट आणि जिवट असते.' अशी जुनी लोकोक्ती आहे. ती भारतातल्या ग्रामीण स्त्रीच्या बाबतीत अनुभवाला येते आहे. बदलत्या वातावरणाचे भान तिलाही आले आहे. ग्रामीण भागात झालेल्या शिक्षणसंस्थांमुळे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. वाचन, प्रसिद्धीमाध्यमे यातून तिच्या विचारांची कवाडे मोकळी होत आहेत. ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांची आणि मुलींची संख्याही लक्षणीयरित्या वाढते आहे. शिक्षकी पेशात नगरपालिकांच्या प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळातून ग्रामीण स्त्रियांची संख्या डोळ्यांत भरेल अशी आहे. एखाद दुसरी प्राध्यापक पेशाही स्वीकारते आहे. संगणक शिक्षणाकडे मुलींचा ओढा वाढतो आहे. पालकांची प्रतिकूल परिस्थिती असेल तर लहानमोठे कामे (शिकवण्या, शिवणकाम, अर्धवेळ नोकऱ्या) करीत जिद्दीने शिक्षण पूर्ण करून अर्थार्जन करण्याची उमेद वाढते आहे.

सरकारी धोरणांमुळे ग्रामपंचायतीत स्त्रियांसाठी राखीव जागा आल्यानंतर स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या पुरुषप्रधान मानसिकतेला प्रथम थोडे कठीण गेले तरी उपजत जिद्द असलेल्या अनेकींनी घरात आणि बाहेर संघर्ष करीत आपली पात्रता सिद्ध केली आहे. अनेक सत्ताकांक्षी पुरुष बायकांच्या नथीतून तीर मारीत बायकोच्या पदाचा कारभार आपल्याच हाती घेत आहेत. काही जण आपल्याच घरातल्या

बायकांना स्थानापन्न करण्याची 'राजकारणे' करीत आहेत. अनेक सरपंच स्त्रियांवर अविश्वासाचे ठराव आणून त्यांना पदच्युत केले जात आहे. स्त्री वरचढ होणे अजून पुरुषप्रधान व्यवस्थेला सहन होत नाही. ती एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून मान्यता देणे जड जात आहे, अशी सगळी प्रतिकूलतेची काटेरी वाट तुडवीत अनेकजणी जिद्दीने कर्तृत्व गाजवीत आहेत. जिथे त्यांना गावकऱ्यांचा, सहकाऱ्यांचा पाठिंबा मिळतो तिथे पुरुष सहकाऱ्यांपेक्षाही त्या सरस कामे करीत आहेत. विशेषत: गावाचे पाण्याचे प्रश्न, स्वच्छतागृहाचे प्रश्न अग्रक्रमाने हाती घेत आहेत. म्हणून त्यांचा पाठिंबाही वाढत आहे.

नुकत्याच सुरू झालेल्या ग्रामस्वच्छता अभियानातील पुरस्कारविजेत्या गावातील स्त्रियांचा वाटा सर्वाधिक आहे. याचा पुन्हा पुन्हा उल्लेख केला जात आहे. स्त्रियांना एखादी गोष्ट मनापासून पटली की त्या जिद्दीने तिचा पिच्छा पुरवतात. ग्रामस्वच्छतेमुळे पाणीप्रश्न, रोगराई दूर होणे, पर्यावरण रक्षण अशा चिरस्थायी वृत्तींची रुजवण ग्रामीण भागात होत आहे. महात्मा गांधींनी खेडे हे केंद्र मानून विकासाची जी कल्पना मांडली होती ती स्त्रियांच्या पुढाकारानेच यशस्वी होऊ शकेल अशी प्रसादचिन्हे दिसत आहेत.

स्त्रियांना थोडे अनुकूल वातावरण मिळाले, थोडे आर्थिक सहकार्य मिळाले, योग्य मार्गदर्शन मिळाले तर ग्रामीण भागात शेतीशी संबंधित असे अनेक व्यवसाय समर्थपणे करून त्या आपल्या कुटुंबाची पर्यायाने अभावग्रस्त ग्रामजीवनाची नव्याने पुनर्उभारणी करू शकतात असेही अनुभव वारंवार येत आहेत. स्त्रियांना प्रपंच चालविण्याचा पिढ्यान् पिढ्यांचा अनुभव असल्याने जीवनातल्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यास त्या प्रामाणिकपणे झटतात असा अनुभव येतो. समाजाने आपली जुनी पुरुषकेंद्री पुरुषसत्ताक मानसिकता बदलण्याची मात्र गरज आहे.

ग्रामीण स्त्रियांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे कुटुंबातील पुरुषांची वाढती व्यसनाधीनता! विशेषत: दारू! पौरुषाचे अत्यंत सोपे आणि पलायनवादी साधन म्हणजे दारू. अशा पुरुषी वृत्तीचा सर्वाधिक त्रास निरनिराळ्या नात्यांनी स्त्रियांना होतो. पुरुषवर्गाचा आळशीपणा, स्त्रियांनी कष्टाने मिळवलेल्या पैशाच्या जोरावर व्यसनात बुडणे, स्त्रियांनाच मारहाण करणे, छळ करणे ही सार्वत्रिक बाब दिसते. त्यामुळे गावातून दारू हद्दपार करण्यासाठी स्त्रियांनाच संघटितपणे चळवळी कराव्या लागतात. जेथे त्या करतात तेथे त्यांना यशही येते. मात्र गुत्तेवाले, पोलीस आणि सरकारी कायदे यांचा फार मोठा अडथळा येतो. पुरुषांची व्यसने ही स्त्रियांची समस्या बनणे ही पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या रोगट

अहंकारी मानसिकतेची परिसीमा आहे. त्याची खरे तर शरम वाटली पाहिजे; पण अनेकदा आंदोलनकर्त्या स्त्रियांनाच पोलिसांच्या रोषाचा प्रसाद मिळतो आणि तरीही जागोजागी बायका दारूविरोधी आंदोलने छेडत आहेत.

व्यसनाधीन होणे हे खरे तर जीवनातल्या खऱ्या समस्येपासून दूर जाणाऱ्या भ्याड, दुबळ्या आणि पलायनवादी मानसिकतेचे लक्षण आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होणारा पुरुषसमाज या दुबळेपणाचा बळी आहे आणि अशा दुबळ्या मानसिकतेच्या समाजाने स्त्रियांना 'अबला' म्हणावे हा सर्वात भीषण विनोद आहे. जन्मापासूनच ग्रामीण स्त्रीवर्ग नकाराला आणि अन्यायाला सामोरा जात असतो. कष्ट तर अपरंपार असतात. या वेदनेतून सुटण्यासाठी त्या नाही कोणत्या नशेच्या आहारी जात? त्या उलट मूळ समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करीत असतात.

स्त्रीला केवळ शाब्दिक गौरवाचे आणि 'देवी'त्वाचे मोहजाल आता मोहवू शकत नाही. ग्रामीण स्त्रीही अनेक अंगांनी जागी होते आहे. तिच्या मार्गातले अडथळे खूप मोठे आहेत; पण ते दूर करण्याची तिची जिद्द त्याहीपेक्षा मोठी आहे.

आम्हाला खरोखर ग्रामकेंद्री विकासाचे स्वप्न सत्यात आणायचे असेल, तर या सुकलेल्या हरळीला अनुकूल वातावरणाचे खत-पाणी द्यायला हवे. तिला मोकळ्या मनाने कुटुंबाने, समाजाने, सरकारने आणि मुख्य म्हणजे तिच्या आसपास अनेक नात्यांनी वावरणाऱ्या पुरुषवर्गाने साथ द्यायला हवी. त्यात त्याचे आणि त्याच्या भावी पिढ्यांचेही कल्याण आहे. ''एक स्त्री शहाणी झाली की कुटुंबाला शहाणी करते.'' असे म्हणणाऱ्या म. ज्योतिबा फुलेंची वाणी सत्य ठरण्याचा अनुभव पदोपदी येतच असतो.

# नवसहस्त्रक : परंपरा आणि परिवर्तन!

एकविसावे शतक असो की पहिले शतक असो किंवा माणसाला आपल्या माणुसपणाचे भान येण्याचा प्रारंभकाळ असो; आनंद, उत्सव आणि त्यापोटीचा उत्साह हा जणु समाज म्हणून माणसाचा स्थायीभाव आहे.

ज्या क्षणी दोन व्यक्तींनी एकमेकांकडे पाहून प्रथम हास्य केले असेल, निर्हेतुकपणे स्पर्श केला असेल त्याक्षणीच उत्सवाचा प्रारंभ झाला असेल. त्याची रूपे बदलत आली हे स्वतंत्रपणे सांगायला नको; कारण सतत बदलणे हे व्यक्तीच्या आणि समाजाच्याही जिवंतपणाचे लक्षण असते. जोवर समाज जिवंत राहणार आहे, तोवर माणूस उत्सव साजरे करणारच आहे.

उत्सव म्हणजे एकापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येऊन आनंद निर्माण करणे. मग त्यानुसार ते उत्सव कुटुंबापुरते असतील किंवा घराणे, जात, जमात, गाव, राष्ट्र, जग अशी व्याप्ती वाढवीत नेणारे असतील. सध्याच नाही का नवसहस्त्रकाच्या उंबरठ्यावरचा उत्सव साजरा करण्यासाठी सगळे जग सज्ज झाले आहे. जात-पात, पक्ष-पंथ हे भेद ओलांडून, धर्म-भाषा आणि राष्ट्र यांच्या सीमांचे उल्लंघन करून हा महोत्सव साजरा करण्यासाठी जग कटिबद्ध झाले आहे. यात व्यापारीकरणाचा भाग - राजकारण कितपत आहे याच्याशी उत्सव साजरा करणाऱ्यांना काही देणे-घेणे नाही. तो काथ्याकूट समाजचिंतकांनी करावा - हे का होते? साधे उत्तर आहे, माणूस समाजशील प्राणी आहे, याचाच अर्थ तो उत्सवप्रिय प्राणी आहे.

जगभर आदिमकाळापासून साजरे होणारे काही उत्सव पिढ्यान्‌पिढ्या आपोआप साजरे होत आहेत. त्यासाठी खरे तर कोणत्या पंचांगांचीही गरज नसते. पाऊस पडला, नवे धान्य, फुले, फळे आली, नद्यांना पाणी आले, सुखद ऊन पडले, कोणतेही कारण उत्सवासाठी पुरते आणि यातले काही ना काही सतत घडतच आले आहे ना! समाजबांधणीच्या ओघात मग कुणी त्या प्रदेशांच्या पंचांगांतही त्यांची नोंद केली आणि त्यांना सांस्कृतिक संस्थात्मकता दिली इतकेच! पण

आधी उत्सव, मग पंचांग हे पक्के!

आणखीही महत्त्वाच्या गोष्टी जगभर सतत घडत असतात आणि त्यांचेही उत्सव होत असतात. एका बाईच्या देहातून हुबेहूब माणसाचे इवलेसे रूप जन्म घेते, तो क्षण किती विस्मयचकित करणारा! तो 'क्षण' हाच 'सण'! आनंददायी क्षण म्हणजे सण! त्यापोटी होणाऱ्या हर्षाचा आविष्कार हा उत्सवच! म्हणून मग गाणे, नाचणे (वाद्ये), वाजवणे, खाणे-पिणे, सुंदर वस्तू (रांगोळ्या, मूर्ती, वस्त्रे इ.) घडवणे, अनेक अंगांनी उत्सवाचा उत्साह सर्व समाजात व्यक्त होत असतो.

बाळ जन्माची पूर्व अट म्हणजे विवाह, म्हणून तोही उत्सव! विवाहाची पूर्व अट म्हणून स्त्रीची पहिली रजस्वलावस्था म्हणून तोही उत्सव, बालपणीच्या नाजूक अवस्थेतून बाळ तगले, म्हणून पाचवी, षष्ठी, बारसे... सगळी उत्सवांची मालिका! शुद्ध माणसाची, शुद्ध प्राकृतिक निर्मिती म्हणजे अपत्यजन्म! ते सृजन हे उत्सवाचे निमित्त!

म्हणून जमीन, पाणी, सूर्य यातून झालेले सृष्टीचे सृजन असो की नर-मादी एकत्र येऊन झालेले अपत्य सृजन असो दोन्हीही शुद्ध प्राकृतिक, सनातन सृजनोत्सव झाले असले तर आश्चर्य नाही. हे अनुभव एकूणच सार्वत्रिक माणसाच्या जातीचे असल्याने या घटनांशी निगडित उत्सवही सार्वत्रिक असणार. अगदी आदिम काळापासून नवसहस्त्रकापर्यंत आणि आदिम जातींपासून प्रगततम समुदायांपर्यंत! नावे फक्त भिन्न!

या उत्सवी उत्साहाच्या पोटात अगदी खोलवर एक भावना असते ती भय! भयभावना ही अगदी जन्मजात! आईच्या सुरक्षित गर्भकोशातून बाहेर फेकले जाण्याचा क्षण हा भयाचा प्रारंभ क्षण! भोवतालच्या जगात आपली सुरक्षितता जपणे हा भयापोटीचा उद्योग माणूस जन्मभर या ना त्या प्रकारे करीत असतो. एकाकी, एकान्त, अनामिक भयमुक्ततेसाठी स्वेतर जगाशी संबंध जोडीत ऐहिक जीवन सुरक्षित करणे ही गरजच असते. त्यापोटी अनेक बाबींबरोबरच सण-उत्सवांचा पसारा माणसाने वाढवीत नेला आहे. आदिम अवस्थेत नृत्य-गीतातून तो स्वेतर जगाशी नाते जोडीत राहिला. दुसरीकडे प्रतिकूल निसर्ग अनुकूल व्हावा म्हणून प्रकृतीशी संवाद साधित राहिला - पाणी, झाडे, पशु-पक्षी, सूर्य, आकाश या प्रकृती घटकातच माणसाला एकाच वेळी रक्षक आणि भक्षक शक्तींचा प्रत्यय आला आणि त्यातूनच माणसाच्या मनात 'देव' जन्माला आला. सण-उत्सवाला आणखी एक निमित्त!

बायकांचे जीवन तर दर क्षणी असुरक्षिततेला सामोरे जाण्यास भाग पाडणारे. बाळाने पोटात आकार घ्यायला सुरवात केल्यापासून दोघेही असुरक्षित. मग ती

असुरक्षिततेची भयभावना नष्ट करणारी अनेकानेक 'सुफलीकरण' विधी-विधाने बायकांच्या आयुष्याला व्यापून राहिली. त्यांची व्रते झाली. ती एकीकडे कलात्मक निर्मितीद्वारे भयकोशाला वाट देत राहिली. आनंद निर्माण करीत राहिली.

काही मानवी भयांवर (बाळजन्म) वैज्ञानिक उपाय निघाल्याने त्याप्रमाणात व्रतवैकल्याच्या मुळाचे भय कमी झाले. ती सोडण्याची मानसिकता आली, हे चांगलेच झाले. तरी अनाम भयाची एक पेशी मनाच्या तळाशी असते. त्यासाठी माणूस मार्ग शोधतो. कलात्मक सृजन आणि समूहात्मक उत्सव हे त्यासाठी अधिक निरामय मार्ग असतात. म्हणूनच सण-उत्सव होतच राहतात त्यात स्त्रिया अग्रेसर असतात. त्यांनी आपली भयभावना अधिक सृजनात्मक, उपयुक्त कलात्मक माध्यमातून मुक्त करावी, ही अपेक्षा!

नव्या शतकात ती वाढली पाहिजे. तशी ती वाढली की पारंपरिक मृत कर्मकांडांना रजा मिळत जाईल.

जन्म आणि विवाह या घटनांशी संबद्ध ते सर्व सृजनोत्सव! पण मृत्यूचाही उत्सवच असतो. थोडे औदासिन्याचे पटल असतेच, चिरविरहाची कासाविशी असतेच, पण हे 'जाणे' दुसऱ्या 'येण्यासाठी' आहे, हे 'नसणे' दुसऱ्या कोणत्यातरी 'असण्या'साठी आहे, हा भावात्मक दिलासा असतो. म्हणून तर मरणाचाही 'सोहळा' होतो! सर्वच समाजात होतो. पुन्हा तपशीलात फरक असेल, तत्त्व कायम! त्यापोटीची कर्मकांडे नव्या जीवनाला अनुरूप बदल घडवीत आहेत.अडचण कोठे होते की, या प्राकृतिक उत्साहाला जेव्हा विशिष्ट सामाजिक हितसंबंधांची चौकट जखडून ती जाच करू लागते तेव्हा! त्याला व्यावहारिक हेतूंच्या गाठी बांधून प्राकृतिक उत्साह बंदिस्त केला जातो तेव्हा! तेव्हा उत्सवी आनंदाच्या विकासाला, मतलबाचे बांध घातले जातात. काही 'विशिष्टां'च्या लाभासाठी बाकीच्यांची मने-भावना बंदिस्त केल्या जातात तेव्हा!

सृष्टीच्या सृजनाचा स्वाभाविक आनंद मातीचे सुफलित होणे आणि मातेचे सुफलित होणे निर्मळपणे परस्पररूपात अनुभवण्यासाठी केलेल्या उत्सवी प्रतीकात्मक कृती (नृत्य, गीत इ.) आनंददायकच असतात. घटात बीज उगवलेले पाहण्यात प्रतीकात्मक सृजनाचा आनंद असतो; पण तो जेव्हा पातिव्रत्याच्या काचात आवळला जातो तेव्हा निखळ मातृत्व गुदमरण्याची शक्यता निर्माण होते. तो केवळ बाळाच्या जन्माचा आनंद रहात नाही तर बाळाच्या जन्माला कारण होणाऱ्या पुरुषाच्या प्रतिष्ठेचा भाग होतो आणि त्या पुरुषाची मान्यता विशिष्ट पद्धतीने असेल तरच ते मातृत्व, तो जन्म आनंददायी होतो आणि तेव्हा हे काच प्राकृतिक आनंद बंदिस्त करतात. मातेचे मन सृजनापेक्षा एका मानवनिर्मित

सामाजिक भयाला जन्म देतात. सृजनाला कारण होणाऱ्याशीच जखडून टाकतात. ते रूढ व्यवस्थेला मान्य नसेल तर तिला माणसातून उठवतात. रूढी बलवान ठरते आणि अशा अनेक रूढी मग अनेक घटकांच्या प्राकृतिक बंदिस्तीवर उभ्या राहतात. (शास्त्रात रूढीर्बलीयसि). त्या रूढी मग बळजबरी करतात. मग ते उत्सव, व्रते अनेकदा जाचक ठरतात आणि बहुधा स्त्रिया त्यांच्या बळी ठरतात. प्राकृतिक उत्सवी घटकांना धर्ममार्तंड आणि पुरोहितशाही आपल्या विशिष्ट हेतूंशी बांधून टाकते आणि अर्थशून्य कर्मकांडांच्या पसाऱ्यालाच महत्त्व प्राप्त होते. त्याची ही मग सवय होते. आता स्त्री हे 'राजकारण' समजून घेऊ लागली आहे. त्यातून ती बाहेर पडू पाहत आहे.

अठराव्या शतकापर्यंत हे जगभरच झाले; पण पुन्हा त्याविरोधी विचार जागृती झाली. स्त्रियांबाबत भारतात विसाव्या शतकात नवभान आले. व्रत-उत्सवांच्या नावावर स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व, त्यांची सर्जनशीलता मोठ्या प्रमाणावर बंदिस्त झाल्याची जाणीव झाली. स्त्रीचे सगळे मानसिक विश्व पुरुषावलंबित्वाने बंदिस्त झाल्याची जाणीव झाल्यामुळे मग सर्वच पारंपरिक व्रतांचा पुनर्विचार करण्याची गरज भासली.

आता लक्षात आले असेल की, स्वाभाविक सृजनानंद हा उत्सवाचा गाभा असतो; पण या निमित्ताने येणारी मानसिक बंदिस्ती बायकांनी झुगारायला हवी. कालबाह्य कर्मकांडे बायका झुगारू लागल्या आहेतच! सर्जनशील आनंदाला मात्र नवे मार्ग देणे आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे उंबरठ्याबाहेर पडलेल्या स्त्रीला केवळ देहाने सृजन करणे (अपत्य जन्माला घालणे) हेच आपल्या अस्तित्वाचे गौरी-शंकर मानण्याची गरज नाही. स्त्री म्हणजे केवळ देह नव्हे. मन-बुद्धीसह देह म्हणजे पूर्ण अस्तित्व होय! म्हणूनच सर्व कलात्मक सृजनाचे दरवाजे तिला मुक्त असताना केवळ एकाच अवयवाशी संबंधित सृजनात तिने का गुंतून रहावे? ते तिने वैकल्पिक का ठेवू नये? किंवा एखाद्या वेळी प्रकृतीची काही अडचण असेल तर त्या स्त्री-पुरुषांनी जीवनातील तेवढा भाग सहज बाजूला ठेवून आपल्या उर्वरित सृजनशक्ती का फुलवू नयेत? अशी भूमिका अधिक उन्नत म्हणून पुढे येत आहे. स्वाभाविकच मग पारंपरिक पद्धतींच्या कर्मकांडाचा त्याग किंवा काळानुसार, सोयीनुसार नवे वळण का देऊ नये? तसे ते दिले जातच असते.

पण अशा वेळी परंपराशील मने थोडी धास्तावतात. ती अधिक स्थितीशील राहू पाहतात. पारंपरिक कर्मकांड स्त्रीने सोडले तर जणु काही ती आपल्या 'हाताबाहेर' चालल्याची भीती वाटते. सध्या नव्हे तर नेहमीच पुरुषप्रधान

व्यवस्थेला (ती व्यवस्था मानणाऱ्या स्त्रियांनाही) भीती वाटते. खरे तर तो त्या व्यवस्थेतील पोकळपणाचाच आविष्कार असतो. जणु काही सर्व स्त्रिया आता घरे सोडून जातील आणि ''कुटुंबव्यवस्था उध्वस्त होईल.'' या भयगंडाने ते पछाडतात. गेली सुमारे दोनशे वर्षे आधुनिक युग आल्यापासून हा भयगंड डोके वर काढताना दिसतो.

खरे तर कुटुंबव्यवस्थेत जे काही बरे-वाईट बदल झाले त्याला एकटी स्त्रीच जबाबदार कशी? बदलती अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था या व्यवस्थेतला कर्ताकरविता पुरुष घटक जबाबदार नाही का? तसा तो असू शकतो, असा विचारही एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असतानाही का निर्माण होऊ नये? कुटंबव्यवस्था सुरळीत चालविण्याची जबाबदारी सर्वच घटकांवर असणार आहे. असायला हवी. केवळ स्त्रीवर जबाबदारीचे ओझे टाकून नामानिराळे राहता येणार नाही. काळाबरोबर येणारे अनेक बदल, सोयी आम्हाला हव्या असतील, त्या मिळविण्यासाठी स्त्रींचे अर्थार्जनासह सर्व सहभाग हवा असेल तर मग जे काही बदल होतील त्याची जबाबदारीही उभय घटकांची असणार आहे. त्यासाठी पारंपरिक व्रतवैकल्ये वा रूढी या आता स्त्रीला पुरेशा नाहीत.

मात्र याचा अर्थ जीवनातला आनंद आणि उत्सव संपणार आहेत असा नाही उलट ते वाढत आहेत. त्यांचे स्वरूप बदलत आहे. ते अधिक वैश्विक (युनिव्हर्सल) होत जाणार आहेत. आजही आपण नाताळ आणि नववर्ष, स्वातंत्र्योत्सव हे नवे उत्सव स्वीकारले आहेत. वाढदिवसाचे केक आणि मेणबत्त्या सार्वत्रिक झाल्या आहेत. त्याचेच मोठे आविष्कार म्हणजे विवाहासारखे समारंभ! या समारंभात धार्मिक विधींच्या गांभीर्यापेक्षा उत्सवी देखाव्यांनाच महत्त्व येत आहे. तसे तर ते आधीही होतेच. आता ते अधिक उघडपणे होते इतकेच! अखेर विवाह हा 'समारंभ'च असतो. 'मानसिक बांधिलकी असेल तर केवळ विधी कितपत गरजेचा आहे? असाही विचार नवीन स्त्री-पुरुषांनी केला तर गडबडून जायचे कारण नाही. नाहीतरी 'विवाह समारंभ' समाज मान्यतेसाठीच (Social Sanction) असतो. जाहीर समारंभ झाला की ती मान्यता मिळतेच. त्या थाटामाटाचे स्वरूप ते करणाराच्या ऐपतीवर मात्र अवलंबून असावे. अन्यथा नोंदणी विवाहाचा पर्यायही आहे. तरी स्वागतोत्सवाचा आनंद सोहळा राहतोच.

नवसहस्त्रकात अनंत वाटांनी कल्पकता, सर्जनशीलता कार्य करणार असेल, माणसाला विकसित करीत भयमुक्ततेकडे नेणार असेल तर आनंद सोहळे अधिक व्यापक निरामय, वैश्विक व्हायला हवेत.

# चिंताजनक परिवर्तन

सालाबादप्रमाणे नुकतीच ज्येष्ठी पौर्णिमा-वटपौर्णिमा झाली. पारंपरिक पद्धतीने अनेक स्त्रियांनी हे सौभाग्यव्रत म्हणून साजरे केले. त्यात शिक्षित, अर्धशिक्षित, अशिक्षित सर्वच जणी होत्या. हेही तसे नेहमीचेच!

त्याच्या थोडे आधी बरोबरीची एक मैत्रीण भेटली होती. दिवसेंदिवस समाजात कर्मकांड आणि देवताळेपणा वाढत चालल्याची तेव्हा चर्चा झाली. हेही तसे नेहमीचेच!

माझ्या पिढीतल्या अनेक शिक्षित स्त्रियांना पारंपरिक व्रतवैकल्ये, कर्मकांड यातील वैफल्य विचाराअंती पटले म्हणून त्यांनी या बाबी सोडून दिल्या होत्या. त्या सर्वजणी पूर्ण नास्तिक होत्या असेही नाही. आपल्या स्वत:पुरत्या त्या काही वैयक्तिक-कौटुंबिक उपासनाही करीत होत्या; पण त्यासाठी आटापिटा मात्र करीत नव्हत्या. त्यांच्या मागच्या पिढीतल्या बायकांना चाकोरीचा धबडगा सोसताना होणारी ओढाताण आणि तरीही कर्मकांडाबाबतचा हटवादीपणा यातून या बायका बाहेर आल्या होत्या.

मध्यमवर्गीय बायकांची घराबाहेर पडून नोकरी करणारी पहिली - दुसरी पिढी भूतकाळाच्या काचातून आणि हटवादी वडिलधाऱ्यांच्या धाकातून सर्व कर्मकांडेही करीत होती; पण त्यांची ओढाताणच झाली म्हणून ज्यांना मोकळीकीची संधी मिळाली त्यांनी आपल्या विवेकाचा कौल अमलात आणला होता.

भारतीय स्त्रीचे मानसविश्व अखंड दडपणाने आणि भयगंडाने ग्रासलेले असते. त्याची दोन मुख्य कारणे! एक आधी लग्न लवकर होऊन मुलगा जन्माला घालणे आणि दुसरे 'अहेव' मरण मरणे! म्हणजे नवऱ्याच्या आधी मरणे. ह्यापैकी खरे तर स्त्रीच्याच काय पण कोणाच्याही हाती काही उपाय नसतो; पण तिच्या दुर्दैवाने यापैकी काही घडले तर काय करायचे? येथील कुटुंबव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत तिच्या हालांना पारावार रहात नाही. हे झाले तर काय?

या भयाची एक अनामिक टांगती तलवार सतत तिच्या डोक्यावर असते; कारण स्त्रीजीवनाचे सगळे अस्तित्व आणि सार्थक्यच असे पुरुष घटकांशी बद्ध असते. अशात काल्पनिक सुरक्षितता देणारे कर्मकांड हा सोपा दिलासा तिला जवळचा वाटतो.

आपल्या कुटुंबातील घटकांविषयी प्रेम, आदर, आस्था असणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे हे खरे! पण आपल्या हाती नसलेल्या एखाद्या कारणामुळे एखाद्या कुटुंबियाचा विशेषत: पतीचा वियोग झाला तर स्त्रीजीवनाचे वाळवंट होते. अशी येथील मानसिकता आहे. प्रत्यक्षात तिची उपेक्षाच होते. विशेषत: तरुणपणात वैधव्य आले तर तीच 'पांढऱ्या पायाची' ठरते. उलट झाले तर पुरुष मात्र दोषाचा धनी होत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेतून पुरुष (पुत्र वा पती) विरहित जगणे हे भौतिक (आर्थिक स्तरावर) आणि मानसिक स्तरावर दु:सह होते. तिचे निराधारत्व हे तिचे पूर्वजन्मीचे पाप ठरते. तरुण विधवेला तर देह सुरक्षित ठेवणे कुटुंबातही कठीण होते. खरे तर पती असला तरी स्त्री त्या पातळीवर सुरक्षित असतेच असे नव्हे. अगदी पुराणातल्या अहल्येपासूनची उदाहरणे समोर आहेत; पण पती हा 'संरक्षक' तोही स्त्रीच्या 'शीला'चा (यात भाऊही संरक्षक असतो) संरक्षक हे गृहीत असते. ते वास्तवात आल्याचा मात्र फारसा अनुभव नाही आणि तरीही कुटुंबातले पुरुष घटक हे रक्षक ही प्रतिमा अगदी अंतर्मनात पिढ्यान्‌पिढ्या रूजली आहे. म्हणूनच अर्थार्जन करणारीलाही आपले अस्तित्व पुत्र-पतीशिवाय कल्पिणेही असह्य व्हावे अशी मानसिकता असते. अखंड या भयाचे सुप्त दडपण असते.

स्त्रियांच्या भोवती जो पारंपरिक व्रतवैकल्यांचा पसारा पूर्वापार आहे, तो सगळा कोणत्या ना कोणत्या नात्याने (भाऊ, पती, पुत्र इत्यादी) पुरुष घटकांची सुरक्षितता राखण्यासाठी आहे. व्रतसंबद्ध देवतेने ती सुरक्षितता राखावी म्हणून एकीकडे विविध कर्मकांडे आणि उपवासादि आचरणातून आत्मक्लेश (सेल्फ टॉर्चरिंग) असे थोडक्यात व्रताचरणांचे स्वरूप असते.

ज्येष्ठ ते अश्विनाअखेरपर्यंतची सर्व व्रते ही प्रामुख्याने सृष्टीच्या निर्मितीकाळातल्या विविध टप्प्यांशी संबंधित असलेली 'सुफलन व्रते' (fertility rite) आहेत. पर्जन्यकाळातील सृष्टीचे सुफलित होणे ही माणसाच्या अस्तित्वाची मूलभूत गरज आहे. या अपेक्षेतून आदिम अवस्थेपासूनच्या 'यातुक्रिया' (magical rite) हे या व्रतांचे मूळ रूप आहे. नंतर ते स्त्रीच्या सर्जनशीलतेशी जोडले गेले. जेव्हा विवाहसंस्था दृढ होत गेली तेव्हा त्याचे नाते स्त्रीच्या स्वतंत्र सर्जनशीलतेपासून तोडले गेले. ते पतीशी दृढ केले गेले आणि स्त्रीच्या

सर्जनशीलतेवर सर्वार्थाने पुरुषसत्तेचे शिक्कामोर्तब झाले.

सर्व व्रताचरणात एक उत्सवी उत्साहाचा भाग असतो. तो स्त्रीच्या (खरे तर सर्वांच्या) कलात्मक निर्मितीला वाट देत तिची सर्जनशीलता वृद्धिंगत करतो. फुला-फळांचे सुशोभन रांगोळ्या, विविध आकृत्या, पाणवठ्यांवर, झाडावेलींसमवेत समूहाने नृत्यगायनादि आविष्कार करणे हा सगळा सृष्टिसंवादी सर्जनशीलतेतून मुक्त आनंद भोगण्याचा भाग असतो.

पण याच व्रतांची बांधिलकी केवळ पुरुष घटकांच्या अस्तित्वाशी आणि त्यापोटीच्या भयाशी जेव्हा संबद्ध होते, तेव्हा स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा संकोचही होतो. तिच्या मनावरच्या भयाच्या दडपणाशी तो बांधलेला असतो. मुक्त आनंद व समाधानापेक्षा 'हे व्रताचरण मी केले नाही तर पुरुष घटकाच्या वियोगाने, माझे जीवन निरर्थक तर होणार नाही ना!' हे भय असते; कारण पतिविरहित स्त्रीला चांगले वस्त्रालंकार, अन्न, नृत्य, संगीतादि आनंददायी कलाविष्कार सगळेच वर्ज्य केले जाते. पुरुष केंद्राशी व्रताचरणांची सांगड घातल्याने सर्वच पातळ्यांवर स्त्रीची सर्जनशीलता बंदिस्त होत गेल्याचे अनेक दुष्परिणाम झाले आहेत. जेव्हा जेव्हा स्त्रीने विवेकातून स्वत:ला या भयगंडातून मोकळे केले तेव्हा तेव्हा तिची सर्जक ऊर्जा अधिक कलात्मकतेकडे वळलेली दिसते. त्याच्या उदाहरणांना प्रस्तुत अवकाश नाही.

एरव्ही पती 'कसाही असला' तरी केवळ 'कुंकवाचा धनी' म्हणून त्याच्यासाठी आत्मक्लेशयुक्त कर्मकांडे स्त्रिया करीत राहतात. या जन्मी नाही तर पुढच्या जन्मी तरी त्याला सद्‌बुद्धी मिळावी ही एक भाबडी आशा! यात जन्मोजन्मी हाच पती अभिप्रेत आहेच.

व्रताचरणामागचा सर्जनशील उत्सवीपणा आणि भयगंडाचे दडपण यापैकी नक्की कोणत्या घटकाचे अधिक आकर्षण आधुनिक म्हणवणाऱ्या स्त्रीला वाटते! हा खरे तर समाजमानसशास्त्रीय संशोधनाचा विषय आहे. कारण अनेकदा असे दिसते की, ज्यांच्या आईची पिढी कर्मकांडयुक्त आचरणातून विवेकाने बाहेर आली होती, त्याच घरातील मुले-मुली पारंपरिक कर्मकांडाकडे वेगाने ओढले जात आहेत. कधी त्यात गंमत वाटते, हौस वाटते असे सांगितले जाते.

यातली गंमत आणि हौस हा उत्सवी सर्जक आनंदाचा भाग असतो. नवरात्रीच्या गरबा प्रकरणात त्याचेही भीषण बाजारीकरण होताना दिसते. पण 'बरे वाटणे' हा मुळात 'बरे वाटत नाही'शी संबंधित असतो. मानसिक-भावनिक अस्वस्थतेशी, असुरक्षिततेशी संबद्ध असतो. नवयुगातील अनेक ज्ञान-विज्ञानांना कवेत घेऊ पाहणारी नवी पिढी ही अनेक पातळ्यांवर (केवळ पती-पुत्र वियोगभय

नव्हे) मनातून अस्वस्थ, भयग्रस्त असेल तर मात्र चिंता करण्यासारखी परिस्थिती आहे.

तरुण स्त्रिया-मुलींचे पुन्हा कर्मकांडात गुरफटणे ही वास्तव समस्यांपुढे अगतिक होण्याची अवस्था आहे. मग जुन्या पठडीतल्या कर्मकांडांनाच केवळ पलायनवाद म्हणणे योग्य नव्हे. अस्वस्थता आणि भयगंड हे एकीकडे व्यक्तीला अगतिक करतात आणि दुसरीकडे त्यांचा समूह झाला की उन्मादी हिंसक होतात. स्त्रियांमध्येही हे बदल वेगाने होताना दिसत आहेत, ही अधिक चिंतेची बाब आहे. बाह्य परंपरा टिकवताना होणारे हे आंतरिक परिवर्तन चिंताजनक आहे.

# मध्यमवर्गीय स्त्री : सिंहावलोकन

**भा**रतीय संदर्भात स्त्रीमुक्ति चळवळीने नेमके काय साधले? या बाबत मध्यमवर्गीय स्त्रीपुरते सिंहावलोकन करणे सोपे वाटते. पण हा खरे तर एका मोठ्या प्रबंधाचा विषय आहे. तरीही एका वाक्यात उत्तराचे सूत्र सांगायचे तर 'फार थोडे साधले, खूप काही राहिले' आहे.

याचे एक महत्त्वाचे कारण असे वाटते की, एकंदरीत मध्यमवर्गीय परीघ ही एकुणातच सर्व परिवर्तनवादी चळवळींची मर्यादा ठरली आहे. स्त्रियांबाबत फारच. एका मध्यमवर्गीय मानसिकतेत स्त्री चळवळी दीर्घकाळ घोटाळत राहिल्या. ती कोंडी फोडण्याचा प्रयत्न झालाच नाही असे नाही. पण तोही मर्यादितच!

'स्त्री मुक्ती' हा शब्द १९७५ च्या आंतरराष्ट्रीय स्त्री मुक्ती वर्षानंतर प्रामुख्याने प्रचारात आला आणि अल्पावकाशात बदनामही झाला. ''स्त्री मुक्तीवाली बाई'' हा अवहेलनात्मक संबोध आजही आहे. याचे कारण मात्र १९७५ मध्ये नसून त्याही आधीच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील पाश्चिमात्त्य विचारसरणीतून घडलेल्या उदारमतवादी सामाजिक परिवर्तनातून आलेल्या वातावरणात आहे. त्या काळात 'स्त्री स्वातंत्र्य' हा शब्द प्रचारात होता.

सुधारणावादी चळवळी इंग्रजोत्तर काळात सुरू झाल्या; त्या खरे तर सामाजिक सुधारणेच्याच चळवळी होत्या. सामाजिक सुधारणेचा मूळ आशय व्यक्तीला सामाजिक जीवनात मिळणारा न्याय, समता आणि प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित होता. येथील पारंपरिक जीवन सर्वच पातळ्यांवर आधुनिक समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या मूल्यांनुसार विरोधी तत्त्वावरच उभे होते. विविध पातळ्यांवरील विषमता हा येथील पारंपरिक जीवनाचा मूलाधार होताच; पण तो सुप्रतिष्ठितही होता; कारण या सर्व विषमतेला धार्मिकतेच्या बैठकीवरच मोजले जाई. थोडक्यात म्हणजे सर्व विषमता धर्माच्या भक्कम आधारावर उभी होती. (आजही येथील भारतीय मानसिकतेचा एक सूक्ष्म अंश अत्यंत खोलवर याच मानसिकतेत आहे.)

सामाजिक पातळीवर जातिव्यवस्थेतील विषमतेची उतरंड, कौटुंबिक पातळीवर स्त्री-पुरुष लिंगभेदारित विषमतेतील तरतमभाव आणि याला तात्त्विक आधार म्हणून कर्मविपाकवादाचा पिढ्यान्‌पिढ्या रुजलेला भक्कम आधार यातून वाट काढण्यासाठीच आजवरच्या सर्व परिवर्तनवाद्यांची धडपड आहे.

जातिव्यवस्थेत आर्थिक, शैक्षणिक (ज्ञानविषयक) सांस्कृतिक विषमतेचे प्रश्न सामावलेले आहेत. जाती या वर्णाधिष्ठित आहेत की नाहीत हा वाद तूर्तास बाजूला ठेवला तरी व्यवसायाशी पर्यायाने अर्थोत्पादन व्यवस्थेशी जातींची बांधिलकी असल्याने आणि जाती व्यक्तीला जन्मजात लाभत असल्याने काही जाती आर्थिकदृष्ट्या नेहमीच शीर्षस्थानी राहिल्या तर काही नेहमीच 'पददलित' राहिल्या. त्यांचे व्यवसाय उच्चस्तरीयांच्या अमंगळ सेवांशी बांधलेले राहिले. धर्माने त्यावर 'अपवित्र' म्हणून शिक्कामोर्तब केले. उलट आर्थिक लाभांचे व्यवसाय 'पवित्र' म्हणून धर्माने प्रतिष्ठित केले. शिवाय श्रमाशीही त्यांचे विषम नाते राहिले आहे. अधिक श्रम करणाऱ्या जाती कमी प्रतिष्ठित आणि कमी श्रम करणाऱ्या तसेच केवळ बौद्धिक काम करणाऱ्या जाती अधिक प्रतिष्ठित. या जातींच्या पातळीवरही प्रत्येक जाती-जमातीतील स्त्री त्या त्या स्तरात कमी दर्जाची अवहेलितच राहिली.

कौटुंबिक जीवनातच सर्व स्त्रिया बंदिस्त राहिल्या आणि स्त्री जन्म हेच मागील जन्माच्या पापाचे फळ ही धर्ममान्यता असल्याने उच्च जातीतल्या स्त्रियाही सतत दुय्यम स्थानावरच राहिल्या. धर्माने कर्मविपाकवादानुसार पुनर्जन्म हे मागील जन्माचे फळ सांगितल्याने चालू जन्मात मागच्या जन्माचे 'भोग'-बरे-वाईट निमूटपणे भोगणे हीच पुढच्या जन्माच्या पुण्याची बेगमी ठरली.

या सगळ्याचा परिणाम म्हणून गतानुगतिकतेचे चक्र वर्षानुवर्षे एकाच चाकोरीत फिरण्याची मानसिकता घडत गेली. चालू जन्मात आपली परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न आपण करावेत हा विचारसुद्धा मनात येणे 'पाप' मानले गेले. उलट 'भोग' मुकाट्याने भोगणे हेच 'सत्व' मानले गेले. त्यातून सर्व निम्नश्रेणीय जाती आणि स्त्रिया यांची "निमूट सोशिकता" हे गौरवमूल्य म्हणून जे प्रतिष्ठित झाले ते आजतागायत मुळातून बदलले आहे, असे दिसत नाही.

एका उतरंडीच्या व्यवस्थेत येथील जाती, व्यवसाय, आर्थिक स्थिती, कुटुंबघटक अगदी बिनबोभाट रहावेत असे येथील धर्माचे तत्त्वज्ञान फार घट्टपणे रुजले आहे.

इंग्रजोत्तर समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मूल्ये या घट्ट मानसिक व्यवस्थेला मुळापासून हादरवून टाकणारी होती. या पारंपरिक व्यवस्थेमुळे ज्या घटकांना

अनायासे लाभ मिळत होते असे घटक अनेक कारणांनी अस्वस्थ झाले आणि विविध प्रकारच्या प्रतिक्रिया सुरू झाल्या. त्यांनाही नवा विचार-मूल्ये एकदम पचवणे कठीण गेले. यापैकी स्त्रियांना ते अजूनही कठीण जात आहे. पिढ्यान्-पिढ्यांच्या स्थितिशील मानसिकतेशीच प्रामुख्याने इंग्रजोत्तर पुरोगामी व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचारवंतांचा आणि चळवळींचा संघर्ष आहे. धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, कौटुंबिक असे अनेक प्रश्न एकमेकांत अडकलेले आहेत. म्हणून पुरोगामी विचारांची लढाई नेहमीच गुंतागुंतीची राहिली आहे.

या पार्श्वभूमीवर स्त्रीमुक्ती लढ्याचे आयुष्य तसे फार कमी आहे. इंग्रजोत्तर प्रारंभीच्या एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या प्रश्नांवर प्रामुख्याने पुरोगामी पुरुषांनीच प्रयत्न केले आणि त्यांना स्थितिशील पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषांच्याच कडव्या विरोधाला तोंड द्यावे लागले.

स्त्रियांना येथील धर्माने आणि समाजाने जे दुय्यम - गौण स्थान दिले आहे, तेच कसे योग्य आहे, हे आग्रहाने सांगणारा स्थितिशीलांचा एक विचारप्रवाह प्रारंभी फार प्रबळ होता. विरोधी असला तरी एकपरीने तो प्रामाणिक होता; पण दुसरा प्रवाह त्याच गौणत्वाचे गोडवे गाताना मात्र हे गौणत्व नसून स्त्रीगौरव असल्याचा चतुर आणि मतलबी बुरखा पांघरणारा आहे. खरे तर हा प्रवाहही जुनाच आहे; पण दर टप्प्यातल्या पुरुषप्रधान व्यवस्थेने तपशील बदलून परंपरेचे गौरवगान चालू ठेवले आहे आणि विशेष म्हणजे स्त्रीवर्ग या चतुराईचा बळी ठरत आला आहे. पतीव्रता, पुत्रवती, सती, गृहलक्ष्मी आदिशक्ती अशा विविध विशेषणांतून स्त्रीची सर्व पातळ्यांवरची बंदिस्ती केली आहे. तिच्याही लक्षात येऊ नये अशी गौरवगाथा या विशेषणांच्या आशयाभोवती गुंफली गेली आहे. एकेकाळी या विशेषणांनी युक्त ''आर्य स्त्री''चा मानदंड सांगितला जात असे तर आज ''थोर भारतीय संस्कृती''तील स्त्रीची सन्माननीय बिरूदे म्हणून त्यांचा गौरव होतो.

जातीभेदाच्या किंवा आर्थिक विषमतेच्या संघर्षासाठी पीडितांच्या संघटना बांधणे तुलनेने सोपे असते, कारण प्रतिस्पर्धी आपल्या जातीबाहेर, घराबाहेर असतो. एका अर्थी तो 'पर' का असतो. परक्यांशी संघटितपणे लढणे तुलनेने सोपे असते. त्यापासून होणारे लाभ आर्थिक-भौतिक असतात.

स्त्रियांना आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात विषम वागणुकीच्या विरोधात संघर्ष करायचा झाला तर प्रतिस्पर्धी कोठे बाहेर नसतो. घरातच असतो. 'पाण्यात राहून माशाशी वैर' अनेकदा विकत घ्यावे तसा घरातील, निकटच्या नात्यातील पुरुष घटकांशीच संघर्ष करावा लागतो. अनेकदा कुटुंबातील स्त्री घटकांशी

करावा लागतो; कारण त्या स्त्रिया पारंपरिक पुरुषसत्ताक मूल्यांच्याच पुरस्कर्त्या असतात. त्या मुद्दाम अशा होतात असे नव्हे, तर नकळत येथील धार्मिक, सामाजिक, कौटुंबिक जीवनातील पुरुषसत्ताक व्यवस्था हीच गौरवास्पद असण्याची मानसिकता सर्वांचीच असते. ही व्यवस्था मोडली तर विद्यमान व्यवस्थेतील घटकांना नेहमीच भय वाटत आले आहे.

उच्च जातीयांना निम्नजातीय आपल्या लाभस्थानांवर आक्रमण करून आपले उच्चाटन करतील हे जसे भय असते तसेच स्त्रियांना अधिक सोयी, सवलती, स्वातंत्र्य मिळाले तर पुरुषसत्ताक व्यवस्थेतील लाभार्थीनाही असुरक्षिततेचे भय वाटते. त्यातून स्त्रियांच्या चळवळींना टोकाचा विरोध होत आला आहे.

खुद्द स्त्रियाच कुटुंबाच्या चौकटीत इतक्या बंदिस्त आहेत की, येथेच आपण सर्वाधिक सुरक्षित आहोत अशी त्यांची मानसिकता आहे. विद्यमान चौकटीबाहेर जाणे म्हणजे असुरक्षित होणे, असे भय स्त्रीमनाच्या गाभ्यात फार घट्ट रुजले आहे.

अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीमनालाही या भयातून सहजासहजी मुक्तता मिळत नाही; कारण अर्थार्जन करून फार तर उपजीविकेचा प्रश्न सुटेल; पण स्त्रीची समस्या त्यापलीकडची. स्पष्टच सांगायचे तर कुटुंबाबाहेर पुरुषछत्राशिवाय स्त्रीला लैंगिक सुरक्षितता मिळू शकत नाही. ही धारणा (भ्रामक असली तरी) स्त्री-पुरुष सर्वांच्याच मनात ठामपणे आहे.

शिवाय चारित्र्य, शील या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या अर्थसंकेतांची वेटोळी स्त्रियांसाठी तुरुंग बनलेली आहेत. कुटुंबाबाहेर राहणारी स्त्री ही चारित्र्यहीनच असणार आणि चारित्र्यहीनता म्हणजे लैंगिक स्वैरपणा हा समज पक्का आहे. या सर्वांची इतकी दडपणे स्त्रीमनावर असतात की स्त्री स्वातंत्र्य किंवा स्त्री मुक्ती म्हणजे कुटुंबाशी विद्रोह करणे, विशेषत: वैवाहिक जीवन उध्वस्त करणे अशी टोकाची मानसिकता असते. अशी मानसिकता तयार करण्यात येथील पुरुषप्रधान व्यवस्थेच्या अपप्रचाराचा फार मोठा सहभाग आहे. कारण स्त्रीला जर एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून सर्व स्तरांवर स्थान मिळाले तर स्त्रीला दुय्यम स्थान दिल्याने होणाऱ्या लाभांपासून आपण वंचित होऊ ही भीती पुरुषसत्तेला सतत वाटते. कारण विवाह करून एक स्त्री घरात आणली की ती दैनंदिन सर्व स्तरांवरचे कष्ट उपसण्यासाठी, हुकमी लैंगिक गरजा भागविण्यासाठी आणि वंशसातत्यासाठी हक्काची सोय असते. वंशसातत्यामुळे म्हातारपणाचीही सोय होते. म्हणून जिच्यामुळे इतके लाभ होतात, ती स्त्री आपल्या 'ताब्यात' असणे गरजेचे असते; पण स्त्री म्हणजे जनावर वा वस्तू नाही. तिलाही मन-विचार आहे. म्हणूनच विविध

गौरवान्वित विशेषणांनी तिचे मन आणि विचार बंदिस्त केले की शरीरही आपोआप ताब्यात राहते, अशी ही व्यवस्था आहे. स्त्रीही त्यात अडकते.

पुन्हा वैवाहिक जीवनातील सर्व बंधने केवळ स्त्रीला असतात. पुरुष त्यातून मुक्त असतो. स्त्रीवर निसर्गाने अपत्य जन्माची जबाबदारी टाकलेली असल्यानेही तिला बंदिस्त ठेवणे व्यवस्थेला सोपे गेले. त्यासाठी मातृत्व गौरवाचे देव्हारे उभे केले. पण अविवाहिता वा विधवा स्त्री माता झाली म्हणून तिचा गौरव होत नाही. उलट अवहेलना होते. उलट समाजमान्य पद्धतीने विवाहोत्तर मातृत्व प्राप्त झाले तरच गौरव होतो. हा गौरव खरे तर पितृत्वाचा गौरव असतो; पण शब्दांच्या भ्रमजालाच्या मोहिनीत हे लक्षात येत नाही.

या सर्वांमुळे स्त्रीला आत्मसन्मानार्थ संघर्ष करणे म्हणजे काय? हे समजतच नाही. उलट परंपरेच्या बंदिस्त व्यवस्थेतच आत्मसन्मान आहे, अशी मानसिक घडण झालेली आहे. त्यामुळे शब्दातून गौरव व प्रत्यक्षात उपेक्षा ही स्त्रीबाबत सार्वत्रिक बाब आहे. आणखी एक बाब म्हणजे भारतीय समाज एकजिनसी नाही. स्वाभाविकच सर्व समाजाचे हित-अनहिताचे घटकही समान नाहीत. त्यातल्या त्यात आर्थिक प्रश्नावर संघटना लवकर होऊ शकते.

स्त्रियाही अनेक स्तरात विभागलेल्या आहेत. सर्व जातीतील स्त्रियांचे प्रश्न समान नाहीत, सर्व व्यावसायिक स्त्रियांचे प्रश्न समान नाहीत. ग्रामीण व शहरी स्त्रियांचे प्रश्न भिन्न आहेत. तर महानगरी आणि अर्धशहरी स्त्रियांचे प्रश्नही भिन्न आहेत. सर्व स्त्रियांना एकत्र आणण्यासाठी निकडीचा एकच एक बिंदू सापडणे कठीण. म्हणूनही संघटना कठीण!

स्त्रीविषयक प्रश्नांबाबत प्रथम उच्चजातीय पुरुष जागृत झाले. हा समाजस्तर आर्थिकदृष्ट्या संपन्न नसला तरी भुकेकंगालही नव्हता. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या दुरवस्थेबाबतचे या स्तरातले प्रश्न आणि समाजातील अन्य स्तरातील स्त्रियांचे प्रश्न यांचा एकत्र विचार करावा असे सुद्धा या प्रारंभपर्वात वाटल्याचे दिसत नाही. (अपवाद म. फुले) त्यामुळे या एका उच्चवर्णीय लहान स्तरातील बालविवाह, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण अशा सारख्या प्रश्नांवरच कृतिशील चळवळी झाल्या.

मात्र क्रमाने याच उच्चवर्णीय, मध्यमवर्गीय, पांढरपेशा स्त्रियांनीही स्त्री प्रश्नांविषयी पुढाकार घ्यायला आपल्या कुवतीनुसार सुरुवात केली. चळवळींच्या रेट्याने स्त्रीविषयक कायदे वेळोवेळी झाले हे महत्त्वाचे आहे.

पहिल्या महायुद्धानंतर महागाईमुळे आणि जुनी अर्थोत्पादन व्यवस्था विस्कळीत झाल्याने या उच्चवर्णीय पुरुषाला शिक्षण-नोकरी इ.त. स्थिरस्थावर झाल्याखेरीज

लग्न करणे शक्य नसल्याने पुरुषाचे लग्नाचे वय वाढले, म्हणून मुलींचे लग्नाचे वय वाढले. शिक्षित मुलाला शिक्षित बायको हवी म्हणून मुली शिकू लागल्या आणि वाढत्या महागाईत पुरुषाच्या एकट्याच्या उत्पन्नात भागेना म्हणून स्त्रिया नोकरी करू लागल्या, पण या सर्व सुधारणा (?) पुरुषाच्या दोन पावले मागे राहूनच करणे 'मर्यादेचे' मानले गेले. तात्पर्य - पुरुषाला 'पूरक' ही स्त्रीची भूमिका बदलली नाहीच. पण हीच सुधारणा मानली गेली. या फसव्या भ्रमात अजूनही हा स्तर आहे. स्त्रीला तिचा स्वतंत्र 'अवकाश' (space) मिळावा असा प्रयत्न या स्तरातही फार अपवादानेच घडला.

स्वाभाविकच विसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वापर्यंत आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्तीवर्षापर्यंत येथील स्त्रीविषयक प्रश्न, चळवळी प्रामुख्याने सुस्थिर मध्यमवर्गापुरत्याच राहिल्या. त्यामुळे एक खूप मोठी वैचारिक मर्यादाही पडली. या चौकटीबाहेरचा स्त्रियांचा खूप मोठा वर्ग विचारव्यूहाच्याही बाहेर राहिला. मग कृती कशी होणार? त्यामुळे स्त्रीला मोकळीक देणारे कायदे झाले तरी त्यांचे लाभ घेण्याची कुवत सार्वत्रिकपणे आली नाही. तरी व्यवस्थेवर काही अंशी वचक बसला.

१९७५ पूर्वी काही तुरळक प्रयत्न झाले असले तरी प्रामुख्याने १९७५ नंतर चळवळीचा परीघ अधिक विस्तृत झाला. शेतकरी, शेतमजूर स्त्रियांच्या संघटनांचे प्रयत्न झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात महानगरात गिरणी कामगारांच्या संघटना आणि चळवळी झाल्या; पण त्यांनीही खूप मोठ्या संख्येने गिरणी कामगार असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांकडे लक्षच दिले नाही, मग त्या संघटनात स्वतंत्र स्त्री मजूर संघटना करणे दूरच राहिले. म्हणजे महानगरीय व्यवस्थेत अर्थोत्पादन करणारी मजूर स्त्रीही दुर्लक्षितच राहिली. तिचा रोजगाराचा दरसुद्धा पुरुषापेक्षा कमी राहिला. याची कामगार संघटनांनी फार गांभीर्याने कधी दखल घेतली नाही. स्त्रियांना कामाच्या ठिकाणी अग्रक्रमाने स्वच्छतागृहांच्या सोयी, पाळणाघरे अशा किमान गोष्टींसाठीही स्त्रियांनाच झगडावे लागले. मध्यमवर्गीय डाव्या विचाराच्या स्त्री संघटनांनीच त्याचा पाठपुरावा केला.

शेतमजूर स्त्रिया तर अजूनही उपेक्षितच आहेत. शहरी घरकामवाल्या मोलकरणींच्या संघटना अलीकडे तुरळक झाल्या आहेत; पण त्यांच्या मागण्यांची हुकमी अंमलबजावणी होईल, अशी परिस्थिती कोणत्याच आघाड्यांवर नाही; कारण त्यांचे मालक आणि कामे विखुरलेली आहेत. त्यामुळे कामाच्या वेळा, कामाचे स्वरूप, सुट्या इत्यादी कोण आणि कसे ठरवणार? तरी बहुतेक शहरी मोलकरणींनी अलीकडे वर्षातून एका महिन्याचा जादा पगाराचा (बोनसचा)

हक्क बजावयाला सुरुवात केली आहे.

विशेष म्हणजे आपल्या आर्थिक लाभांसाठी संघटनांमार्फत झगडणाऱ्या मध्यमवर्गीय गृहिणींना मोलकरणींचे हक्क नामंजूर असतात. येथे वर्गीय आणि जातीय अहंकाराची सरमिसळ झालेली दिसते. आपल्या घरात मागील पिढीपेक्षा अधिकाधिक भौतिक सोयी-सुविधा पुरवणारी साधने घेणे हा आपला हक्क आहे, त्यात गौरव आणि प्रतिष्ठा आहे, असे मनापासून वाटणाऱ्या मध्यमवर्गीय वाटणाऱ्या गृहिणीला मोलकरणीच्या घरात दूरदर्शन, गॅस, मिक्सर अशा वस्तू आलेल्या फारशा पचनी पडत नाहीत. श्रमकरी वर्गाचा आर्थिक स्तर समजा थोडा उंचावला तर ते समाजाच्या पर्यायाने राष्ट्राच्या सुस्थितीचे चिन्ह आहे, इतपत समंजस विचार 'तथाकथित' शिक्षित मध्यमवर्गीय स्त्रीही अभावानेच करताना दिसते. स्वाभाविकच स्त्रियांच्या म्हणून प्रश्नांवरही समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रिया एकत्र येऊ शकत नाहीत; कारण सर्व स्तरातील स्त्रियांचे अग्रक्रमाचे प्रश्न एकमेकांपासून फार दूर आहेत. म्हणूनच विचार करणाऱ्या (तसे समजल्या जाणाऱ्या) शिक्षित मध्यमवर्गीय स्त्रीच्या प्रश्नांभोवतीच स्त्रीचळवळी दीर्घकाळ घोटाळत राहिल्या आहेत. अगदी स्त्रियांच्या लैंगिक छळासारख्या सर्वमान्य प्रश्नांबाबतही हेच दृश्य आहे. एखाद्या शहरी उच्चपदस्थ स्त्रीला जर अशा अवमानाला सामोरे जावे लागले तर संघटनांमध्ये जेवढी संवेदनशीलता दिसते, तेवढी आदिवासी, दलित, मजूर स्त्रियांबाबत दिसत नाही.

मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवल्यापासून चित्र थोडे बदलते आहे. तेथेही फार आशादायक वातावरण आहे असे नव्हे. परंपरेने ज्या घरातले पुरुष राजकारणात आहेत त्याच घरातल्या स्त्रियांना 'डमी बाहुल्या' म्हणून संधी मिळणे हे 'राबडीदेवी मॉडेल' मोठ्या प्रमाणात आहे. अनेकजणी पुरुषी दबावाखाली राहून कशीबशी मुदत पूर्ण करतात. तरीही निदान पाच-दहा टक्के स्त्रिया स्वतंत्रपणे झगडून आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व राजकारणात घडवताना दिसतात.

ग्रामीण भागात जेथे कार्यक्षमपणे बचतगट यंत्रणा चालू आहेत, तेथे सामान्य स्त्रियाही कात टाकून उभ्या राहताना दिसत आहेत. जेथे समंजस पुरुष सहकार्य आहे तेथे एखादी सगळी पंचायत कार्यक्षम स्त्रियांची असू शकते. एखादी कर्तबगार महिला सरपंच सर्व गावाचा सहभाग घेऊन गावाचा कायापालट करू शकते. जेथे स्त्री सदस्यांना कामाला वाव दिला जातो तेथे गावाच्या पाणीप्रश्नाला अग्रक्रम मिळालेला दिसतो.

'संत गाडगेमहाराज ग्रामस्वच्छता अभियाना'चे पुरस्कार ज्या ज्या गावांना

मिळालेले आहेत, त्या त्या गावात ''स्त्रियांच्या पुढाकाराने, सहकार्यानेच हे घडू शकले'', हे अभिमानाने सांगितले गेले. ग्रामीण, श्रमकरी वर्गातील स्त्रिया अलीकडे दारूबंदीबाबत अधिक कृतिशील आणि सजग झालेल्या दिसतात. पुरुष व्यसनाधीन होत असला तरी त्याची झळ सर्व नात्यांनी स्त्रियांनाच बसते. जेथे स्त्रियांनी जिद्द बांधली तेथे दारूचे गुत्ते उठवणे भाग पडलेले दिसते आणि जेथे तरुणांचे, पुरुष वर्गाचे सहकार्य मिळाले तेथे गाव व्यसनमुक्त होणे सोपे झालेले दिसते; पण अशी उदाहरणे तुलनेने दुर्मिळ आहेत. एकूण शिक्षण आणि स्त्री हक्कांविषयी सजगता नेहमी परस्परावलंबी असतातच असे नाही.

विसावे शतक संपताना ग्रामीण कष्टकरी, अनक्षर/अल्पाक्षर स्त्री आपल्या अभावग्रस्ततेतूनही वाट काढताना दिसते, मात्र शहरी मध्यमवर्गीय स्त्री आपला सुरक्षाकोश आपल्याभोवती अधिकाधिक घट्ट आवळताना दिसते. स्त्री शिक्षणाने स्त्रियांची परिस्थिती सुधारेल असे एके काळी सुधारकांना वाटत होते. आर्थिक पातळीवर एकूणच मध्यमवर्ग सुस्थिर झाला, म्हणून स्त्रीही सुस्थिर झाली. कुटुंबे लहान झाल्याचाही तो परिणाम आहे; पण दुसरीकडे ती अल्पसंतुष्टही झालेली दिसते. तसा मध्यमवर्ग नेहमी अल्पसंतुष्ट असतोच. आता तो विलक्षण आत्मकेंद्री झाला आहे.

आत्मकेंद्रित्वाचे कारण आणि परिणाम म्हणूनही त्याला भयाने घेरले आहे. त्यातून तो झपाट्याने अगतिक होऊन अतार्किक अशा मार्गांचा अवलंब करतो आहे आणि गंमत म्हणजे हा वर्ग उच्चशिक्षित असल्याने अतार्किक कृतिशून्य मार्गांना ''वैज्ञानिक''तेचा मुलामा देऊन समाजाच्या शीर्षस्थानी राहण्याचा प्रयत्न करतो आहे. मध्यमवर्गीय स्त्री तर फारच वेगाने 'संस्कृती संरक्षणा'च्या नावाखाली पारंपरिक जीवनालाच शरण जाताना दिसते. त्यात सुरक्षितता शोधते आहे.

परिणामी तथाकथित धार्मिक, आध्यात्मिक म्हणवले जाणारे मार्ग 'आत्मशांती'साठी तिला हवेसे वाटतात. म्हणजे तिला खरी आत्मशांती नाही; पण ती दूर करण्याचे उपाय मात्र भ्रामक आहेत. आपल्या लहान वर्तुळापलीकडे सजगपणे पाहण्याची क्षमता ती गमावते आहे असे वाटते. इतकेच नव्हे, तर औद्योगीकीकरणानंतर नव्याने येणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रीलाही हीच वाट चोखाळावीशी वाटते.

जी पारंपरिक मूल्ये स्त्रीला माणूस म्हणून उपेक्षित ठेवतात, ती दूर करण्यासाठी सुधारणेच्या चळवळी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत जोरात चालू होत्या. तीच बंदिस्ती करणारी मूल्ये स्त्रीला आज गौरवान्वित करणारी वाटत आहेत की काय? मध्यमवर्ग एकेकाळी सर्व पुरोगामी चळवळीत अग्रभागी होता, त्यालाच

आता आत्मस्वातंत्र्याची भीती वाटते की काय? सुरक्षित कोशापुढे आत्मप्रतिष्ठा त्याला 'दुय्यम वाटते' की काय? मग त्या वर्गातली स्त्रीही तोच मार्ग चोखाळते. दुसरीकडे स्त्रियांच्या अवहेलनेची वर्तुळे वाढताना दिसत आहेत. उघड-उघड देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया प्राचीन काळापासून आहेत. त्यांचीही अवस्था काही चळवळींमुळे प्रकाशात आली आहे. परंपरेने काही जातीतल्या, काही संप्रदायातल्या स्त्रियांना देवदासी म्हणून हा मार्ग स्वीकारणे भाग पाडले आहे. त्याच्या मुळाशी असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयत्न काही संघटना करीत आहेत. परंतु त्याच्या मुळाशी केवळ अंधश्रद्धा नसून स्त्रीदेह विक्रय करणाऱ्या दलालांचे अर्थक्षेत्रीय जाळे, त्यांचे सत्ताधाऱ्यांशी लागेबांधे या दुष्ट चक्राचा भेद करणे दुरापास्त होत आहे.

उलट जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था आणि मुळातली सरंजामशाही मानसिकता यांची अभद्र युती होऊन स्त्रीदेहविक्रयाचे जागतिक जाळे निर्माण झाले आहे. दारिद्र्यापोटी भारतासारख्या देशात अल्पवयीन मुलींचासुद्धा बाजार मांडला जातो. हे मार्ग अवैध असूनही भयावह रीतीने प्रसार पावत आहेत. तथाकथित संस्कृती रक्षक आणि स्त्रीगौरवगाथा गाणाऱ्यांना त्या प्रश्नांचे भानच नाही.

महानगरांतून सुस्थितीतील स्त्रियाही लपूनछपून सुलभ अर्थोत्पादनासाठी देहविक्रय व्यवसायात सामील होत आहेत. स्त्रीमुक्ती चळवळी या सगळ्या जगडव्याळ प्रश्नांना कशा सामोऱ्या जाणार आहेत?

महिला-बालक प्रश्नांसाठीचे आयोग या सर्व प्रश्नांना मुळात कितपत भिडत आहेत? राजकारण्यांवर केवळ विसंबून राहण्याचे किंवा राजसत्तेत सहभाग मिळाल्याने स्त्री म्हणून असलेले प्रश्न संपणे कठीण आहे.

तरी गेल्या काही वर्षांत स्त्री अनेक स्तरावर सजग होते आहे. संघर्ष करते आहे. परंपरेच्या कोशातून जिद्दीने बाहेर येते आहे. पण पुरुषवर्गाची स्त्रीविषयीची आणि स्वत:विषयीचीही धारणा ज्या प्रमाणात बदलायला हवी, तेवढी बदलत नाही. प्रश्न केवळ स्त्रियांचे वा पुरुषांचे सुटे नसतात. ते सर्व समाजाचे असतात. केवळ कायदे करून भागत नाही. कायदेपालनासाठी समाजाची मानसिकता तयार व्हावी लागते.

अस्पृश्यता निवारण संदर्भात जे म्हटले जाते, तेच स्त्रियांबाबतही आहे. अस्पृश्यतेचा प्रश्न केवळ अस्पृश्यांचा नाही, त्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर अस्पृश्यांविषयी स्पृश्यांची मानसिकता बदलण्याचा आहे. त्याच चालीवर म्हणायचे तर स्त्रियांविषयीचे प्रश्न हे स्त्रीविषयक 'पुरुषी' (पुरुषांची नव्हे) मानसिकता बदलण्याचे प्रश्न आहेत. ज्या प्रमाणात पुरुषी मानसिकता बदलण्याची गती

वाढायला हवी, त्या प्रमाणात ती वाढताना दिसत नाही. काही वेळा तर कालचक्राची गती उलट फिरते आहे की काय? अशी शंका येण्याजोगी परिस्थिती आहे.

स्त्रिया (मध्यमवर्गीय एक गट सोडता) अनेक स्तरावर सजग, कृतिशील होत आहेत. स्त्रीमुक्ती चळवळींचा मध्यमवर्गीय सीमा ओलांडण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. त्या प्रयत्नांना पुरुषी साथ कशी मिळते, यावर येथील स्त्रियांचेच नव्हे तर भावी समाजाचे भवितव्य अवलंबून आहे.

# बदलते कुटुंब

आपण भारतीय मंडळी सतत खंडित मानसिकता घेऊन जगतो आहोत, की काय? अशी शंका गेली अनेक वर्षे मनात होती. पण आता मात्र शंकेचे खात्रीत रूपांतर व्हावे असे झाले आहे.

एकाच वेळी आपण भूतकाळाचे गोडवे गातो आणि वर्तमानाची निंदा करतो तर कधी भूतकाळाची निंदा करतो आणि वर्तमानाचे गोडवे गातो. 'सुधारणां'बद्दल तर आपल्या मनात आकर्षण आणि अढी एकाच वेळी असते. आपल्या कुटुंबव्यवस्थेबद्दल माणसे जेव्हा बोलतात, लिहितात, तेव्हा ही विसंगती प्रबळपणे जाणवते. एकत्र (संयुक्त) कुटुंबव्यवस्थेबद्दल आकर्षण असते. (हिंदी मालिका व हम आपके... सिनेमापुरते) आणि त्याचवेळी आपल्या घरात मात्र आपले आई-वडीलही अडचणीचे होत असतात. मग अनेक बहीण भावंडांचे त्यांच्या कुटुंब- कबिल्यासह एकत्र राहणे दूरच. कारण आपल्यापैकी प्रत्येकजण आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याबद्दल खूप संवेदनशील असतो. एकत्र कुटुंबपद्धती आणि व्यक्तिस्वातंत्र्य एकत्र नांदणे कठीण असते, हे वास्तव आपण कसे टाळणार असतो?

'कुटुंबसंस्था मोडत आहे,' ही तक्रार गेली सुमारे शंभर-दीडशे वर्षे चालू आहे. ती मोडत आहे की नाही, हा वादाचा विषय असला तरी ती बदलत आहे हे खरे आहे. हा बदल आपल्या स्थितिशील भूतकाळाच्या गाभ्यात रमणाऱ्या (नॉस्टेल्जिक) मनाच्या एका कोपऱ्याला धोकादायक वाटतो; पण आपल्याला मिळालेले नव्या व्यवस्थेतले स्वातंत्र्य मात्र हवेसे वाटते. नव्या वस्तुरूप सुखसोयी हव्याशा वाटतात.

या वस्तुरूप सुखसोयींची सुरुवात इंग्रजोत्तर यंत्रयुगाबरोबरच झाली आणि तेथपासून कुटुंबव्यवस्थेबद्दल तक्रारीही सुरू झाल्या. इंग्रजोत्तर काळात झपाट्याने आपण शेतीकेंद्री जीवनपद्धतीपासून दुरावत गेलो. आपली जीविकोपार्जनाची

साधने शहरात केंद्रित होत गेली. किंबहुना यंत्र-तंत्राधिष्ठित साधनांमुळेच शहरे वाढली. खेड्यातील पारंपरिक उद्योग व्यवसाय बंद पडल्याने लोक शहरात आले आणि गेल्या दीडशे वर्षात त्यांची मुळेच खेड्यातून उखडली गेली.

एकेकाळी ''उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट नोकरी'' असा जनमानसात क्रम होता; तर आता शेतकरी मंडळींना आत्महत्या करण्याची वेळ आली आहे आणि बहुराष्ट्रीय कंपनीतल्या किंवा सिलिकॉन व्हॅलीतल्या नोकऱ्या म्हणजे स्वर्गाची दारे खुली झाल्यासारखी वाटत आहेत.

कुटुंबव्यवस्था बदलते आहे हे निश्चित; पण त्याचे मूळ कारण बदलती अर्थोत्पादन व्यवस्था आहे आणि ती पुरुषांनी घडवलेली आहे, याकडे अनेकदा सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. बदलत्या कुटुंबव्यवस्थेवर बोट ठेवून त्याचे अपश्रेय मात्र स्त्रीला दिले जाते. ही परंपराही शे-दीडशे वर्षाइतकी जुनी असल्याचे पुरावे साहित्यातून भरपूर मिळतात.

बायका नोकरीसाठी 'घराबाहेर' पडल्या, म्हणून कुटुंबव्यवस्था ढासळली. ही तक्रार फार जुनी आहे. बायका घराबाहेर पडल्यामुळे कुटुंबव्यवस्था बदलली हे खरे. 'ढासळली' की नाही हा वादाचा मुद्दा घटकाभर बाजूला ठेवला तरी बाई नोकरीसाठी उंबरठ्याबाहेर कधी पडली? तर यंत्रयुगात, पहिल्या महायुद्धानंतर बदललेल्या शहरी जीवनसरणीत एकट्या पुरुषाच्या उत्पन्नात प्रपंच सावरणे कठीण होऊ लागले तेव्हा. म्हणजे पुरुषाची गरज म्हणून बाई प्रथम शिकली आणि पुरुषाची गरज म्हणूनच बाई प्रथम कामधंद्यासाठी घराबाहेर पडली. मग तो पुरुष स्त्रीचा पिता असेल, पती असेल किंवा भाऊ असेल. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाकडे नजर टाकली तर हे सार्वत्रिक दृश्य दिसते.

स्त्रीची कमाई पुरुषाला पूरक म्हणून सुरू झाली तरी तिच्या मागची पारंपरिक गृहकर्तव्ये अजूनही चुकली नाहीत. त्यात थोडेफार बदल झाले, यंत्रामुळे काबाडकष्ट थोडे उणावले एवढेच; पण त्याच वेळी तिच्या शिक्षितपणामुळे नोकरी खेरीजही घराबाहेरची पण घरासाठीची पोस्ट, बँक, बाजार, मुलांची शिक्षणे इत्यादीविषयीची तिची कामे वाढतच गेली.

विसावे शतक संपताना दृश्य फारसे बदलले नाही. उलट याप्रकारे अष्टभुजेसारख्या अनेक आघाड्यांवर कामे करणाऱ्या गृहिणींचा संख्यात्मक विस्तार फार मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. पन्नासेक वर्षांपूर्वी शहरी उच्चवर्णीय स्त्रीची जी अवस्था होती ती आता बहुजन समाजातल्या अनेक शिक्षित स्त्रियांची आणि कुटुंबांची आहे. सर्व जाती जमातीत आणि ग्रामीण भागातही स्त्री शिक्षण ही नित्य सवयीची बाब झाल्यानंतर तालुका पातळीवरच्या लग्नाळू मुलालाही शिकलेली

आणि नोकरी-व्यवसाय करणारी किमानपक्षी काहीना काही अर्थार्जन करणारी मुलगी वधू म्हणून हवी असते.

कुटुंबव्यवस्थेतील फार मोठ्या जबाबदाऱ्या आजही स्त्रीच्याच खांद्यावर आहेत. स्त्रीनेच मुला-बाळांकडे पहायचे, स्वयंपाकपाणी करायचे हे स्त्रीच्याही मनात घट्ट रुजलेले असल्याने तिची ओढाताण चालूच असते. घरातले दुर्लक्ष ही जणु आपलीच चूक आहे, असा अपराधगंड शिक्षित स्त्रीच्या मनात घट्ट असतो. त्याचे मूळ कारण परंपरेने निर्माण झालेली पुरुषप्रधान अशी स्त्रियांचीही मानसिकता हे आहे. गृहिणीकर्तव्ये म्हणून जी कामे स्त्रिया वर्षानुवर्षे विनातक्रार करीत आल्या आहेत. तीच कामे अर्थकेंद्री व्यवस्थेत पुरुष करू लागले की तो 'व्यवसाय' होतो. तेथे पुरुष म्हणून कमीपणा नसतो. उदा. शिलाई काम, स्वयंपाक यांचे 'टेलरिंग फर्म' आणि 'हॉटेल्स' झाली की पुरुषांचे स्वामित्व येते.

समाजाच्या ज्या उच्चवर्णीय समाजातल्या स्त्रिया नोकरीसाठी प्रथम बाहेर पडल्या त्यांची आता दुसरी-तिसरी पिढी आहे. त्यामुळे अनुभवाने त्या आता अपराधगंडातून बाहेर पडत आहेत. घराबाहेरचे काम ही काही लोकविलक्षण पुरुषी मक्तेदारी नाही, हे तिला अनुभवाने उमगले आहे. संधी मिळाली की क्षमता वाढते. मग काम कोणतेही असो. शिवाय पारंपरिक जीवनसरणीच बदलली असल्याने घराबाहेरच्या स्त्री-पुरुषांच्या कामात फारशी तफावत राहिलेली नाही. त्यामुळे घरातही आपण अकारण अपराधगंड बाळगून घराच्या कामात गुरफटून जायचे कारण नाही. हे तिला उमगले आहे आणि त्या स्तरातल्या पुरुषांनाही उमगून घेणे भाग पडले आहे. त्यामुळे या स्तरात स्त्री-पुरुषांच्या घरातल्या व बाहेरच्या कामांविषयी निदान सैद्धांन्तिक पातळीवर तरी एकमत होत असल्याचे दृश्य दिसू लागले आहे.

कुटुंबाचा आकार हा एक महत्त्वाचा बदल सर्वत्र दिसतो आहे. पन्नासेक वर्षांपूर्वीच त्याचा प्रारंभ झाला होता. आज तर समाजाच्या एका स्तरात एक दाम्पत्य-एक अपत्य हे समीकरण रूजले आहे. स्वाभाविकच कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा पसारा कमी झाला तरी त्या एखाद-दुसऱ्या अपत्याच्या संगोपन-सोबतीचा नवा प्रश्न निर्माण झाला आहे.

बहुजन समाजात नोकरी करणाऱ्या पहिल्या पिढीतल्या स्त्रीला मात्र अजून आपल्या कुटुंबाच्या आकारावर आपली इच्छा प्रस्थापित करता आलेली नाही. तिच्या पुरुष सहचराच्या समंजसपणावरच तिला अवलंबून राहणे भाग पडते आहे. पण ही परिस्थितीही झपाट्याने बदलते आहे.

यंत्रोत्पादनामुळे उपभोगसाधने अमाप वाढली. स्वाभाविकच मोहही वाढले.

माणूस म्हणून स्त्री-पुरुष दोघांतही मोह वाढले. म्हणून मग त्यांच्या पूर्तीसाठी अधिक अर्थार्जन ही अपरिहार्यता झाली आहे. त्यातून माणसांचे माणसांवरचे अवलंबित्व उणावत गेल्यानेही कुटुंबसंस्था बदलत आहे.

शहरात जागांची अडचण असल्याने वृद्ध माणसे सामावली जात नाहीत, हे ही पूर्णपणे खरे नव्हे. आज जी माणसे साठीच्या पुढची आहेत त्यापैकी अनेकांचे लहानपण मोठ्या कुटुंबात दाटीवाटीने दोन-तीन खोल्यात, सार्वजनिक संडास-नळ अशा परिस्थितीत गेले आहे; पण त्याच स्तरातल्या मुलाबाळांचा अर्थोत्पादनाचा स्तर उंचावला. म्हणूनच राहणीमानाच्या कल्पना आणि सवयीही बदलल्या आहेत. ते स्वाभाविक आहे.

आमची कुटुंबव्यवस्था ही आजवर स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर टिकून आहे. त्याग, सेवा आशा शब्दांचे मुलामे जरी तिला दिले असले तरी बदलत्या अर्थकेंद्री जगात त्याची किंमत नगण्य आहे. मुख्य म्हणजे ज्या अर्थोत्पादनाच्या बळावर पुरुषाच्या स्वामित्वाखाली राहणे तिला भाग पडले ते अर्थोत्पादन आपणही कौशल्यपूर्णतेने आपले सामर्थ्य वापरून करू शकतो हा आत्मविश्वास गेल्या काही वर्षांच्या अनुभवातून स्त्रियांना आला आहे आणि प्रामाणिक पुरुषांनी तो मान्यही केला आहे.

सध्याच्या लहान कुटुंबव्यवस्थेत मुलांवर 'संस्कार' होत नाहीत. कारण त्यांना 'आई' मिळत नाही. हे उत्तर सोपे आणि सोयीस्कर असले तरी खरे नाही. एकतर इथे आपण समाजातला एक छोटासा शिक्षित, नोकरीपेशा गटच लक्षात घेतो. त्या गटाबाहेर फार मोठा श्रमिकांचा गट आहे. या गटातल्या स्त्रियांना तर नोकरीपेशा स्त्रियांपेक्षा जास्त काळ घराबाहेर रहावे लागते. घरातही सर्व कामे घाईगर्दीने उरकताना मुलांचे लाड शक्यच नसतात. अशा मुलांचे पुरुष पालक मोठ्या प्रमाणावर व्यसनी आणि तेही घराबाहेरच राहणारे असतात. त्या मुलांच्या 'संस्कारां'चे काय? 'संस्कार' नेमके कशाला म्हणायचे? आई-वडिलांच्या वर्तनातून, जो थोडा फार सहवास मिळतो त्या काळातल्या भावनिक जवळीकीतून संस्कार आपोआप होतात. किती काळ मुलांना, घरातल्या माणसांना एकमेकांचा सहवास मिळतो, यापेक्षा जो मिळतो त्यात किती उत्कटता असते, गुंतवणूक असते, हे महत्त्वाचे. अनुभव असा आहे की, अशा समंजस पालकांची (स्त्री-पुरुष दोघेही) मुले अधिक स्वावलंबी, जबाबदार आणि गुणी होतात. उलट आई-वडिलांकडे जर समंसजस पालकत्व नसेल तर चोवीस तास सहवासात राहूनही विपरीत परिणाम होण्याचीच शक्यता जास्त आहे. जुन्या एकत्र कुटुंबव्यवस्थेत अपत्यसंख्याही जास्त असे. स्त्रिया अखंड गरोदरपणे, बाळंतपणे,

व्रतवैकल्ये, धुणीभांडी, पाणी, दळण-कांडण यातच इतक्या गुरफटलेल्या असत की मुलांकडे लक्ष द्यायलाही त्यांना फुरसद नसे. कुणीकडून मुलांना खाऊ-पिऊ घातले की झाले. बहुसंख्य श्रमकरी आणि कनिष्ट मध्यमवर्गात हीच परिस्थिती होती आणि आहे. आपआपल्या मानसिक, बौद्धिक, क्षमतेनुसार मुलांची वाटचाल होई. सुमारे शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या एकत्र कुटुंबाची विशेषत: पालकमुले संबंधांची चित्रे हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यात मोठ्या प्रमाणावर दिसतात. आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. त्यामानाने अर्थार्जन करणारी लहान कुटुंबातील आई मुलांना भौतिक सोयीसुविधा तर देऊ शकतेच, पण अधिक समंजस नाते निर्माण करू शकते. (फाजील लाड टाळले तर!)

गेल्या दीडेशेक वर्षातले आपले शिक्षण, शासनसंस्था, उत्पादने, घरे, वस्तूंचा वापर, ज्ञानक्षेत्रातील सर्व व्यवहार हे पाश्चिमात्त्यांद्वारेच घडले आहेत. त्याचा आम्हाला अभिमानही असतो. स्त्रियांनी मात्र आपली परंपराशील भूमिकाच जतन करावी असा आग्रह विसंगत आणि असमंजसपणाचा नाही का?

आमचे कपडेलत्ते, सौंदर्यसाधने, रंजनाची साधने, गृहोपयोगी वस्तू, उत्पादने, बाजारपेठा हे सर्वच जर भांडवली पुरुषप्रधान विचारसरणीने घडवले असेल तर स्त्री त्यापासून दूर कशी राहू शकेल.' नवीन जीवनसरणीच्या उपभोग साधनात स्त्री हे एक उपभोग साधन म्हणूनच स्त्रीची प्रतिमा सुधारित परिवेशात दृढ केली जात असेल तर त्याला जबाबदार कोण?

एकीकडे डोक्यापासून पायाच्या नखापर्यंत गुळगुळीत स्त्रीची सौंदर्याचे गौरीशंकर म्हणून प्रतिमा सर्व जाहिराती, प्रसारमाध्यमे, रंजन साधने, वेश्या बाजार, मॉडेल्सचा भूलभुलैया यातून उभी करायची आणि दुसरीकडे तिला सती सावित्रीच्या व्रतवैकल्यातही गुरफटून टाकायचे. रात्री नाइटक्लबात आणि दिवसा हातात पूजेची थाळी घेऊन घुंघटदार 'करवाचौथ' किंवा वटपूजा करणारी स्त्री यातले आम्हाला नक्की काय हवे आहे? हे कुणी ठरवायचे?

कुटुंबव्यवस्थेत जर विस्कळीतपणा येत असेल तर त्याला हे भोवतालचे वातावरण किती कारणीभूत आहे? अगदी चोवीस तास मुलांवर लक्ष ठेवणे पालकांना शक्य तरी आहे का? प्रसिद्धी माध्यमांतून खून, हिंसा, बलात्कार, व्यसनाधीनता, गुंडगिरी, व्यभिचार यांच्यातच 'शूरपणा' वाटावा अशा प्रतिमा इतका भडीमार करीत असतात की, त्यातून मुलांना अलिप्त ठेवणे महाकर्मकठीण आहे; कारण दूरदर्शनने हे सगळं घरातच आणून ठेवलंय. शिवाय मुले घरात असतात किती कमी वेळ! आई घरात राहिली तरी शंभर 'क्लास' आणि 'वर्ग' यातून मुलांनाच वेळ कुठे शिल्लक राहतो?

असे दिसत आहे की, कुटुंबसंस्था शाबूत राहू नये असाच सर्व पसारा भोवती वाढतो आहे.

तरीही कुटुंबव्यवस्था बदलत्या स्वरूपात का होईना अजून टिकून आहे ती त्या व्यवस्थेतल्या काही अंगभूत बलस्थानांमुळेच टिकून राहिली आहे.

आई-वडील-मुले हा स्थूलमानाने कुटुंबाचा विस्तार असला, तरी स्त्री शिवाय कुटुंब असू शकत नाही. पन्नासेक वर्षांपूर्वी तर पत्नीसाठीच 'कुटुंब' शब्द वापरला जाई. स्त्री-पुरुषांमधील नाते पती-पत्नी खेरीज आई-मुलगा, बाप-मुलगी, भाऊ-बहीण काहीही असले तरी कोणत्याही कुटुंबात किमान एक स्त्री असल्याखेरीज कुटुंब होऊ शकत नाही. दोन स्त्रिया एकत्र राहिल्या तर घर-कुटुंब होते; पण दोन पुरुष एकत्र राहिले तर ती 'खोली' (राहण्याची फक्त जागा) होते.

विवाहसंस्था हा कुटुंबसंस्थेचा आधार आहे. ती टिकवायची जबाबदारी मात्र इथून पुढे एकट्या स्त्रीवर राहणार नाही. स्त्री ते चालवून घेणार नाही. कुटुंबसंस्थेची ऊब हवी असेल तर ती जबाबदारी कुटुंबातील सर्वच स्त्री-पुरुष सदस्यांना डोळसपणे घ्यावी लागेल. तशी जर घेतली नाही तर स्त्री आपले एककेंद्री कुटुंब करील. तसे ती करू लागल्याची उदाहरणे विसावे शतक संपतानाच दिसत आहेत. किल्लारीच्या भूकंपानंतर पाच वर्षांनी केलेल्या पाहणीचा निष्कर्ष नुकताच वाचनात आला. त्यात सर्व विधुर पुरुषांनी वर्षभराच्या आत कुमारिकांशी लग्ने केली; पण दोन अपवाद वगळता विधवा स्त्रियांनी पुनर्विवाह केले नाहीत. रूढीमुळे अनेकींना तसे वाटले नाही; पण अनेकजणी म्हणाल्या, 'पुन्हा लग्न करून तेच कष्ट, नवऱ्यांचा व्यसनीपणा सहन करण्यापेक्षा एकटीनं कष्ट करून राहिलेलं बरं.'' हे उत्तर फार बोलकं आहे. या स्त्रिया श्रमकरी वर्गातल्या आहेत, हेही महत्त्वाचे आहे.

कुटुंबाची सुरक्षितता सर्वांनाच हवी असेल तर कुटुंबातील सर्व घटकांना (स्त्रिया-पुरुष, मुले) परस्पराबद्दल आदर (विशेषत: आपल्याकडे दुर्मिळ असा पुरुषाला स्त्रीविषयी आदर), विश्वास अपरिहार्य आहे. तो असेल तर सर्व स्तरावर सहकार्य आपोआप येते.

विवाहसंस्था नसली तरी जेव्हा एकत्र राहणाऱ्या सदस्यांमध्ये परस्पर आदर आणि विश्वास असतो, असेल तर ते कुटुंब टिकविण्यासाठी मंत्राक्षतांच्या कृत्रिम संस्काराचीही गरज नसेल. कदाचित अशा कुटुंबातून रक्तसंबंधी नातेसंबंधही नसतील. समानशील व्यक्तींचे ते कुटुंब असेल. कदाचित ते अधिक सखोल जाणिवांचेही असेल; कारण बदलत्या जननविषयक संशोधनातून जन्माला येणाऱ्या अपत्यांबाबत रक्तसंबंधी नात्यालाही फारसा अर्थ राहीलच याची खात्री नाही.

तरीही 'कुटुंब' राहील; कारण माणूस कुठेही गेला तरी माणसाला माणसाची विश्वासाची सोबत हवीच असणार आहे. ती जिथे मिळेल तिथे 'कुटुंबाचा सुरक्षाकोश' निर्माण होईल.

रक्तसंबंधी नात्यातल्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या कुटुंबव्यवस्थेतील माणसांना जर परस्पर आदर व विश्वास नसेल, सुरक्षितता वाटत नसेल, द्वेषातून किंवा स्वार्थातून परस्परांच्या हत्या होत असतील तर अशी दिखाऊ कुटुंबव्यवस्था लवकर कोसळलेलीच बरी.

त्यानंतर माणूस पुन्हा अधिक समंजसपणे आपले उबदार घरटे निर्माण करील. त्यात कुणा एकाचा त्याग, उपमर्द किंवा अरेरावी नसेल. अधिक जबाबदार असे मनुष्यत्व असेल अशी आशा विसावे शतक संपताना एकविसाव्या शतकाच्या प्रारंभपर्वात करावी आणि घराचे हे सुंदर वर्णन सत्यात आलेले अनुभवावे.

*घर असावे घरासारखे,*
*नकोत नुसत्या भिंती ।*
*जिथे असावा प्रेम जिव्हाळा,*
*नकोत नुसती नाती ।।*

# एका व्यक्तीचे कुटुंब

'एका व्यक्तीचे कुटुंब' किंवा 'एक सदस्यीय कुटुंब' हाच मुळी एक वदतोव्याघात आहे. पती-पत्नी आणि त्यांची अपत्ये ही सर्वसामान्यपणे 'कुटुंब' शब्दात अभिप्रेत असलेली व्याप्ती आहे. मग त्यात पतीचे सर्व नातेवाईक, प्रसंगपरत्वे पत्नीचे नातेवाईकही येतात. त्यामुळे कुटुंब शब्द व्याकरणदृष्ट्या एकवचनी असला तरी त्यातील सदस्यसंख्या एकाधिक गृहीतच असते. गेला बाजार पती आणि पत्नी अशा दोन व्यक्ती! त्यातही किमान एक पुरुष आणि एक स्त्री हे रूढीचे गणित आहे. अशा परिस्थितीत एका व्यक्तीचे कुटुंब हा विरोधाभास नाही कां?

'कुटुंब' या शब्दाच्या व्युत्पत्तीत मात्र हे अभिप्रेत नाही. कुटुंब शब्दाचा मूळ धातू 'कुं' माती किंवा जमीन या अर्थाचा आहे. 'जमिनीच्या आधाराने (उपजीविकेचे साधन म्हणून) राहिलेला स्त्रियांचा आणि मुलांचा समूह'' अशा आशयाची व्युत्पत्ती वि. का. राजवाडे यांनी दिली' आहे. यात पुरुष घटक अपरिहार्य असल्याचे दिसत नाही.

माझ्या मागच्या पिढीत बरीच प्रौढ पुरुष मंडळी आपल्या पत्नीचा (एकवचनी) उल्लेख ''आमचं कुटुंब'' असा करीत असत. म्हणजे स्त्री हा कुटुंबाचा मूलभूत घटक गृहीत होता. त्यामुळे कुटुंबाच्या सदस्यात कोणत्याही नात्याने एक स्त्री असली की ते कुटुंब होते. आई आणि अपत्ये असली की ते कुटुंब झाले. नाहीतरी आदिम शिकारी भटक्या अवस्थेत पुरुष घटक हा कुटुंबातला स्थिर आणि स्थायी घटक नव्हताच.

कालांतराने समाज रचना, अर्थोत्पादन व्यवसाय बदलत गेले आणि पुरुष घटक कुटुंबात सामावला गेला. इतकेच नाही तर ''कानामागून'' आला आणि तिखट झाला,'' असे म्हणता येण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली. तो 'कुटुंबप्रमुख' झाला आणि आज तर पुरुष घटकाशिवाय कुटुंब ही कल्पनाच दुरापास्त वाटते.

पण प्रत्यक्षात काय दिसते?

अनेक घरात पुरुष पती या नात्याने नसतो. समजा आई-मुलगा, बहीण-भाऊ, दीर-भावजय, सासरा-सून, किंवा भाचे-पुतणे आणि त्यांची मामी किंवा चुलती असे सदस्य एका छपराखाली नांदताना दिसतात. त्यातले कोणी अर्थार्जन करतात, क्वचित स्त्रियाही अर्थार्जन करतात. कुटुंबात अभिप्रेत असलेले सर्वांचे पालन-पोषण, खाणे-पिणे, शिक्षण-व्यवसाय, सण-वार, अन्य सण उत्सवांच्या निमित्ताने इष्ट स्नेही नातेवाईकांचा राबता असे सर्व अशा घरांतून चालू असते. मग अशा घरांना कुटुंब म्हणायचे की नाही?

उलट केवळ स्त्री घटक असलेली घरेही तुरळक का होईना जुन्या काळापासून आढळतात. विधवा/परित्यक्ता, सासू-सून, आई-मुलगी, बहिणी-बहिणी, नणंद-भावजय अशा नात्यातील केवळ स्त्रियांच्या घरांना कुटुंब म्हणायचे की नाही?

कधी कधी बाप-मुलगा, भाऊ-भाऊ, मित्र-मित्र एका छपराखाली राहत असतील तर त्याला कुटुंब म्हणायचे की नाही?

माझ्या अवती-भवती लहानपणापासून मी अशा सर्व प्रकारचे 'सहनिवास' पाहत आले आहे. मात्र एका व्यक्तीचे कुटुंब म्हणताना कोणत्या ना कोणत्या कारणामुळे विभक्त झालेले पती-पत्नी किंवा अविवाहित स्त्री-पुरुषच अभिप्रेत असतात. तसे पाहिले तर अशा व्यक्तीही काही अपवाद वगळता केवळ एक व्यक्ती=एक घर अशा नसतात. अन्य कोणी नातेवाईक घरात असतात. मग त्या व्यक्तीचे एका व्यक्तीचे कुटुंब कसे होईल? की पती-पत्नी नात्यांखेरीजच्या जिव्हाळ्याच्या नात्यातील ''सहनिवास'' 'कुटुंब' संज्ञेला मान्यच नाही?

मला स्वत:ला असे अजिबात वाटत नाही. अन्य नातेवाईकांसह पती-पत्नी नात्यांखेरीजही व्यक्तींचा एका घरातील जीवनक्रम कोणत्याही रूढ चाकोरीबद्ध कुटंबाइतकाच सुखाचा/दु:खाचा/सामंजस्यपूर्ण किंवा ताणतणावाचा असू शकतो.

माझ्या पाहण्यातले असे काही नमुने येथे नोंदवीत आहे. असे नमुने इतरांच्याही पाहण्यात असतील.

लग्न झाल्यावर जेमतेम ४/५ वर्षे पती-पत्नींचे सहजीवन झाले. तीन अपत्ये झाली. पती परागंदा झाला. नंतरचे पूर्ण जीवन ती स्त्री, धाकटा दीर आणि अपत्ये यांचेच ते कुटुंब आहे. मुलांची लग्न-कार्ये, सण सोहळे सगळे या कुटुंबात सामान्यपणे होतात, तसेच झाले.

पत्नीच्या निधनानंतर दोन मुलांना सावत्रपणाचा जाच नको म्हणून पिता आणि दोन मुलगे यांचे कुटुंब गेली पंचवीस वर्षे नांदते आहे. या कुटुंबात कोणत्याही नात्याने एकही स्त्रीसदस्य नाही. मोठ्या मुलाचे यथावकाश लग्न

झाले. तो स्वतंत्र राहू लागला. आजही धाकट्या मुलासह पिता राहतो आहे. अन्य घरांप्रमाणे घरात स्वयंपाक-पाण्यासह सर्व गृहकृत्ये होतात. मात्र केवळ पुरुष सदस्यांच्या घरात हे दृश्य दुर्मिळ आहे. केवळ पुरुष सदस्य एकत्र राहत असतील तर ''घरपणाची'' स्वयंपाक वगैरे कोणतीही तसदी सहसा घेतली जात नाही. म्हणून ते ''घर'' नसते, खोली किंवा इमारत असते. हे कुटुंब मात्र त्याला अपवाद आहे.

उलट कोणत्याही नात्याने जेव्हा एकाधिक स्त्री सदस्य एकत्र राहतात तेव्हा ''घर''पणाचा सर्व पसारा, जिव्हाळा आणि सुरक्षाकोश तिथे असतो. हाही अनुभव आहे.

माणूस समाजप्रिय प्राणी आहे असे म्हटले जाते. त्याची सुरुवात कुटुंबापासून होते. माणसाच्या जातीला जेवढी कुटुंबसंस्थेची गरज असते, तेवढी क्वचितच दुसऱ्या प्राण्याला असते. माणसाच्या आहार, निद्रा, भयमुक्ती या गरजा कुटुंबात जास्त सुलभतेने, आस्थेने भागू शकतात. अर्थातच (कोणत्याही नात्याने) एकत्र राहत असलेल्या कुटुंबातल्या सदस्यांना परस्परांविषयी आस्था, प्रेम असेल तरच हे होऊ शकते. सजीवाच्या वंशसातत्याच्या प्राकृतिक गरजेसाठी आवश्यक अशी गरज म्हणजे ''मैथुन''! स्त्री-पुरुष समागम ही गरज मात्र पती-पत्नी नात्यातच निर्वेधपणे पूर्ण होऊ शकते. अर्थात् त्यातूनच पुढे नात्यांचा, कर्तव्यांचा विस्तार वाढत गेलेला दिसतो. माता-पिता व अपत्ये असा या कुटुंबाचा आकार होतो.

अविवाहित किंवा अन्य काही कारणाने (उदा. सहचराचा मृत्यू, त्याग इत्यादी) एकटे राहणारे स्त्री-पुरुष आधी म्हटल्यानुसार अन्य नातेवाईकांच्या सहवासात राहत असल्याने त्यांचे कुटुंबही तसे एकसदस्य कुटुंब नसतेच.

जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, परंपराशील स्त्री जीवनाचा बदलता प्रवाह, स्त्रियांचे अर्थोत्पादन आणि आर्थिक सबलीकरण, एका लहान (वरच्या) स्तरात का होईना स्त्री-पुरुषांचे करियरिस्ट (खऱ्या अर्थाने) असणे या व अशासारख्या कारणांनी स्त्री-पुरुषांची विवाहाची वये वाढताना दिसतात. कुटुंब (लग्न) केले की कुटुंबातल्या सहचरासाठी, मुलाबाळांसाठी वेळ द्यावा लागतो, हा विक्षेपही क्वचित नकोसा वाटतो. म्हणून विवाहच न करण्याची प्रवृत्ती अमेरिकेसारख्या देशात वाढते आहे. अन्य नात्यांच्या गुंतवणुकीतून हा समाज कधीच मोकळा झाला आहे. आपल्याकडे परस्परांवरचे आर्थिक अवलंबन राहत्या जागांची टंचाई यामुळे अनेकदा कुटुंबातील सदस्य एकत्र राहतात. आर्थिक सुबत्ता असलेल्या अमेरिकेत ही गरज नसल्याने अक्षरश: एक सदस्यीय घरे असतात. याला कुटुंब म्हणायचे की नाही?

भारतातल्या महानगरात आता तरुणांमध्ये ही प्रवृत्ती येऊ लागली आहे. नोकरी-व्यवसायानिमित्त रूढ कुटुंबे सोडून दुसऱ्या शहरात गेल्यावर समवयस्क एकत्र राहू लागले आहेत. यात मुलगे, मुली किंवा स्त्री-पुरुष दोघेही अशी समलिंगीयांची घरे करून राहतात. रूढार्थाने रक्तसंबंधी नाते नसूनही समान परिस्थितीमुळे त्यांच्यात जिव्हाळा, स्नेह निर्माण होतो. सुख-दु:खात ते परस्परांचे सहकारी होतात. आधुनिक महानगरी जीवनात ही एक नवी कुटुंबव्यवस्था आकार घेते आहे.

क्वचित विवाहाखेरीज स्त्री-पुरुषांनी एकत्र राहण्याचे प्रमाणही आता अपवादापलीकडे जात आहे. अर्थात हे महानगरामध्ये होते आहे. असे सहनिवास विवाह नसल्याने एकसदस्यीय म्हणायचे की एकत्र राहत असल्याने बहुसदस्यीय म्हणायचे?

विवाहाखेरीज अशा अनेक प्रकारांनी स्त्री-पुरुष विविध प्रकारे एकत्र राहतात, ही वस्तुस्थिती आहे. अशा विवाहित जोडीदाराखेरीज राहणाऱ्या स्त्री-पुरुषांना रूढ विवाहित जोडप्यांच्या कुटुंबासारखी सोबत, जिव्हाळा मिळू शकत नाही. मुला-बाळांच्या सहवासात राहिल्याने जगण्याला हेतू व समाधान मिळते. वृद्धांना अशा कुटुंबात आसरा मिळतो. हे सामान्यपणे खरे आहे. शिवाय पिढ्यान्‌पिढ्या भारतासारख्या देशात ही व्यवस्था समाज स्वास्थ्यकारक मानली जाते. ती सुप्रतिष्ठित मानली जाते. त्यामुळे जरी पती-पत्नींमध्ये मतभेद झाले तरी शक्यतो तडजोडी करीत अशी बहुसदस्यीय कुटुंबव्यवस्था टिकवून ठेवावी असा सामान्यत: कल असतो.

परंतु औद्योगिकीकरणाच्या प्रथम पर्वापासूनच आपल्याकडील कुटुंबव्यवस्था विस्कटू लागली आहे. प्रथम संयुक्त कुटुंबव्यवस्था मोडीत निघाली. शेतीनिष्ठ जीवनातल्या शहरी यंत्रयुगाची ही देणगी होती.

वाढत्या औद्योगिकीकरणानंतरच्या युगात विभक्त कुटुंबव्यवस्थेच्या चौकटीही खिळखिळ्या होत गेल्या. घटस्फोटांचे प्रमाण वाढत गेले. कुटुंबातील वृद्धांचा आश्रय अनिश्चित होत गेला. आता तर विज्ञान-तंत्रज्ञानोत्तर विश्व हे महाग्राम होत असताना कुटुंबाचा आकार मात्र लघुत्तम होत तो एकसदस्यत्वाकडे चाललेला दिसतो. जी उघड उघड एकसदस्यी कुटुंबे आहेत, त्यांनी निदान जाणीवपूर्वक तिचा स्वीकार केला आहे. मात्र त्यामुळे कामाखेरीजच्या काळात एकाकीपणामुळे काही नवीन समस्या.. विशेषत: मानसिक समस्या निर्माण होत आहेत असे म्हणतात.

दुसरीकडे रूढ पती-पत्नी-अपत्ये अशी कुटुंबे तरी पूर्ण ''स्वस्थ'' आहेत

असे म्हणता येईल का? कामानिमित्त दीर्घकाळ पती फिरतीवर, परदेशात निदान कामाच्या ठिकाणीच १६ ते २० तास राहण्याचे प्रमाण जेथे वाढते आहे, त्या कुटुंबातील पत्नी आणि मुले यांची अवस्था काय होते? बाहेरच्या अतिरिक्त ताणाने पती अनेकदा रिकाम्या वेळात मद्याच्या अमलाखाली असतात. अशावेळी तथाकथित दांपत्य सुखाचे (?) काय होते? मानसिकदृष्ट्या कुटुंबातले सगळेच घटक परस्परांपासून दुरावलेले, एकेकटे आणि एकाकी होत जातात. रूढार्थाने ते सहनिवासी असतात, अशी दृश्ये आणि उदाहरणे आता दुर्मिळ राहिलेली नाहीत. पत्नीही नोकरी व्यवसाय सांभाळून पती असूनही पतिविरहित घर सांभाळताना अकालीच थकून जाते. केवळ गृहिणी असेल तर वैफल्यग्रस्त होत जाते. मुलांचे जग लवकरच स्वतंत्र होत जाते.

अशा कुटुंबात वृद्धांना आसरा क्वचितच मिळतो. सर्वच आर्थिक स्तरात वृद्ध-पतीपत्नींचे स्वतंत्र राहणे हे सार्वत्रिक झाले आहे. वृद्धपणी जोडीदार गेला तर मुला-मुलीकडे आश्रितासारखे किंवा वृद्धाश्रमात राहणे अटळ होते. यातून येणारी भावनिक उध्वस्तता एकाकीपणा अटळ होतो आहे.

अस म्हणतात की विश्वाच्या प्रारंभी परमेश्वर एकटाच होता. त्याला करमेना म्हणून मग त्याने विश्वाच्या पसाऱ्यातली एकेक चीज निर्माण करीत सगळा विश्वसंसार उभा केला. मग त्याला बरे वाटले. तो म्हणाला, ''एकोऽहं बहुस्याम।'' मी एक होतो आणि आता अनेक झालो. हा सगळा पसारा त्याच्या करमणुकीसाठी.

माणसानेही मग त्याचीच नक्कल केली आणि कुटुंबव्यवस्थेचा पसारा वाढवला; पण त्याबाहेरच्या अनेक व्यापात परत त्या कुटुंबातही तो एकाकीच होत गेलेला दिसतो. भोवती रूढार्थाने 'आपली' म्हणवणारी माणसे असूनही 'आतून' एकाकी, एकटे होत जाणे हे अधिक दयनीय नाही कां?

''समुद्री चहुंकडे पाणी; पिण्याला थेंबही नाही''। ही अवस्था किती वाईट! नात्यांच्या पसाऱ्यात असून माणूस एकाकी, एकटा होत जातो आहे.

एक परीने सगळे जगच एक सदस्यीय कुटुंबअवस्थेकडे जात नाही ना?

# अपघात : कधी असे, कधी तसे

एखाद्या इमारतीचा वळणदार जिना, विशेषत: महाविद्यालयाच्या किंवा एखाद्या तालेवार ऑफिसचा! ती उशीर झाला म्हणून घाईगर्दीने पावलांकडे पहात जिना चढते आहे आणि काय होते कोण जाणे अचानक काहीतरी अंगावर धडकते हातातील पर्स, पुस्तके उधळली जातात. 'ती' दचकून समोर पाहते. तर तिच्यासारखाच घाई गर्दीने उतरणारा कोणीतरी रूबाबदार 'तो' धडकलेला असतो; आणि त्या क्षणी मग दोघांच्याही हृदयात धडकन सुरू होते, तो क्षण आठवून 'कसंतरी' होत रहातं आणि त्या अकस्मिक अपघाताचा शेवट म्हणजे आपल्याला उभयतांच्या शुभमंगल प्रसंगी हजर राहण्याचं निमंत्रण येतं.

या प्रसंगातले स्थळ-काळ थोडेसे बदलून हे प्रसंग कुठेही घडू शकतात रस्त्यात, बसस्टॉपवर, बाजारात किंवा आणखीही कुठे कुठे! काही ध्यानी मनी नसताना अचानक अशी धडक होते. सरळ चाललेल्या आयुष्यात काही उलथापालथ होते. वाटा बदलाव्या लागतात. म्हणून तर त्यांना अपघात म्हणायचं पण हा एक गोड अपघात ठरतो. आयुष्यात होणारे बदल दोघांनाही आनंददायक ठरतात.

आमच्या एका मैत्रिणीचं प्रपंचाच्या जनसंख्येचं नियोजन बिघडवून तिच्या घरात एक चिंटी आली आणि मोठा बाळ्या आठ वर्षाचा झाल्यावर घरात खूप दिवस मध्ये जाणवणारं काहीसं सुनेपण जाऊन चैतन्य संचारलं. मग चिंटीचे आई-बाबा म्हणाले खरं तर हा एक अपघातच होता. आमच्या थोड्या दुर्लक्षानं घडलेला. प्रथम आम्ही जरा धास्तावलो; पण चिंटींच्या बाळलीलांनी आमच्या घरात जाणवू लागलेला एकसुरीपणा एकदम नाहीसा झाला. एकपरीनं हाही अपघात खरा, पण अंतिमत: गोड अपघातच ठरला.

कमल आणि तिचा भाऊ लहानपणीच आई-वडिलांवाचून पोरकी झालेली मुलं! कोणाचा आधार नाही. कष्ट करून आपआपली रांगेला लागली आणि एकदिवशी अचानक तिचा पत्ता शोधीत एक पत्र आलं. तिच्या आजोबांची गावाकडची वडिलोपार्जित जमीन तिच्या एका चुलत चुलत्यानं विकली. जमिनीवर

या मुलांच्या वडिलांनी वारस म्हणून या मुलांच्या नावांची नोंद केल्याचं मुलांनाही माहीत नव्हतं पण हा चुलता बरी नियत असलेला म्हणून म्हणा यांच्या वाटणीची जमिनीची रक्कम त्यांना देण्यासाठी शोध घेत होता. त्याचं हे आकस्मिक पत्र हाही एक गोड अपघात, अगदी हिंदी सिनेमात घडावा असा. पण प्रत्यक्ष घडलेला सुखावह!

अचानक सुख देणारे अपघातही घडतच नाहीत असं नाही घडतातच. फारसा अभ्यास केलेला नसला तरी बऱ्या मार्कांनी पास झालं की एक धक्का बसतोच, असं कसं झालं बुवा! पण हा सुखद धक्का असतो.

ध्यानी मनी नसताना एखाद्या लेखकाला, कलावंताला एखादा पुरस्कार मिळतो, एखाद्या आडगावी राहून कंटाळलेल्या, सुरुवातीला बदलीचे प्रयत्न करूनही ती होत नाही म्हणून स्वस्थ बसून नाकासमोर नोकरी करणाऱ्याला अचानक हवा तिथला बदली हुकूम मिळतो, नको असलेल्या पाहुण्यांचं येणं अचानक रद्द होतं, परदेश प्रवासाचा अकस्मात योग येतो. हेही सगळे एकपरीने अपघातच की! पण हवेहवेसे वाटणारे, सुखदायक अपघात.

पण माणसाची सवय अशी असते की, अशा अकस्मात घडणाऱ्या सुखद घटनांची आठवण माणूस आवर्जून ठेवत नाही आणि दु:खद घटनांची आठवण सहज विसरत नाही. म्हणून मग कवी मंडळी म्हणतात.

*वेड्या मना कर विचार । सुख थोडे दु:ख फार ।।*

पण हे खरंच असं असतं का? एकाच मार्गावरचे शंभर प्रवास विनाअडथळा सुखरूप झालेले असतात; पण काही कारणानं एखाद्या प्रवासात रखडपट्टी झाली की, 'हे कायम असंच असतं या गाड्यांचं,' म्हणून वैताग येतो आणि हा प्रवास मात्र दीर्घकाळ आठवून त्रास होत राहतो.

माणसाचं जीवन खरोखरच सुखापेक्षा दु:खाचीच बेरीज करणारं आहे का? तसं असेल तर माणूस मग जगण्याची आणि जिवंत राहण्याची तरी एवढी धडपड का करतो? ज्या अर्थी सामान्य मन:स्थिती असलेल्या माणसांना अडीअडचणींतूनही जगावसं वाटतं त्या अर्थी जीवन काही पूर्णपणे दु:खमय नाही. शेवटी सुख म्हणजे तरी काय आणि दु:ख म्हणजे तरी काय?

*अनुकूल संवेदनीयम् सुखम् । प्रतिकूल संवेदनीयम् दु:खम्।।*

अनुकूल, आपल्या हिताची संवेदना म्हणजे सुख! आणि प्रतिकूल, आपल्या अनहिताची संवेदना म्हणजे दु:ख! पण ही अनुकूलता आणि प्रतिकूलता तरी ठरवायची कोणी आणि कशी? परीक्षेत ९० टक्के, ९५ टक्के गुणांची अपेक्षा करणाऱ्याला जर ८५ टक्के गुण मिळाले तर त्याच्या दृष्टीने ती प्रतिकूलच घटना म्हणून ती दु:खकारक!

उलट ज्याला उत्तीर्ण होऊ की नाही? हीच धास्ती वाटत असते, त्याला ५० टक्के गुण मिळाले तरी ते हितकारक ठरल्याने आनंदच वाटतो.

अनेकदा सुखकारक घटना जशा अनपेक्षितपणे घडतात, तशाच प्रतिकूल घटनाही अकस्मातच घडतात. म्हणून तर त्यांना अपघात म्हणायचं असे दु:ख देणारे अपघात घडावेत असं कुणालाच वाटत नाही; पण ते घडू नयेत म्हणूनही काही खबरदारी घ्यावी लागते, सावधानता बाळगावी लागते. कधी कधी थोडेसंच दुर्लक्ष किंवा आळस फार मोठी किंमत वसूल करणारा अपघात ठरतो.

सुरवातीला सांगितलेले 'तो' आणि 'ती' यांची भेट जरी आकस्मिक अपघाताने झालेली असली तरी पुढे विवाहाचा निर्णय घेताना परस्परांचे पूर्वजीवन (भौतिक, शारीरिक आजार इत्यादी) तपासून पाहण्याची सावधगिरी मात्र बाळगावीच लागते. नाहीतर फसवणूक होऊन जन्मभर पश्चाताप करण्याची वेळ येते. मग हा अपघात फार महागात पडतो 'तो टाळता येणं शक्य होतं.' असा नंतर कितीही पश्चाताप झाला तरी इलाज नसतो.

लहान मुलांचे अवखळ खेळ जसे मोठ्यांना बाललीलांनी प्रमुदित करीत असतात, तसेच त्यांच्याकडे थोडे दुर्लक्ष झाले तर त्या आनंदावर कायमचे विरजण घालणारेही ठरतात.मुलांच्या खेळात अनेक वस्तूंचा संग्रह असतो. एखादे मूल सहज म्हणून एखादी काचेची गोटी, एखादे नाणे, किल्ली अशी वस्तू तोंडात घालते आणि कधी कधी त्यातून प्राणसंकट ओढवते, असे अनुभव वारंवार येतात.

घरात गॅस चालू असतो ४/५ वर्षांचे एखादे अवखळ मूल आईच्या आगे-मागे घोटाळत असताना कुतूहल म्हणून रेग्युलेटरची फिरवा-फिरव करते आणि जीवघेणा अपघात घडतो.

असे कितीतरी छोटे-मोठे दु:खद अपघात आधी थोडी काळजी घेतली तर टाळता येणे शक्य असते; पण काही अपघात हे मात्र खरोखर दुर्दैवाचे आघात ठरतात. मती गुंग करणारे असतात.

रस्त्यावर होणारे वाहनांचे अपघात अशा प्रकारचे असतात. खरे तर सर्वांनीच थोडी सावधानता बाळगली, वाहने तंदुरुस्त ठेवली, घाई-गर्दी टाळली तर हे अपघातही टळू शकतात. निदान काही अंशी टळू शकतात.

अशा जीवघेण्या अपघाताचे एक रूप शारीरिक व्यंग घेऊन येते. कधी उपजतच ही व्यंगे असतात तर कधी अपघातामुळे, शस्त्रक्रियेनंतरचे परिणाम म्हणून तर अनेकदा वृद्धावस्थेत इंद्रियेच क्रमाने दुबळी होत जातात, म्हणूनही एखादा अवयव बाद होतो. सर्व अवयव सदैव सुस्थितीत असणे हेच केवढे मोठे सुखनिधान आहे, याचा प्रत्यय अशी व्यंगे पाहिल्यावर येतो. पण त्या उणीवेवर

मात करूनही प्रतिकूल ते अनुकूल करून घेण्याची जिद्द असलेल्या माणसांचीही शेकडो उदाहरणे अवती-भवती दिसतात.

ज्या शारीरिक-मानसिक आघाताने उध्वस्त व्हावे, त्या आघातांवरही मात करणाऱ्या व्यक्ती हे खरे जीवनादर्श होत. दु:खावर मात करून त्या दु:खालाच ते सुख रूप देतात.

दोन्ही हात-पायांनी अधू असलेला एखादा कलावंत केवळ तोंडात ब्रश धरून सुंदर चित्रांची दुनिया उभी करतो. एखादा पायांनीच केवळ यंत्रे चालवून उत्पादन करतो तर एखादा थोट्या हातांनी ते काम कतो. उपजत अपघाताने असो वा अन्य कारणाने असो प्रतिकूलतेवर मात करीत ही माणूस जगणे सुखमय करण्याचा, आनंदम करण्याचा प्रयत्न करतो.

हे सांगत असतानाच मराठीतले पहिले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कादंबरीकार कै. वि. स. खांडेकर यांची आठवण येते. त्यांची प्रकृती तशी लहानपणापासूनच तोळा-मासा होती. नजर तर अधू होतीच. वृद्धावस्थेत तर दृष्टी जवळ जवळ नाहीशी झाली होती. अशा वेळी एकदा त्यांच्या घरी जाण्याचा योग आला. बरोबर माझे ज्येष्ठ गुरू प्रा. आंबेकर होते. त्यांनी दृष्टीमुळे येणाऱ्या अडचणींबद्दल हळहळ व्यक्त केली. तेव्हा खांडेकर म्हणाले, 'वाचनाची अडचण होते खरी पण एक मुलगा मला वाचून दाखविण्यासाठी येतो; पण माझ्या लक्षात आलंय की, आंधळेपणाचे काही फायदेही आहेत.'

'असं कसं असेल?' मी अगदीच भाबडेपणाने उद्‌गारले होते. तेव्हा भाऊ (खांडेकर) जरा हसले आणि म्हणाले, 'अग खरंच, आता माझ्या घराची मला खरी ओळख पटत चालली आहे. जिन्याला पायऱ्या किती हे तीस वर्षांनंतर मला कळलं ते दृष्टी गेल्यावर. माझ्या घराच्या जिन्याचा कठडा, त्यावरची नक्षी, माझ्या लेखण्यांची लांबी, रुंदी, कपाटांचे आकार एक की दोन अनेक वस्तू स्पर्शामुळे मला जास्त जवळच्या, जास्त ओळखीच्या वाटतात, त्यांच्याबद्दल ममत्व वाटतं.' त्या वेळी (सुमारे ४५ वर्षांपूर्वी) मला हे सगळं अजब आणि चमत्कारिक वाटलं होतं आता ते काय म्हणाले होते ते थोडं थोडं कळतय् असं वाटतं.

प्रतिकूलातही जमेची बाजू शोधली की तेवढ्या प्रमाणात दु:ख उणावतं आणि सुख दुणावतं. शेवटी सुखद अपघातांबरोबर दु:खद अपघातांनाही सामोरे जावेच लागते. त्या दु:खाचीही एखादी रूपेरी कड शोधली की जगणे सुसह्य होते. अर्धा पेला रिकामा आहे म्हणण्यापेक्षा अर्धा तर भरलेला आहे ना! छान! हाच मोठा दिलासा ठरतो.

# स्त्री शिक्षण आणि समाजसुधारणा

स्त्रियांविषयी समाजाची मानसिकता नेहमी दुहेरी आणि तीही परस्परविरोधी राहिली आहे. स्त्री शिक्षण आणि स्त्री सुधारणा एवढ्यापुरताच येते विचार करायचा आहे.

एकूणच समाज सुधारणेचा विचार भारतात इंग्रजोत्तर काळात आला. साता समुद्रापलीकडून आलेल्या मूठभर गोऱ्या लोकांनी भारतासारख्या प्राचीन आणि अवाढव्य देशावर कशाच्या जोरावर कब्जा मिळविला? याचा विचार जेव्हा या देशातील विचारवंत करू लागले तेव्हा युरोपियन (इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज इ.) आपल्यापेक्षा उद्योगधंद्यात, व्यापारात पुढारलेले ओहत. अर्थात् आपण मागासलेले आहोत, हे उत्तर स्थूलमानाने मिळाले. मग या मागासलेपणाच्या कारणांचा शोध घेताना आपल्या समाजात फार मोठ्या प्रमाणावर अज्ञान आहे, असे जाणवले. आपल्याकडे ज्याला ज्ञान म्हटले जाई, ते प्रामुख्याने धार्मिक, आध्यात्मिक मानले जाई. दैनंदिन जगण्यासाठी भौतिक जीवनात त्याचा काही उपयोग नसे. त्या स्तरावरचे ज्ञान त्या त्या उद्योग व्यवसाय करणाऱ्यांना त्यांच्या पारंपरिक अनुभवातून मिळे. ते कृतिशील असे. लेखन-वाचनादि व्यवहारातून मिळणारे ज्ञान काही ठराविक उच्च जातीच्या पुरुषांनाच फक्त मिळे म्हणूनच आपल्या देशातील सर्वसामान्य जनतेला लेखन वाचन यायला हवे आणि त्याच्या साहाय्याने नवीन भौतिक विषयांचे ज्ञान सर्वांना मिळावे असा विचार इंग्रजोत्तर काळात प्रथमच आला. ज्यांना लेखन वाचन येत असे त्यांना शेती, सुतारकाम, लोहारकाम, विणकाम असे जगण्यासाठी आवश्यक काम येत नसे, तर ज्यांना हे येत असे त्यांना लेखन-वाचन येत नसे. नवीन शिक्षण विचाराने ही विषमता दूर करण्याला प्रारंभ झाला. ही फार मोठी सुधारणा होती.

या देशात धर्म, जात, व्यवसाय, लिंग यावर आधारित विविध प्रकारच्या विषमता असल्याने मागासलेपण मोठ्या प्रमाणावर होते. म्हणून या विविध

विषमता दूर करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे सुधारणा करणे आणि त्याचा प्रारंभ सर्वांना समान शिक्षण देऊन करणे याला प्राधान्य मिळाले.

स्वाभाविकच धर्माच्या नावावर विषमतेचे पोषण करून आपले लाभ उठवणाऱ्यांना हे गैरसोयीचे असल्याने त्यांचा विरोध होता; परंतु संपूर्ण समाज खऱ्या अर्थाने सबळ करायचा असेल तर आधुनिक ज्ञानाला पर्याय नाही, हे विवेकी मंडळींनी ओळखले.

विविध विषमतांमध्ये स्त्री-पुरुष विषमता सर्वात मोठी आहे. अजून आहे. निसर्गाने स्त्री-पुरुषांची शारीरिक घडण काही बाबतीत वेगळी केली आहे. निसर्गानेच विषमता निर्माण केली आहे, असा याचा सोयीस्कर अर्थ घेतला जातो, पण वेगळेपण म्हणजे वैगुण्य अथवा कमीपणा नव्हे, हे बरेचदा कळलं तरी वळत नाही.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी नवशिक्षणाचा सार्वत्रिक शिक्षणाचा विचार आला तरी लगेच आचार सुरू झाला नाही. ब्राह्मणेतर पुरुषांचे शिक्षणही हळूहळू प्रसार पावत गेले; मग स्त्री शिक्षणाची गती किती मंद असेल याची कल्पनाच केलेली बरी!

इंग्रज सरकारने काही शाळा सुरू केल्या; पण केवळ मुलींना शिक्षण देणारी पहिली शाळा महाराष्ट्रात म. जोतिबा फुले - खरे तर सावित्रीबाई फुले यांनी सुरू केली, हे सर्वांना माहितच आहे. त्यालाही आता दीडशे वर्षे होऊन गेली.

दादोबा पांडुरंग तर्खडकर, भाऊ दाजी लाड, नी. भ. भवाळकर, लोकहितवादी उर्फ गोपाळ हरि देशमुख, म. जोतिबा फुले हे इंग्रजोत्तर काळातील पहिल्या पिढीचे स्त्रीकैवारी, उदारमतवादी पुरुष सुधारक होते. त्यांच्याच पाठोपाठ न्या. महादेव गोविंद रानडे, ना. गोपाळ कृष्ण गोखले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांची पिढी स्त्री सुधारकांची पिढी म्हणूनच प्रसिद्ध आहे.

एक म. जोतिबा फुले सोडले तर अन्य सर्व सुधारकांचा भर उच्चवर्णीय स्त्रियांच्या सुधारणांवर होता. ते स्वाभाविकही होते. एक तर त्यांचा अनुभवही त्यांच्या समाज-जातीपुरताच होता. दुसरे म्हणजे बालविवाह, केशवपन, विधवा पुनर्विवाहाला प्रतिबंध अशी बंधने याच स्तरात जास्त होती. ब्राह्मणेतर उच्चवर्णीयात (खानदानी मराठा) केशवपन वगळता इतर सर्व बंधने होती; पण सुधारकांच्या प्रारंभपर्वात त्या स्तरातील उदारमतवादी सुधारक पुरुष स्त्री प्रश्नावर असे एकत्र आलेले दिसत नाहीत, म्हणूनही असेल की स्त्री शिक्षण आणि स्त्री सुधारणेच्या चळवळी, चर्चा, लेखन प्रामुख्याने उच्चवर्णीय शहरी स्त्रियांच्या संदर्भातच फार मोठ्या प्रमाणात झाले. याच वर्गातील स्त्रियांमध्ये शिक्षणाचा आणि सुधारणांचाही

प्रसार झपाट्याने झाला. नोकरी करून अर्थार्जनही याच स्त्रियांत प्रथम सुरू झाले. क्रमाने ते अन्य स्तरात पाझरत आज सर्व स्तरातील स्त्रियांपर्यंत पोचले आहे.

काही असले तरी स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण जसजसे वाढेल, तसतशा बाकीच्या सुधारणाही होत जातील, हा आशावाद पूर्वीही होता, आजही आहे.

असे असले तरी शिक्षित स्त्रीविषयी समाजमन नेहमीच साशंक राहिले आहे. प्रारंभी तर ही साशंकता फार मोठ्या प्रमाणावर होती. कारण स्त्रीशिक्षणाची सांगड समाजाने नेहमीच उथळ, उद्धट दिखाऊपणाशी घातलेली दिसते. अगदी विसावे शतक संपेपर्यंतच्या लोकप्रिय नाटक-सिनेमांमधून शिक्षित स्त्रीची अशीच उथळ, स्वार्थी, आक्रस्ताळी प्रतिमा रंगवलेली दिसते. एकोणिसाव्या शतकाअखेरच्या नाटकांतून तर शिक्षित स्त्री म्हणजे धर्मभ्रष्ट, नटवी, मोठ्यांचा आदर न राखणारी, नवऱ्याची किंमत न ठेवणारी, खर्चिक आणि क्वचित सैल चारित्र्याची अशीही रंगवली जाई. उलट न शिकलेली स्त्री साधीभोळी, सत्वस्थ, सोज्वळ त्यागी वगैरे दाखवली जाई. जणु काही शिकलेल्या स्त्रीची समाजाला भीती वाटते की काय? असे वाटण्याजोगी ही परिस्थिती आहे. त्यामुळे शिक्षित स्त्रीला विनोदाचे लक्ष्य मोठ्या प्रमाणावर केले जाते. शिकलेली असूनही आज्ञाधारक स्त्री हा समाजाचा आदर्श असतो.

आज्ञाधारक म्हणजे काय? तर इतर कोणी (विशेषत: भोवतालच्या पुरुष घटकांनी किंवा सासरच्या स्त्री-पुरुषांनी) कितीही बिनडोक मूर्खपणा केला, उद्दामपणा केला, तिचा अपमान केला तरी निमूटपणे सहन करणारी स्त्री ही आदर्श ठरते. तिला जरी भोवतालच्यांच्या उणिवा दिसत असतील तरी तिने जाणीव करून द्यायची नाही. मग शिक्षण कशाला घ्यायचे? शिक्षणाने आलेले शहाणपण, विचारक्षमता, आत्मविश्वास हे जर सगळे गुंडाळूनच ठेवायचे असेल तर शिकायचे कशाला? केवळ शिक्षित नवऱ्याच्या प्रतिष्ठेसाठी पदवीधर बायको मिरवता यावी म्हणून?

''शिक्षणाचा फार टेंभा मिरवू नकोस.''

''आपलं शहाणपण आपल्यापाशी ठेव. मला शिकवायच्या फंदात पडू नकोस.''- अशा आशयाचे उद्‌गार शिक्षित स्त्रियांना नेहमीच ऐकावे लागतात. सार्वजनिक ठिकाणी एखादी स्त्री कायदेशीर नियम दाखवू लागली तर अल्पशिक्षित पुरुषालाही राग येतो. ''उगीच आम्हाला शाळा शिकवायच्या फंदात पडू नका.'' म्हणून एखादा वयाने, शिक्षणाने लहान असलेला पुरुष प्रौढ शिक्षित बाईलही दमात घेतो. हिंदी मालिका आणि चित्रपटातील पुरुष तर उठता बसता - ''औरत हो! औरत बनके रहो। मर्द बननेकी कोशिश मत करो।'' म्हणून उद्धटपणे

फर्मावतो. तेव्हा त्यात कोणालाच काही गैर वाटत नाही.

आजही स्त्री शिक्षणाविषयीची ही पुरुषी मानसिकता पाहिली की सुधारक पुरुषांना जे वाटत होते, ते चूक होते की काय असेच वाटते. स्त्री शिकली की सुधारेल. मग समाज सुधारणा आपोआप होईल, असे त्यांना वाटत होते; पण शिक्षित स्त्रीची सर्व स्तरावर चाललेली ससेहोलपट पाहिली की, शिक्षणाने सुधारणा होईल हा आशावाद खोटा होता असे वाटते.

खरे तर त्या त्या समाजस्तरात स्त्रीच्या आधी पुरुष शिकला. शिक्षणाने माणूस प्रगल्भ होतो. व्हावा. आपल्या इतकाच इतर कोणत्याही व्यक्तीचा त्याने आदर करावा. त्यालाच सुसंस्कृतपणा म्हणतात. शिकलेल्या पुरुषाला हे माहीत नसते का? की स्त्रीच्या संदर्भात त्याचा विचारच करायचा नसतो,असे त्याला वाटते! स्त्री ही पुरुषाबरोबरीची माणूस आहे. मग ती शिक्षित-अशिक्षित कशीही असो, हे आमच्या शिक्षित पुरुषाच्या गावीच नसते का? नसेल तर त्याला खऱ्या अर्थाने शिक्षित म्हणायचे का?

शिक्षणाने विषमता दूर व्हावी हे जसे नोकरीची संधी, अर्थोत्पादन याबाबत खरे आहे, त्याहीपेक्षा दैनंदिन जीवनात कोणत्याही नात्याने विषमता मनात नसावी, म्हणजे आचरणातून ती आपोआपच हद्दपार होईल, हे खरे आहे.

गेल्या दीडशे वर्षांत शिक्षणाने स्त्री जेवढी उदार आणि प्रगल्भ झाली आहे, तेवढ्या प्रमाणात पुरुष प्रगल्भ झालेला दिसत नाही. त्यामुळे असे वाटते की, केवळ अक्षरांची साक्षरता पुरेशी नसते. मानसिक जडणघडणीची भावसाक्षरता आणि विचारसाक्षरता जास्त महत्त्वाची असते. स्त्रीबाबत पुरुषाची ही साक्षरता कमी पडते, असे नाईलाजाने म्हणावे लागते.

म्हणूनच आता समाजसुधारणेसाठी स्त्रीला लक्ष्य करण्यापेक्षा स्त्रीविषयक भावसाक्षरतेसाठी आणि विचारसाक्षरतेसाठी निदान भारतीय समाजात तरी पुरुषाला लक्ष्य करायला हवे. समाजसुधारणेचे केंद्र पुरुषी मानसिकता बदलणारे हवे आहे. एका नव्या सुधारणापर्वाची प्रबोधन दिशेची गरज आहे. तरच सुधारणेच्या आदिपर्वातील समाज सुधारकांचे स्वप्न पूर्ण होईल.

# कुंपणावरून

"**बा**यांनो, बाहेरची कामे जरूर करा, पण आपला स्वयंपाकघरावरचा ताबा सोडू नका." उदारमतवादी म्हणून कीर्ती असलेल्या एका विचारवंतांनी एका जाहीर सभेत स्त्रियांना हा उपदेश केला आणि नंतर चहा-पाण्याच्या वेळी झालेल्या चर्चेत त्यांनी मोठ्या अभिमानाने त्याचा पुनरुच्चार केला.

आणखी एक प्रसंगही नुकताच घडला. स्त्री आणि पुरुष यांची शैक्षणिक पात्रता समान असली तरी पती-पत्नी जर एकाच व्यवसायात असतील तर (अपवाद वजा जाता) बहुधा पत्नीकडे त्या व्यवसायाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी येते किंवा ती स्वीकारते असे म्हणू फार तर! (उदा. डॉक्टरी व्यवसाय) अशा आशयाची चर्चा चालू असताना स्वत: डॉक्टर असलेल्या एका पत्नीने अशी व्यवस्थाच कशी योग्य आहे, पुरुषाला व्यवस्थापन कसे जमत नाही, वगैरे बाबी आग्रहाने सांगितल्या.

दोन्ही प्रसंगांतून संदेश मात्र एकच मिळत होता, असे वाटते. स्वयंपाकघर सांभाळणे हे स्त्रियांचे महत्त्वाचे आणि आद्य कर्तव्य आहे, ही पारंपरिक भूमिका पुरुष वक्त्यांच्या प्रतिपादनातून व्यक्त होत होती. विशेषत: घरातली बालसंगोपनासारखी कामे, घरातील व्यक्तींच्या दैनंदिन गरजा भागवणारी कामे स्त्रिया 'उपजतच' (?) जास्त कौशल्याने करू शकतात, हा समज ठाम होता. घराच्या देखभालीत स्वयंपाकादि कामांबरोबरच किरकोळ शिवण-टिपण स्वच्छता वगैरे कामे गृहीतच असतात.

थोडे तटस्थपणे आणि बारकाईने पाहिले तर सर्वच घरातील ही कामे सर्व बायका फार कौशल्याने आणि टापटिपीने करतातच, करू शकतातच असे खात्रीशीरपणे सांगण्यासारखी परिस्थिती नाही. अगदी नोकरी न करता पूर्णवेळ गृहिणी असणाऱ्यांच्या घरांतूनही गचाळपणा आणि अनागोंदी व्यवस्था असू शकते, असते. केवळ नोकरीपेशा स्त्रियांवर अव्यवस्थितपणाचा केला जाणारा

आरोप किंवा गृहीत ही वस्तुस्थिती अनेकदा नसते. ह्याखेरीज आणखी एक बाब अध्यहृत असते ती अशी की, स्वयंपाक-पाणी, शिवण-टिपण, गृह-सौंदर्य इत्यादी बाबी पुरुषांना जमत(च) नाहीत. त्यांचा तो पिंड(च) नाही. हे गृहीतही मनात पक्के घर करून असते.

प्रत्यक्षात काय दिसते? विशेषत: एकूणच जीवन जसजसे अर्थकेंद्री होत आहे, तसतसा अनेक गृहीते ही भ्रामक असल्याचे सिद्ध होत आहे.

घरातली जी जी कामे स्त्रियांची स्वाभाविक कौशल्याची आणि कदाचित म्हणूनच स्वाभाविक कर्तव्ये म्हणून आजतागायत सांगितली गेली, मानली गेली आहेत ती ती अर्थोत्पादनाच्या बाजारी क्षेत्रात गेली की ती पुरुषांच्या कौशल्याची कामे होतात आणि एरव्ही गृहकृत्यदक्षतेचा अभिमान असणाऱ्यांनाही ती कामे बाहेरच्या इतकी चांगली जमत नाहीत, हे सांगण्यात काही कमीपणा आहे असे सहसा वाटत नाही.

शिवण-टिपण हे खास स्त्रियांचे काम असे एकीकडे म्हणत असताना टेलरिंग व्यवसायावर सर्वार्थाने पुरुषी आधिपत्य आहे. थोडक्यात म्हणजे सगळे कुशल ''लेडीज् टेलर्स् जेण्ट्स'' आहेत.

घरात दैनंदिन स्वयंपाकपाणी हे खास स्त्रीक्षेत्र असते, मात्र लग्नकार्याच्या स्वयंपाकाच्या पारंपरिक आचारी-बल्लवाचार्यांपासून पंचतारांकित 'शेफ' पर्यंतचे सर्व अर्थोत्पादनाचे खाद्यक्षेत्र खास पुरुषांचे असते. त्यांच्यासारख्या लज्जतदार चवींचे पदार्थ घरात क्वचितच होतात, हे खाणारे तर सांगतातच; पण तथाकथित 'सुगृहिणी'ही बहुधा सहज मान्य करून टाकतात.

घरगुती व्यवस्थापन खास स्त्रियांनाच जमू शकते. असे म्हणत असताना मोठमोठ्या व्यवसायांचे सर्व व्यवस्थापक-मॅनेजर्स पुरुषच असतात, हे वास्तव आहे. तीच गोष्ट गृहसजावटीसारख्या बाबीची! 'इंटिरिअर डेकोरेटर' म्हणून ते व्यवसायक्षेत्र झाले की, त्यावर पुरुषांचे आधिपत्य स्थापन होते. नंतर स्त्रियांचा शिरकाव होतो, अशी अनेक उदाहरणे सहज लक्षात येतात.

या सर्व बाबतीत अपवाद आहेतच; पण ते अपवादच आहेत. नियम म्हणावा असे नाहीत.

म्हणजेच जेव्हा घरात रोज काटकसरीने, चिकाटीने आणि मुख्य म्हणजे फुकट करायची सर्व कामे ही स्त्रीच्या स्वाभाविक कौशल्याची ठरतात आणि उंबऱ्याबाहेरची तीच कामे अधिक पैसे मिळवून देण्यासाठी केली जातात, तेव्हा ती पुरुषांची कौशल्ये ठरतात. घरातली कामे पुरुषांनी करणे हे पुरुषवर्चस्ववादी मानसिकता असलेल्या (पुरुषांना आणि स्त्रियांनाही) कमीपणाचे वाटते; पण

अर्थोत्पादक क्षेत्रात तीच कामे करणाराची प्रतिष्ठा वाढते. अशी चमत्कारिक आणि विसंवादी मानसिकता बहुसंख्य समाजाची आहे.

मात्र या पारंपरिक मानसिकतेपलीकडे गेलेल्यांच्या स्त्री-पुरुषविषयक प्रतिष्ठेच्या कल्पना इतक्या कोत्या आणि संकुचित कधीच नसतात. आज एक समंजस समाजस्तर या मानसिकतेबाहेर येत आहे. तरी प्रारंभी सांगितल्यानुसार धारणाही मोठ्या प्रमाणात आहेत.

१९१७ सालातली एक सत्यकथा आहे. पत्नी १३/१४ वर्षांची! तिला स्टोव्हवर भाकरी करता येत नव्हत्या. भाकरीशिवाय तर पर्यायच नव्हता. पती एक नामांकित विचारवंत, राज्यशास्त्र, अर्थशास्त्रासारख्या विषयावर ग्रंथलेखन करणारा, एका प्रतिष्ठित नियतकालिकाचे संपादन करणारा. घरात विद्यार्जनासाठी सांभाळलेली दोन-तीन गरजू मुले. आर्थिक ओढाताण. अशा परिस्थितीत पती सकाळी स्टोव्हवर सर्वांच्या भाकरी करी, कारण त्याला सवयच होती. घरातल्या अन्य कामांची वाटणी होत होती आणि पत्नीसह सर्वांनी सकाळी दोन तास एकाचवेळी अभ्यास करावा असा नियमही आचरणात आणला जाई.

हे पती-पत्नी म्हणजे ''आधुनिक भारत'' या आजही मार्गदर्शक असलेल्या राज्यशास्त्रीय ग्रंथाचे लेखक, विचारवंत आचार्य शं. द. जावडेकर आणि त्यांच्या पत्नी सुशीलाबाई! सुशीलाबाईंनीच ही कथा लिहून ठेवली आहे.

प्रतिष्ठा कामात नसते. व्यक्तिमनाच्या विकासात असते आणि महत्त्वाचे म्हणजे ठरवले की प्रत्येक काम सर्व स्त्री-पुरुषांना 'स्वाभाविक' होते. कौशल्यही संपादन करता येते.

# अक्षर दिवाळी

आकाशदिवा, फटाके, फराळ यांच्याइतकीच दिवाळी म्हटले की, दिवाळी अंकांचीही आठवण येण्याइतकी सवय झाली आहे. शरीर, मन आणि बुद्धी सर्वांच्याच भोगाची तरतूद बहुतेक सण समारंभ करीत असतात. भारतात इंग्रजोत्तर काळात सार्वत्रिक साक्षरतेची मुभा आणि सोय उपलब्ध झाली आणि तेव्हापासून वाढत्या अक्षरसुधेची व्यवस्था करण्यालाही प्रारंभ झाला. वृत्तपत्रे आणि मासिके यांच्या निर्मितीची इतरही (व्यापारी) कारणे असतील; पण समाजातील अक्षरांच्या उपासनेची वाढती आस पुरवणे आणि नव्याने निर्माण करणे हे दोन्ही हेतू साध्य होत आले आहेत. त्यातूनच कधीतरी दिवाळीसाठीच्या विशेष अंकाची कल्पना निघाली असावी.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे जशी अठरापगड जाती-जमातीची पुरुष मंडळी साक्षर झाली तशी स्त्रियांचीही शिक्षणक्षेत्रातली संख्या वाढू लागली. अक्षर ओळख हा शहाणपण वाढविण्याचा पाया ठरला. नवीन माहिती, ज्ञान, जीवनाविषयी स्वतंत्र विचार करण्याची शक्ती वाढावी म्हणून विविध प्रकारचे वाचन स्त्रियांनीही करावे ही भूमिका होती; कारण स्त्री शिक्षण आणि स्त्री सुधारणेसाठी प्रारंभी तरी उदारमतवादी नवशिक्षित पुरुषांचाच पुढाकार होता. शिक्षणामुळे निर्माण झालेली वाचनाची भूक वृत्तपत्रे, मासिके भागवीत असताना स्त्रियांनीही त्यांचे वाचन करावे, अशी कल्पना होती; परंतु सामाजिक आणि बौद्धिक क्षेत्रात स्त्रियांची पुरुषाइतकी गती नसते असे तेव्हा समजले गेले आणि स्त्रियांसाठी वेगळ्या अक्षरसाहित्याची गरज वाटू लागली. त्याची तरतूद करण्यासाठी छापील मासिक-वृत्तपत्रांनी थोडी जागा निर्माण करून दिली.

घर हे स्त्रीचे मुख्य कार्यक्षेत्र; तेव्हा तर एकमेव कार्यक्षेत्र होते! स्वाभाविकच मासिका-वृत्तपत्रांतूनही गृहिणीला उपयुक्त व मार्गदर्शक असाच मजकूर देणे अपरिहार्य ठरले. त्या धारणेचा पगडा आजही किती जबरदस्त आहे, ते वृत्तपत्र-मासिकांच्या स्त्रीविषयक पुरवण्यांतून दिसते.

म. जोतिबा फुलेंनी मुलींची पहिली शाळा काढल्यानंतर स्त्रीचीही अक्षरांची भूक वाढत गेली आणि नंतरच्या वीसएक वर्षातच स्त्रियांसाठी मासिके निघाली.

ते काही असले तरी स्त्रियांसाठी स्वतंत्र मासिक काढण्याची कल्पना ज्याला प्रथम स्फुरली आणि ज्याने ती अंमलात आणली, त्याचे ऋण मानलेच पाहिजे.

१८६४ साली 'स्त्रीभूषण' नावाचे खास स्त्रियांसाठीचे मासिक सुरू झाल्याची वाङ्मयेतिहासात प्रा. गं. बा. सरदार यांनी नोंद केली आहे. त्याचे संपादक मात्र अज्ञात आहेत. म्हणजे म. जोतिबा फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढल्यापासून सुमारे वीसएक वर्षात स्त्रियांसाठी स्वतंत्र मासिकाची गरज भासली हे महत्त्वाचे! पाठोपाठ पाचच वर्षांनी म्हणजे १८६९ साली लक्ष्मण शंकर अभ्यंकर यांनी "स्त्री ज्ञान प्रदीप" हे मासिक सुरू केल्याची नोंद आहे. मात्र या मासिकातील मजकुराचे स्वरूप काय होते, ते नेमके माहीत नाही. तरीही एकूण स्त्रीविषयक नियतकालिकांच्या आजच्या स्वरूपावरूनही त्याची कल्पना येते. घर हे स्त्रीचे मूलभूत कार्यक्षेत्र, गृहिणी हे तिचे स्थान आणि त्या अंतर्गत सुमाता, सुपत्नी, सुगृहिणी या तिच्या महत्त्वाच्या भूमिका वठवण्यासाठी आवश्यक असाच मजकूर त्यात असणार. गृहकर्तव्ये, मातृकर्तव्ये, बाळाची काळजी व जोपासना, विविध खाद्यपदार्थांच्या कृती, गृहसजावट, घरातले नातेसंबंध सांभाळण्यासाठी आवश्यक असा समंजस सोशीकपणा राखण्यासाठी उपदेश अशा काहीशा स्वरूपातून अजूनही स्त्री विषयक पुरवण्यांची, मासिकांची सुटका झालेली दिसत नाही. काही असले तरी अशाच मासिकांच्या आणि वृत्तपत्रांच्या प्रेरणेने स्त्रियांनी हातात लेखणी घेतली हे महत्त्वाचे!

एकोणीसाव्या शतकात ही वाटचाल चाचपडत झाली असेल, नव्हे झालीच! परंपरेने आदर्श मानलेल्या स्त्री प्रतिमांचेच जतन-संवर्धन करण्यासाठी प्रारंभी स्त्रियांच्या लेखणीनेही तेच कित्ते गिरविले; पण त्यातूनच तिची वाट तिला सापडत गेली. उदारमतवादी द्रष्ट्या पुरुषांनी येथेही पुढाकार घेतला. विसाव्या शतकाचे प्रथम पर्व संपत असतानाच उद्योगपती शंकरराव किर्लोस्कर यांनी 'स्त्री' मासिक सुरू केले. स्त्रीविषयक प्रबोधनात 'स्त्री' मासिकाचा सिंहिणीचा वाटा आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये. "स्त्री"ने स्त्रीविषयी स्त्रिया आणि पुरुष दोघांनाही लिहिते केले.

परंपराशील विचारांना धक्के देणारे लेखन 'स्त्री'ने अनेकदा प्रसिद्ध केले. 'स्त्री'मुळे कसदार लेखन करणाऱ्या अनेक लेखिका महाराष्ट्राला मिळाल्या. महाराष्ट्रातील 'स्त्री' विषयक प्रबोधनात आणि साहित्य निर्मितीत 'स्त्री'ने इतिहास घडवला, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये.

'माहेर', 'ललना' आणि त्यांच्यासारख्या त्यांच्या भावंडांनी 'स्त्री' जातीची पारंपरिक भूमिका बहुधा जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. कालमानानुसार होणारे बदल टिपणारे लेखनही या मासिकांतून प्रकाशित होते हे खरे आहे; पण 'नवे घडवताना जुने मोडू नये' या भूमिकेचे सूत्र कायम राखलेले दिसते. या मासिकांचे निर्माते आणि प्रारंभी तरी संपादक उदारमतवादी पुरुष होते. या मासिकांनी अनेक कथालेखिका जन्माला घातल्या, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एकूणच महाराष्ट्रातील स्त्रीच्या शैक्षणिक, सामाजिक जाणिवांमध्ये खूप बदल झाले. मुख्य म्हणजे एक परीने ''आत्मशोधाला'' स्त्री प्रवृत्त झाली. परंपरेने घडवलेपणाचे कवच भेदून 'खरंच मी कोण? मला काय हवे?' याचा गंभीरपणे शोध स्त्री घेऊ लागली. ''स्त्री म्हणजे अशी, तिचे मन असे...'' हे सगळे खरेच कां? की ते सगळे समाजाला - पुरुषप्रधान व्यवस्थेला सोयीचे म्हणून थोपलेले आहे?'' असे प्रश्न तिला पडू लागले. त्या दृष्टीने ती उत्तरे शोधू लागली. १९७५ च्या आंतरराष्ट्रीय स्त्री मुक्तीवर्षाने तिला अधिकृत प्रेरणा मिळाली. जगातल्या अभ्यासकांनी पूर्वग्रह (बरे-वाईट) बाजूला ठेवून अनेक अंगांनी स्त्रीविषयक शोधअभ्यास केले. नवे विचार प्रकट झाले. एक नवमंथन होऊ लागले आणि आता विवेकी स्त्रिया म्हणू लागल्या की, सुधारणेच्या आदिपर्वात आमच्या उद्धारासाठी (?) उदारमतवादी पुरुषांनी पुढाकार घेतला, त्यांच्या आम्ही कृतज्ञ आहोत. मात्र आता आमचा मार्ग आम्ही शोधू. ह्या आत्मशोधाच्या वाटेवर आम्ही कदाचित चुकू. चुकण्याचेही स्वातंत्र्य आमचे आम्हाला असू दे. चुकण्याची संधी मिळाली तरच सुधारण्याचीही संधी मिळेल. चुकल्याशिवाय शिकता येणार नाही आणि शिकल्याखेरीज समर्थ होता येणार नाही. पुस्तकी किंवा सुभाषिती गौरव किंवा निंदा या दोन्हींच्या विशेषणांचे मुलामे आता आम्हाला नकोत. आमची वाट आम्हाला चालू दे. या आमच्या वाटचालीत 'समानधर्मा' पुरुष आले तर त्यांचे स्वागत आहे वाट मात्र आमची आम्ही शोधू.

आणि मग स्त्रियांनीच स्त्रियांसाठी मासिके, नियतकालिके सुरू केली ती संख्या विसाव्या शतकाच्या शेवटच्या पर्वात वाढत गेलेली दिसते. दिवाळी अंकांचा मोसम आला की, स्त्रियांचीही सर्व मासिके आपआपले दिवाळी अंक प्रकाशित करीत आहेत. विशेष म्हणजे या कालखंडातील बहुतेक अंकांनी 'स्त्री सौंदर्य', 'गृहसजावट', 'खाद्यपदार्थ' आणि राशिभविष्य अशा खास स्त्रियांच्या समजल्या जाणाऱ्या (अपवाद - राशिभविष्य - केवळ स्त्रियांसाठी नसते) विषयांना फाटा दिलेला दिसतो. आतील मजकूर स्त्री विषयकच नव्हे तर एकूण समाजाच्या दृष्टीने गंभीरपणे, विचारपूर्वक लिहिलेला असतो. कथा-कादंबरी,

चरित्र-आत्मचरित्र, कविता-नाटक या बाबी असतातच. पण त्या सर्वांचे लेखन आणि निवड करणाऱ्या स्त्रिया असतात. अशा काही मासिकांचे दिवाळी अंक आवर्जून पाहिले तर आता लिहिणाऱ्या-वाचणाऱ्या स्त्रियांच्या वैचारिक, शैक्षणिक, साहित्यिक स्थितिगतीची कल्पना येऊ शकेल.

'बायजा' (संपा - सौदामिनी राव, पुणे) हे नियतकालिक गेली पंचवीस वर्षे प्रकाशित होत असून शहरी स्त्रियांबरोबरच ग्रामीण, श्रमकरी स्त्रियांचे प्रश्न केंद्रस्थानी असतात. 'प्रेरक ललकारी (संपादक - शारदा साठे, मुंबई), 'महिला आंदोलन पत्रिका' (तारा रेट्टी, मुंबई), 'वनस्थळी (माधुरी पुरंदरे, पुणे), 'मिळून साऱ्या जणी' (विद्या बाळ, पुणे) ही मासिके पुण्या-मुंबईतून निघत असल्याने अनेकांना माहिती असण्याची शक्यता आहे. पण 'आकांक्षा' (अरुणा सबाने, नागपूर) आणि अजून वर्षभराचे बालक असलेले 'दिशा' (अपर्णा कुलकर्णी, सांगली) यांचा दर्जा कोठेही कमी नाही.

चारचौघी, माहेर, ललना, गृहशोभिका, तनिष्क ही (मागील पर्वाच्या) आवृत्त्या असलेली मासिके, विशिष्ट महिला वर्गात प्रिय आहेतच. शिवाय महाराष्ट्रातील जवळजवळ प्रत्येक महत्त्वाचे दैनिक आपली स्त्री विषयक पुरवणी काढीत आहेच.

विसावे शतक संपत असताना एक तिसरे वळण स्त्रीविषयक विचारांना मिळत आहे. केवळ पुरुषांनी केलेले स्त्री सुधारणेचे पर्व हे प्रथम पर्व, स्त्रियांनी स्वत:च्या आत्मशोधासाठी केलेली धडपड हे द्वितीय पर्व आणि आता ''पुरुष स्पंदने'' या वार्षिकांकाच्या रूपाने एक तिसरे पर्व निर्माण होत आहे. यंदाचे ''पुरुष स्पंदने'' अंकाचे सातवे वर्ष असेल. अंकाच्या संपादक मंडळाचं धुरीणत्त्व पुरुषांकडे आहे.

'मेन अगेन्स्ट व्हायोलन्स ॲण्ड ॲब्यूज ('मावा') या मानवतावादी संघटनेचे हे अनोखे नियतकालीक (वार्षिक) आहे. स्त्रीवादी भूमिकेतून विचार करणाऱ्या तरुणांचा हा गट आहे. स्त्रियाही त्यात सहकारी आहेत. आजपर्यंतचा प्रत्येक अंक एखाद्या विशेष विषयाचे सर्वांगीण मंथन करणारा, खूप परिश्रमपूर्वक काढलेला अंक आहे. प्रत्येक अंक एकही पान न वगळता वाचन करायला भाग पाडणारा आहे. नमुना म्हणून एखाद-दुसऱ्या अंकातल्या 'संपादकीय'मधल्या या वाक्यांतून त्याचे वेगळेपण लक्षात येईल.

''कुणी कुणाला गाडून उभं रहायला नको. तसंच कुणी कुणावर ओझं बनूनही रहायला नको....

स्त्रीत्वाची पारंपरिक जाचक चौकट मोडून व्यक्तीच्या आवडीनिवडी, कार्यकुशलता यांना उत्स्फूर्तपणे सहज फुलायला वाव ठेवला तर स्त्री-पुरुष

दोघांमधला ताण कमी होतो आणि सौहार्दपूर्ण नातं बहरतं. त्याचा मुलांच्या वाढीवर चांगला परिणाम होतो. आवडी-निवडी दर वेळी परस्पर पूरकच असतील असं नाही. एकमेकांविषयी पुरेसा आदर आणि समजुतदारपणा असेल तर त्यातून मार्ग काढणं केव्हाही अधिक सुकर होतं.''

(वार्षिक - २०००)

''या अंकात पुरुषांच्या पुरुषांशी असलेल्या नात्यांचा आढावा घेण्याचा छोटा प्रयत्न केला आहे.''

खरे तर ही कल्पनाच अभिनव आहे. आजपर्यंत स्त्रियांच्या परस्पर नात्यांची-विशेषत: सासू-सून, नणंद-भावजय जितकी चर्चा झाली आहे त्याच्या शतांशानेही सासरा-जावई, साडू-साडू, मेहुणे या बायकोमुळे निर्माण झालेल्या पुरुष नात्यांची सोडाच पण बाप-मुलगा, भाऊ-भाऊ अशा रक्तसंबंधी पुरुष नात्यांचीही चर्चा झाली नाही. किंबहुना नाती म्हणून पुरुषांनी अशी काही स्वत:ची तपासणी करायला हवी, हा विचारसुद्धा कुणाला सुचला नसेल. याच अंकातील लेखांची शीर्षकेही त्यांचे अनोखेपण दाखवतील.

''पुरुषपणाकडून माणूसपणाकडे प्रवास'', ''आम्ही पुरुष आता बदलतोय्''... फक्त स्त्रीत्व अथवा फक्त पुरुषत्व अशी उभी विभागणी न करता त्याचा समृद्ध मिलाफ होऊन संपन्न व्यक्तिमत्त्वाचा प्रवास आपण सर्वचजण करूया.''

(वार्षिक - २००१)

या अंकातलं हे आवानही पहा -

''...आई, पर्यायाने स्त्रीचे, तिच्या अहर्निश कष्टाचे महत्त्व ती असेपर्यंत जाणवत नाही. बापाला 'आई' होता येणं आणि आईने 'बाप' होणं यातच सहजीवनाचं यश आहे. तेव्हा 'मूल' हा 'नवा पांथस्थ' त्यांना दिशा दाखवतो.''...

मावाच्या 'पुरुषस्पंदनं' २००२ (संपा. हरिश सदानी)चं वेगळेपण काय असेल? याची उत्सुकता निश्चित वाढेल. निरनिराळ्या दिवाळी अंकांच्या वाचनाने समृद्ध होत असता मानवी सहजीवनाचा, पर्यायाने सुखाचा पाया असलेले स्त्री-पुरुषविषयक विचारांची आधारशिला असलेले स्त्रीविषयक दिवाळी अंक आवर्जून वाचावेत, म्हणून हा थोडा परिचय!

स्त्री-पुरुष द्वंद्वापेक्षा आता उभयपक्षी आत्मशोधाचे निरामय पर्व सुरू होण्यासाठी दिवाळीअंक मार्गदर्शन करणारे दीप होवोत, या शुभेच्छांसह - शुभम् भवतु।।

हा लेख पुस्तकात संग्रहित होत असताना २०१० मध्ये आजपर्यंतच्या निवडक लेखांचे पुस्तक ''प्रश्न पुरुषभानाचे'' या शीर्षकाने प्रसिद्ध झाले आहे.

# मातृत्व : पुनर्विचार

जगाच्या पाठीवरचे सर्वात घट्ट जैविक नाते कोणते असेल तर ते जननी आणि अपत्य यांचे! जनक आणि अपत्य यांचे नातेही जैविक असते; परंतु ते जननीच्या नात्याइतके घट्ट नसते. सामाजिक जीवनात त्याचे (जनकाचे) निर्विवादपण सिद्ध करण्यासाठी विवाह, कुटुंब, संस्कार, धर्मविधी असा बराच खटाटोप करावा लागतो. त्यानंतर समाजमान्यता मिळते.

याठिकाणी जननी आणि जनक हे शब्द जाणीवपूर्वक वापरले आहेत. ते अपत्याशी असलेल्या नर-नारींच्या नात्याचे नेमके प्राकृतिक स्वरूप व्यक्त करणारे आहेत. माता-पिता या शब्दांतून नात्यांतील संस्कारित आशय व्यक्त होतो. स्त्रीच्या बाबतीत मातृत्व हा भाववाचक संबोध आहे.

मातृत्व हे विशेषत: भारतीय समाजात स्त्रीच्या जीवनाचे गौरीशंकर मानले जाते. मात्र 'मातृत्व' शब्दातील भाववाचक आशय येथे अभिप्रेत असतोच असे नाही किंबहुना तसा तो बऱ्याच वेळेला नसतोच. तेथे स्त्रीचे 'जननी' असणेच केवळ अभिप्रेत असते. प्रत्येक स्त्रीला अपत्य जन्माला घालण्याची स्वाभाविक ओढ असते, हे एक गृहित आहे. ती एक नैसर्गिक शारीर प्रक्रिया आहे. वंशसातत्य ही त्यामागची जैविक प्रेरणा अहे, तशी ती सर्व सजीव सृष्टीत असते तशीच.

पण सजीव सृष्टी पिढ्यान्‌पिढ्या तिच्या प्राकृतिक अवस्थेत असते. त्या सृष्टीतले बदल ही देखील एक प्राकृतिक प्रक्रिया आहे. स्त्रीच्या बाबतीत मात्र तसे असत नाही. कारण माणसाने एकूणच आपले जगणे सर्व बाजूंनी 'प्रकृती'पासून फारकत घेत घडविले आहे. त्यामुळे मानवी समाजात 'प्रकृती'पेक्षा मानवाने घडवलेल्या शारीर-मानसिक बदलांचा प्रभाव सर्वात जास्त आहे. म्हणजेच रूढार्थाने तो सांस्कृतिक आहे. मानवी जीवनात मात्र संस्कृतीने निर्माण केलेली मनोधारणा स्त्रीवर अधिक प्रभाव गाजवते.

आता बऱ्याच वेळेला 'संस्कृती'च्या आवरणाखालच्या चालीरिती, रूढी,

समज (खरे तर बरेचदा 'गैर' समज), धार्मिकतेच्या नावावर आलेल्या धारणा या सर्वांतून 'संस्कृती'च्या उदात्ततेपेक्षा 'विकृती'चे हिणकस रूपच प्रत्यक्षात अवतरते, याचा वारंवार प्रत्यय येतो.

स्त्रीच्या मातृत्वाचे असेच काहीसे व्यमिश्र रूप पिढ्यान्‌पिढ्यांनी घडविले आहे. आमच्या संस्कृतीत मातृत्व पूजनीय आहे, गौरवास्पद आहे असेही म्हटले जाते. त्यासाठी मातृदेवतांच्या उत्सवांची उदाहरणे दिली जातात; पण हा मातृत्त्वगौरव किती फसवा आणि वरवरचा आहे, हे सहसा लक्षात येऊ नये अशी शाब्दिक मखलाशी असते.

जन्माला आलेली कोणतीही स्त्री प्रकृतिधर्मानुसार 'जननी' बनू शकते म्हणून प्रत्येक स्त्रीच्या मातृत्वशक्तीचा हा गौरव प्रत्यक्षात असतो कां? विवाहविरहित-अविवाहिता किंवा विधवा जर 'जननी' झाली तर तिच्या वाट्याला मातृत्वमहतीने वर्णन केलेली प्रतिष्ठा कधी येते का? उलट पांडवमाता कुंतीपासूनच्या कहाण्या अशा 'जननी'ची काय आणि कशी ससेहोलपट हा समाज करतो, याची उदाहरणे आहेत. मग हा गौरव खरेच निखळ स्त्रीच्या प्राकृतिक 'जनन'सामर्थ्याचा गौरव आहे का?

भारतीय जीवनात जातिव्यवस्था आणि जातीमध्येच झालेले विवाहसंबंध प्रतिष्ठेचे ठरतात. शिवाय घरातील ज्येष्ठांनी ठरविलेले विवाहसंबंध घरंदाज·खानदानी प्रतिष्ठेचे असतात. वधूवरांनी परस्पर आकर्षणातून, ज्येष्ठांच्या अनुमतीखेरीज केलेले विवाहही दुय्यम स्तरावरचेच ठरतात, असे भिन्नधर्मीय प्रेमविवाह तर अनेकदा सामाजिकदृष्ट्या बहिष्कृतच ठरविले जातात. अगदी सुधारणावादी आणि उच्चशिक्षित समाजातही अपवाद वजा जाता वेगळी परिस्थिती नाही.

तात्पर्य काय तर वडीलधाऱ्यांच्या संमतीने सजातीय, समकक्षांशी झालेल्या विवाहानंतर स्त्रीला प्राप्त होणारे 'विशेषत: पुत्राचे' मातृत्वच हा समाज गौरवास्पद आणि पवित्र मानतो. मग प्रश्न असा निर्माण होतो की, हा तथाकथित मातृत्व गौरव आहे की पितृत्व गौरव आहे? उघडच मातृत्वाच्या शब्दांनी अवगुंठित असा हा पितृत्व गौरव आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेने निर्माण केलेला मातृत्व गौरवाचा आणि देवत्वाचा हा भूलभुलैया आहे.

कळीचा मुद्दा पुढेच आहे. देहाने मूल जन्माला घालणे या प्रक्रियेलाच एवढे महत्त्व दिले जाते की कोणत्याही कारणाने तसे न करणारी स्त्री स्वत:च अपराधगंडाने पछाडली जाते. तिला विकृतीच्या पातळीवर हा समाज नेतो. देहाने मूल जन्माला घालणाऱ्या प्रत्येक स्त्रीजवळ मातृत्वगुण असतातच. हेही एक भ्रांत गृहित आहे. निसर्गक्रमानुसार स्त्री 'जननी' झाली तरी ती 'माता' होईलच असे नाही, हेही समजून घ्यायला हवे. जन्माला घातलेल्या अपत्यावर स्त्री ममता करू शकेल हे

खरे; पण यात परंपरेच्या सामाजिक दबावातून झालेली घडण किती आणि प्राकृतिक किती? याचाही शोध घ्यायला हवा. स्त्रीच काय पण प्रत्येक व्यक्तीची ममता करण्याची, प्रेम करण्याची प्रवृत्ती आणि प्रमाण भिन्न असू शकते. अनेकदा 'जननी' पेक्षा 'जनक' अधिक उत्कटतेने ममता करतो. खरे मातृत्व त्याच्याकडे असू शकते; परंतु आपल्या स्त्री-पुरुषविषयक धारणांनी स्त्री-पुरुषांची स्वत:ची मनेही इतकी बंदिस्त केली आहेत की, या दृष्टीने आत्मशोध घ्यावा असेही मनात येऊ नये.

शरीरधारणेसाठी आणि रूढीने ठरविलेले स्त्रीचे कर्तव्य म्हणून मुलांचे खाणे-पिणे, स्वच्छता, कपडे अशा बाबी जननीला कराव्याच लागतात. त्याची सांगड मातृत्त्वाशी पूर्णपणे घालता येईल का?

जननीपेक्षाही कुटुंबातील किंवा अन्य कोणी घटक अपत्यांवर अधिक ममता करताना दिसतात. अनेकदा नोकर-चाकर मनाने मुलांमध्ये अधिक गुंतलेले दिसतात. मूल जन्माला घातले की, प्रत्येक स्त्रीकडे उत्कट ममता करण्याची क्षमता येतेच, हे गृहितही निर्लेपपणे तपासून पहायला हवे. हल्लीच्या नोकरीपेशा 'करिअरिस्ट' बायकाच मुलांवर प्रेम न करण्याचा, 'अपराध' करतात, हे गृहितही वस्तुस्थितीला धरून नाही.

जुन्या पारंपरिक संयुक्त कुटुंबव्यवस्थेत स्त्री वयात आल्यापासून दरवर्षाआड गरोदरपण आणि बाळंतपण या चक्रात अडकलेल्या आणि आयुष्यभरात १५-१५/२०-२० मुलांना जन्म देणाऱ्या 'जननी' या आदर्श 'माता' होत्या असे निखालसपणे सांगता येईल कां? त्यासाठी वस्तुनिष्ठ तटस्थ अभ्यासाची गरज आहे. म्हणजे मग मातृत्वमहतीच्या आडच्या अनेक खाचखळग्याआडचे वास्तव उकलेल.

मातृत्व संकल्पनेचा अनादर करणे हा येथे मुळीच हेतू नाही. उलट 'जननी' आणि 'माता' यातील अंतर स्पष्ट करून पारखून घेण्यासाठी आपली मनोभूमिका तपासून पाहण्याचा हेतू आहे.

मग असे लक्षात येईल की, प्रत्येक 'जननी' ही 'माता' आणि विशेषत: 'सुमाता' होईलच असे नाही. उलट 'जननी' नसूनसुद्धा एखादी स्त्री आणि पुरुषही 'सुमाता' होऊ शकेल; कारण मातृत्व ही भावात्मक ताकद आहे. ती स्त्री-पुरुष, जात-पात, धर्म-पंथ या सर्वांपलीकडे जाणारी आहे. ते 'मातृत्व' अधिक व्यापक आणि संपन्न असेल नव्हे असतेच. म्हणून तर मग साने गुरुजीही आश्रमातल्या मुलांची आई होऊन त्यांचे खाणे-पिणे, आजारपणातील स्वच्छता करण्यापासून त्यांचे भावात्मक भरण-पोषण करतात. निवृत्तीनाथांना ज्ञानदेव 'गुरू

माऊली' म्हणतात, त्यामागे आशयाचा आणि भावाचा केवढा तरी डोंगर उभा असतो. आणि पंढरीचा विठोबाही उत्कट भक्ताला 'माऊली'च दिसतो. 'मातृत्वा'चे हे मुलायम माऊलीरूप किती कनवाळू आणि असीम आहे.

म्हणून मातृत्व ही काही स्त्री देहाने जन्माला आलेल्यांचीच मक्तेदारी नाही आणि त्यांनीही आपल्या केवळ 'जननी' असण्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देऊ नये. दूरदर्शनवरच्या मालिकांनी त्याचे केलेले संकुचित आणि अप्रबुद्ध चित्रण समजून घ्यावे आणि खऱ्या अर्थाने मातृत्व संकल्पनेतील समृद्ध सांस्कृतिक आशय डावलू नये. पुरुषांनीही आपल्यातील मातृत्वभावाचे भरण करावे म्हणजे सांस्कृतिक जीवनात निर्माण झालेला असमतोल दूर व्हायला मदत होईल.

या निमित्ताने आणखीही एक विचार मनात येतो. अलीकडे विविध प्रकारच्या पुरस्कारात "आदर्श माता" पुरस्कारही अनेक ठिकाणी दिले जातात. आदर्शत्वाच्या विविध कसोट्यांमध्ये जैविक मातृत्व ही आद्य आणि अलिखित अट असते. ती स्त्री रूढ समाजमान्य चौकटीतली जननी असणे महत्त्वाचे असते. खरे तर ती जननी नसतानाही मातृत्वात अभिप्रेत असलेल्या गुणांनी युक्त असेल तर ती अधिक मोठी पात्रता समजायला हवी. प्रत्यक्षात 'जननी' नसूनही मातृत्वामध्ये अभिप्रेत अशा गुणांनी युक्त अशा अनेक स्त्रिया असतात. कधी एखादी 'सावत्र' आई आदर्श माता असू शकते किंवा एखादी आजी, वहिनी, बहीण या नात्यांनी आदर्श मातृत्व सिद्ध केलेले असते. अशा ठिकाणी खऱ्या अर्थाने संस्कृती समृद्ध केलेली असते. त्यांचा गौरव अधिक योग्य ठरेल. या ठिकाणी यशोदा मातेचा आदर्श आपण का विसरतो?

दुसरीकडे असेही होते की, एखादी जननी आदर्शत्वाच्या अनेक कसोट्यांना उतरण्याइतकी पात्र असते. पण तिच्या कक्षेपलीकडील अडचणींमुळे तिची अपत्ये सद्गुणी होण्यात उणी ठरली तर तो दोष कोणाचा? तिचे मातृत्व उणे का ठरावे? मुलांनी योग्य प्रतिसाद दिला तरच तिला आदर्शत्वाचे श्रेय मिळते. म्हणजे काही गुण सोन्याचा तर काही गुण सोनाराचा हेच खरे! मुले 'एक्स्ट्रॉऑर्डिनरीली' नाठाळ निघाली तर बिचारीचे सगळे गुण मातीमोल ठरतात. आई आणि मुले यांच्या परस्पर प्रतिसादावरच शेवटी 'आदर्श माता' ठरणे अवलंबून राहते.

म्हणून, अनेक अंगांनी मातृत्व संकल्पनेचा पुनर्विचार व्हायला हवा. केवळ 'जननी' असण्याच्या महतीचाही पुनर्विचार व्हायला हवा.

# पायवाटेची रंगरूपे

**नो**करीची वर्षानुवर्षांची चाकोरी संपल्यामुळे गेली काही वर्षे त्या बाबतीत मी फार सुखी आहे; पण काही आनंदांनाही मुकावे लागले आहे. विशेषत: १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला मला जुन्या आठवणी तीव्रतेने येतात.

सुमारे पंचवीस वर्षे रोज ठराविक गल्ल्या ओलांडित जवळचा रस्ता म्हणून सकाळी मी कॉलेजला पायी जात असे. गल्ल्यांतल्या घरांतून राहणारी माणसे निम्नमध्यमवर्गीय, क्वचित श्रमकरी वर्गातली. संमिश्र जातीजमातीची. अरुंद रस्त्यावरच नळाची कोंडाळी, धुणीभांडी, वाळवणं यातून जेमतेम पाऊलवाट राहते. त्यातच मुलांचे खेळ, गल्लीत लग्नकार्य, सण-उत्सव, गणपती-शिवजयंती आणि इस्लाम बांधवांचे 'पंजे' अशा निमित्ताने घातलेले मांडव, सजावटी आणि ध्वनिवर्धक! प्रसंगानुसार गाणी. सतत नवीन वातावरणातून प्रवास केल्याचा आनंद या रस्त्यांनी, गल्ल्यांनी मला दिला.

इतक्या सगळ्या व्यवहारात गुंतलेल्या या गल्ल्या रामप्रहरी अगदी प्रसन्न वाटतात. प्रत्येक दारासमोरच्या उखडलेल्या, उखीरवाखीर डांबरी रस्त्यांवर पाण्याचा सडा आणि हळदीकुंकवाने सजवलेली रांगोळी हमखास असते. कुठे ठिपक्यांची, कुठे शाळकरी मुलींची पानाफुलांची नक्षी, एखाद्या दारात ठिपक्यांच्या भोवताली नागमोडी वळणे घेत हात न उचलता सरळ रेखाटलेला दाक्षिणात्य पद्धतीचा चक्रव्यूही आकृतिबंध! ही दाक्षिणात्य रांगोळी प्रथम मला याच गल्लीत भेटली आणि पुढे तिचे तंत्र शिकून गिरवण्यात माझे कित्येक महिने आनंदात गेले.

दिवाळी-दसऱ्याला रंगभरल्या अंगणभर-खरे तर रस्ताभर रांगोळ्या असल्या तर नवल नाही, पण १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला हमखास तिरंगा ध्वज आणि जोडीला 'जयहिंद', 'जय भारत', 'वन्दे मातरम्' अशी अक्षरे तुळशीच्या लग्नासाठीच्या तुळशी वृंदावनाबरोबर लिहिलेल्या 'राधा-कृष्ण', 'राधा-दामोदर' इतक्याच आत्मीय भावाने लिहिलेली असतात. घराघरातून गणवेश घातलेली

मुले-मुली लगबगीने बाहेर पडतात आणि कामाच्या गर्दीतूनही आया कौतुकाने त्यांची 'झेंडावंदना'साठी पाठवणी करतात.

हे दृश्य इतके उत्साही आणि उत्स्फूर्त असायचे की आज खरंच मोठा 'सण' आहे हा भाव घेऊनच मी महाविद्यालयात पोचायची.

मात्र मध्यमवर्गीय फ्लॅट संस्कृतीच्या घरांतून या राष्ट्रीय सणांचे इतके उत्स्फूर्त स्वागत झाल्याचे दिसले नाही. अगदी नाइलाज झाला तरच मंडळी ध्वजवंदनासाठी जाताना दिसतात. मध्यमवर्गीय स्त्रियाही या दिवसांबाबत उदासीनच दिसतात. आवर्जून गोडधोड फार कमी ठिकाणी दिसते. उलट गल्लीच्या टोकांना पहाटेपासून जिलेबीची दुकाने घमघमत असतात.

माझ्या गल्लीच्या वाटांमधून मात्र मला लोकसंस्कृतीच्या व्यापक स्वीकारशीलतेचा प्रत्यय सतत येत राहिला. जुन्या सण-उत्सवांच्या परंपरा सांभाळताना नव्यालाही त्या किती सहज कवेत घेतात ते लक्षातसुद्धा येत नाही. यात अर्थातच बायकांचा सहभाग मोठा! रांगोळीपासून त्याची सुरुवात होते. मग गल्लीतला 'वार्ताफलक' ही तरुण मंडळींच्या हस्तकौशल्यातून रंगतो.

सणवार, चालीरीती रूढी अक्षरश: वर्षानुवर्षे आपोआप सहजपणे जीवनप्रवाहात वाहत असतात आणि दुसरीकडे देशकाल परिस्थितीनुसार येणाऱ्या नव्यालाही सामावून घेत असतात. जी जिवंतपणे स्वीकारली जाते ती संस्कृती सदैव ताजी टवटवीत उत्साही राहते. ती टिकवण्यासाठी मुद्दाम आटापिटा करून प्रचार यंत्रणा राबवण्याची गरज राहत नाही.

पारंपरिक सणातला उत्साही या गल्ल्यांतून ओसंडून जात असतो आणि त्यातील प्रकृतिसंवादी विधीही तेवढ्याच आत्मीयतेने-मुख्य म्हणजे कोणत्याही अवडंबराशिवाय सहज होताना दिसतात.

२६ जानेवारीच्या उत्साही ध्वजवंदनाच्या आधीच मकरसंक्रांतीचा तिळगूळ गल्ल्यांतून फिरलेला असतो. विशेषत: लहान शाळकरी मुलं-मुली नटून-थटून हातात छोटे छोटे तिळगुळाचे डबे घेऊन ओळखी-अनोळखी सगळ्यांच्या हातांवर डब्यातला चिमूट चिमूट तिळगूळ वाटत, मोठी माणसे असली तर पटकन् पायांशी वाकत चेहरे पाहण्याचीही त्यांना गरज वाटत नसे. तोंडओळख झाल्यावर पाच-दहा मुला-मुलींची झुंड कित्येक वर्षे घरीही हजेरी लावून जात असे.

मधला २६ जानेवारी उलटला की, कधीतरी गल्लीत शिरतानाच दूध उतू जाऊन निखाऱ्यावर करपल्याचा वास नाकात शिरे आणि सूर्य-चंद्र-चक्राच्या रांगोळीच्या सूर्य रथाच्या मधोमध गोवऱ्यांच्या निखाऱ्यावर मातीच्या इवल्याशा बुडकुल्यांतून उगवत्या सूर्यनारायणाला साक्षी ठेवून दूध ऊतू घालवलेले दिसायचे

आणि रथसप्तमीची आठवण द्यायचे. गंमत म्हणजे अगदी प्रत्येक दारासमोरच्या कोपऱ्यात कोणी आदेश दिल्यासारखे हे दृश्य असायचे. आदेश होताच; पण तो परंपरेतल्या सवयीचा.

अशा नव्या-जुन्याच्या सरमिसळ उत्सवातून गल्लीतले वर्षचक्र पुढे सरकत राहते. पंधरा ऑगस्टच्या ध्वजवंदनाचा महिना म्हणजे एकीकडे श्रावण-भाद्रपदातल्या सणांचा महिना. पावसाचा पहिला भर ओसरत असतानाच गल्लीतल्या एका घरासमोर चिखल मातीच्या गाऱ्याचा ढीग दिसायला लागायचा आणि त्या घरातल्या वृद्ध स्त्रीच्या देखरेखीखाली हरितालिका, पोळ्याचे बैल, नागपंचमीचे नाग चिखलातून साकार होत जायचे. मग उनसावलीत ते सुकवले जायचीही गडबड दिसायची आणि एके सकाळी ही सगळी मातीची रूपे नाना रंगात रंगून दारात सजलेली दिसायची. गौरीच्या मुखवट्यांचे काम थोडे अधिक कलाकुसरीचे अनुभवी प्रौढ हात करायचे आणि एके सकाळी गोजीरवाण्या, हंसतमुख सालंकृत गौरींच्या मुखवट्यांनी त्या झोपडीवजा अंधाऱ्या खोलीचा कोपरान् कोपरा उजळून गेलेला असायचा. अर्थात गौरींचे सगळे अलंकार अंगच्या मातीच्या उठावाचे आणि मग नाजुकपणाने त्यावर सोनेरी वर्खांनी चमचमता साज चढवलेले असायचे. ही सगळी बदलती रूपे न्याहाळण्यात महिना कधीच उलटून जायचा आणि गल्लीत नवीनच धामधूम सुरू व्हायची. खरं तर अजूनही होते.

तरुण पुरुष माणसं यात अग्रेसर असतात. भल्या भक्कम वाशांच्या उंच खुंट्या जमिनीत घट्ट गाडून त्यावर उंच आडवी तशाच भक्कम वाशाची लग (तुळई) कासऱ्याने आवळून झोपाळे बांधले जातात. ही तयारी पंचमीची, नागपंचमीची. मोठे वृक्ष असते तर वृक्षांनाच झोके बांधले असते.

दिवसभरात कधीही जा लहान थोर, स्त्रिया, तरुण-तरुणी, पोरं-सोरं कोणी तरी अखंड या झोपाळ्यांवर हिंदोळत असतात. अलीकडे गाण्यांच्या कॅसेटच्या तालावर झोके कुरकुरत असतात. गाणी आणि झोपाळ्यांच्या कुरकुरीचे संयुक्त आवाज रात्रीच्या शांततेत समोरच्या गल्लीतून घरापर्यंत येतात आणि नागपंचमीच्या आगमनाची वार्ता पोचवतात. आठ-दहा दिवस हाही माहौल या गल्ल्या साजरा करतात.

मोठ्या शहरांतून नामशेष झालेली ही परंपरेतील प्रकृतिसंवादी सहजता या गल्ल्यांतून अजून दिसते. केवळ परंपरेचे पुनरूज्जीवन करण्यासाठी प्रचारी कर्मकांडांची गरज अजून इथे वाटत नाही. अर्थात हे किती काळ टिकेल, सांगात येत नाही; कारण पांढऱ्या भेंडाच्या मातीच्या कौलारू घरांच्या जागी आता एखादी काँक्रीटची इमारतही उभी राहत आहे. एक खरेच आहे, मुद्दाम काही टिकवण्याच्या आग्रहातून

जी खरी प्रकृतिसंवादी सहजता टिकण्याची गरज असते, तीच बऱ्याच वेळेला हरवून जाते. उरतो तो आक्रोशी, आग्रही, आक्रमक कर्मकांडांचा पसारा. अनेकदा संस्कृतीच्या पुनरूज्जीवनाच्या नावाखाली त्याचाच सोस वाढत गेलेला दिसतो.

प्रकृतीपासून दुरावत चाललेल्या अति नागरीकरणाच्या ओझ्याखाली बऱ्याच वेळा एक अपराधगंड येतो. आपले उपरेपण आपल्यालाच आतून उसवत नेते. मुळांपासून तुटलेपणाची खंत मधूनच कुरतडत राहते आणि त्यातून उरते ते देखाव्याचे कर्मकांड! आग्रहाचा दुराग्रह कधी होतो आणि मुळाचे 'मूळ' उद्देश कधी बाजूला पडतात ते कळतही नाही.

समाजाच्या निरामय स्वास्थ्यासाठी आपोआप आलेल्या सांस्कृतिक परंपरांचे विकृतीकरण होते. संस्कृती आणि विकृतीतल्या सीमारेषाच पुसट होतात.

माझ्या पंचवीस-तीस वर्षांच्या या गल्ल्यांच्या अक्षरश:च्या वाटचालीने मात्र मला भारतातल्या प्रकृतिसंवादी सहज जीवनशैलीतल्या निरामयतेचे वारंवार 'नमुनादर्शन' घडविले. हे नुसते डोळ्यांना दिसलेले दृश्य नव्हते. तर मनाला मोहवून टाकणारे आणि दरवर्षी नव्या विचारांच्या उर्मींना उर्जा देणारे अंत:सृष्टीचेही 'दर्शन' होते. म्हणूनच भिजला ज्येष्ठ-आषाढ घेऊन एखादी सकाळ उगवली की या गल्ल्यांची मला मनापासून सय येते. अर्थात् या गल्लीतल्या बायकांना याचे जास्त श्रेय आहे.

स्त्रिया एकीकडे परंपराशीलही असतात आणि दुसरीकडे परिवर्तनशीलही असतात याचा प्रत्यय अगदी पदोपदी येत असतो. तोच प्रवाह मग कुटुंबात आणि समाजातही मुरत जातो.

रांगोळीसारख्याच विविध प्रकारच्या हस्तकला, खाद्यपदार्थ, अलंकार, वस्त्रे-प्रावरणे यांच्या परंपरा बदलत्या घटकांसह मोठ्या प्रमाणात शिल्लक राहतात, त्या स्त्रियांमुळे! साधे पोषाख पहा ना! अजूनही स्त्री वर्गात जेवढे परंपरांचे अस्तित्व टिकले आहे तेवढे पुरुष वर्गात अगदी खेड्यातूनही टिकलेले नाही आणि तरीही काळानुसार नवीन आचार विचारही स्त्रीने मोठ्या प्रमाणात स्वीकारलेले दिसतात. स्त्रीमधील ही परिवर्तन प्रक्रियाही लक्षणीय आहे.

# एक अवघड वळण

"बाई, तुमच्या ओळखीने आम्हाला एक वकिलीणबाई गाठून द्या." समोरच्या बाईचा चिडका आवाज आणखीनच चढलेला.

कॉलेजमधून घरी आल्या आल्या खेडवळशा दोन बायका दारात उभ्या. "या बसा" झाल्यावर बाईंचे पहिलेच वाक्य "वकिलीण गाठून द्या."... का? कशासाठी वगैरे चौकशी केली तेव्हा दोघींनी अडखळत एकमेकींना अडवीत, दुरुस्त करीत, तपशील सुचवीत मुद्दा सांगितला. दोघींच्यातल्या एकीच्या भावाची बायको नांदायला येत नव्हती. तिने नांदायला यावे, ही सगळ्यांची इच्छा होती. विशेषत: भावाचा आग्रह होता. बऱ्याच प्रश्नोत्तरांतून आणखी काही तपशील हाती लागला तो, असा भावाचे लग्न होऊन नुकतेच वर्ष होत होते. त्यांचे वय बावीस-तेवीस वर्षांचे. शिकलेला चार-पाच इयत्ता. सुतारकाम करतो. चाळीस-पन्नास रुपये रोज मिळवितो. (ही गोष्ट घडली तेव्हा.. वीस एक वर्षांपूर्वी) घरात म्हातारी आई आणि तो. शेजारी ही तक्रार करणारी बहीण. तिचे सासर घरसंसार सुरळीत चाललेला. ही भावाला करून आणलेली मुलगी या बहिणीच्या सासरच्या पाव्हण्यातली, म्हणजे नात्यातली. मुलगी असावी पंधरा एक वर्षांची. तेही बोलण्यातून काढून घ्यावे लागले, तिलाही नेमके वय माहीत नव्हते. तिच्याच भाषेत सांगायचे तर, 'न्हाती हून वर्ष झालं.' मुलीचे माहेर मध्यम दर्जाचे शेतकरी कुटुंब, अब्रूने जगणारे; पण पहिल्या खेपेला मुलगी सासरी जेमतेम आठ दिवस नांदली. आठव्या दिवशी शेजारी नणंदेकडे आली आणि हट्ट धरून बसली की, 'आत्ताच्या आत्ता आईकडे जायचे आहे.' पहिलीच वेळ, खंतावली असेल म्हणून समजुतदारपणे नणंदेच्या नवऱ्याने तिला माहेरी पोचवली ती परत यायचे नाव घेईना. येथपर्यंत दोघींनी हिरिरीने माहिती सांगितली आणि गप्प झाल्या दोघी.

मग पुन्हा त्यांना बोलते केले, जरा आढेवेढे घेतले. मी विचारले, "तिला गावातल्या दुसऱ्या कोणाबरोबर लग्न करायचे होते का? तशी चटकन् म्हणाल्या,

''न्हाय बा. तसलं काय करायचं न्हवतं. त्ये तिला काही नीट कळत बी न्हवतं.''
''मग तुम्ही त्या मुलीला नीट विचारले की नाही? तिला सासर का नको वाटतं? सासू त्रास देते का? तर तसंही काही नाही. मग संकोचत लाजत एकजण म्हणाली, ''बाई, तुम्हापासून काय लपवायचं? तिला न्हवराच नको वाटतोय्! इथं तिला दोन-चार वेळेला आणली तर नणंदेकडे शेजारी नीट ऱ्हायची. सासूकडं दिवसभर नीट ऱ्हायली आणि संध्याकाळी न्हवरा घरात आला की, नणंदेकडे पळून आली ती घरात जायलाच तयार नाही.'' आता त्या प्रश्नाचा थोडा थोडा उलगडा व्हायला लागला. त्यांना म्हटलं, ''पोरगी लहान आहे, नीट समज नसेल आली अजून.'' - ''कशानी वो ल्हान! न्हाती हून चांगलं वर्ष झालं. बाई मान्साला सगळं कळतय् आपसुकच. आम्ही काय मोठ्या हुतो का?'' आणि मग एकदा संकोच दूर झाल्यावर बरेच काही सांगत बसल्या.

आता यात कायदा काय करणार! फार तर ''नवऱ्याकडे नांदायला जा,'' असा हुकूम कोर्ट देईल; पण त्यामुळे मूळ प्रश्न सुटणार आहे का?'' तर तेही त्यांना पटले. 'ते खरंच आहे म्हणा! पण हा तिढा सोडवायचा कसा हो! घरात तर आई आणि भाऊ डोकं खाऊन राह्यलेत!' मामला कठीण होता. आमचे मध्यमवर्गीय मन आणि पुस्तकी मानसशास्त्र पणाला लावून त्यांची समजूत घालणे अशक्य झाले. एखाद्या मुलीच्या मनात 'या' गोष्टीबद्दल भीती, तिरस्कार निर्माणच कसा होऊ शकतो, हे कोडे काही त्या बायकांना उलगडेना. 'हे' उपजतच कळतं, कळायला हवं. बाईच्या जातीला त्यावाचून गत्यंतरच नाही. मनाचे असले चोचले पोरीच्या जातीला बरे नव्हेत' अशी त्यांची ठाम समजूत. भावाला समजुतीने सांगायची मात्र त्यांची तयारी नाही. पुन्हा बराच वेळ आमचा मानसशास्त्रीय पाठ... अखेरीस एकीला माझा मुद्दा हळूहळू पटला. ती म्हणाली, ''माझ्या नवऱ्याकडून भावाला चार समजुतीच्या गोष्टी सांगते. तुम्ही म्हणता तसा तिला तिच्या नवऱ्याचा विश्वास वाटला पाहिजे हे पटतं, पण तो कितपत ऐकेल काही सांगता येत नाही. पण पोरीला समजून घ्यायला पाहिजे हे खरं! कोर्ट कचेऱ्यात हे काम काही व्हायचं नाही. इतपत पटले हेही नसे थोडके, म्हणून स्वत:चीच समजूत घातली.

बरेच दिवस पुढची काहीच हालचाल कळली नाही. म्हटले, सगळे सुरळीत झालेले दिसते; पण दोन-तीन दिवसांनी एकजण बसस्टॉपवर भेटली. चेहरा उतरलेला. तिने सांगितलेली हकीकत अस्वस्थ करणारी होती. ती म्हणाली, ''भावाला समजून सांगायचा प्रयत्न केला. एका वेळेला मुलगी येऊन दोन-तीन दिवस नीट राहिली. चौथ्या दिवशी खरे तर रात्री किंचाळत खोलीबाहेर आली.

तेव्हापासून तिने नवऱ्याचा जास्तच धसका घेतलाय्. माहेरी पोचवली तरी रात्री किंचाळत जागी होते, तोंडाला फेस येतो, अंग थरथरते. मग तिला कुणी करणी केली, लागीर झालं अशा शंका आल्या. देवऋषी, मंत्र-तंत्र, गंडे-दोरे, ताईत एक की दोन, सगळे झाले. 'अंगातलं' काढण्यासाठी मारहाण केली, तिच अन्न तुटत गेलं, ताप येऊ लागला. मग डॉक्टरकडे नेली. त्या डॉक्टरांनी तिला मानसतज्ज्ञाकडे न्यायला सांगितले. तिथेच ती सध्या होती. उपचार चालू आहेत.

हेच मानसतज्ज्ञ डॉक्टर एकदा एका व्याख्यानात म्हणाले होते, ''अशा स्त्री-मनोरुग्णांची संख्या खेड्यात जास्त असते. याची मुळे कोठेतरी स्त्री-पुरुष संबंधात असतात. या संबंधाबद्दल स्त्रिया/मुली व पुरुष या दोघांच्या मनातल्या गैरसमजात असतात. आपल्या समाजात बायकांच्या मनावर फार दडपणे असतात. कधी त्याबद्दल त्या बोलत नाहीत. कधी त्यांचे त्यांनाच नीट कळत नाही. अगदी जवळच्या स्त्री नातलगाजवळसुद्धा नाही बोलत. त्यामुळे शरीर-मनावर उपचार करण्यापेक्षा देवऋषी, गंडेदोरे, मंत्र-तंत्र यावरच भर दिला जातो. त्यातून विकृती वाढतच जाते. बायकांच्या मनावरची भीतीची दडपणे वाढत जातात. कितीकजणी त्यातच मृत्युमुखी पडतात. आमच्याकडे येणाऱ्या स्त्रियांची संख्या त्यामानाने फार कमी असते; कारण एक तर मनाला असा काही आजार होऊ शकतो हे मुळातच पटत नाही. पटले तरी अशा डॉक्टरकडे जाणे म्हणजे 'वेड्या'च्या डॉक्टरकडे जाणे, म्हणून अप्रतिष्ठेचे वाटते. शिक्षितांमध्येही ही भावना असते. अशिक्षितांचे विचारायलाच नको.

समोरची बाई सांगत होती, 'बाई तुम्ही म्हणाला होतात, तसेच डॉक्टर म्हणाले, पण आता खूप उशीर झालाय. तिच्या मनातली भीती आधीच काढायला हवी होती. तरी प्रयत्न चालू आहेत! मनात आले, हेही नसे थोडके । इतरांना तरी लवकर शहाणपण यावे असे वाटत राहिले.

# कडू करंजाचं झाड

शांतपणे केवळ फिरायला म्हणून त्या रस्त्याने जायला मला नेहमीच आवडते; पण गेल्या कित्येक दिवसांत ते जमलेच नव्हते. आज मात्र ठरविले की, काही झाले तरी जायचेच. रात्रीची जेवणे काहीशी लवकर उरकून आठ-साडेआठ... फार तर पावणे नऊला निघायचेच; कारण तेव्हा तो रस्ता शांत असतो. गजबज कमी पण सोबत नाही, असेही नाही, तसा म्हटले तर गावात असून गावात नसल्यासारखा; पण वाढत्या शहरामुळे या भागातही वस्ती वाढते आहे. एखाद-दुसरा नवा बंगला होतो आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अंतरा-अंतरावर मोटारी दुरुस्तीची गॅरेज होत आहेत, एखाद-दुसरे हार्डवेअरचे दुकान आहे. गावाच्या टोकाच्या नाक्याशी सडकेच्या कडेला एखादी पत्र्याची चहावाल्याची टपरी. हमाल, गॅरेजमधले कामगार ही त्याची बहुधा गिऱ्हाइके! अशा या रस्त्याने फिरायला जाण्यात एवढी अपूर्वाई कसली? प्रत्येक गावात अशा एका वर्णनाचा रस्ता असतोच; असे कोणालाही वाटेल; पण हा रस्ता मला आवडण्याचे कारण अगदी वेगळेच आहे. गॅरेजचा परिसर सोडून थोडे आत गेले की, दुतर्फा भरगच्च उसाची शेते, कधी हिरवीकंच तर कधी ऊस तुऱ्याला आलेला. कधी कापणीला आलेला; शेताच्या कडेला बांधावर कसली कसली रानझाडे, वेली माजलेल्या. त्यावर कसली कसली फुलं फुललेली, रानफुलेच; त्यांची नावेही माहीत नाहीत अशी. एखादी बाभळ हिरव्या काटेरी फांदीवर पिवळ्या धम्मक केसरांच्या गुंडीएवढ्या फुलांचे झुपके, तोलत-सावरत डोलत असते. घाणेरीच्या रंगीबेरंगी टिकल्या नाचत असतात. पाणकणसांचे लालसर पांढरट तुरे डौलदार माना उभारून हेलकावत असतात. एखाद्या झाडावर चढलेल्या वेलीतून कर्ण्याच्या आकाराची पांढरी-निळी फुले झुपक्यांनी डोकावत असतात.

आणखी फर्लांगभर पुढे गेले की, एक पेट्रोलपंप लागतो. तिथं एक मोठ्ठं तळं, पाणी बहुधा बारा महिने असते.

त्या जलाशयाच्या कडेला एक मैलाचा दगड आहे. सडकेवर एक लहानसा साकव आणि त्याचा कठडा! तिथे बसले की कधी संध्याकाळची सूर्याची रंगपंचमी पाहण्यातही अपूर्व सुख असते. वसंताच्या चाहूलकाळी तर तो रस्ता आणखीनच मोहात पाडतो. दुतर्फा शिरिषाचे घनदाट वृक्ष. एरव्ही बहुधा रस्त्याच्या कडेला असतात ती वडाची झाडं किंवा चिंचेची! या रस्त्याचे शिरीष मात्र या दिवसात फुलायला लागतात. त्यांची लालवट नाजुक फुले गच्च हिरव्यागार पानांतून डोकावतात. संध्याकाळी सूर्य बुडायला आला की अंधार-उजेडाच्या सीमारेषेची जागा शिरीषाचा मंद-मधुर गंध व्यापून टाकत असतो. एखाद्या शेतात दूरवर मोहोराने लगडलेले आंब्याचे झाड वाऱ्याच्या झोक्याबरोबर गंधाची पाठवण करून आपले अस्तित्व दाखवीत असते. शिरीषासारखेच देखणे वृक्ष रस्त्याकडेलाच आहेत, ते मात्र कडू करंजाचे! कडू करंजाचे झाड खास कोणी त्याच्या प्रेमात पडावे असे नाही; पण या वसंताच्या दिवसांत पाहिले की त्याच्याही प्रेमात पडायला होते.

नाक्यावरून वळण घेतलं आणि पहिली गोष्ट जाणवली की चहाच्या पूर्वीच्या एका टपरीऐवजी आता तीन-चार टपऱ्या उभ्या राहिल्या आहेत. एकीतून भज्यांचा खमंग वास येतो आहे. या टपरीकडे थोडा अंधार आहे. बाहेरच्या बाकड्यावर एक धोतरवाला ओंगळ माणूस एका स्त्रीच्या खांद्यावर हात टाकून तिला भजी खाण्याचा आग्रह करतो आहे. आणखी दोघे असेच लडखडत येऊन कसेबसे बाकड्यावर बसत असलेले. पुढे जावे की नाही असा विचार चालू असतानाच एका कडू करंजाच्या झाडाखाली एका स्त्रीची आकृती नजरेस पडली. विचार केला, 'काही हरकत नाही; 'आपल्या' तळ्यापर्यंत जाऊन यावे. तशी जाग आहे या रस्त्याला. झाडाजवळ पोचेपर्यंत लक्ष त्या स्त्रीकडेच होते आणि आश्चर्य वाटले, चांगला उन्हाळा जाणवतोय, दिवसभर खूप उकडतही होते, म्हणून गारव्यात जरा फिरायला आलेली मी आणि या बाईने अंगात चक्क स्वेटर घालून गळ्याभोवती मफलर गंडाळलाय् म्हटलं, आजारी बिजारी असेल. एवढ्यात कुठून तरी गाण्याची हलकी लकेर कानावर आली, "शोला दबायें रक्खा" म्हटले, इथे कोण गातेय्? तर दुसऱ्या क्षणी लक्षात आले की स्वेटरवालीच गातेय्. आवाज अगदी स्पष्ट, आजारी असल्याचे लक्षण नाही; पण खास दाक्षिणात्य काळा वर्ण आणि उजव्या नाकपुडीवर चमकणारी चमकी थोडी आणखी पुढे जाते तो आणखी एका झाडाखाली तसाच स्वेटर आणि खड्याची चमकी! हा काय भुताटकीचा प्रकार आहे? जर बारकाईने पाहिले तर स्वेटरचा रंग जरा वेगळा होता. मघाचा काळा आत्ताचा काळपट लाल. तसंच एक फिल्मी

गीत, मुद्दाम जाणाऱ्या-येणाऱ्यांचे लक्ष जावे अशा आवाजात!

कुतूहल चाळवले. मनात थोडी धास्तीही वाटत होती. तरीही आणखी एक कडू करंजाचं झाडं गाठलं तर तिथे झाडाला पाठ टेकवून तीन बाजूला तीन स्वेटर आणि नाकात चमकणारी चमकी. हा या रस्त्याला आज वेगळाच प्रकार दिसत होता. आजवर या रस्त्यावर असे काही नव्हते. नजर थोडी आजूबाजूला टाकली. पूर्वीच्या मोकळ्या रानजमिनीत कितीतरी झोपड्या आता वाढल्या होत्या. एखादा स्वेटर आणि जोडीला एखादी पुरुष आकृती एखाद्या झोपडीकडे जाताना दिसत होती. सगळ्याच स्वेटरधारी, गणवेश असल्यासारख्या. आता हळूहळू रस्त्याच्या या बदलाचा अर्थ लक्षात येत होता. तशीच परत फिरले. येताना एक झाड कडू करंजाचे एकटे स्वेटरधारी नसलेले. मोहराने नुसते फुलारून लवलवले होते. त्याचा उग्र कडवट पण मधुर गंध पुढे जाऊ देईना. मोहराने लगडलेली एखादी फांदी पुढे जाऊन तोडण्याचा... बरोबर नेण्याचा मोह आवरता आला नाही. तोडण्यासाठी फांदी वाकवली पण ती ओली फांदी तुटता तुटेना. भारी चिवट, पण मोहही आवरेना; हात काचायला लागले. खूप खटपटीनंतर फांदी हातात आली. नाकाशी धरून पोटभर हुंगली-अखेर कोणतेही बहराचे मोहर मोहात पाडतातच. घटकाभर त्याच धुंदीत असताना पावले घराकडे वळली. तोच... "हे काय? इतक्या रात्रीच्या इकडे कुठे?" एक ओळखीचा आवाज कानावर आला. "असेच, फिरायला" संभाषण तुटले, पण समोरचा आश्चर्याचा बहर अजून ओसरला नव्हता. न राहवून पुन्हा संभाषण सुरू केल्यासारखे... "एकट्या येत जाऊ नका अशा रात्री. या बाजूला वस्ती चांगली नाही. आमचा नाइलाज आहे. घरच इथे आहेना पूर्वीपासून! आम्हीही हल्ली लवकर घरी परततो. "..." पण पूर्वी असे काही नव्हते हो या बाजूला. हल्लीच दिसतेय?" स्पष्ट उल्लेख न करता नेमका अभिप्राय माहीत असल्यासारखे बोलणे चालू होते.

"अहो या सगळ्या कर्नाटकाकडून आलेल्या बायका. सगळी झोपडपट्टी यांचीच. अलीकडच्या तीन-चार महिन्यातली. वाढतच चालली आहे दिवसेंदिवस. कीड आहे पहा ही गावाला लागत असलेली पण तुम्ही जा पाहू लवकर!"

आता हातातली कडू करंजाची फुललेली फांदी घरात फुलदाणीत आहे. हा एक सोस! कुठलीही रानफुलं असली तरी घरात आणायचा! या फांदीचा गंध घरभरून दरवळतोय. मोठी शोभीवंत बाकदार कमान झालीय तिची. एरव्ही सुगंधाने मन वेडे-बावरे होते. पण का कोण जाणे आज विषण्ण होत होते; उदास होत होते. त्या वाटेवरचा शिरीष एवढा सहज आठवत नाही. आठवते आहे फक्त कडू करंजाचे झाड. त्याखालचे ते स्वेटर, नाकातल्या चमक्या आणि अत्यंत

भयानकपणे गाइली जाणारी ती ओळ... ''शोला दबाके रखना'' आणि इशारा मिळालेले ते शब्द, ''ही कीड वाढतच चालली आहे.'' ही 'कीड'! खरंच या सगळ्या बायका हौस म्हणून असा रस्त्यावर बाजार मांडत असतील का? यात अगतिकता, परिस्थिती-शरणता, कौटुंबिक आणि सामाजिक परंपरा यांचा भाग किती असेल? की या स्त्रियांना 'खरोखर हाच आपला व्यवसाय आहे, असे प्रामाणिकपणे वाटत असेल! यातून बाहेर यावेसे वाटत असेल का? त्यासाठी खरोखर व्यावहारिक मार्ग यांना उपलब्ध होत नसतील का? की,कायदे आणि सरकारी तरतुदी फक्त कागदावरच राहतात. असेही कानावर येते की अलीकडे याच कडू करंजाच्या झाडाखाली एखादी खाकी वर्दी चमकीवालीकडून चिरमिरी घेतानाही दिसते. क्रमाने ते ही मागे पडले.

काळ उलटला पण स्मरणातील फुलदाणीतली ती कडू करंजाची फांदी अगतिकपणे वाकली आहे असे वाटत राहिले आणि त्याच वेळी आठवली आजोळी गेल्यावर आजी लावत असलेली कडू करंजाच्या तेलाची भट्टी! ही गोष्ट साठ-एक वर्षांमागची! रानात कडू करंजाची, एरंडाची भरपूर झाडे तेव्हा असायची. सुट्टीतल्या आमच्या अनेक उद्योगात एरंड्याच्या लंबगोल करड्या ठिपक्यांच्या बिया आणि कडू करंजीच्या अक्षरश: अगदी इवल्याशा करंजीच्या आकाराच्या लाल मातीच्या मातकट रंगाच्या बिया गोळा करून आणणे आणि परसातल्या चुलीजवळ त्यांचे दोन ढीग रचणे, मग आजी खुश होत असे. मग वर्षभरासाठी त्यांची तेलं काढायच्या तिच्या भट्ट्या लागत. दगडी चुलाण्यांवर मोठ्या पातेल्यात बिया ठेचून टाकायच्या, त्या पाणी घालून खूप उकळायच्या आणि तेलाचा तवंग वर दिसायला लागला की ते थंड होऊ द्यायचे. ते तेल ओतून काढण्याचे काम मोठे कौशल्याचे असे आणि गडी-माणसांच्या मदतीने आजी ते करीत असे. दोन्हींची साठवण निगुतीनी केली जायची. एरंडीच्या तेलाचा उपयोग सुप्रसिद्धच आहे. महिना-पंधरा दिवसातून भल्या सकाळी चमचा दोन चमचा तेल पोराबाळांना नाक दाबून पिणे भाग असायचे. आजच्या स्कूटर-मोटर सर्व्हिसिंगच्या भाषेत पोरांच्या एकूण कोठ्याचेच ओव्हरऑईलिंग होऊन जाई. आज त्याच्या सुधारित आवृत्त्या निघाल्या आहेत.

कडू करंजाची बुधली भरणे हा एक प्रापंचिक काटकसरीचा भाग होता. वीज नव्हती, रॉकेल फारसे खेड्यात मिळत नसे. परवडतही नसे. मग अंगणात, गुरांच्या गोठ्यात, पोरांच्या ओसरीवर आणि दिवाळीतही दिवे लावायला करंजाचे तेल उत्तम काम करी. अंधारी जागा प्रकाशमान करी. आणखी एक म्हणजे बैलगाडीच्या चाकात लुब्रिकेटिंग म्हणून नळ्यात करंजाचे तेल भरले जाई. बैलांच्या खांद्यांना

नांगर, औत, मोटा, गाड्या ओढून हमखास जखमा होत, त्यावर मलम आणि निर्जंतुकीकरणासाठी हळदीत खलून ते तेल लावले जाई. घरात छताच्या कडीपाटाला, तुळईला, पलंगांना... लाकडाला वाळवी-उधई लागली तर कडू करंजाच्या तेलात चिंधी बुडवून लावले जाई. वाळवी मारणे, प्रतिबंध करण्याचे गुण ही या कडू तेलाची खासीयत; चुकून तेलाचा जिभेला स्पर्श झाला तर खरी कडू चव कळायची! घरात-दारात उजेड पाडणारी. आणि घरातली कीड नाहिशी करणारी ही गुणी झाडे आता फक्त 'त्या सद्गृहस्थांच्या भाषेत' 'कीडी'ला फक्त आसरा देण्याचेच काम करतात का?

कडू करंजाचे तेल काढणे, त्यांचे वापर हे सगळे आताचे ग्रामीण शेतकरी विसरूनच गेले आहेत कां? कधी आणि कसे झाले सगळे? शरही जीवनात आपल्याही किती विस्मरणात गेला हा काळ! आता कोणी कृषीविद्यापीठे, प्रयोगशील शेतकरी कडू करंजाचा असा शोध घेत असतील का?

मी जी झाडे पाहिली होती 'त्या' रस्त्याने, त्यालाही आता तीस-एक वर्षे झाली. अजून ती झाडे तिथे आहेत की नाही? हे पहायलाही गेल्या कित्येक वर्षांत सवड झाली नाही. स्मरणशक्ती समाजाचीच नव्हे तर व्यक्तीचीही किती क्षीण असते, असेही आज वाटत आहे.

कसा कोण जाणे तो फिरण्याचा प्रसंग आठवला आणि मग कडू करंजाची एक स्मरणसाखळी उलगडत गेली. कदाचित आता प्रत्यक्ष पायी फिरणे कमी आणि आठवणीत फिरणे वाढत चालल्याचा हा परिणाम असेल.

पण अजूनही कुठे सापडले तर मला ते कडू करंजाचे झाड हवे आहे.

# कळतं पण वळत नाही

वेळेची आणि मार्गांची पद्धतशीर आखणी करून प्रवास करणाऱ्यांचं मला नेहमीच फार कौतुक वाटतं. मला हे कधी जमत नाही; पण आखणी करून प्रवास करणाऱ्यांचा हेवा मात्र मुळीच वाटत नाही; कारण आपण ठरवल्यापेक्षा अनपेक्षितपणे वेगळाच असा अनुभव अनेकदा येतो आणि तो खूप छान असतो.

परदेश प्रवास ही काही आता अपूर्वाई राहिलेली नाही; मात्र माझ्यासारखीला ती अनपेक्षित मिळालेली संधी ही काहीशी अपूर्वाईच होती. म्हणून प्रवासात अमुकच करायचे-पहायचे असा आग्रह नव्हता. अमेरिकेच्या एका विद्यापीठाच्या निमंत्रणावरून आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी मी गेले होते. चर्चासत्र संपल्यावर एक दिवस रिकामा होता आणि बहुतेक सहकारी निघून गेले होते. एक महाराष्ट्रीय मैत्रीण मीरा (ही समाजशास्त्रज्ञ कोसंबींची मुलगी) तेवढी त्या हॉटेलवर होती. सकाळी मी आरामात असतानाच ध्यानी मनी नसलेल्या ग्रँडकॅनॅइनच्या सहलीची संधी घेऊन ती आली. सकाळी निघून आम्ही रात्री परत येऊ शकणार होतो.

वाटेत एका विस्तीर्ण घळीत गाडी थांबली. आमच्या गाडीतली माणसं आणि ती गाडी त्या अतिविशाल भव्य घळीत अक्षरशः एवढीशी खेळण्यातली वाटत असणार. भोवताली आमच्या उंचीच्याच पांढऱ्याशुभ्र डेरेदार फुलांनी लगडलेली झाडं. ते दृश्य पाहून अक्षरशः मंत्रमुग्ध व्हायला झालं.

इतकी असंख्य फुलांनी लगडलेली झाडं, राखणदार कोणी नाही. माझी पावलं आपोआप झाडाकडे वळली. वाकलेली फांदी हाती घेऊन फुलं तोडणार तोच मैत्रिणीनं थांबवलं. भानच नव्हतं मला. गाडीतली सगळी माणसं विलक्षण अचंब्यानं माझ्याकडे पाहत होती. आपलं काय चुकलं हे मला कळेचना! पाहणाऱ्यांचे चेहरे असे की कोण्या भामट्या बाईला बरोबर आणलय्!

"का? काय झालं?" - मैत्रिणीला विचारलं. मनात एक शंका आली की

फुलं जहाल विषारी वगैरे तर नसावीत? कुठे तरी जहाल विषारी झाडांबद्दल काहीबाही वाचलेलं आठवत राहिलं. विशेषत: ॲमेझॉन, नाइल अशा नद्यांच्या खोऱ्यात, आफ्रिका, ऑस्ट्रेलियाच्या घनदाट जंगलात काही मोहक वनस्पती असतात. त्यांच्या मोहिनीनं, सुरेख रंग आकारांनी प्राणी तिकडे आकर्षित होतात, पण त्या मोहिनी रुपाआड फार घातक भस्मासुर लपलेला असतो. ''स्पर्शासह मरणही आणी, ती तुझ्या जीवाची राणी'' असं काही अप्रूप त्या फुलात आहे की काय? असे विचार क्षणार्धात चमकून जात असतानाच मैत्रीण धावत जवळ आली आणि नाठाळ मुलाला दटावणी द्यावी त्या स्वरात मातृभाषेत म्हणाली, ''असा झाडा-फुलांना हात लावायचा नसतो इथं सार्वजनिक ठिकाणी. राष्ट्रीय संपत्तीचं नुकसान केलं म्हणून पोलीस केस होऊ शकते.'' बापरे! 'पोलिस केस' शब्दाची जरबच मोठी ठरली. या परक्या देशात खरंच असं काही घडलं तर...! पण एवढ्या मोठ्या त्या घळीतल्या जंगलातली चार-सहा फुलं तोडली एखाद्यानं, तर असं काय मोठं 'राष्ट्रीय नुकसान'(?) झालं असतं? ते माझ्या भारतीय मनाला अजून उलगडलेलं नाही. इथं वर्षानुवर्षे वाढलेल्या वृक्षांची जंगलेच्या जंगले तोडणारे राष्ट्रीय संपत्तीचे दरोडेखोर उजळ माथ्याने फिरत असतात. वर बढाई मारतात. त्या देशातल्या माझ्यासारख्या सामान्य नागरिकाला हे कळवून घेणं अंमळ कठीणच जाणार ना!

आमच्याकडे सगळा उलटाच कारभार. रस्त्यावर सुरेख वाढलेल्या डेरेदार झाडावर उन्हाळ्यात उनाड पोरे चढतात आणि गंमत म्हणून फांद्याच्या फांद्या तोडून झाडाचा पार खराटा करतात. त्यांना थोडं सांगायला गेलं की, उलट त्यांचे आईबाप कंबर कसून भांडायला येणार. ''तुमच्या ... चं काय गेलं? झाड काय तुमचं खाजगी आहे? रस्त्यावरच्या सार्वजनिक झाडावर आमचाही अधिकार तेवढाच आहे.?'' आता काय बोलणार?

रेल्वेत लिहिलेले असतं. ''यह गाडी भारतीय जनता की संपत्ती है।'' या संपत्तीची वाटेल तशी लूट करायचा आणि नासधूस करायचा हक्क मात्र सगळे बजावतात. उत्तर प्रदेशात एकदा प्रवास करीत असताना भरल्या गाडीत रेल्वेचे दिवे आणि पंखे यांच्या तारा तोडणारी उनाड मुलांची टोळकी सुखेनैन हिंडताना पाहिली. कोणीच त्या मुलांना काही बोलत नव्हतं. मलाच राहवेना म्हणून थोडं नम्रपणेच सांगण्याचा प्रयत्न केला. तर ''मॅडम, आपको आखिरतक जाना है ना?'' असा जरबदार प्रश्न विचारून गप्प बसवलं होतं. डब्यातल्या तथाकथित 'सभ्य' प्रवाशांनीही गप्प बसायचा सल्ला दिला होता. अशा वातावरणातून गेलेल्या माझ्या सारखीला 'राष्ट्रीय संपत्तीच्या जपणुकीची ही अमेरिकन मानसिकता

खूप प्रभावित करून गेली. खरे तर त्या निर्मनुष्य जंगलात कोणी राखणदार, पोलीस नजरेच्या टप्प्यातही येण्याची शक्यता नव्हती. पण तेथील सर्वसामान्य नागरिकाच्या मनातला अदृश्य राखणदार जास्त दक्ष होता; त्याचीच अपूर्वाई होती.

याच प्रवासातला आणखी एक अनुभव! एक पशुपक्षी संग्रहालय आणि त्यासंदर्भातलं एक वस्तुसंग्रहालय पाहत असतानाचा!

आपल्याकडच्या भाषेत बोलायचं तर बालवाडीतल्या, फार तर पहिलीच्या वर्गातल्या मुलामुलींची सहल आलेली होती. मुलं मजेत प्राण्यांच्या पिंजऱ्याबाहेरून हिंडत होती. ''प्राण्यांना प्रेक्षकांनी आपल्या जवळचे पदार्थ खाऊ घालू नयेत, त्यांना हात लावू नये,'' अशा अर्थाचे फलक जागोजागी लावले होते आणि प्रेक्षक त्या सूचनांची अंमलबजावणी करीत होते. मोठ्यांनी हे केले तर आश्चर्य नव्हते पण शिक्षिकेने मुलांच्या हाती नुकतीच चॉकलेट दिली होती. एकीकडे मुले ते खात होती; पण चुकूनही एका मुलाने पिंजऱ्यातल्या प्राण्याला ते देण्याचा प्रयत्न केला नाही. मात्र चॉकलेट कां द्यायचे नाही? असा प्रश्न आपल्या शिक्षिकेला विचारून आपले कुतूहल मात्र ती मुले व्यक्त करीत होती. उत्तराने त्यांचे समाधान झाल्याचे दिसत होते. विशेष कौतुक आणखी एका गोष्टीचे वाटले. चॉकलेट खाऊन झाल्यावर आपल्या हाताच्या चिमटीत प्रत्येक मुलाने चॉकलेटच्या आवरणाचा कागद ठेवला होता आणि पुढे जेव्हा कचऱ्याचे कोंडाळे लागले तेव्हा बरोबर त्या कोंडाळ्यात पडेल तशा बेताने टाकला. ही शिस्त तर सगळीकडेच दिसते. कोठेही खाद्यपेय विक्री केंद्रात किंवा बागेत खाद्यपदार्थांचे रिकामे कागद, प्लॅस्टिकच्या बशा-पेले इतस्तत: टाकले जात नव्हते. म्हातारी माणसे बागेत येत. काही खाणे-पिणे करीत आणि आसपास कोंडाळे नसेल तर रिकाम्या प्लॅस्टिकच्या पिशवीत कचरा भरून नेत आणि कोंडाळे दिसताच नेमकेपणाने त्यात टाकीत.

आपल्याच मोटारीतून किंवा मिनीबसमधून छोट्या सहलीला जातानाही हा अनुभव सार्वत्रिकपणे येत असे. वाटेल तेथे रस्त्यावर खाद्य-पेयांच्या रिकाम्या आवरणाचा कचरा वाहनाच्या खिडकीतून न टाकण्याचे वळण सगळ्यांच्याच अंगवळणी लहानपणापासून पडल्याशिवाय हे घडत नाही.

परदेशातल्या सार्वजनिक बागा, बाजार, रस्ते यांच्या अपरंपार स्वच्छतेची अपूर्वाई आपल्यासारख्यांना नेहमीच वाटते आणि आपल्याकडच्या घाणीशी, अनास्थेशी आपोआपच तुलना होते. शेवटचा एक शेरा असतो तो सरकारवर! सरकार, शासनयंत्रणा, महानगरपालिका ते ग्रामपंचायत अशासारख्या संस्थांनी सामान्य नागरिकाने जिथे-तिथे केलेली घाण अष्टौप्रहर झाडू चालवले तरी सामान्य

माणसात सुसंस्कृत नागरिकत्वाचा एक अविभाज्य भाग म्हणजे 'स्वच्छता महत्त्वाची आहे, हे जोपर्यंत रुजत नाही तोवर "स्वच्छ शहर/गाव, सुंदर शहर/गाव... ?"चे कितीही फलक लावले तरी काय उपयोग होणार?

आपल्याकडून परदेशी प्रवासाला गेलेल्या माणसांच्या स्वभावाची आणखी एक गंमत लक्षात आली. परदेशी कंपनीच्या विमानातून प्रवास करताना, तिकडच्या बागांतून, बाजारातून, दुकानातून, रस्त्यावरून फिरताना तिकडच्या नागरिकांप्रमाणे... क्वचित अधिक काटेकोरपणे स्वच्छतेचे नियम पाळणारा माणूस एअरइंडियाच्या विमानात बसल्याबरोबर त्याच्यात एतद्देशीयत्व संचारत असे आणि इथे-तिथे कागद-कचरा टाकण्याचा त्याचा मूळ स्वभाव उफाळून येत असे. "मूळ स्वभाव जाईना।" असा अनुभव अनेकदा येत राहतो.

आणखी एका वस्तुसंग्रहालयात माध्यमिक शाळेतल्या मुला-मुलींची सहल आलेली दिसली. प्रत्येक मुला-मुलींच्या हाती टाचणवही-पेन होते. मुले स्वतंत्रपणे टाचणे लिहित होती. क्वचित एखाद्या ठिकाणी थांबून हलक्या आवाजात शिक्षक सामूहिकपणे एखाद्या शिल्पाविषयी, वस्तुविषयी काही सांगत. मुले नीट ऐकून टिपणे लिहित. खऱ्या अर्थाने ही शैक्षणिक सहल होती. आपल्याकडच्या शाळेतल्या सहलीत असा एखादा अनुभव अपवादात्मकच असावा.

उलट किल्ले, लेणी अशा ठिकाणी आपली किंवा संबंधितांची नावे कोरून त्या विद्रूप करणाऱ्यांचेच प्रमाण जास्त, असा अनुभव मोठ्या माणसांच्या बाबतीतही येतो.

भारतात असेपर्यंत आपल्या घरातल्या पुरुषाला (पती, मुलगा, भाऊ) चहासुद्धा करून घ्यायची सवय नाही, हे कौतुकाने सांगणाऱ्या बायका परदेशात काही काळ रहायला गेलेला घरातला पुरुष घरात स्वयंपाकाचे प्रयोग कसे करतो आणि फोनवर, पत्रातून निरनिराळ्या पदार्थांच्या कृतींची देवाण-घेवाण कशी करतो, हे दुप्पट उत्साहाने सांगताना दिसतात.

म्हणजे सार्वजनिक स्वच्छता, शिस्त स्वावलंबन या गोष्टींची परदेशात अंमलबजावणी करण्यातच मोठेपणा आहे, असा या माणसांचा समज आहे की काय? आपण आपल्याच देशात उत्स्फूर्तपणे या बाबी आचरणात आणणे म्हणजे पाप आहे, असा तर समज नसावा?

याचा अर्थ पाश्चिमात्त्य जीवनशैली सर्वथैव आदर्श आहे असे मुळीच नाही; पण आमच्याकडच्या अनेक दोषांचे खापर आपण "पाश्चिमात्त्यांच्या अनुकरणावर" फोडतो. त्यावेळी आपल्या समाजाला अतिशय उपकारक असलेल्या चांगल्या गोष्टींचे अनुकरण करायला आपल्याला कोणी मनाई केली आहे का? सार्वजनिक

स्वच्छता, शिस्त, स्वावलंबन, कामसूपणा अनेक विषयांतील कुतूहल अशा बाबींची संस्कृती आपण आपल्या समाजात का रूजवीत नाही? त्यांचे अनुकरण का करीत नाही? याचाही विचार आपण अधिक तटस्थतेने करायला नको का? केवळ पाश्चिमात्त्यांमुळे दोषच का यावेत? गुण का उचलू नयेत? मग तो दोष आपल्या मानसिकतेचा आहे का? की जबाबदाऱ्या झटकण्याचा आहे?

एक दंतकथा सांगितली जाते, काही भारतीय लेखक अमेरिकेत गेले. त्यांच्या तेथील लेखकांशी गप्पा चालू होत्या. पूर्वज गौरवाच्या आपल्या परंपरेनुसार भूतकाळातील राम-कृष्णापासून ते गौतमबुद्ध, म. गांधींपर्यंत थोर लोकांची नावे घेत ''आमच्या देशात असे मोठे मोठे लोक होऊन गेले.'' असे एका भारतीयाने अभिमानाने समारोपाचे विधान केले.

अमेरिकन शिष्टाचारानुसार येथील लेखक म्हणाला, ''बरोबर आहे तुमचे म्हणणे, तुमच्या खूप मोठ्या देशात थोडी माणसे खूप उंच होती. आमच्या देशात प्रत्येक लहान माणूस थोडा थोडा उंच व्हावा, असा आमचा प्रयत्न आहे.'' तात्पर्य, प्रत्येक सामान्य माणूस थोडा थोडा उंच होतो, तेव्हा सर्व समाजाची प्रत सुधारते, हे सगळं कळतं, पण वळत नाही, त्याला काय करायचे?

# तारुण्य : तेव्हा आणि आता...!

'ही असली फडकी गुंडाळून हिंडायला लाज नाही वाटत तुम्हाला! बापाला भीक लागली नाही तुमच्या अजून! चार वार जास्त मोठं लुगडं विकत घ्यायची ऐपत आहे अजून!... जरा लेकीला समजवून सांगा तुमच्या. (हे अर्थात लेकीच्या आईला उद्देशून वडिलांचे उद्गार!)

'अग पण आई, वर्गातल्या सगळ्या मुली हल्ली पाचवारीच नेसतात. परवा नव्या आलेल्या लिमयेबाईसुद्धा पाचवारीच...'

'अगं पण तुझ्या बाबांना आवडत नाही तर नाही नेसू..'

'अं... मी नाही हं असलं काही ऐकणार...!' मग आठ-दहा दिवस धुसफूस. वडिलांचा एकूणच माय-लेकींशी अबोला... हळूहळू गाडं पूर्ववत्. मधल्या काळात वाड्यात नवीन साडी नेसू लागलेल्या म्हणजे तेरावं सरत आलेल्या आणखी दोघी-चौघी पाचवारी नेसून 'शेपटे फलकारीत' (ही म्हाताऱ्या बायकांनी केलेली खास तारीफ!) हिंडू लागल्या आणि दोन-तीन वर्षांत... मी साडी नेसायच्या अवस्थेला येईपर्यंत असले वाद मनातसुद्धा न येण्याइतकी पाचवारी साडी रूळली.

हा प्रसंग फार जुना नाही. नाटकातला तर नाहीच. चाळीस एक वर्षांपूर्वी आमच्या पुण्याच्या वाड्यात घडलेला हा प्रसंग! माझ्या आत्याच्या मैत्रिणीच्या घरातला. माझ्या आत्याचं तेव्हा लग्न व्हायचं होतं. ती चांगली 'सतरा वर्षांची घोडनवरी' झालीय असे शेरे ज्येष्ठ बायका जाता-येता मारीत.

आता या पार्श्वभूमीवर परवा परवाचा एक प्रसंग! शहरात मिसळू पाहत असलेल्या खेड्यातली कॉलेजमध्ये शिकणारी एक विद्यार्थिनी! सकाळी पहिल्या तासाला पाहिलं तर साडी नेसलेली. मधल्या सुटीनंतर पंजाबी सलवार-खमीसमध्ये! पुन्हा कॉलेजातून परत जाताना साडी! हा काय विविध पोशाख स्पर्धेचा प्रकार! म्हणून कुतूहलानं तिला विचारलं, तर उत्तर मिळालं,

'काय करणार! आमच्या गावात चालत नाही ना हा 'ड्रेस'! मग हिच्याकडे (मैत्रिणीकडे) ठेवते हे दोन ड्रेस! कॉलेजमध्ये ऑफ तासाला बदलते लेडीजरूममध्ये! पुन्हा घरी साडीतच जावं लागतं नां!'

मग कुतूहल जास्तच चाळवलं. तेव्हा मोठ्या गंमतीन-जंमतीच समजल्या. 'ऑफ', तास असला की मुलींच्या प्रसाधनगृहाच्या आरशासमोर हीऽऽ गर्दी होते. तेव्हा पुन्हा एकदा भूतकाळाचा पडदा हळूच सरकला.

बाहेर जाताना अंधाऱ्या जिन्यात उभं राहून अंबाडा सोडून वेणी घालणारी अन् घरी येताना पुन्हा वेणी सोडून अंबाडा वळणारी आत्या आणि तिची मैत्रीण आठवली आणि पुढचं दृश्य पाहून तर हसूच फुटलं. दोन्ही कानांमागे घट्ट आवळलेल्या वेण्यांचे पेड ओढून ओढून सैल करण्याचा निरर्थक प्रयत्न करणारी अकरा-बारा वर्षांची एक मुलगी- कोण बरं ही! गंमतच आहे.

आणि अगदी महिनाभरापूर्वीच त्याच वयातली माझी छोटी भाची आरशासमोर उभं राहून दूरदर्शनच्या मुलीसारखी आपले केस वाऱ्यावर लहरत कसे नाहीत म्हणून मानेला झटका देत तासभर आरशासमोर उभी होती. वाटलं मान दुखेल कार्टीची!

लहानपणी शाळेत शिकताना आणि पुढे २०-२१ व्या वर्षी शाळेत नोकरी करतानाही बाहेर काही खाण्याचा प्रसंग आला तर मैत्रिणींनी घरून आणलेले डबे! या पलीकडे मजल गेली नाही. पुण्याला उन्हाळ्यात दोन-चार वेळा कुटुंबातल्या सगळ्यांच्याबरोबर 'कावरे'आईस्क्रीममध्ये जाऊन चार आणेवालं रवाळ आईस्क्रीम खाणं म्हणजे पराकोटीची चैन होती!

आता भाची म्हणते, 'सारखं सारखं काय आपलं इडली-डोसा खायचं! चायनीजमध्ये गेलं आठवड्यातून निदान एकदा तर काय बिघडलं! आणि त्यांच्या मैत्रिणींचाच कळप जायचा असला की बिनधास्त कार्ट्या पार कँपातल्या चायनीजमध्ये जाऊनही येतात. कसं त्यांना ते आवडतं कोण जाणे!

'कसल्या मेल्या त्या इडल्या की फिडल्या! चव ना ढव!' कोण बोललं हे! ही आजीच की! तीस-पस्तीस वर्षांपूर्वी आईनं प्रथम घरी इडली केली कौतुकानं; तेव्हा आजीनं नाक मुरडून मारलेला हा शेरा!

वर्तमान आणि भूत यांची अशी सारखी गल्लत होत राहिलीय्.

पावसाचा जोर कमी झालाय्. श्रावण रिमझिमतो आहे आणि मंगळागौरींचा धुडगूस सुरू झाला आहे. झिम्मा, फुगड्या, आगोटापागोटा, कोंबडा, रात्रभर नुसता धिंगाणा! पहाट झाली तरी भेंड्या, लावण्याच्या निमित्तानं सुरू झालेले गाण्यांचे कोरस! रात्रभर इतका हैदोस घालूनही दुसऱ्या दिवशी कुठंतरी नदीकाठी

नाही तर टेकडीवर हिंडायचा उत्साह कायम! परकराचे कासोटे घालून आलेल्या ११-१२ वर्षांच्या धाकट्या बहिणींना घेऊन आणि पाचवारीचे पदर आडवे खोचून दोन-चार तास सहज भटकून येत होतो.

आता म्हणजे हरतालिका, मंगळागौरी, गोकुळाष्टमी सगळी जागरणं संपली हळूहळू. रात्रभरचा झिम्मा-फुगड्यांचा गोंधळही फारसा दिसत नाही; करतात तरी काय हल्लीच्या या मुली!

'हे बघ आई, अंजूची बर्थ डे पार्टी आहे. आम्ही सगळ्यांनी केव्हाच ठरवलं होतं. यंदा आमच्या ग्रुपमधल्या प्रत्येकीच्या वाढदिवशी एकत्र रहायचं रात्रीसुद्धा!'

'अग पण रात्रीचं काय...?'

'आई, कसं कळत नाही तुला! अग गप्पांना अन् खेळांना रात्रीच तर खरी गंमत येते. खूप रेकॉर्डस् ऐकणार आहोत. डान्सिंग पार्टी साजरी करणार आहोत... प्लीज आई!'

हा मायलेकींचा 'प्रेमळ' (?) संवाद अलीकडचा. निमित्त कधी कुणाच्या वाढदिवसाच्या पार्टीचं असेल तर कधी ३१ डिसेंबरच्या वर्ष अखेरच्या पार्टीचे! उद्दिष्ट एकच! सगळ्या मैत्रिणींनी एकत्र जमून धुडगूस घालायचा! खाणं, खेळणं, गाणं, नाचणं आणि मनमुराद गप्पा मारीत समवयस्कांच्या सहवासाचा आनंद लुटणं-क्वचित मित्रांच्या समवेतही!

हल्लीच्या या मुलींचं काही कळेनासंच झालंय! केस काय कापतात! मुलांसारखे कपडे काय घालतात! हातात बांगड्या नाहीत! मुलींच्या जातीनं कसं छान वेण्या घालाव्यात. फुलं माळावीत. काही हौसच नाही यांना. कुठलं मार्दव म्हणून नाही!

हा एकूण आजच्या तरुणींबद्दलचा मागच्या पिढ्यांचा अभिप्राय! या तरुण मुली हळुवारपणा हरवत तर नाहीत ना!

'छे छे! मी तुझं मुळीच ऐकणार नाही. उद्या तू पिंक ड्रेसच घालायचास आणि छान रोझ फ्लावर्स आणणार आहेस ना! उद्या 'पिंक ॲन्ड रोझ डे' आहे.

मग सगळा कॉलेजचा परिसर गुलाबी रंगांच्या अनंत छटांनी बहरून जातो. लालचुटूक रंगाच्या, डौलदार देठांच्या टपोऱ्या गुलाब-पुष्पांची देवाण-घेवाण होते. हळूच गुलाब देताना क्वचित नजरबंदी होते अन् निष्काळजीपणानं एखादा गुलाबाचा काटा बोटाबरोबरच हृदयही घायाळ करतो आणि कुणीतरी कुणाच्या तरी 'डबक्यात (हा 'प्रेमात'साठी क्वाइन केलेल्या नव्या पिढीचा शब्द) पडतं.

मग पापण्यांची फडफड, लोकांच्या नजरा चुकवत नजरभेटी, ग्रंथालयाच्या पुस्तकांच्या निमित्तानं कवितांची आणि थरथरत्या मनांनी लिहिलेल्या पत्रांची देवाणघेवाण! कुणीतरी समंजस मित्र-मैत्रिणींची मदत आणि अखेर शुभमंगल!

हे सगळं नेमेचि येणाऱ्या पावसाळ्यासारखं दरवर्षी अनुभवता येतंच! हे पाहिलं की, वाटतं तारुण्याचा तो खळाळ, हळवा भावुकपणा अजूनही आहेच की! तपशील बदलले असतील, तत्त्व मात्र कायम आहेत.

आमच्या गॅदरिंगच्या वेळी थरथरत्या घोगऱ्या आवाजात रमेश पटवर्धननं (किंवा अशाच कुणी... नावात काय आहे...?) शकू नाईकसाठी लावलेला वशिला आठवतो.' म्हणजे काय आहे... तुझी आणि तिची जरा जास्त मैत्री आहे ना! तू माझ्या बहिणीसारखी! माझ्यासाठी विचारशील तिला?' आणि मग शकूनं पळून जाऊन लावलेलं लग्न? देशस्थ-कोकणस्थ विवाह म्हणून दोन्ही कुटुंबांनी केलेला थयथयाट आणि त्यापायी आमच्या टोळक्यानं खाल्लेल्या शिव्या, तरीही अनुभवलेलं विलक्षण थ्रिल! थरार! काही तरी जगावेगळा केल्यामुळं एकीकडे जमिनीपासून चार अंगुळं अधांतरी चाललेले आमचे (मनो)रथ!

आणि मग पुढे शकूची झालेली ओढाताण! शिक्षण अर्धवट सोडून केलेली कामं! शिवणकाम, विणकाम, लोणची-पापड या सगळ्यात शकू इतकी गुरफटली की मान वर करायला तिला सवडच मिळाली नाही कधी! सासर-माहेरची मर्जी संपादन करेपर्यंत शकू चाळीशीला आली. सगळं उमेदीचं आयुष्य गेलं झगडण्यात! आयुष्याच्या सुरुवातीला पाहिलेली सगळी हळवी, हळुवार स्वप्नं! काडी काडी करून उभारलेलं घरटं!

या पार्श्वभूमीवर सुमेधाचा आजचा संसार दिसतो. नवरा-बायको दोघेही उच्च शिक्षित पण लग्न करून स्वतंत्र बिऱ्हाड थाटलेले! शहरात फ्लॅट हवा म्हणून सुमेधाचीही नोकरी सकाळी सात ते संध्याकाळी पाचपर्यंत राबून नि स्त्राण झालेली स्त्री हे काही आता फार दुर्मिळ चित्र नाही. सहज सर्वत्र आढळणारी ही दृश्यं आहेत. तरी 'घरी बसं' म्हटलं की कुणी सहसा नोकरी सोडून घरी थांबत नाही. थांबवतच नाही तिला. 'मग शिक्षणाचा उपयोग काय?' नोकरी घर यात होणारी ओढाताण आणि समाधान! समाधान कशाचं? 'मी काही कुणाच्या जिवावर बांडगूळ म्हणून जगत नाही' याचं! अर्धशिक्षित मामेबहिणीला नवऱ्यानं सरळ घराबाहेर काढलं!' माझा नवरा नाही म्हटलं तरी समंजसपणानं वागतो. वागणारच! माझ्या नोकरीमुळेच तर संसाराच्या सुरुवातीलाच आमचं घर झालं. मनाजोगं फर्निचर आलं घरात. परवा त्याचे मित्र आले तर सजलेलं नेटकं घर कसा अभिमानानं दाखवीत होता. सासूबाईंना तोंडदेखलं का होईना कौतुक करावं

लागतं. एखादवेळी म्हणतात, 'इतकी ओढाताण करून घ्यायची गरज आहे का?' त्यांच्या मुलाला अधूनमधून दूध तापवणं, भाजी आणणं अशी कामं करावी लागतात, ते त्यांना आवडत नसावं. पण खरं सांगू कां, रात्रंदिवस घरात राबणाऱ्या बाईची किंमत कळत नाही, घरातल्या लोकांना! आमच्या आईचं झालं ना तसंच! आता कसे रविवारीच आम्ही एकत्र असतो. तेव्हाचा आमचा सहवास किती सुखाचा वाटतो. आवडीचे पदार्थ मी रविवारी करते. मधूनमधून मित्र-मैत्रिणीकडे जाणं येणं, क्वचित बाहेर जेवायला जाणं एन्जॉय करतोच ग आम्ही!' सुमेधा नव्या संसारात रमलेली होती तर!

तिकडे मधुरिमानंही लग्न झालं तरी संगीतनृत्य चालू ठेवलचं होतं, 'नवरा त्याच्या धंद्याचा जम बसवण्यात पार बुडालाय्. सकाळी जो जातो ते संध्याकाळी क्वचित रात्री उगवतो. दिवसभरात फोन करायलासुद्धा त्याला सवड नसते; मग मी दिवसभर एकटी घरात करणार काय? आणि माझं गाणं आणि नृत्य सोडून जगणं जमणारही नाही मला! घरात इनमीन दोन माणसं! घरकाम तरी किती करणार! कार्यक्रमासाठी परगावी जावंच लागतं अधूनमधून - तो नाही का त्याच्या धंद्याच्या निमित्तानं 'टूरवर' जात? खरं सांगू का, तुम्ही किती काळ एकमेकांच्या सहवासात असता, हे महत्त्वाचं नाही. जेव्हा सहवासात असता तेव्हा काय करता! हे महत्त्वाचं! आणि शरीरानं दूर असतानाही एकमेकांविषयीच्या आदरानं आणि प्रेमानं एकमेकांशी किती प्रामाणिक असता हे महत्त्वाचं! नाही तर सुलभा मावशीच्या ऋजुताच्या नवऱ्यासारखं. सारखी बायकोला घरात ठेवूनही बाहेर नाही ते उद्योग करत बसणारा नवरा असतोच की! त्यापेक्षा आमचं छान आहे.' बापरे! लहान लहान वाटणाऱ्या या २२-२४ वर्षांच्या मुली किती विचार करतात?

'अग पण सारखं घरातलं-बाहेरचं काम काम! कंटाळवाणं नाही होत! आमच्यावेळी कसं डोहाळजेवणं, बारशी, लग्नकार्य किती मोकळेपणानं मुलींना कौतुक करू घेता यायचं!

'तू असं कर मावशी, एकदा पुणे-मुंबई सिंहगडनं नाही तर डेक्कननं बायकांच्या डब्यातून प्रवास कर. भाचीनं दिलेल्या अनाहूत सल्ल्यानुसार प्रवासाचा योग अचानक आला. डब्यात एक गजरेवाला होता. त्याची तडाखेबंद विक्री झाली होती. प्रत्येकीच्या डोक्यात गजरा. डबाभर मोगऱ्याचा वास दरवळा होता. त्या गर्दीतही एकीच्या जवळ थोडी ऐसपैस जागा होती. पेपरडिश निघाल्या. प्रत्येकीच्या पर्समधून काही खाद्यपदार्थ निघाले. लक्षात आलं इथं चक्क डोहाळ-

जेवणाचा सोहळा चालू आहे. थट्टा मस्करीला, खाण्या-पिण्याला उत आला आहे. दर स्टेशनवर चढणाऱ्या-उतरणाऱ्याही हळूहळू त्यात सहभागी होत आहेत. साडेतीन चार तासांच्या प्रवासात मीही त्यांच्यातीलच एक झाले.

'अहो, आम्ही वर्षानुवर्षे हा प्रवास करतो आहोत. जाता-येताना मिळून आठ-आठ तास एकमेकींच्या सहवासात असतो. 'एकजण थट्टेनं म्हणाली, 'नवरा आणि मुलबाळं यांच्यापेक्षाही जागेपणीचा जास्त काळ आम्हीच एकत्र असतो. मग इथंच डोहाळजेवणं, केळवणं साजरी करतो. हिचं केळवणही आम्ही असंच गाडीत केलं होतं.' 'नाहीतरी पूर्वी चांदण्यातलं, नावेतलं अशी डोहाळजेवणं असायची ना! आम्ही धावत्या रेल्वेतलं आणि तेही सामुदायिक डोहाळजेवण करतो. विना सहकार नही उद्धार!' आणि सगळ्या खळखळून हसल्या.

'कशा ग बाई या बायका आठ आठ तास प्रवास करतात!' असं म्हणणाऱ्या अनेकांपैकी मी एक होते. आता कळलं की प्रत्येक परिस्थितीत माणूस आनंद अन् समाधान शोधायचा प्रयत्न करतो; कारण माणूस सदैव सुखाच्या शोधात असतो आणि हळुवार भावनांचं जतन करणं, निर्मितीच्या सोहळ्यात सहभागी होणं यातच सुख नसतं का? बायकांना डोहाळजेवणं अन् केळवणं अशा समारंभात दिवसभर गुंतून पडायला वेळ नाही आता; पण मिळणारा प्रत्येक क्षण त्या छान कारणी लावतात की! एकीनं दहा वर्षांच्या प्रवासाच्या काळात पन्नास-साठ स्वेटर्स विणल्याचं सांगितलं. एकूण कुठल्याही परिस्थितीत काही करायचं म्हटलं तर खूप काही करता येतं तर!

हे सगळं मी एकदा घरात सांगत होते. तेव्हा आमची एक मावशी म्हणाली, 'अग हे सगळ्या गावाचं करणं ठीक आहे गं! पण तुम्ही नोकऱ्या करणाऱ्या बाया आपल्या पोराबाळांकडं किती लक्ष देता?'

बापरे! वर्षानुवर्षे बायकांच्या नोकऱ्यांना लक्ष्य करून मारलेला प्रश्नाचा तीर आलाच की शेवटी!

'मावशी, खरं सांग. आम्ही लहान असताना तुला आणि आईला तरी किती वेळ होता होता आम्हाला जवळ घेऊन गोंजारत बसायला? सारख्या तुम्ही स्वयंपाक, धुणी, भांडी यात गुंतलेल्या. मला तर माझं गोंडस लहानपण आठवतच नाही बघ; कारण सहा-सात वर्षांच्या होईतो आमच्या पाठीवर दोन-दोन भावंडं होऊन तुमच्या दृष्टीनं आम्ही 'घोडमे' झालो होतो. धाकट्या भावंडांना ताई-दादा होऊन सांभाळत होतो. आम्हालाही कुणी जवळ घेऊन गोंजारावं असं वाटतं असावं, हे तुम्हाला कधी कळलंच नाही का गं?' आणि मावशी एकदम

चमकलीच! खरंच असं कही झालं असेल! असा भाव तिच्याही चेहऱ्यावर तरळलेला दिसला. तिथंच असलेली माझी मावसबहीण म्हणाली, 'तुला खरं सांगू कां! हल्लीच्या मुलींचा मला कधी कधी फार हेवा वाटतो! त्याचं लाडीक बालपण सगळं घरचं कितीतरी दिवस जपत राहातं! अगदी वीस वीस वर्षांच्या मुलीलाही 'लहान आहे ती अजून!' म्हटलं जातं.

हे असं एक की दोन! सांगावं तितकं कमीच!

पूर्वीचं म्हणजे सगळं सुंदर, उच्च, उदात्त, हळवं, भावुक वगैरे वगैरे! असं एक चित्र रंगवलं जातं तर दुसरीकडे...

पूर्वीचं म्हणजे अडाणीपणा, अंधश्रद्धा, बंधनं सगळंच टाकाऊ असं दुसरं चित्र असतं.

तर हल्लीचं म्हणजे सगळं वाया गेलेलं. बायकांच्या आयुष्यातला भावुकपणा, हळवेपणा माधुर्य सगळं व्यवहारी बाजारी जगात हरवत आहे. करिअरच्या मागे धावत राहिल्यानं घर, मुलं, कुटुंबसंस्था उध्वस्त होतेय, असंही एक चित्र!

यातलं खरं काय? जे होतं ते फक्त स्त्रियांच्याच बाबतीत होतय् का? की बदलतं राजकारण, समाजकारण, अर्थव्यवस्था, उत्पादन साधनं, महागाई बाहेर वाढती लोकसंख्या आणि कुटुंबातली घटती लोकसंख्या या सगळ्यांच्या ताण-प्रतिताणातून सगळ्याबरोबर बाईही बदलते आहे.

भारतीय मन मोठं चमत्कारिक आहे. त्याला वस्तुरूप. बदल, सुखं हवी असतातच; पण त्याबरोबर अपरिहार्यपणे येणारे कुटुंबव्यवस्थेतले विशेषत: स्त्रीमधले बदल नको असतात. तिनं भावमधुर असावं असं वाटण्यापेक्षा तिनं दुबळं, रडवं, अगतिक असावं असंच वाटत असतं. उठबस अश्रू ढाळणारी स्त्री! तरुणी ही एक सार्वत्रिक स्त्री प्रतिमा मराठी चित्रपटांनीही लोकप्रिय केली आहे.

पण भावविवश अगतिकता म्हणजे भावमधुरता नव्हे, हे आपण कधी समजून घेणार आहोत का?

तारुण्य अजूनही भावमधुरच आहे. अजूनही नाच, गाणी, खेळ, फुलं, भटकणं, खाणं-पिणं आणि हळवं हळवं होऊन उत्कट प्रेम करणं, कविता करणं यात तरुण मन रंगतंच आहे ना! रूप, रस, गंध, स्पर्श यांची प्राकृतिक आदिम असोशी तारुण्याच्या वसंतात बहरतेच आहे ना! गजरे-वेण्यांची जागा 'रोझ-डे'नं घेतली असेल. पण फुलांचं आकर्षण कायमच आहे! तपशील बदलले असले तरी तत्त्व कायम आहे ना!

एकीकडे तरुणांचं 'बालपण' घर जास्तीत जास्त काळ गृहीत धरतं आहे; तर

बदलत्या ज्ञान आणि माहिती यांच्या समृद्ध साधनांमुळं... वृत्तपत्र, रेडिओ, दूरदर्शन, कंप्युटर या सर्वांमुळं तरुण मनं अधिक वेगानं प्रगल्भ होत आहेत. जीवनाचा फार मोठा पैस त्यांच्या कवेत लवकर झेपावतो आहे.

जुनं सगळं जसंच्या तसं कधीच टिकत नाही! महाकवी कालिदास म्हणतो ना, जुनं ते सगळं सोनं असतंच असं नाही आणि नवं ते सगळं टाकाऊ असतंच असं नाही.

शिवाय पुढची पिढी मागच्यांच्या खांद्यावर उभी असते हे मान्य केलं तर त्यांच्या दृष्टिपथात येणारा पैस अधिक व्यापक असणार असायलाच हवा.

आणि चाललं आहे ते चूक की बरोबर हे आपण आताच कसं ठरवणार? काळ ठरवील. वाट पाहूया तोवर आणि उमलत्या तरुणींच्या भावविश्वातलं शाश्वत आणि तत्कालिक समजून घेण्याचा प्रयत्न तरी करू या, नाही का?

# घराची अर्थमंत्री

'आर्थिक दृष्ट्या घराचं कर्तेपण स्त्रियांनी घ्यावे का? या वाक्यात आता 'का?' या प्रश्नांकित शब्दाची गरजच नाही; किंबहुना अर्धे-अधिक आर्थिक कर्तेपण स्त्रिया गेली अनेक वर्षे सांभाळीत आहेत.

आर्थिक दृष्ट्या रूढार्थाने ज्या कमावत्या स्त्रिया आहेत त्या .. म्हणजे नोकरी करणाऱ्या किंवा लहान-मोठे व्यवसाय करून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रिया तर अनेक आर्थिक व्यवहार सहजपणे सांभाळीत आहेत. यात घराच्या नित्य आणि नैमित्यिक (सण-वार, एखादे लहानमोठे कार्य, आजारपण इ.) खर्चाचे अंदाजपत्रक आणि त्याची अंमलबजावणी करणे स्त्रियांच्या अंगवळणी पडले आहे. आपले... म्हणजे केवळ स्वत:चे नव्हे तर एकूण कुटुंबाचे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ घालणे अगदी निम्नमध्यमवर्गीय स्त्रियाही कसोशीने करीत असतात. हा मेळ घालीत असतानाच अडी-अडचणीसाठी 'गंगाजळी' ही शिल्लक टाकीत असतात. त्यांची 'गंगाजळी'ची बँक म्हणजे जुन्या काळी हिंग-मोहरीच्या डब्या असत, एखाद्या ठेवणीच्या लुगड्याची घडी असे, हल्ली कपाटातला एखादा 'खास' कोपरा असतो. हा कोपरा खास 'तिचाच' असतो. घरातल्या बाईजवळ अशी 'गंगाजळी' असण्याची घरातल्या जवळच्या लोकांनाही इतकी खात्री असते की, त्यांच्याही आणीबाणीच्या प्रसंगी ते मागणी करतात आणि तारतम्य पाहून गृहिणी ती नड पूर्णही करीत असते, हा माझ्या आजीपासूनचा (ती मिळवती नसूनही) अनुभव आहे आणि तो घराघरात सर्वांचा अनुभव आहे. या जुन्या बायका तर आजच्यासारख्या घराबाहेर जाऊन अर्थार्जन करीत नव्हत्या; तरीही एक परीने अंशत: का होईना आर्थिक कर्तेपणाची कुवत त्या प्रत्यक्षात सिद्ध करीत असतात.

दुसरी बाब म्हणजे काटकसर. बहुतेक (निदान) मध्यमवर्गीय गृहिणी घरखर्चाबाबत काटकसरी असतात. (प्रत्येक नियमाला अपवाद असतो, तसा

याबाबतही असणार) बहुतेक घरातून स्वयंपाक आणि नित्य घरातली कामे यांचा वेळ आणि कष्ट दोन्ही दृष्टीने अधिक भार स्त्रियांवर पडतो. तो त्यांना घ्यावाही लागतो. याचे पैशात रोखीत मूल्यमापन कधीही होत नाही. परंपरा, संस्कार अशा बाबींमुळे पैशात गृहकृत्यांचे मूल्यमापन करणे तात्त्विकदृष्ट्या आवश्यक असले, तरी प्रत्यक्षात ते केले जात नाही; मात्र येथे काय होते, तर बाहेर जाणारा पैसा स्त्री या नित्य 'गृहिणी कर्तव्य' सदराखाली येणाऱ्या कामांतून वाचवीत असते. मग ती वाच्यार्थाने अर्थार्जन करणारी असो की नसो. अर्थशास्त्राचा नियम येथे लावायचा झाला तर 'पैसा वाचवणे (काटकसर) म्हणजे पैसा मिळवणे' हे सर्व अनेक पिढ्या बहुतेक जगभरच्या गृहिणी करीतच आल्या आहेत.

तरीही घराचे पूर्णार्थाने आर्थिक कर्तेपण स्त्रीच्या हाती प्रत्यक्षात नसते. याचे मुख्य कारण असे सांगितले जाते की, स्त्रियांना आर्थिक व्यवहार कळत नाहीत, पेलवत नाहीत. खरे तर तिच्यावर सोपवले जात नाहीत, म्हणून तिचा आत्मविश्वास कमी पडतो. पाण्यात पडले की पोहता येते, या उक्तीनुसार एकदा अंगावर जबाबदारी पडली की सवयीने ती पेलवते.

घराबाहेर पडून स्त्रीने नोकरी करून अर्थार्जन करणे ही आता नवलाईची बाब राहिली नाही. महाराष्ट्रात तरी निश्चितच नाही. याचा अर्थ असा की, नोकरीतली जी काही कामे असतील ती (चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापासून ते ऑफिसर/मॅनेजर पदापर्यंतची) कामे करण्याची सर्व दृष्टींनी पात्रता असल्याखेरीज त्यांना कोणी नोकऱ्या दिल्या नसत्या. दिल्या असत्या तरी त्या टिकल्या नसत्या. याचा अर्थ असा की अर्थार्जनाची कुवत-पात्रता स्त्रियांमध्ये आहे. साधा प्रश्न असा आहे की, पैसा मिळवायला जास्त अक्कल लागते की खर्च करायला? खर्च करणाऱ्यांच्या तुलनेने प्रत्यक्ष कमावत्या व्यक्ती कमी असतात. त्यात स्त्रियाही असतात. म्हणूनच जी स्त्री अर्थार्जन करते ती अर्थनियोजनही करू शकते. अगदी मोठमोठे आर्थिक व्यवहारही स्वतःच्या जबाबदारीवर समर्थपणे करताना दिसते.

फरक एवढाच आहे की पात्रता असूनही पुरुष अर्थकेंद्री समाजात त्याबद्दल विश्वास दाखवला जात नाही. संधी दिली जात नाही. पिढ्यान्‌पिढ्यांच्या सवयीमुळे, समजुतींमुळे स्त्रियांच्या मनातही भीती असते; आपण जर अपयशी झालो, एखाद्या व्यवहारात फसलो तर नुकसानीला आपल्याला जबाबदार धरले जाईलच, शिवाय एखाद्या उदाहरणावरून एकूणच स्त्रीजात आर्थिक व्यवहार करण्यास असमर्थ असल्याचा शिक्का मारला जाईल. तसे पाहिले तर कुटुंबाचे सर्व आर्थिक व्यवहार पिढ्यान्‌पिढ्या पुरुष पाहत आले आहेत. तरीही त्यांची फसवणूक होत नाही का? नुकसान होत नाही का? अगदी एखाद्या लहान

वस्तूच्या खरेदीपासून ते घर खरेदी-विक्री व्यवसाय, मोठी खरेदी या सर्व बाबतीत पुरुषही फसतात- फसू शकतात. अशा वेळी पुरुष जात आर्थिक व्यवहार सांभाळण्यास नालायक आहे असा सरसकट शिक्का कोणी मारीत नाही. उलट अनेकदा कुटुंबियांसकट सगळ्यांची सहानुभूती त्याला मिळते. कधी कधी तर 'बिचाऱ्याचे नशीब?' म्हणून हळहळ व्यक्त होते. ही किंवा अशी घटना स्त्रीच्या बाबतीत घडली तर उलट तिला दूषणे दिली जातात. ''अक्कल नाही तर करावेत कशाला पैशाचे उपद्व्याप!'' असे लागट उद्‌गार ऐकून घ्यावे लागतात. वस्तुतः स्त्री असो वा पुरुष फसण्याची, नुकसान होण्याची शक्यता सर्वांच्याच बाबतीत असते. सवयीमुळे नियम, कायदे, बाजार-हाट करण्यातील कौशल्ये कोणीही शिकू शकतो आणि दिवसेंदिवस स्त्रिया ते सर्व समर्थपणे करू शकत आहेत. अगदी शेअर मार्केटमध्येही त्या मोठमोठ्या आर्थिक उलाढाली करीत आहेत. कारखानदारी, व्यावसायिक क्षेत्रे समर्थपणे सांभाळीत आहेत. अगदी काटकसरीने, नेटकेपणाने सांभाळीत आहेत. घरातल्या खर्चाचे अंदाजपत्रक तर गेल्या किमान पन्नास वर्षे स्त्रियांनी सावरले आहे.

तरीही कुटुंबासाठी एखादा मोठ्या रकमेचा व्यवहार करायचा झाला तर पुरुषाखेरीज तो करू नये, असा एक अलिखित दंडक अगदी मोठ्या पदावर अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीच्या घरातही बहुधा पाळला जातो; निदान पुरुषाचा (कोणत्याही नात्याने) सल्ला घेतल्याखेरीज, त्याच्या उपस्थितीखेरीज स्वयंपूर्णतेने निर्णयापासून अंमलबजावणीपर्यंत सहसा व्यवहार केला जात नाही. ही वस्तुस्थिती आहे.

घराचे आर्थिक कर्तेपण असल्याचा पुरुषाचा 'अहं' जपावा. तरच घरात ताण निर्माण होणार नाही, असे एक पिढ्यान् पिढ्या चालत आलेले उपजत शहाणपण (?) ही त्यामागे असेल.

शिवाय मिळवत्या मध्यमवर्गीय स्त्रीच्या बाहेरच्या जबाबदाऱ्या गेल्या काही वर्षांत अनेक बाजूंनी वाढत गेल्या. त्यातच 'शिक्षित'पणामुळे नित्यनैमित्यिक खरेदी, अंदाजपत्रक, मुलांच्या शाळा हे वाढत गेले आणि स्वयंपाक, गृहव्यवस्थापन, नातेसंबंध सांभाळणे या पारंपरिक जबाबदाऱ्यांतून सुटका झाली नाही. अष्टभुजेच्या थाटात 'सुपर वुमन' बनू पाहणाऱ्या स्त्रीवर शारीरिक, मानसिक, आर्थिक ताण वाढत गेला हे उघड आहे. मग उघडपणे घराचे आर्थिक कर्तृत्व घेऊन आणखी ओझे कशाला वाढवायचे! तसे पाहिले तर मोठ्या आर्थिक गुंतवणुकी आणि खरेदी हे शक्तिमान आर्थिक दोर पुरुषाहाती ठेवून उर्वरित सगळीच आर्थिक जबाबदारी स्त्री आजही सांभाळते आहेच. पूर्वीही सांभाळीत होती.

प्रश्न (खरे तर युक्तिवाद) असा आहे मग स्त्रीने कशाला 'कर्तेपणाचे' ओझे वाढवून घ्यायचे? करू दे ना पुरुषाला ते (तरी) काम!

पण त्यामुळे होते काय की, अर्थार्जन करूनही स्त्रीला आर्थिक 'स्वायत्तता' मिळत नाही. स्वकष्टार्जित पैशाच्या गुंतवणुकीचे, विनियोगाचे पूर्ण निर्णय ती घेऊ शकत नाही आणि दुर्दैवाने एखादा 'प्रसंग' आला तर जन्मभर अर्थार्जन करून ती क्षणात कफल्लक होऊ शकते. (होतेच असे नाही.) होऊ शकते, ही शक्यता लक्षात घेऊन कमावत्या स्त्रीकडे तरी संपूर्ण आर्थिक कर्तेपण असणे गरजेचे आहे. उरला प्रश्न वाढीव जबाबदारीचा!

स्त्रीने अर्थार्जनाचा पुरुषांचा भाग उचलून बरेच दिवस झाले. त्यामानाने स्त्रीच्या गृहकर्तव्यांचा भार उचलण्यात पुरुष मागे राहिला आहे. तो त्याने घेतला तर दोघांच्याही पारंपरिक कामांमधल्या लाभ-हानीचेही दोघे समान वाटेकरी होतील. दोघांच्या अडचणी कळल्याने अधिक सौहार्द निर्माण होऊन खऱ्या अर्थाने गृहस्थाश्रम धन्य होईल. ''गृहिणी, सचिव...'' वगैरे सुभाषित केवळ शब्दात राहणार नाही.... एक लहानशी नोंद शेवटी - वयाच्या १८ व्या वर्षापासून गेली ५२ वर्षे सर्वार्थाने मी स्वत: आर्थिक कर्तेपण लाभ-हानीसह आनंदाने सांभाळीत आहे. असो.

# असेही अनुभव

**बी.** ए.ची वार्षिक परीक्षा अगदी तोंडावर आली होती. नोकरी करीत बहिस्थ म्हणून परीक्षा देणाऱ्या आम्ही चारपाचजणी मार्गदर्शनासाठी 'सरां'च्या घरी गेलो होतो. तसा पहिल्या वर्षांपासून आमचा शिरस्ताच होता. ठराविक विषयांसाठी आमचे काही सर आपल्या हातातली कामे बाजूला ठेवून आमच्यासाठी ऐनवेळी वेळ द्यायचे. नोकरीच्या वेळा संपल्यावर संध्याकाळी आम्ही अशाच एका सरांच्या बैठकीत जमलो होतो. सरांचे विवेचन सुरू होते. आमच्या लेखण्या वह्यांमध्ये कुरकुरत होत्या. संध्याकाळी साडेसातचा टोला घड्याळाने दिला आणि सर एकदम थांबले. सहजपणे म्हणाले, ''जरा थांबू या आपण. मी कुकर लावून येतो.'' सर उठून आत गेले आणि आम्ही एकमेकींच्याकडे 'हे काय आक्रित?' म्हणून बघतच राहिलो.

सर शांतपणे बाहेर आले आणि पुन्हा अगदी सहजपणे म्हणाले, ''काय आहे, की कुकर लावायची आज माझी पाळी आहे. घरात आम्ही संध्याकाळच्या कुकरच्या पाळ्या लावल्या आहेत. दोन दिवस मी, दोन दिवस मुलगा आणि दोन दिवस मुलगी. तुमच्या बाईंना संध्याकाळची तेवढीच सुट्टी, सकाळचा स्वयंपाक रोज त्या करतात. दिवसभर शाळेची नोकरी. संध्याकाळ त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे निश्चिंत घालवता यावी, म्हणून मीच हा पायंडा पाडला आहे.''

आजही खरे वाटू नये अशी ही हकीकत आहे की नाही? पण ही अगदी अनुभवलेली घटना आहे. चाळीस वर्षांपूर्वीची. नाशिकला प्रा. वि. बा. आंबेकर यांच्या घरातली.

असे एखादे काम घरात करण्याचे नवल नव्हते. तरीपण मराठीतले एक ख्यातनाम समीक्षक, लोकप्रिय विद्वान वक्ते, नाशिकच्या हं. प्रा. ठा. कॉलेजमधील मराठी विभागप्रमुख, हरि नारायण आपट्यांच्या घरात बालपणी घरोब्याचे संबंध असलेले. 'ज्ञानप्रकाश' या नावाजलेल्या वृत्तपत्रांच्या सहसंपादकांचे पुत्र आणि

नाशिकच नव्हे, तर महाराष्ट्रात विलक्षण आदरयुक्त दबदबा असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे हे सर प्रा. विष्णू बापूजी आंबेकर! सहज एखाद्या गृहिणीसारखे कुकर लावताहेत. हे पाहिल्यावर विशीच्या उंबरठ्यावर असलेल्या आम्हा मुलींना तेही चाळीस वर्षांपूर्वी एक आश्चर्यच होते.

पुढे सरांचा सहवास जसा वाढत गेला आणि समजही वाढत गेली तशी सरांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्येही उलगडत गेली. स्वच्छता, टापटीप, नेटकेपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होता आणि त्यासाठी ते स्वत:च आचरण करीत. चहाच्या कपाचे कान थोडे किटलेले दिसले की, एखाद्या रविवारी टूथब्रश घेऊन ते स्वत: साफ करीत आणि आठवडाभराचे आपले बाहेरचे कपडेही बगळ्याच्या पंख्यासारखे स्वच्छ धुवून टाकीत.

न्या. म. गो. रानडे आणि नंतरचे गोपाळकृष्ण गोखले यांचा वैचारिक वारसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात मुरला होता. आगरकर आणि हरि नारायण आपटे यांचा उदारमतवाद त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अंग बनून गेला होता. 'ज्ञानप्रकाश'चा लोकप्रबोधनाचे वारसा घरातच होता. 'आधी केले, मग सांगितले' हे उदारमतवादाचे, प्रबोधन सूत्र अंगात भिनले होते. केवळ स्त्री विषयीचाच नव्हे तर एकूणच माणसाचा माणूस म्हणून आदर करण्याचा तो वस्तुपाठ होता.

नंतर आणखी एक अनुभव आला तो घरातच! आमची एक आजी त्या काळातल्या सर्वसामान्य बायकांसारखीच श्रद्धाळू उपास-व्रते करणारी होती.

आजोबा मात्र साफ नास्तिक. कट्टर, बुद्धिनिष्ठ, विवेकवादी. एरवी आजीच्या व्रतवैकल्यांची, समजुतींची आम्हां नातवंडांसमोरही चेष्टा मस्करी करणारे.

आजीची सत्तरी उलटून गेल्यावर तिने एकदा सोळा सोमवारचे व्रत केले होते. खरे तर आता दिवसभर पाण्याचा घोटही न घेता उपवास तिला झेपत नव्हता पण तिचे व्रत निष्ठेने चालू होते. संध्याकाळी ती अगदी मरगळून जायची.

संध्याकाळी आजोबांनी देव्हाऱ्याजवळ पाट मांडलेला असायचा. आरतीची तयारी, वाटीत खडीसाखर, भांड्यात पाणी ठेवलेले असायचे. कशीबशी आरती करून खडीसाखेचा एक खडा; घोटभर पाणी तोंडात टाकून आजी झोपून जायची.

पहाटे पाचलाच अंगणात बंब पेटवला जायचा. आजोबांनीच तो पेटवून स्वत:ची आंघोळ उरकून पुन्हा भर-पेटवण घातलेले असायचे. आजी उठून स्नान करून देवपूजा करायची, तोवर आम्ही उठून तोंड धुवायच्या आत आजोबा कुकर शिजवून चुलीजवळ आजीच्या ताटात गरम भात-वरण वाढीत असायचे.

हे दृश्यही खूप काही संस्कार करून गेले. श्रद्धा हा वेगळा भाग आणि

घरातल्या माणसाविषयी प्रेम, आस्था, जिव्हाळा, माणुसकी हा वेगळा भाग तिथे पुरुष-स्त्री या सीमाच संपून जातात.

आमचे हे आजोबा ही त्यांच्या काळातली नाशिकमधली एक कर्तबगार, दबदबा असलेली असामी होती. शिक्षण, न्याय, वैद्यक शेती व्यापार, यंत्रे या सर्वांविषयी मूलभूत विचार आचार करणारी व्यक्ती शिक्षणाधिकारी (डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन) म्हणून नोकरी, नंतर शेती खरेदी करून, स्वत: राबणारे, शेतीमालाची प्रदर्शने हा प्रकार सत्तर वर्षांपूर्वी अंमलात आणणारे, चंदनाच्या आणि मोत्यांच्या व्यापाराचा प्रयोग करणारे आणि भात सडण्याच्या यंत्राची गिरणी नाशिकमध्ये साठ-सत्तर वर्षांपूर्वी सुरू करणारे, वैद्यकात मौलिक लेखन-संशोधन करीत असतानाच धर्मानंद कोसंबी या बौद्ध पंडितासमवेत पाली भाषेचा अभ्यास करून त्यांच्याबरोबर सिलोनच्या (श्रीलंका) प्रवासात साथ करीत बुद्ध तत्त्वज्ञानाची चिकित्सा करणारे माझे हे आजोबा म्हणजे आईचे काका रावसाहेब नारायण गोविंद पिंगळे! त्यांच्या सहवासात जी वर्षे दोन वर्षे संस्कारक्षम वयात राहण्याचा योग आला, त्याचा खूप फायदा झाला असे वाटते.

आणखी एक अनुभव तसा खूप उशिराचा. १९७५ नंतरचा. इस्लामपूरच्या जावडेकर कुटुंबीयांशी अंतरंग स्नेह झाल्यानंतरचा! अर्थात आचार्य शंकरराव जावडेकर (मृ. १९५५) यांची भेट शक्य नव्हती; पण त्यांच्या पत्नी श्रीमती सुशीलाबाई (मामी) जावडेकर त्यांच्या उत्तरायुष्यात खूप जवळच्या झाल्या. त्यांच्या स्वभावात विलक्षण संकोच; अनौपारिक गप्पा मारताना सहज म्हणून सांगितलेल्या घटना-प्रसंगातून आचार्य जावडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि उभयतांच्या दांपत्य जीवनातील सौहार्दाचे नेमके पैलू उलगडत गेले. काही भागासाठी त्यांना आग्रहाने लिहिते केले. त्यापैकी काही लेख त्या काळात सकाळ (कोल्हापूर)मध्ये प्रसिद्ध झाले होते. पुढे सविस्तर पुस्तक प्रकाशित केले. त्यातलाच हा एक अंश! (संदर्भ - आचार्य जावडेकर : पत्रे आणि संस्मरणे - संपा. तारा भवाळकर, लोकवाङ्मय प्रकाशन)

''लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २ एप्रिल १९१८ ला माझी वार्षिक परीक्षा होती. दोन्ही घरच्या मंडळींच्या संमतीनेच मी परीक्षेसाठी शाळेत गेले. आदल्या दिवशी संध्याकाळी लग्नाला आलेले लोक दुसऱ्या दिवशीच मी शाळेत आलेली पाहून थक्क झाले व तीसुद्धा एक चर्चाच झाली. जे सरळ असेल ते करायचे लोकमताला भिऊन चालायचे नाही, असा धडा मला पहिल्याच दिवशी मिळाला.'' (पृ. ४९)

आणखी एक आठवण मामी लिहितात -

''... मी इंग्लिश सहावीत गेले होतेच; तेव्हा सहावी सातवीचा अभ्यास घरी करून मी परीक्षेला बसावे असा बेत ठरला; पण १९१८ च्या ऑक्टोबरमध्ये आलेल्या इन्फ्लूएंझाच्या साथीत सगळेच आजारी पडलो व सगळ्यांचेच अभ्यास मंदावले. शेवटी पुढच्या वर्षी आम्ही पुण्यास आलो व तेथे अभ्यास करू लागलो. त्यावेळी आमच्याबरोबर दोन विद्यार्थी राहत होते. सर्वांनी मिळून स्वयंपाक वगैरे कामे करायची व सर्वांनीच अभ्यास करायचा हे सुरू झाले. यावेळेपर्यंत मला भाकरी नीट करता येत नसत. रोजच्या भाकरी दोन्ही वेळा श्री. जावडेकर स्वत:च स्टोव्हवर करीत व त्या पाहून पाहून नंतरच मी भाकरी शिकले. पुरुष जातीला अगर स्त्री जातीला कोणतीही गोष्ट शिकल्यावर अशक्य आहे असे नाही. ती साध्य होण्यासाठी प्रयत्न मात्र हवेत, असे ते सांगत.'' (पृ. ५२)

ही घटना घडली तेव्हा मध्ये खंड पडल्यानंतर आचार्य स्वत: एम. ए. (इतिहास)चा अभ्यास करीत होते. त्या आधीच त्यांची सार्वजनिक व राजकीय कामे सुरू झाली होती. स्वतंत्र लेखनही चालू होते.

स्त्री स्वातंत्र्याचा विचार इंग्रजोत्तर काळात जेव्हा जेव्हा चर्चेला आला, तेव्हा तेव्हा स्थितिप्रिय सनातनी पुरुषप्रधान व्यवस्था फार अस्वस्थ झालेली दिसते. त्या अस्वस्थतेपोटी ''बायका आता संसार सोडून जातील आणि पुरुषांना घरकामाला जुंपतील'' अशी हाकाटी सुरू केली होती. यात ''बायकांचे कार्यक्षेत्र घर आणि घरकाम हेच आहे. पुरुषांनी घरकाम करणे... बायकांची कामे करणे हे कमी दर्जाचे आहे, ''हा भाव निहित असतोच. या धारणेच्या पलीकडे जाऊन विचार करण्याचा विचारही ही प्रवृत्ती करू शकत नाही. अजूनही फारसा नाही. अशावेळी प्रत्यक्षातले हे सुमारे पन्नास वर्षांपूर्वीचे अनुभव खूप मोठ्या क्षितिजांना स्पर्श करतात, याच देशात, याच समाजात स्त्री-पुरुष भेदातीत असा नित्य कौटुंबिक कामाचा विचार आणि सहज आचार करणारी ही (विशेषत: पुरुष) माणसे फार पूर्वीच पाहिली तेव्हा तर हे कौटुंबिक आणि सामाजिक सुसंस्कृततेचे मानदंड वाटलेच, पण आजही ते मत बदलावे, असे वाटत नाही. आज काही घरांतून बदल होत आहेत, ही समाधानाची बाब आहे.

# संक्षिप्त व्यक्ति परिचय

१. नाव : डॉ. श्रीमती तारा भवाळकर

२. शिक्षण : एम. ए., पीएच. डी. (पुणे विद्यापीठ)
शालान्त परीक्षेनंतरचे सर्व शिक्षण नोकरी करीत बहिस्थ पद्धतीने

३. विशेष अभिरूचीचे विषय : लोकसंस्कृती, लोकसाहित्य लेखन,
नाटक, दिग्दर्शन, अभिनय, समीक्षा, संशोधन इत्यादी
नाट्यांगे, वैयक्तिक अभिनयासाठी राज्यनाट्य स्पर्धेत अनेक पुरस्कार
लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला इत्यादी विषयात विशेष
रस. त्यासाठी क्षेत्रीय कार्य. अनेक चर्चासत्रांतून सहभाग, राष्ट्रीय
व आंतरराष्ट्रीय स्तरांवर शोधनिबंध सादर.

४. परदेश प्रवास : १९९१ अरिझोना स्टेट युनिव्हर्सिटी, अमेरिका. चर्चासत्रासाठी
निमंत्रणावरून सहभाग. अमेरिका व इंग्लंड प्रवास.

५. विविध उपक्रमातील सहभाग :
१. स्त्री समस्या व एकूणच सामाजिक परिवर्तन विषयक उपक्रमात सहभाग
२. स्त्रीवादी समीक्षा-विशेषतः लोकसाहित्याची- हे नवे संशोधन
३. विविध विषयांवर महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्रातील विविध संस्था व विद्यापीठातून व्याख्याने चर्चासत्रे इत्यादीत सहभाग
४. अनेक सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमात सहभाग
५. विविध संस्थांत पदाधिकारी म्हणून काम

६. काही महत्त्वाच्या कोशनिर्मितीत सहभाग :

| | | |
|---|---|---|
| १. मराठी वाङ्मय कोश | ९ लेख | १९७८-७९ |
| २. मराठी ग्रंथकोश | ७ लेख | १९८५ |
| ३. मराठी समाजविज्ञान कोश | ३ लेख | १९८९ |
| ४. मराठी विश्वकोश (वाई) | ४ लेख | |

५. (लोकसाहित्य विभागासाठी अतिथी संपादक म्हणून काम)
६. शिल्पकार चरित्रकोश - २००९-१०

७. विविध साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे :
१. इस्लामपूर - जागर साहित्य संमेलन
२. उचगाव - (बेळगाव) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रदेशीय सा.संमेलन
३. कारदगा - (बेळगाव) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रदेशीय सा.संमेलन
४. अलिबाग - (आवास) कोकण मराठी साहित्य परिषद, पहिले महिला साहित्य संमेलन
५. जळगाव - सूर्योदय साहित्य संमेलन

## प्रकाशित ग्रंथसूची :
## लेखक डॉ. तारा भवाळकर

| अ.क्र. | शीर्षक |
|---|---|
| १. | राणीसाहेब रुसल्या (एकांकिका) |
| २. | मधुशाला (बच्चनकृत काव्यानुवाद) |
| ३. | यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा |
| ४. | यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा |
| ५. | प्रियतमा (गडकरी साहित्यातील स्त्री प्रतिभा) |
| ६. | लोकनागर रंगभूमी |
| ७. | महामाया (डॉ. रा. चि. ढेरे यांच्या सहयोगाने) |
| ८. | मिथक आणि नाटक |
| ९. | लोकसंचित |
| १०. | लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा |
| ११. | स्त्री मुक्तीचा आत्मस्वर |
| १२. | माझिये जातीच्या |
| १३. | मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद |
| १४. | आचार्य जावडेकर : पत्रे आणि संस्मरणे (प्रस्तावना व संपादन) |
| १५. | लोकसाहित्य : वाङ्मय प्रवाह |
| १६. | कुमारभारती (१२ वी, संपादन) |
| १७. | मराठी लोकसाहित्य (एम. ए. १ व २ साठी) |
| १८. | मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे |
| १९. | मायवाटेचा मागोवा (स्त्रीवादी दृष्टिकोनातून लोकसाहित्याचे पुनराकलन) |
| २०. | तिसऱ्या बिंदूच्या शोधात |
| २१. | लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिभा |
| २२. | बोरीबाभळी (रा. रं. बोराडे यांच्या ग्रामीण स्त्रीविषयक कथांचे संपादन व प्रस्तावना) |

२३. पायवाटेची रंगरूपे (आत्मकथनपर लेख संग्रह)

२४. आकलन आणि आस्वाद

२५. लोकसंस्कृतीची शोधयात्रा
(डॉ. रा. चिं. ढेरे व्यक्ती आणि वाङ्मय)

२६. माझिये जातीच्या (२ री आवृत्ती)

२७. लोकांगण (लोकसंस्कृती विषयक)

२८. लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा

२९. मनातले जनात

# प्राप्त पुरस्कार, पारितोषिके, सन्मान

| अ.क्र. | साल | पुरस्कार |
|---|---|---|
| १. | १९६९,१९७२,१९७४ | महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा, वैयक्तिक अभिनयासाठी प्रमाणपत्रे |
| २. | १९७५ | महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा, वैयक्तिक अभिनयासाठी रौप्यपदके |
| ३. | १९८२ | पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट पीएच. डी. प्रबंधासाठीचा पुरस्कार |
| ४. | १९९० | बँक ऑफ बडोदा, सांगलीचा कृतज्ञता पुरस्कार |
| ५. | १९९२ | महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार 'लोकसंचित' या पुस्तकासाठी |
| ६. | १९९४ | अखिल भारतीय दलित साहित्य ॲकॅडमी दिल्लीची डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरववृत्ती (फेलोशिप) |
| ७. | १९९५ | 'मंगल पुरस्कार' कोल्हापूर-विशेष कर्तृत्ववान स्त्री साठी - साहित्यिक क्षेत्रातील कार्याबद्दल |
| ८. | १९९६ | श्री. ना. बनहट्टी पुरस्कार, पुणे नगरवाचन मंदिर, पुणेतर्फे 'मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद' या पुस्तकासाठी |
| ९. | १९९६ | वि. म. गोखले पुरस्कार, मा. सा. परिषद, पुणेतर्फे 'मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद' पुस्तकासाठी |
| १०. | १९९६ | विशेष वाङ्मय पुरस्कार, वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगावतर्फे 'माझिये जातीच्या' पुस्तकासाठी |
| ११. | १९९८ | वाङ्मय समीक्षा प्रथम पुरस्कार, वाङ्मय |

| | | |
|---|---|---|
| | | चर्चा मंडळ, बेळगातर्फे 'मराठी नाटक : नव्या दिशा नवी वळणे' या पुस्तकासाठी |
| १२. | २००४ | कै. मालतीबाई दांडेकर 'जीवनगौरव' पुरस्कार साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांच्या वतीने |
| १३. | २००५ | के. प्र. महिला गौरव पुरस्कार |
| १४. | २००६ | शिवलीला सांस्कृतिक कलामंच, सांगली तर्फे महिला गौरव पुरस्कार |
| १५. | २००६ | विशाखा वतने पुरस्कार : शब्दपंढरी, लातूरतर्फे 'आकलन आणि आस्वाद' पुस्तकासाठी |
| १६. | २००६ | महाराष्ट्र साहित्य परिषद गौरव पुरस्कार पुणे |
| १७. | २००७ | शरच्चंद्र चटोपाध्याय पुरस्कार, पुणे |



स्त्रीविषयक लेखन म्हणजे केवळ स्त्रियांनीच लिहिण्या-वाचण्यासाठी असते, या (अप) समजातून बाहेर येऊन सुजाण असलेल्या आणि सुजाण होऊ पाहणाऱ्या सर्वच स्त्री-पुरुषांनी ते वाचावे; कारण जन्मापासून आपण सर्व स्त्री-पुरुष विविध नात्यांनी बांधलेले असतो. म्हणून समाजातला कोणताही प्रश्न केवळ स्त्रियांचा वा पुरुषांचा सुटा नसतो. ते एकमेकांशी बांधलेले असतात. म्हणून सर्वांचीच समज जशी विकसित होत जाते तसे जगणेही सहज स्वास्थ्यमय होऊ शकते. सुटा विचार हा एकूणच विचार-आचाराचा पैस विस्तारण्याच्या सोयीचा एक भाग असतो. तो सवता-सुभा नसतो. निदान आता एकविसाव्या शतकात आपण सर्वांनी असा विचार करायला हरकत नसावी.

आकांक्षा
प्रकाशन
नागपूर